# अर्थसंवाद

अ

खंड 21, अंक 3
ऑक्टोबर-डिसेंबर, 1997
भारतीय सौर आश्विन-मार्गशीर्ष 1919

- सामयिक बाजार व सामयिक चलन
- सेवा क्षेत्र
- पाणी उपयोगितेचे खाजगीकरण
- मुंबईतील राखी व्यवसाय
- अर्थशास्त्रातील नोबेल
- रुपयाची परिवर्तनीयता

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 21, अंक 3 ऑक्टोबर–डिसेंबर 1997

● प्रमुख संपादक
रवीन्द्र दोशी

● सहायक संपादक
अजित डांगे

● सल्लागार मंडळ
(1997–2000)
कुमुद पोरे
एस. के. जी. सुंदरम
भगवान म्हस्के
विनायक देशपांडे

● संपादकीय पत्रव्यवहार
रवीन्द्र दोशी,
526/1, सूर्यवंशी लेआऊट,
'एलोरा गार्डन'
अपार्टमेंटस् समोर, सम्राट नगर,
कोल्हापूर–416 008
दूरध्वनी :
[0231] 656963

## अनुक्रमणिका

231 सामयिक बाजार आणि सामयिक चलन
भा. रा. ढेकणे

243 आर्थिक विकास, अर्थव्यवस्थेतील उत्पन्न / उत्पादन रोजगारातील क्षेत्रीय बदल आणि सेवा क्षेत्र
किर्ती केळकर

256 पाणी उपयोगितेचे खाजगीकरण व विनियमन : जागतिक अनुभवाचे धडे
जेनिस ए. बीकर / बाळकृष्ण कुलकर्णी

269 मुंबईतील राखी व्यवसाय
स्वाती वैद्य

281 अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक
यशवंत राराबीकर

288 रुपयाची परिवर्तनीयता
शि. ना. माने

295 टिपणे
कु. [illegible] / [illegible]

305 ग्रंथ परीक्षण - (1) व (2)
[illegible] खेर / मृणालिनी फडणवीस

318 सांख्यिकी पुरवणी (27)
रवीन्द्र दोशी

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ

( 1997-98 )

**अध्यक्ष**

दि. व्यं. जहागिरदार

**कार्याध्यक्ष**

व्यं. सु. पाटणकर

**कार्यवाह–खजिनदार**

आ. गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

रवीन्द्र दोशी

**सदस्य**

शिवाजी पाटील
रमेशचंद्र बेराड
दिलीप पाटील
बाळकृष्ण कुलकर्णी
नंदकिशोर सुदा
कृष्णराव भोसले
विनायक देशपांडे
सुभाष माने
सुरेंद्र देसाई
अनिल पडोशी
सुलोचना मानकर
खासेराव शितोळे

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, इत्यादी)


**डॉ. आ. गो. पुजारी,**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
प्रपाठक, नेहरू सामाजिकशास्त्र विद्यास्थान,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे 411 037
(दूरध्वनी : 440856 / 436888 / 425068)


■ **परिषदेचे प्रमुख कार्यालय :**


मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा / सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई 400 014.


■ **वर्गणी :**

**(अ) परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु. 100 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 100 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

**(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 100 (वार्षिक)

( इ ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पुण्याला पाठवावी.


■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

( 1 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
( 2 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
**(टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)**

# सामयिक बाजार आणि सामयिक चलन

मा. रा. ढेकणे *

युरोप खंडामध्ये सध्या राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात अतिमहत्त्वाच्या घडामोडी होत आहेत. अर्थशास्त्राच्या अभ्यासकाने या घडामोडींकडे सतत लक्ष देऊन त्याचा परामर्श घ्यावा इतके त्या घडामोडींचे महत्त्व आहे. जागतिकीकरणाचा वेग व व्याप्ती वाढत आहे. युरोपातील आर्थिक घडामोडींचा भारताच्या आर्थिक हितसंबंधांवर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही. म्हणून युरोपातील आर्थिक घडामोडींचे स्वरूप काय आणि त्यांचा उद्देश काय हे समजाऊन घेणे बोधप्रद होईल. कदाचित युरोपातील या घडामोडींपासून आपल्यालाही काही शिकण्यासारखे खास असेल.

विख्यात सेनानी नेपोलियन बोनापार्ट यांच्या मनात अखंड युरोपचे स्वप्न होते. ते स्वप्न साकार करण्याचे त्यांचे मार्ग वेगळे आणि मुख्यतः लष्करी स्वरूपाचे होते. नेपोलियन आपले स्वप्न साकार करू शकले नाहीत. परंतु त्यांनी युरोपला एक कायदा (code) दिला आणि त्या कायद्याचे राजकीय व सामाजिक परिणाम थोड्याफार प्रमाणात का होईना युरोपातील समाजावर आजही होत आहेत. अलीकडच्या काळात युरोपातील बहुसंख्य राष्ट्रे एकत्र येऊन एकप्रकारचा अखंड युरोप स्थापन करू पहात आहेत. परंतु या प्रयत्नांचे मार्ग वेगळे आहेत, त्यांची उद्दिष्टे वेगळी आहेत आणि या प्रयत्नातील टप्पेही भिन्न आहेत. पूर्वीचे वैरभाव विसरून ही राष्ट्रे, विशेषतः फ्रान्स व जर्मनी, एकत्र येत आहेत. 1871 चे फ्रँको–जर्मन युद्ध, पहिले महायुद्ध व दुसरे महायुद्ध यामुळे या दोन राष्ट्रांतील यादवी युद्ध ही पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांचे एकत्र येणे ही सामान्य गोष्ट नाही.

युरोपातील राष्ट्रे एकत्र येण्यासाठी जे विविध प्रयत्न करीत आहेत. त्यांचा मागोवा घेणे योग्य होईल. 1951 मध्ये सहा राष्ट्रे एकत्र येऊन त्यांनी एक करार केला. त्याचे नाव 'Treaty of Paris'. या करारान्वये या सहा राष्ट्रांनी कोळसा व पोलाद या साधनसामग्री संबंधी एक संघटना स्थापन केली. तिचे नाव 'Euro–

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, पुणे.

pean Coal and Steel Community'. या संघटनेचे कार्य 1952 मध्ये सुरू झाले. अणुशक्तीसंबंधी अशीच एक संघटना स्थापन केली. तिचे नाव European Atomic Energy Community' (EURATOM). 1957 मध्ये एक नवीन व व्यापक स्वरुपाचा करार (Treaty of Rome) या सहा राष्ट्रांनी केला आणि तो 1958 मध्ये कार्यान्वित झाला. या करारान्वये एक नवीन संघटना स्थापन झाली आणि तिचे नाव 'European Economic Community' हे होय. 1967 मध्ये तिन्ही संघटना विलीन होऊन एक नवीन संघटना उदयाला आली. तिचे नाव 'European Community' (EC) असे होते. या संघटना स्थापन करण्यामध्ये ज्या सहा राष्ट्रांनी पुढाकार घेतला होता ती राष्ट्रे म्हणजे फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जियम, नेदरलँड, लक्झेंबर्ग ही होत. 1973 मध्ये इंग्लंड, आयर्लंड व डेन्मार्क यात सामील झाली. 1981 मध्ये ग्रीस व 1986 मध्ये स्पेन व पोर्तुगाल ही राष्ट्रे येऊन मिळाली. संघटनेची एकूण संख्या 12 झाली.

ही राष्ट्रे एकत्र येण्यामध्ये कोणती कारणे असावीत? मुख्यत: दोन कारणे संभवतात. गरजेच्या मानाने आपली साधनसामग्री मर्यादित आहे याची या प्रत्येक राष्ट्राला जाणीव होऊ लागली होती. आपण एकत्र आलो तर साधनसामग्रीत थोडी भर पडेल आणि त्याचा योग्य प्रकारे उपयोग करता येईल असे त्यांना तीव्रपणे वाटू लागले होते. या राष्ट्रांची उत्पादनसाधने एकमेकांना पूरक होऊन त्यांचा कार्यदक्षतेने उपयोग करण्याचा मार्ग म्हणजे एकत्र येणे हाच होय. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे युद्धोत्तर कालात अनेक युरोपीय राष्ट्रांना राष्ट्र उभारणीसाठी भांडवलाची अत्यावश्यकता होती आणि हे भांडवल पुरविणारे राष्ट्र म्हणजे अमेरिका हेच होय यात शंका नव्हती. दुसऱ्या महायुद्धामध्ये युरोपची अर्थव्यवस्था कोलमडून पडली होती. युरोपीय राष्ट्रांच्या पुनरुत्थानासाठी, विकासासाठी मोठ्या भांडवली खर्चाची जरुरी होती. याचवेळी अमेरिकेने या राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर द्रव्यसाहाय्य केले होते. ते 'मार्शल साहाय्य' (Marshall Aid) म्हणून ओळखले जाते. ही मदत देताना अमेरिकेने अशी अट घातली होती की, मदत घेणाऱ्या राष्ट्रांनी एकमेकांना साहाय्य केले पाहिजे. युरोपमध्ये सहकार्याची भावना जागृत होतीच. परंतु अमेरिकेच्या या अटीमुळे या सहकार्याला अधिक बळकटी आली.

पश्चिम युरोपातील राष्ट्रे एकत्र येण्याचे आणखी एक कारण म्हणजे सोविएत रशिया व साम्यवाद यांची भीती हे होय. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या एकीचा जनक स्टालिन हाच होय. अमेरिकेने या राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर मदत केली याचा मुख्य हेतू त्या राष्ट्रांना रशियापासून व साम्यवादापासून वाचविणे हाच होता.

युरोपीय राष्ट्रांच्या एकीकरणाला राजकीय बाजू होती. त्याचा थोडक्यात विचार करणे योग्य होईल. या राजकीय बाजूचे मुख्य घटक म्हणजे युरोपातील संसद, मंत्रीमंडळ (Council of Ministers) आणि आयोग (Commission) हे होत. सहभागी राष्ट्रे आपले प्रतिनिधी थेट पद्धतीने निवडून संसदेत पाठवितात. भौगोलिकदृष्ट्या इंग्लंड हे राष्ट्र युरोपपासून जरी अलग असले तरी त्या राष्ट्राचा प्रतिनिधी या संसदेत बसतो. पार्लमेंटच्या निर्णयाची अमलबजावणी करण्यासाठी आयोगाची नेमणूक होते. या आयोगाच्या कार्यावर देखरेख करण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रीमंडळाची योजना केली आहे. युरोपीय पार्लमेंटचे अधिकार पुढीलप्रमाणे सांगता येतील. "It has the right to be consulted in the legislative process of European Community; it asks frequent questions of the Commission and the Council; it maintains Standing Committees which debate policy at expert level; it holds well-attended public sessions; it can dismiss the Commission by a two-thirds majority vote of no confidence and it has been promised a margin of budgetary power." युरोपीय संघाच्या मूळ आकृतीबंधाप्रमाणे आयोगाने सूचना करावयाच्या, संसदेने त्यावर विचार करून अभिप्राय द्यावयाचा आणि मंत्रीमंडळाने त्याप्रमाणे कार्यवाही करावयाची. परंतु अनुभव असा आहे की, अधिकार संसदेकडून आयोगाकडे आणि आयोगाकडून मंत्रीमंडळाकडे सतत झिरपत असतात. परराष्ट्र धोरणे व स्थानिक प्रश्न याबाबतीत संसद किंवा आयोग याना फारसे काही करावयाला वाव मिळत नाही. मंत्रीमंडळच सर्व काही पाहात असते. परंतु हे सर्व तितके सरळ किंवा सोपे दिसत नाही. एकमेकाच्या अधि-

कारावर अतिक्रमण होण्याची नेहमीच शक्यता असते.

निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये आयोग (Commission) हा युरोपीय संघाचे मर्मस्थान आहे. सध्या आयोगामध्ये 20 सभासद आहेत. हे सभासद सहभागी राष्ट्रांकडून नेमले जातात आणि त्यांची मुदत 5 वर्षे असते. परंतु त्यांना मुदतवाढ मिळू शकते. प्रत्येक सहभागी राष्ट्र एक प्रतिनिधी आयोगाकडे नियुक्त करते. परंतु काही मोठी राष्ट्रे प्रत्येकी दोन प्रतिनिधी पाठवू शकतात. हे प्रतिनिधी आयोगाचे सभासद झाल्यानंतर त्यांना स्वतःच्या राष्ट्राच्या निष्ठेचा त्याग करून निःपक्षपातीपणे आयोगात काम करावे लागते. आयोगाचे मुख्य काम म्हणजे नवीन कायद्यांविषयी संघटनेला सूचना पाठविणे, वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे, घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करणे, स्वतः पुढाकार घेऊन स्वतंत्रपणे मंत्रीमंडळाकडे सूचना पाठविणे, वगैरे. मंत्रीमंडळाचे सभासद सहभागी राष्ट्रांकडून पाठविले जातात. त्यांची नेमणूक कायम स्वरूपाची अथवा काही मुदतीपुरती नसते. मंत्रीमंडळापुढे जे विषय चर्चेला किंवा निर्णयाला येतात तेव्हा त्या विषयातील तज्ज्ञ माणसाला प्रत्येक राष्ट्र आपला प्रतिनिधी म्हणून नियुक्त करते. मंत्रीमंडळाचा अध्यक्ष दर सहा महिन्यांनी बदलत असतो. मंत्रीमंडळाच्या सभा नियमितपणे होत असतात. सध्या 15 राष्ट्रांचे प्रतिनिधी या मंडळावर असतात. भारताला परिचित असलेले रॉय जेन्किन्स (आता लॉर्ड जेन्किन्स) काही वर्षांपूर्वी आयोगाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कामाची बरीच प्रशंसा होते, कारण त्यांनी आयोगाच्या कामात बराच जिवंतपणा आणला होता. युरोपीय संघाचे मुख्य कार्यालय ब्रुसेल्स येथे आहे. ब्रुसेल्सच्या मंत्रालयात सध्या 2,300 कर्मचारी आहेत. सहभागी राष्ट्रांची शिष्टमंडळे ब्रुसेल्स येथे ठाण मांडून असतात. अशा प्रकारे संसद, आयोग व मंत्रीमंडळ मिळून युरोपीय संघाची एक नवीन संस्था निर्माण झाली आहे. ही झाली युरोपीय संघाची राजकीय बाजू.

युरोपीय संघाची महत्त्वाची कामगिरी म्हणजे सामयिक बाजाराची (common market) स्थापना ही होय. संघातील 15 राष्ट्रांनी आंतरप्रान्तीय व्यापारावरील बंधने शक्यतो काढून टाकली आहेत. स्थानिक करांव्यतिरिक्तची विनियनात्मक,प्रक्रियात्मक बंधने वगैरे अडचणी दूर केल्यामुळे या 15 राष्ट्रांमध्ये एक मोठा बाजार निर्माण झाला आहे. त्यामुळे वस्तू, सेवा, भांडवल आणि श्रम यांची चलनशीलता खूपच वाढली आहे. युरोपीय संघाच्या बाहेरील देशांबरोबर व्यापारी संबंध कसे असावे, कोणती धोरणे ठरवावीत यासंबंधीचे निर्णय घेण्यासाठी ही 15 राष्ट्रे एकत्र येतात आणि व्यापारी धोरणे ठरवितात. आता यापुढे प्रत्येक राष्ट्राचे वेगळे व्यापारी धोरण असणार नाही. एक बाजार आणि एक व्यापारी धोरण. त्यामुळेच बाहेरच्या जगाशी व्यवहार करताना या युरोपीय राष्ट्रांना नवे बळ प्राप्त झाले आहे. युरोपात सामयिक बाजार स्थापन करण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आणि आजही निर्माण होत आहेत. युरोपीय संघातील प्रत्येक राष्ट्राने आपल्या व्यापार व उद्योगविषयक धोरणात सामयिक तत्त्वाला सुसंगत असेच फेरबदल करणे जरूर असते, हे फरक त्या राष्ट्राची व पर्यायाने युरोपीय संघाची स्पर्धात्मकता वाढविण्याच्या दृष्टीने झाले पाहिजेत. संघातील प्रत्येक व्यक्तीने, प्रत्येक उपक्रमाने स्वतःच्या पायावर ताठ उभे राहिले पाहिजे. तरच सामयिक बाजार आकार घेऊ शकेल आणि तरच त्याची फळे पदरात पडतील. उपक्रमाला किंवा व्यक्तीला कृत्रिम टेकू देऊन उभे करण्याचा मोह टाळला पाहिजे. या ठिकाणी मार्गारेट थॅचर यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची आठवण होईल.

बेल्जियममधील रेनॉ मोटार कंपनी बंद केली त्यावेळी ज्या प्रतिक्रिया उमटल्या त्या लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. मागणीच्या मानाने उत्पादन जास्त झाल्यामुळे या कंपनीला सतत तोटा सहन करावा लागत असे. हे किती काल चालणार? शेवटी कंपनीने उत्पादन बंद केले आणि त्यामुळे हजारो कामगार बेकार झाले. त्यावेळी अनेकांनी कंपनीला दोष दिला. त्यामध्ये आयोगाचे अध्यक्ष सेन्टर हेही होते. त्यांच्या मते कंपनीचे उत्पादन बंद करण्याआधी कामगार वर्गाबरोबर विचारविनिमय करावयाला हवा होता. काहींच्या मते कामगारवर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी नवीन कायदा करावयाला हवा होता. भूतपूर्व ब्रिटिश पंतप्रधान जॉन मेजर यांच्या मते राष्ट्राने किंवा व्यक्तीने कोणता आदर्श निवडावा हाच तो मुख्य प्रश्न आहे. अलीकडच्या काळात इंग्लंड या राष्ट्राने जी आर्थिक प्रगती केली त्याचे कारण त्या देशाने साहसी उपक्रम आदर्शाची

(enterprise model) निवड केली हेच होय. याउलट युरोपातील देशांनी सामाजिक आदर्शाची (social model) निवड केली. त्यामुळे युरोपातील उद्योगांची कार्यदक्षता व स्पर्धात्मकता कमी झाली आहे. जगाच्या आर्थिक क्षेत्रात आज जे विचाराचे नवीन वारे वाहात आहेत, जी नवीन विचारसरणी प्रभावी होत आहे तिच्याशी आता जुळवून घेतले पाहिजे हा विचार बळावत आहे. हे नवीन अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञान निर्विनियमन (deregulation), खाजगीकरण (privatisation) आणि उदारीकरण (liberalisation) या तीन संकल्पनांत गुंफले आहे.

सामयिक बाजाराचे मुख्य प्रणेते दोन होते: एक फ्रान्सचे समाजवादी जॅक्स डेलॉर्स (Jacques Delors) आणि दुसरे ब्रिटिश टोरी पक्षाचे लॉर्ड कॉकफील्ड (Lord Cockfield). समाजवादी व भांडवलशाही विचारसरणी यांचा हा समन्वय लोकविलक्षणच म्हटला पाहिजे. सामयिक बाजाराचा हा प्रकल्प 210 निर्देशक तत्त्वांवर आधारित आहे. या निर्देशक तत्त्वांचा मिळून एक कायदाच झाला आहे आणि त्याने 15 राष्ट्रांची नियमावली रद्दबादल केली आहे, कारण त्या नियमावलीचे स्वरूप संरक्षणात्मक (protectionist) होते. राष्ट्राराष्ट्रातील व्यापारावर अनेक प्रकारचे निर्बंध होते. त्यामुळे युरोपातील एकूण व्यापारावर त्यांचा प्रतिकूल परिणाम होत असे. सर्व राष्ट्रांचा एक बाजार स्थापन करावयाचा तर हे सर्व निर्बंध दूर करणे अत्यावश्यकच होते. युरोपीय आयोगाच्या सतत दडपणामुळे हे निर्बंध दूर झाले आहेत आणि होत आहेत.

व्यापाराला हानीकारक असे निर्बंध काढले तरी सामयिक बाजाराचे योग्य प्रकारे विनियमन करण्यासाठी काही नियम करणे क्रमप्राप्त होते. निर्विनियमन म्हणजे विनियमन अजिबात नसणे नव्हे. बाजार पूर्णत्वाने एक बाजार होण्यासाठी काही विनियमन करणे जरूर असते. त्यासाठीच संघाच्या आयोगाला सहभागी राष्ट्रांच्या व्यापारविषयक धोरणावर सतत लक्ष ठेवावे लागते आणि नवीन नियमांचे योग्य पालन होत नसेल तर दोषी राष्ट्रांना ताकीद द्यावी लागते. नियमभंगासाठी आयोगाने आजपर्यंत ग्रीस, फ्रान्स, इंग्लंड या राष्ट्रांना ताकीद दिली आहे. वीज, गॅस, वाहतूक क्षेत्रांत शासकीय एकाधिकार आहे. परंतु ते हळूहळू बंद करून त्या क्षेत्रांत खाजगी उपक्रमाला आणि पर्यायाने स्पर्धेला प्रवेश करू दिला जात आहे. हवाई वाहतूक या महत्त्वाच्या क्षेत्रात शासकीय एकाधिकार आहे. परंतु त्यालाही काळाची पाऊले ओळखून आपली आकाशे खुली करून द्यावी लागणार आहेत. डाक सेवा (postal services) आज सरकारी एकाधिकार आहे. परंतु सन 2003 पर्यंत या सेवेचेही खाजगीकरण होणार आहे.

युरोपातील 15 सहभागी राष्ट्रांच्या व्यापारात येणारे अनेक अडथळे आयोगाने दूर करून संघातील एकूण व्यापार खुला करून एक मोठा बाजार निर्माण केला यात शंका नाही. परंतु प्रश्न असा विचारावासा वाटतो की, आयोगाच्या या कामगिरीची एकूण फलश्रुती काय? आयोगाच्या योजनांचा 15 सहभागी राष्ट्रांच्या अभिवृद्धीवर (growth) अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम झाला असेल तो काय व किती होता? या राष्ट्रसमूहाच्या अभिवृद्धीवर अनुकूल परिणाम झाला आहे यात शंका नाही. परंतु या प्रश्नाचा बारकाईने शोध घेण्यासाठी आजपर्यंत 38 वेळा तपशिलवार अभ्यास केला गेला आहे. आणि त्याचा निष्कर्ष असा की, युरोपीय संघाचे वार्षिक उत्पन्न दीड टक्क्याने वाढले आहे, 300 अब्ज नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत आणि चलनफुगवटा कमी झाला आहे. हे फायदे चांगले असले तरी ते अपेक्षेपेक्षा कमी आहेत. युरोपीय संघाचे उत्पन्न प्रतिवर्षी साडेचार ते साडेसहा टक्के इतके वाढेल असा सेचिनी (Cechini) अहवालाचा अंदाज होता. तसे झाले नाही तरी एकूण परिस्थिती निराशाजनक मुळीच नाही. मारिओ मॉंटी (Mario Monti) यांच्या मते ही केवळ सुरुवात आहे. जर्मन राष्ट्राचे एकीकरण झाल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी व मंदीची हवा यामुळे अपेक्षित वाढ झाली नाही.

अपेक्षित अभिवृद्धी झाली नाही याला केवळ हीच कारणे नव्हती. सामयिक बाजार स्थापन करण्यासाठी सहभागी राष्ट्रांनी जी पथ्ये पाळावयाला हवी होती ती त्यांनी पाळली नाही. हा बाजार अस्तित्वात येऊन आता दहा वर्षे पूर्ण झाली तरी सहभागी राष्ट्रांनी आयोगाचे दंडक पाळले नाहीत. याबाबतीत ऑस्ट्रिया

व जर्मनी ही दोन राष्ट्रे सर्वांत दोषी आहेत. आयोग आणि सहभागी राष्ट्रे यामध्ये जेव्हा वाद निर्माण होतो तेव्हा कुरकुरत का होईना आयोगाचे म्हणणे मान्य करावे लागते. 1973 ते 1995 या कालखंडात आयोगाने 168 अर्थसाहाय्याची ( subsidies ) शासकीय प्रकरणे नामंजूर केली आहेत. एवढेच नव्हे तर ज्याना ती मदत मिळाली त्याना पैसे परत करावयाला लावले. कंपन्यांच्या विलिनीकरणाची ( mergers ) प्रकरणे नामंजूर केली आहेत. त्यापैकी काही प्रस्ताव सहभागी राष्ट्रांनीच सादर केले होते. रासायनिक उद्योग, बांधकाम सामग्री, सिमेंट या धंद्यांतील विक्रयनियंत्रण संघ ( cartels ) आयोगाने मोडून काढले आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्यावर जबर दंड बसविले आहेत.

आयोगाच्या कामात नोकरशाहीचे दोष अनुभवाला येऊ लागले आहेत अशी तक्रार ऐकू येते. परंतु शासनाच्या विविध शाखांकडे हेलपाटे घालण्यापेक्षा एका आयोगाबरोबर व्यवहार करणे अधिक सोईचे वाटते हा अनुभव अधिक महत्त्वाचा आहे. पूर्वीचा राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहाराचा अनुभव लक्षात घेता सामयिक बाजाराचे काम समाधानकारक आहे. परंतु बाजार अजून पूर्ण झालेला नाही. अजून बरेच काही करावयाचे राहिले आहे. कंपन्यांसंबंधीचे कायदे, हिशोबाचे निकर्ष, कार्यभार ग्रहण ( takeover ), करव्यवस्था, वगैरेसंबंधी राष्ट्राराष्ट्रांत आज जे कायदे आहेत, ज्या पद्धती आहेत त्याना सुसंवादी करणे याविषयी निश्चित धोरण आखणे आणि नियमावली तयार करणे ही कामे अजून पूर्ण व्हावयाची आहेत.

शासनाकडून मिळणारे अर्थसाहाय्य आणि कंत्राटी कामे देण्याविषयीचे धोरण हे दोन्ही प्रश्न वादग्रस्त होऊन बसले आहेत. बहुतेक राष्ट्रे कामाची कंत्राटे देताना स्वदेशी कंपन्यांना झुकते माप देतात. देशाबाहेरच्या कंपन्यांच्या अटी अधिक फायदेशीर असल्या तरी त्यांचा स्वीकार होत नाही. स्वदेशीचे हे प्रेम सामयिक बाजाराच्या (single market) धोरणाशी विसंगत आहे. यालाच "dark hole of the single market" असे संबोधिले जाते. आयोगाने घालून दिलेल्या नियमाविरुद्ध कार्य केल्याबद्दल आयोगाने इंग्लंड, जर्मनी, बेल्जियम, फ्रान्स, पोर्तुगाल यांच्या विरुद्ध दंडयोजना केली आहे. शासनाकडून मदत घेऊन काही उद्योग जिवंत ठेवले जातात, कारण असे उद्योग स्पर्धेमध्ये टिकून राहणार नाहीत अशी भीती असते. सामयिक बाजाराच्या धोरणाशी हेही विसंगत आहे. जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत अशी मदत देण्याचे प्रमाण वाढले आहे. शासकीय मदत घेणाऱ्या उद्योगांत काही विमान कंपन्या व बँका आहेत. "ही एक वेळच मदत दिली, आता पुन्हा नाही" (one time, last time) असे म्हणून या मदतीचे समर्थन केले जाते. परंतु शासकीय मदतीची ही प्रथा आता कमी होत चालली आहे आणि संबंध सामयिक बाजारात स्पर्धेचे वारे जोराने वाहू लागले आहेत. रेनॉ मोटार कंपनी बंद करावी लागली होती तेव्हा बरीच कुरबूर झाली. परंतु तोटा होत असतानाही हा कारखाना पुन्हा सुरू करावा असे आयोगाने सुचविले नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

युरोप खंडातील व्यापार खुला व्हावा असेच आयोगाच्या सदस्यांना वाटत असते आणि शक्य तेथे त्यानी खुल्या व्यापाराला पाठिंबा दिला आहे हेही खरे. तथापि त्यांच्यापैकी काहींची वक्तव्ये संरक्षणात्मक धोरणांचा पाठपुरावा करणारी वाटतात. कदाचित त्याना असे सुचवावयाचे असेल की, निदान काही क्षेत्रांतून तरी स्पर्धा टाळली पाहिजे. परंतु अलीकडच्या कालात आंतरराष्ट्रीय व्यापारात होत असलेली वाढ आणि मुख्यतः वाढते जागतिकीकरण यांच्या दट्ट्यामुळे सर्वजण खुल्या व्यापाराकडे ओढले जात आहेत. सामयिक बाजार स्थापन करण्याच्या प्रक्रियेला या नवीन घडामोडीमुळे अधिक चालना मिळत आहे. वाढत्या जागतिकीकरणाशी कसे जुळवून घ्यावयाचे हे उपक्रमींना व व्यापाऱ्यांना लवकर समजते, अधिक समजते आणि राजकारण्यांपेक्षा ते अधिक वेगाने जुळवून घेत असतात. जागतिकीकरणाचा दाब आयोगावर सतत वाढत आहे. त्यामुळे युरोप खंडात एक प्रचंड व एकात्मीकृत (integrated) बाजार उदयाला येत आहे. असा बाजार निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आयोगाचे हात बांधले गेले आहेत, कारण त्याना दुसरा पर्याय दिसत नाही.

राष्ट्रीय हित साधण्यासाठी मोठ्या समूहात सामील होणे हा अनुभव 'बेनेलक्स' (BENELUX) आर्थिक गटात आला होता. युरोपीय संघातील राष्ट्रांची

आर्थिक स्थिती गतीशून्य, कुंठित झाली होती. अशा अवरुद्ध स्थितीतून बाहेर पडण्यासाठी काही व्यावहारिक मार्ग शोधणे क्रमप्राप्त होते. तो मार्ग त्यांना सामयिक बाजाराच्या स्थापनेत सापडला. परंतु तो मार्ग शोधण्यासाठी त्यांना कणखर नेतृत्वाची आवश्यकता होती आणि तसे नेतृत्व त्यांना जॉं मोनेट (Jean Monnet), डेलॉर्स (Delors) व कॉकफील्ड (Cockfield) यांच्यामध्ये सापडले. त्याचप्रमाणे हेही खरे की, सामयिक बाजारासंबंधी अनुकूल मत बनविण्यासाठी युरोपीय संघातील उपक्रमी महामंडळांना राजकीय पुढाऱ्यांवर बरेच दडपण आणावे लागेल.

मुक्त बाजाराकडे ओढून नेणारी दुसरी शक्ती म्हणजे सामयिक चलन ही होय. सामयिक बाजार ( single market ) आणि सामयिक चलन ( single currency ) या एकमेकाला पूरक आहेत आणि पूरक होतील याची जाण वाढत आहे. युरोपमध्ये कोणती चलनव्यवस्था होऊ घातली आहे हे मास्ट्रिच कराराने दाखविले आहे. या कराराचा तपशीलवार विचार होणे असल्याचे आहे. तसा तो यानंतर केला जाईल. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे की, या करारात सहभागी होणाऱ्या 15 राष्ट्रांना आपली एकूण आर्थिक धोरणे एका विशिष्ट दिशेने चालवावी लागतील. विशेषत: अर्थसंकल्पातील तूट आणि कर्ज यावर मर्यादा घालावी लागणार आहे. याच धोरणाचा एक भाग म्हणजे अर्थसाहाय्याच्या योजना रद्द कराव्या लागतील. युरोपमध्येही काही शासकीय उद्योग तोट्यात चालत आहेत. हा तोटा शासनाला सहन करावा लागतो आणि त्याचा परिणाम अर्थसंकल्पातील तूट वाढण्यात होत असतो. त्यामुळे या शासकीय उद्योगाचे खाजगीकरण करणे अवश्य होऊन बसले आहे. याशिवाय कामगारविषयक कायदे एकतर्फी असल्यामुळे कामगारांना वाजवीपेक्षा अधिक संरक्षण मिळत आहे. काही उद्योगांत श्रमिक एकाधिकार (closed shops) निर्माण झाला आहे आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेत श्रमाचे वितरण योग्यप्रकारे होत नाही. एकूण श्रम बाजाराचेही निर्विनियमन (deregulation) व्हावयाला हवे. श्रम बाजारातील अलवचिकता (rigidities) निर्माण झाल्यामुळे त्याचा रोजगार व उत्पादन यावर विपरित परिणाम होऊ लागला आहे. खुल्या अर्थव्यवस्थेत एकाधिकार व अलवचिकतेला स्थान नाही. परंतु मास्ट्रिच करारात 'social chapter' नावाची तरतूद आहे आणि त्यामुळे कामगारवर्गाच्या एकूण प्रश्नांकडे जरा साहानुभूतीच्या, मानवतेच्या दृष्टीने पाहावे लागते. परंतु आयोगाच्या 1996 च्या वार्षिक अहवालात असे निक्षून प्रतिपादिले आहे की, श्रम बाजारात लवचिकता आणली पाहिजे, कारण त्याखेरीज बाजारात खुलेपणा येणार नाही आणि आर्थिक प्रगती थंडावेल. या अहवालात 'social chapter' चा साधा उल्लेखही नाही. यावरून आयोगाचा दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवतो.

या सर्वांचा असा अर्थ होऊ शकेल की, युरोपातील अर्थव्यवस्था पूर्णपणे खुली झाली आहे आणि तेथील राज्यकर्त्यांनी 'social model' अथवा 'social chapter' चा त्याग केला आहे. परंतु तसे म्हणता येत नाही. युरोपीय संघाच्या पातळीवर श्रम बाजारातील अलवचिकता कमी झाली असली तरी स्थानिक पातळीवर (national level) ती अजून अनुभवाला येत असते. जे लोक उद्योगधंद्यांत सतत गुंतलेले असतात. (व्यापारी, कारखानदार, वगैरे) त्यांना जागतिक आर्थिक परिस्थितीचे ज्ञान अधिक असते आणि त्यानाच जागतिक उदारीकरणाच्या वाऱ्यांना तोंड द्यावे लागते. युरोपातील सामयिक बाजार अधिकाधिक खुला व्हावा, श्रम, भांडवल, विविध सेवा याना संघाच्या बाजारात मुक्त संचार करता यावा या विषयाची आच, निकड उपक्रमींना जेवढी वाटते तितकी राज्यकर्त्यांना वाटत नाही. अर्थसाहाय्य कमी केले किंवा रद्द केले तर ग्राहकांना अधिक किंमत मोजावी लागते आणि त्यामुळे त्यांच्या मतदानावर प्रतिकूल परिणाम होतो याची जाण राज्यकर्त्यांना सतत असते. सामयिक व खुल्या बाजाराचे फायदे दिसावयाला काही काल लोटावा लागतो. परंतु ते फायदे निश्चित व मोठे आहेत. ही गोष्ट सामयिक बाजाराचे प्रणेते डेलॉर्स पुढील शब्दांत आवर्जून सांगतात : "Large market without frontiers offers unique opportunity to improve competivity, increase growth and employment and cootribute to a better balance in the world economy. This large market is of direct concern to every citizen of Europe. It is revolutionary. It carries with it the goal of united and strong Europe."

सामयिक बाजाराचे दुसरे प्रणेते लॉर्ड कॉकफील्ड म्हणतात : " Internal market offers immense opportunitis for the future, for growth, for job creation, for economies of scale, for improved productivity and profitability, for healthier competition, for professional and business mobility, for stable prices and for consumer choice, inflation free growth and millions of new jobs."

हे सर्व फायदे युरोपातील सामयिक बाजार पूर्णत्वाला पोहोचेल तेव्हाच मिळतील. आज तरी तो पूर्णत्वाला पोहोचलेला नाही. या बाजारात पूर्णत्वाने खुलेपणा यावयाला हवा. व्यापारातील अडथळे पूर्णपणे दूर झाले पाहिजेत. श्रम, भांडवल, वस्तू व सेवा यांचा मुक्त संचार होण्यासाठी सहभागी राष्ट्रांनी ज्या भिंती बांधल्या आहेत त्या पूर्णपणे पाडल्या पाहिजेत. बाजारातील स्पर्धा ही पूर्ण स्पर्धा व्हावयाला हवी. त्यासाठी जी राष्ट्रे संघात सामील झाली आहेत त्यांनी स्वतःवर काही बंधने घालून घेतली पाहिजेत, काही पथ्ये पाळली पाहिजेत तरच बाजार खऱ्या अर्थाने खुला सामयिक बाजार होईल. तसे होत आहे ना हे सतत आयोगाला पाहावे लागते. सहभागी राष्ट्रांची आर्थिक धोरणे आयोगाच्या नियमात बसतात किंवा नियमांचा भंग करतात हे आयोगाला पाहावे लागते. जी राष्ट्रे नियमांचा भंग करतात त्यांना आयोग ताकीद देते किंवा शासन करते. हे शासन दंडाच्या रूपानेही असू शकते. सामयिक बाजाराची व्यवस्था योग्य दिशेने चालू आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आयोगाची आवश्यकता निर्विवाद आहे. सहभागी राष्ट्रांना आयोगाचा सासुरवास नकोसा वाटत असणार. काही राष्ट्रे आयोगाची बंधने झुगारून देतात आणि मनमानी कारभार करतात हेही खरे. यांचा उल्लेख यापूर्वी आलेला आहे. स्वतःच्या कंपन्यांना कंत्राटे देणे, स्थानिक कामगार, शास्त्रज्ञ, शिक्षक यांना प्राधान्य देणे, झुकते माप देणे आणि राज्याबाहेरून आलेल्यांना सापत्न भावाने वागविणे या गोष्टी होत असतात. परंतु या बाबी किरकोळ, कमी महत्त्वाच्या म्हणून कदाचित आयोग त्याकडे काणाडोळा करीत असेल. महत्त्वाच्या आर्थिक धोरणांविषयी मात्र आयोगाचे आदेश पाळावे लागतात. तसे झाले नाही तर सामयिक बाजाराचा प्रकल्पच कोलमडून पडेल. जगाच्या बाजारात युरोपीय संघाची स्पर्धात्मक ताकद कमी होईल. इंग्लंड हे राष्ट्र खऱ्या अर्थाने युरोपीय संघात सामील झाले आहे असे म्हणता येत नाही. कारण त्या राष्ट्रात या प्रश्नासंबंधी राजकीय पक्षात तीव्र मतभेद आहेत. "थांबा आणि पाहा" अशीच त्या राष्ट्राची एकूण भूमिका आहे. असे म्हटले जाते की, इंग्लंड हे दुकानदारांचे राष्ट्र आहे. त्यांना युरोपातील सामयिक बाजाराचा फायदा करून घ्यावयाचा आहे, परंतु युरोपीय संघात व सामयिक बाजारात औपचारिकरित्या सामील होण्याबाबत ते राष्ट्र अजूनही साशंक आहे. तेथे आता सत्तांतर झाले आहे आणि मजूर पक्ष याबाबत निश्चित कोणते धोरण स्वीकारील ते स्पष्ट व्हावयाचे आहे.

सामयिक बाजाराची पुढची पायरी म्हणजे सामयिक पैसा ही होय. सामयिक पैशामुळे सामयिक बाजाराचे फायदे द्विगुणित होतील असा तेथील विचारवंतांना विश्वास वाटतो. सामयिक पैसा या विषयाचा तात्त्विक दृष्टीने बराच विचार झाला आहे. एकूण कल्पनाच मोठी आकर्षक वाटली. परंतु सामयिक पैसा या कल्पनेचा व्यावहारिक दृष्टीने विचार होणे आवश्यक होते. असा पैसा व्यवहारात आला तर सर्व युरोप खंडाचे द्रव्यविषयक एकीकरण (monetary integration) होऊ शकेल असा आशावाद व्यक्त होत असे. सामयिक पैसा या विषयाची युरोपमध्ये एकवेळ बरीच चर्चा झाली. पुढे ती चर्चा थांबली. काहींना हा विषय स्वप्नवत, अव्यवहार्य असा वाटू लागला. पुढे हा विषय मृतवत झाला आणि त्याविषयी फारसे ऐकूही येत नसे. 1980 च्या दशकात काहींचे या विषयाकडे पुन्हा लक्ष जाऊ लागले. याचा परिणाम म्हणजे या विषयाचा जरा खोलात जाऊन विचार करण्यासाठी डेलॉर्स यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक झाली (1989). या समितीचा अहवाल प्रकट झाल्यावर सामयिक पैसा या विषयावर पुन्हा चर्चा सुरू झाली. हा विषय महत्त्वाचा आणि व्यवहार्यही आहे अशी खात्री पटल्यामुळे 1991 मध्ये युरोपातील राष्ट्रप्रमुखांची परिषद झाली आणि त्या चर्चेतून मास्ट्रिच कराराचा जन्म झाला.

युरोपखंडामध्ये द्रव्यविषयक एकीकरण करून घेण्यासाठी एक व्यूह तयार करण्यात आला आहे आणि त्याप्रमाणेच पुढची पावले टाकण्यात येत आहेत.

मास्ट्रिच करारातच हा व्यूह सापडतो आणि त्यामध्ये सहसा बदल करता येणार नाही. मास्ट्रिच करारात काही बदल करावयाचा झाल्यास राष्ट्रप्रमुखांची पुन्हा परिषद बोलवावी लागेल आणि ते काम सोपे नाही. द्रव्यविषयक एकीकरण करण्याचे एकूण तीन टप्पे सुचविले आहेत. पहिला टप्पा 1990 च्या जुलै महिन्यात सुरू झाला आणि त्यावेळी भांडवल व्यवहारावरील नियंत्रणे रद्द करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्याची मुदत 1993 च्या डिसेंबर महिन्यात समाप्त झाली. दुसरा टप्पा 1994 च्या जानेवारीत सुरू झाला. सहभागी राष्ट्रांच्या मध्यवर्ती बँकांमधील सहकार्य दृढ करण्यासाठी (European Monetary Institute) (EMI) स्थापनेची व्यवस्था झाली. याच संस्थेचे लवकरच युरोपच्या सामयिक मध्यवर्ती बँकेत (ECB) रूपांतर होणार आहे. तिसरा व शेवटचा टप्पा 1996 च्या अखेरीस सुरू होऊन त्याची परिणती 1999 च्या जानेवारीमध्ये होणार आहे. या कालावधीत सहभागी राष्ट्रांचे हुंडणावळीचे दर कायमचे (irrevocably) निश्चित केले जातील युरोपची सामयिक मध्यवर्ती बँक काम सुरू करेल आणि 'युरो' नावाचे सामयिक चलन परिचलनात येऊ लागेल.

युरोपच्या पैसा संघटनेत सामील होण्यासाठी सहभागी राष्ट्रांना काही अटींची पूर्तता करावी लागेल. त्या अटी अशा : (1) राष्ट्राच्या अर्थसंकल्पातील तूट स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या (GDP) तीन टक्क्यांपेक्षा जास्त नसावी आणि (2) त्या राष्ट्राचे एकूण कर्ज स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या 60 टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. जी राष्ट्रे या दोन कसोटया पूर्ण करतील त्यानाच या संघात प्रवेश मिळणार आहे. मास्ट्रिच करारात ज्या दोन अटींवर विशेष भर देण्यात आला आहे त्या म्हणजे, (1) युरोपीय संघ प्रस्थापित होण्याची प्रक्रिया सावकाश होणार आहे आणि (2) युरोपातील सर्व राष्ट्रे एकाच वेळी संघात सामील होतील अशी अपेक्षा नाही.

युरोपीय संघात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रांनी आपल्या राज्यात किमतीची पातळी स्थिर ठेवली पाहिजे, आधीच्या दोन वर्षांत आपला हुंडणावळीचा दर स्थिर ठेवला पाहिजे, दीर्घ मुदतीच्या व्याजाचा दर सक्षम राष्ट्रांच्या दरांपेक्षा दोन टक्के इतकाच जास्त असावा आणि त्याची एकूण राजकोषीय परिस्थिती शाश्वत (sustainable) असावी. ही शाश्वत परिस्थिती म्हणजे काय ते यापूर्वी दर्शविले आहे. मास्ट्रिच कराराने घालून दिलेले हे निकष स्वच्छंदी आहेत, मनमानी आहेत, वास्तवाला धरून नाहीत म्हणून ते सैल करावेत अशी काहींची मागणी आहे. 1991 मध्ये एकूण 12 राष्ट्रांपैकी केवळ तीनच राष्ट्रे या अटी पूर्ण करू शकत होती. 1997 या वर्षी बहुधा सात अधिक राष्ट्रे या अटींची पूर्तता करू शकतील. ती सात राष्ट्रे म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, लक्झेंबर्ग, स्पेन, जर्मनी, डेन्मार्क व पोर्तुगाल ही होत. याशिवाय ऑस्ट्रिया, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड यांचे कर्ज एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या 60 टक्क्यांपेक्षा कमीच होते आणि फिनलंडचा अपवाद वगळता इतर तीन राष्ट्रांच्या अर्थसंकल्पातील तुटीचे प्रमाण 3 टक्क्यांपेक्षा कमीच होते.

कोणती राष्ट्रे वर नमूद केलेल्या अटींची पूर्तता करतात ते आयोग व युरोपीय पैसाविषयक संस्था (EMI) तपासून पाहतील आणि पूर्तता करणाऱ्या राष्ट्रांना संघात प्रवेश द्यावा अशी शिफारस करतील. त्यानंतर राष्ट्रांचे प्रमुख या शिफारशींचा विचार करून शेवटचा निर्णय देतील. हा निर्णय बहुमताने घेण्यात येणार आहे. त्यावेळी "आम्हाला पाठिंबा दिलात तर आम्ही तुम्हाला देऊ" अशा प्रकारची सौदेबाजी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रप्रमुखांचा निर्णय काही राष्ट्रांना मान्य झाला नाही तर ती राष्ट्रे न्यायालयात जाण्याचा धोका आहे. मास्ट्रिच कराराचे प्रकरण जर्मनीमध्ये घटनात्मक न्यायालयात गेले होते याची येथे आठवण होते. 1998 पर्यंत कोणती राष्ट्रे शेवटी संघात सामील झाली ते समजेल. 1999 च्या प्रारंभी संघातील राष्ट्रांचे हुंडणावळीचे दर कायमचे निश्चित केले जातील. परंतु ते कोणत्या पद्धतीने आणि कोणत्या पातळीवर स्थिर केले जातील हे जर स्पष्ट नसेल तर याविषयी सट्टेबाजी होऊ शकेल. त्यानंतर तीन वर्षे सहभागी राष्ट्रांचे चलन व संघाचे चलन 'युरो' यांचे परिचलन चालू राहील. परंतु 2003 या वर्षी मात्र 'युरो' राष्ट्रीय चलनांचे स्थान घेईल. हे सर्व वेळापत्रक मास्ट्रिच करारातच नमूद केले आहे.

मास्ट्रिच करारात ज्या अटी घातल्या त्यांचा मुख्य हेतू हाच की, सहभागी राष्ट्रांनी आपली अर्थ–

व्यवस्था अशा रीतीने राबवावी की, त्याना आर्थिक स्थैर्य लाभेल, किमती स्थिर राहतील, चलनफुगवटा होणार नाही, हुंडणावळीचे दर स्थिर राहतील आणि त्यामुळे व्यापार सुरळीत वाढोला लागेल. शासनाच्या एकूण खर्चावर नियंत्रण हवे, कारण अर्थसंकल्पातील तुटीमुळे चलनफुगवटा पोसला जातो. ही तूट वाढत जाण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे शासनाच्या विविध अर्थसाहाय्याच्या योजना हे होय. समाजातील काही विविष्ट लोकसमुदायाला या अर्थसाहाय्याची चटक लागलेली असते आणि ते साहाय्य कमी केले किंवा रद्द केले म्हणजे शासनाला लोकक्षोभाला तोंड द्यावे लागते. अर्थसंकल्पातील तुटीवर नियंत्रण ठेवले नाही तर ती सतत वाढत जाते आणि ती भरून काढण्या-साठी कर्ज काढावे लागते. पूर्वीच्या कर्जावरील व्याज देण्यासाठी नवीन कर्जे काढावी लागतात. अशा रीतीने ते राष्ट्र कर्जाच्या सापळ्यात (debt trap) सापडते.

परंतु हे सर्व अल्पज्ञान झाले. राज्यकर्त्यांना सतत बदलत जाण्याऱ्या परिस्थिला तोंड द्यावे लागते, तडजोडी कराव्या लागतात. करारातील अटींची पूर्तता करण्याच्या प्रयत्नात आर्थिक परिस्थिती बिघडण्याचा संभव असतो. मंदीची परिस्थिती असताना शासनाने अर्थसंकल्पातील तूट कमी करण्याच्या प्रयत्नात खर्चाला कात्री लावली तर आर्थिक परिस्थिती अधिकच बिघ-डेल. बेकारी कमी करण्यासाठी शासनाला नवीन योजना हाती घेऊन खर्च वाढवावा लागेल, परंतु ते मास्ट्रिच करारात बसत नाही. या करारात अर्थसंक-ल्पातील तुटीसंबंधी जे नियम केले आहेत ते या कराराचा अतिमहत्त्वाचा भाग आहेत असे समजले जाते आणि काही सहभागी राष्ट्रांना तोच भाग अत्यंत जाचक वाटतो. मास्ट्रिच करार म्हणजेच आर्थिक स्थैर्याचा करार (stability pact) असे म्हटले जाते. परंतु या स्थैर्यासाठी सहभागी राष्ट्रांना फार जबर किंमत द्यावी लागेल अशी भीती व्यक्त केली जाते.

ज्या राष्ट्रांच्या अर्थसंकल्पातील तूट प्रमाणाबाहेर असेल अशा राष्ट्रांना संघात प्रवेश देऊ नये अशी करा-रात तरतूद केली आहे. तुटीचे प्रमाण योग्य आहे किंवा नाही ते प्रतिदिनी पाहिले जाईल असे नाही. काही कालावधीत ते पाहिले जाईल यात शंका नाही. काही वेळा तुटीचे प्रमाण योग्य पातळीच्या जवळपास असू शकेल किंवा ते प्रमाण योग्य दिशेने जात असेल किंवा तूट काही अल्पकाळात जास्त वाढली असेल. याचाच अर्थ असा की, तुटीचे प्रमाण फार बारकाईने पाहिले जाणार नाही. परंतु अर्थसंकल्पातील तुटीचे प्रमाण सतत वाढत असेल आणि तूट प्रचंड झाली असेल तर मात्र त्याची दखल घेतली जाईल. जी राष्ट्रे तुटीच्या नियमांचा भंग करतील त्यांना आयोगाजवळ काही ठेव ठेवावी लागेल आणि जी राष्ट्रे नियमबाह्य कर्जे काढतील त्यांच्या कर्जाची रक्कम जप्त केली जाईल. आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने सहभागी राष्ट्रांच्या कर्ज काढण्याच्या अधिकारावर मर्यादा घालणे आवश्यक वाटते. एखाद्या राष्ट्राचा भांडवल बाजार (capital market) लहान आहे, किंवा मोठा आहे ते पाहिले पाहिजे. हा बाजार लहान असेल तर त्या राष्ट्राचा कर्ज काढण्याच्या शक्तीवर मर्यादा पडते. असे लहान राष्ट्र संघात सामील झाले की त्याला प्रचंड मोठा भांडवल बाजार मिळतो आणि त्याचबरोबर त्या राष्ट्राची कर्ज काढण्याची शक्तीही वाढते. पण त्याचा हुंडणावळीच्या दरावर परिणाम होत नाही कारण ते दर शाश्वत असतात. संघ स्थापन झाल्यामुळे कर्ज काढण्याची क्षमता वाढते. त्यामुळे व्याजाचे दर वाढतात आणि त्याचा बोजा इतर राष्ट्रांवर पडतो. एखाद्या राष्ट्राने भरमसाटपणे कर्जे काढली आणि त्यामुळे ते राष्ट्र आर्थिक संकटात सापडेल तर त्या राष्ट्राला वाचविण्यासाठी (to bail it out) संघातील इतर राष्ट्रांना मदतीला यावे लागेल, अशी सर्वसाधारण धारणा आहे. तथापि अशा प्रकारे कर्जखोर राष्ट्राच्या मदतीला येण्याची मास्ट्रिच करारात तरतूद नाही एवढेच नव्हे तर तसे करावयाला मनाई करण्यात आली आहे.

मास्ट्रिच कराराचे एकूण स्वरूप, त्याचे उद्देश, त्यातील सर्व अटी आणि त्या प्रत्यक्षात पाळण्यामध्ये येणाऱ्या विविध अडचणी या सर्वांचा विचार करता युरोपातील किती राष्ट्रे या द्रव्यविषयक संघात सह-भागी होतील हे सांगणे आज तरी कठीण आहे. कोणती राष्ट्रे संघात सहभागी झाली ते 1998 मध्ये स्पष्ट होईल. मास्ट्रिच करारातील अटी पाळल्या गेल्या तरच त्या राष्ट्राला संघात सामील करून घ्यावे याविषयीचा जर्मनीचा विशेष आग्रह होता. परंतु अलीकडच्या काळात खुद्द जर्मनीला या अटी जाचक वाटू लागल्या आहेत. त्याचे मुख्य कारण अर्थसंकल्पातील वाढती तूट

आणि बेकारीचे वाढते प्रमाण हे होय. मास्ट्रिच करारातील वेळापत्रकाप्रमाणे 1 जानेवारी, 1999 या दिवसापासून सहभागी राष्ट्रांना आपले हुंडणावळीचे दर बदलण्याचे स्वातंत्र्य गमवावे लागेल. त्यादिवशी या राष्ट्रांना ते दर शाश्वत निश्चित करावे लागतील. संघातील हुंडणावळीच्या दरात स्थैर्य यावे आणि त्यामागे व्यापार वाढत राहावा हीच त्यामागची इच्छा आहे. हुंडणावळीचा दर कमी करून निर्यात व्यापार वाढविण्याचा मोह कनेक देशांना अनेक वेळा झालेला आहे. परंतु त्यापासून होणारा फायदा अनिश्चित व अल्पकालीन असतो हा इतिहासाचा दाखला आहे. म्हणूनच "devaluation ends in tears" असे म्हटले जाते.

मास्ट्रिच वेळापत्रकाप्रमाणे 1 जानेवारी, 1999 या दिवशी 'युरो' (EURO) या चलनाचा जन्म होणार आहे. त्या दिवसापासून 2002 पर्यंत सहभागी राष्ट्रांची चलने व 'युरो' यांचे विनिमय यांचे दर निश्चित होतील आणि सहभागी राष्ट्रांचा पैसा व 'युरो' संघाच्या परिचलनामध्ये राहतील. परंतु 1 जुलै, 2012 पासून सहभागी राष्ट्रांच्या चलनाची जागा 'युरो' घेईल आणि संघात 'युरो' हे एकमेव चलन परिचलनामध्ये राहील. याच दिवसापासून सहभागी 15 राष्ट्रांत सामयिक बाजार व सामयिक चलन ( single market and single currency ) अस्तित्वात असेल. सामयिक बाजार व सामयिक चलन एकमेकांना पूरक असतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात युरोपीय संघाची स्पर्धात्मकता वाढेल आणि निर्यातीला प्रोत्साहन मिळेल.

सामयिक बाजार सामयिक चलन याबरोबरच सामयिक मध्यवर्ती बँकेची तरतूद मास्ट्रिच करारात केली आहे. ही बँक (ECB) युरोपीय संघाची मध्यवर्ती बँक म्हणून काम करणार आहे. सहभागी राष्ट्रांच्या मध्यवर्ती बँक या संघाच्या मध्यवर्ती बँकेच्या एजंट म्हणून काम करणार आहेत. संघातील सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीवर काळजीपूर्वक लक्ष ठेऊन संघाचे आर्थिक, पैसाविषयक व वित्तीय धोरण ठरविणे, संघात चलन फुगवटा होत नाही ना हे पाहणे आणि आवश्यक तेव्हा त्वरित उपाययोजना करणे ही महत्त्वाची कामे या मध्यवर्ती बँकेकडे सोपविली आहेत. ही सर्व कामे योग्य रीतीने पार पाडता यावी यासाठी मध्यवर्ती बँकेला संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. याबाबतीत जर्मनीतील मध्यवर्ती बँकेचा आदर्श पुढे ठेवण्यात येतो. युरोपीय संघाचे नवीन चलन 'युरो' नाण्यांच्या किंवा नोटांच्या रुपात काढण्याचा एकाधिकार या मध्यवर्ती बँकेकडे असेल. जगातील महत्त्वाच्या चलनांच्या तुलनेने 'युरो' ची किंमत किती असेल ते आताच सांगता येत नाही. विशेषत: अमेरिकेचा डॉलर व जपानचा येन या महत्त्वाच्या चलनाबरोबर 'युरो' ची सतत तुलना होत राहणार. या मध्यवर्ती बँकेला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रतिष्ठा मिळवायला काल लोटावा लागेल. कोठल्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेला त्या देशाच्या राजसत्तेची प्रतिष्ठा, पाठबळ मिळत असते. अशी राजसत्ता युरोपीय संघात स्थापन व्हावयाची आहे. युरोपीय संघात चलन-फुगवटा रोखण्याच्या कामी या बँकेला कितपत यश मिळेल यावर बरेच काही अवलंबून आहे. सहभागी राष्ट्रांतील मध्यवर्ती बँकांमध्ये सहकार्य वाढविणे ही मोठी जबाबदारी या बँकेला पार पाडावी लागेल. सहभागी राष्ट्रे अर्थसंकल्पातील तूट व कर्जाची मर्यादा याविषयी कितपत दक्ष आहेत हेही पाहावे लागेल. अर्थसंकल्पातील तुटीतून चलनफुगवट्याचा जन्म होत असतो. 'युरो' या चलनाची किंमत पर्यायाने संघात चलनफुगवटा आहे किंवा नाही यावर अवलंबून राहील. तुटीच्या बाबतीत तसेच कर्जाच्या बाबतीत सहभागी राष्ट्रे काही शिस्त पाळत आहेत किंवा नाही हे या बँकेला पाहावे लागेल. आणि ही शिस्त पाळली जाण्यासाठी या बँकेला काही वेळा कठोर उपाययोजनाही करावी लागेल. वेळापत्रकाप्रमाणे युरोपीय मध्यवर्ती बँकेची स्थापना 1999 मध्येच व्हावयाला हवी. बँकेला विविध किमतींची नाणी काढावी लागतील ; उदाहरणार्थ, 1 सेंट, 2 सेंट, 5 सेंट, 10 सेंट, 20 सेंट, 50 सेंट, एक युरो व दोन युरो. त्याचप्रमाणे विविध किमतींच्या नोटाही काढाव्या लागतील उदाहरणार्थ, 5, 10, 20, 50, 100, 200, व 500 युरो. संघाचे 'युरो' नामक अपत्य सशक्त व गोंडस असेल किंवा अशक्त व रोगट असेल हे मध्यवर्ती बँकेच्या एकूण धोरणावर, कामगिरीवर अवलंबून राहील.

मास्ट्रिच करारातील अटी स्वच्छंदी आहेत, व्यवहार्य नाहीत म्हणून त्याचा फेरविचार करावयाला हवा असे मत बरेच ठिकाणी ऐकू येते. इंग्लंड व फ्रान्स

या दोन देशांत अलीकडेच निवडणुका झाल्या आणि डावे पक्ष सत्तेवर आले आहेत. ते या सर्व अटींचा नव्याने विचार करावा असा आग्रह धरणे शक्य आहे. आणि हा फेरविचार करताना रोजगार निर्मितीवर अधिक भर द्यावा या मागणीला अधिक पाठिंबा मिळेल असे दिसते. जर्मनीचा या अटी पाळल्या गेल्या पाहिजे यावर बराच आग्रह होता. परंतु तेथेही अलीकडे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे करारातील अटींविषयी जर्मनी पूर्वीप्रमाणे आग्रही भूमिका घेईल असे वाटत नाही. परंतु मास्ट्रिच कराराचा फेरविचार करावयाचे ठरले तर राष्ट्रप्रमुखांची परिषद पुन्हा बोलवावी लागेल. या सर्व गोष्टी लक्षात घेता करारात तयार केलेले वेळापत्रक पाळले जाईल किंवा नाही ते आज सांगता येत नाही. काही झाले तरी वेळापत्रक पाळलेच पाहिजे असाही आग्रह काही देशात दिसून येतो

आजतरी 15 राष्ट्रे युरोपीय संघात सामील झाली आहेत. युरोपातील इतर काही राष्ट्रे या संघात येण्यास उत्सुक आहेत. त्यापैकी हंगेरी, पोलंड, रुमानिया स्लोवाकिया, लॅटविया, बलोरिया वगैरे राष्ट्रांचा उल्लेख करता येईल. या नवीन राष्ट्रांना संघात प्रवेश देताना मास्ट्रिच कराराचे निकष लावणार किंवा इतर काही गोष्टी लक्षात घेतल्या जातील ते सांगता येत नाही. राष्ट्राराष्ट्रांतील एकूण संबंधावरही (totality of relations) ते अवलंबून असेल. काही झाले तरी युरोपीय संघात सामील होण्यात फायदा आहे असे वाटू लागले आहे. संघाच्या बाहेर राहण्यात तोटाच होण्याचा अधिक संभव आहे अशी भावना दिसून येते. बाहेरच्या जगाशी आर्थिक संबंध जोडताना संघाचे सभासद म्हणून स्पर्धात्मक शक्ती वाढण्याचा संभव अधिक आहे; बाहेर राहिलो तर ही शक्ती कमी होईल ही स्थिती. याचबरोबर हेही लक्षात ठेवणे जरूर आहे की, संघाचा व्याप वाढत गेला किंवा अधिक सभासद सामील करून घेतले तर संघाची कार्यदक्षता कमी होण्याची शक्यता आहे. संघाचा इष्ट तम व्याप (optimum area) किती असावा याचाही काळजीपूर्वक विचार होणे योग्य होईल.

मास्ट्रिच कराराच्या काही अटींचा स्वीकार करणे हा अनुभव फारसा सुखद नसावा. हुंडणावळीचा दर बदलण्याचे स्वातंत्र्य गमवावे लागत होते. हा दर बहुधा कमी केला जात असे आणि त्यापासून काही काल तरी फायदा होतो असे वाटत असे. हा फायदा क्षणभर आहे हे खरे असले तरी त्या फायद्याचे आकर्षण कमी होत नाही. सन 2002 पासून सहभागी राष्ट्रांच्या चलनाची जागा 'युरो' हे चलन घेणार. प्रत्येक राष्ट्राचे आपल्या चलनाशी काही भावनिक नाते जोडलेले असते. डी-मार्कमुळे जर्मनीला समृद्धी मिळाली असे अनेक जर्मन नागरिकांना वाटत असते. इंग्लीश माणसाची पौंड स्टर्लिंगविषयी अशीच भावना असणार. ही राष्ट्रीय चलने 2002 पासून परिचलनातून नाहीशी झाली तरी त्यांच्या आठवणी शिल्लक राहणार आणि त्यांची बोच त्रस्त करणार. परंतु ही झाली सर्व सामान्याची भावना.

सामयिक बाजार, सामयिक चलन व सामयिक मध्यवर्ती बँका या सामान्य घटना नाहीत. या संस्था नजिकच्या कालात कार्यान्वित झाल्या म्हणजे त्या युरोप खंडाचा चेहरामोहरा बदलून टाकणार आहेत. बाहेरच्या जगाला या घटनांची दखल घ्यावीच लागेल. या घटनांमुळे जगातील आर्थिक आणि पर्यायाने राजकीय समतोल बदलण्याची शक्यता ध्यानात घ्यावी लागेल. इतके त्या घटनांचे महत्त्व आहे. परंतु प्रश्न असा पडतो की, युरोपातील ही राष्ट्रे आताच इतकी जवळ का येऊ पाहात आहेत. त्यातील प्रमुख राष्ट्रे म्हणजे फ्रान्स व जर्मनी ही होत. पारंपारिक वैरभाव विसरून जवळ आली आहेत. या जवळ येण्याच्या प्रक्रियेत या 15 राष्ट्रांना काही बंधने स्वीकारावी लागत आहेत, काही तडजोडी कराव्या लागत आहेत. या सर्व घटनांच्या मागची प्रेरणा कोणती? या प्रश्नांचे उत्तर कोणी देत नाही, कारण ते उत्तर फार सरळ व सोपे असावे. सध्याच्या वाढत्या जागतिकीकरणामुळे राष्ट्रे जवळ येत असली तरी त्याना आपल्या एकलेपणाची, असुरक्षितपणाची जाणीव होऊ लागली आहे. एका बाजूला अमेरिकेसारखे प्रचंड व सामर्थ्यवान राष्ट्र आणि दुसऱ्या बाजूला अतिपूर्वेकडे जपान, चीन, कोरिया, मलेशिया वगैरे बलवान स्पर्धक राष्ट्रे (Asian tigers). युरोपातील लहानमोठी राष्ट्रे स्वतंत्रपणे जगाच्या बाजारात स्वबलावर आपले स्थान टिकवू शकणार नाहीत ही जाणीव तीव्रपणे लक्षात येऊ लागली त्यामुळे त्याना सामयिक बाजाराचा पर्याय शोधावा लागला.

युरोपीय संघाचे आजचे जे स्वरूप आहे ते कायमचे स्वरूप असे समजण्याचे कारण नाही. संघात सामील होण्याच्या ज्या अटी आहेत त्या सैल होणे शक्य आहे. करारामध्ये जे वेळापत्रक ठरविले आहे त्यातही बदल होऊ शकेल. परंतु आज जे संघात आले आहेत त्यांना मागे फिरता येणार नाही. तशी शक्यता आज तरी दिसत नाही. सभासद एकामागून एक असे संघाच्या बाहेर पडू लागले तर संघाचे विभाजन होईल. तसे होणार नाही. बदलत्या परिस्थितीप्रमाणे संघाच्या उद्दिष्टांत बदल होणे शक्य आहे. आजपर्यंत आर्थिक स्थैर्यावर (stability pact) अधिक भर दिला जात असे. आता मात्र रोजगार वाढविण्यावर employment chapter) अधिक भर दिला जात आहे.

युरोपातील या घटनांपासून भारताने काही घेण्यासारखे आहे काय? आपल्याकडे सामायिक चलन आहे; सामायिक मध्यवर्ती बँकही आहे; परंतु सामायिक बाजार आहे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना बराच विचार करावा लागतो. कारण उत्तर सोपे नाही. भारतातील अंतर्गत व्यापार अद्यापही खुला नाही. प्रान्ताप्रान्तांनी भिंती बांधल्या आहेत. या भिंती भौतिक (physical) आहेत, तशाच राजकोषीयही (fiscal) आहेत. या भिंती पाडल्याखेरीज अंतर्गत व्यापार खुला होणार नाही. युरोपमध्ये केवळ एक बर्लिन वॉलच पाडली असे नाही. अनेक भिंती पाडल्या आणि त्यामुळेच युरोपात वस्तू, श्रम, विविध सेवा व भांडवल मुक्त संचार करतात. आपल्याकडे भावनिक भिंती ओलांडावयाला अधिक कठीण. गुजरातचे तेल, महाराष्ट्राची साखर, पंजाब व मध्यप्रदेशचा गहू हे सर्व अनेक अडथळ्यांत सापडले आहेत. नद्यांच्या पाण्याच्या वाटपाचे तंटे अनेक वर्षे चालू आहेत. याचे कारण प्रान्तीय शासन स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे वागत असते. या तंट्यामध्ये संपूर्ण राष्ट्राचे हित सामावले आहे याचा विसर पडतो. युरोपीय संघाकडून खूपच काही शिकण्यासारखे आहे.

## संदर्भ सूची


1. EUROPE AND YOU : ELECTING THE EUROPEAN PARLIAMENT (1972), Federal Trust, London.
2. Eichengram, Barry (1992), SHOULD THE MAASTRICHT TREATY BE SAVED ?, International Finance Section, Department of Economics, Princeton University, Princeton, New Jersey.
3. De Gramme, Paul (1992), THE ECONOMICS OF MONETARY INTEGRATION, Oxford University Press.
4. Robinson, John. (1992), THE EUROPEAN CHALLENGE 1992 : THE BENEFITS OF A SINGLE MARKET, Wildwood House Ltd.
5. George, Stephen (1993), POLITICS AND POLICY IN THE EUROPEAN UNION, Third Edition, Oxford University P.ass.
6. Tsoukalis, Loukas (1997), The New European ECONOMY REVISITED, Oxford University Press.
7. Prider, John (1995), EUROPEAN COMMUNITY : A BUILDINO OF A UNION, Oxford University Press.
8. THE ECONOMIST, London, December 14, 1996, January 25, 1997, March 8, 1997, March 15, 1997 and June 7, 1997.


□ □

# आर्थिक विकास, अर्थव्यवस्थेतील उत्पन्न / उत्पादन रोजगारातील क्षेत्रीय बदल आणि सेवा क्षेत्र

**किर्ती केळकर ***

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा संबंध श्रम–शक्तीच्या वितरणात होणाऱ्या बदलांशी लावण्यात येतो. तसेच हा संबंध अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांच्या ( sectors ) उत्पन्न वाटयात होणाऱ्या बद–लांशीही लावण्यात येतो. कोणतीही अर्थव्यवस्था आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांतून जात अस–ताना त्या अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये महत्त्व-पूर्ण बदल होत असतात. हे बदल वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उत्पन्न, उत्पादन आणि त्या क्षेत्रातील रोजगारातील चढउतार आणि रोजगाराचे बदलते स्वरूप, इत्यादी बाबतीत दिसून येतात. आर्थिक विकासाचे विविध टप्पे गाठत असताना जे बदल अर्थव्यवस्थेत घडून येतात त्यांना अर्थव्यवस्थेत होणारे संरचनात्मक बदल म्हणून संबोधिता येईल. या लेखाचा प्रमुख हेतू भारतीय अर्थव्यवस्थेत घडून येणाऱ्या क्षेत्रीय बदलांच्या अनु–षंगाने अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलांचा आढावा घेऊन भारतीय अर्थव्यवस्थेतील क्षेत्रीय उत्पन्न/उत्पादन आणि प्रामुख्याने रोजगारात होणाऱ्या बदलांची चर्चा करणे आहे. तसेच क्षेत्रीय उत्पन्न / उत्पादन आणि रोजगारात होणाऱ्या क्षेत्रीय बदलांची कारणमीमांसा करून त्या संदर्भात दृष्टिक्षेपात येणाऱ्या मुख्य प्रवाहांची चर्चा करणे हेही या लेखाचे उद्दिष्ट आहे.

कोणत्याही अर्थव्यवस्थेत होणारे संरचनात्मक बदल आणि त्या अनुषंगाने उत्पन्न, उत्पादन आणि रोजगाराच्या क्षेत्रीय वितरणाबाबत चर्चा करण्यापूर्वी अर्थव्यवस्थेत होणाऱ्या क्षेत्रीय वितरणात होणाऱ्या बदलांमागील पार्श्वभूमी आणि सैद्धान्तिक चौकट लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल. बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांच्या मते आर्थिक विकासाच्या मार्गावर असणाऱ्या अर्थव्यवस्था–मध्ये बदलती व्यावसायिक संरचना असते. कॉलिन क्लार्क (1940), ए. जी. बी. फिशर (1945) आणि कुझनेटस् (1957) यांनी केलेल्या प्रतिपादनानुसार आर्थिक विकासाबरोबर होणाऱ्या बदलांबरोबर उत्पा–दनाच्या तसेच अर्थव्यवस्थेत असणाऱ्या श्रम–वितरणात बदल घडून येतात. त्यांच्या मते आर्थिक विकासाच्या

* अधिव्याख्याता : पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, पुणे परिसर, पुणे.

प्रक्रियेत उत्पादनात क्षेत्रीय बदल होऊन उत्पादन आणि उत्पन्नाचे प्रवाह प्राथमिक क्षेत्रापासून निर्माणक क्षेत्राकडे (उत्पादन क्षेत्र) आणि निर्माणक क्षेत्रापासून सेवा क्षेत्राकडे वळतात. त्याच अनुषंगाने श्रम वितरणातही बदल होऊन श्रमाचे वितरणही प्राथमिक क्षेत्रापासून निर्माणक क्षेत्राकडे आणि तद्नंतर सेवा क्षेत्राकडे वळते. हे बदल स्पष्ट करण्यासाठी या अर्थशास्त्रज्ञांनी जी गृहिते स्वीकारली त्यांचा संबंध क्षेत्रीय रोजगारात होणाऱ्या नियमित बदलाशी होता. रोजगाराच्या क्षेत्रीय संरचनेत होणारा बदल थोडक्यात अशा प्रकारे स्पष्ट करता येईल.

"मागणीच्या लवचिकतेनुसार ठरणारी उपभोगाची संरचना आणि दरडोई उत्पन्न मिळून क्षेत्रीय उत्पन्न ठरवीत असतात. उपभोगाची संरचना परिणामत: क्षेत्रीय उत्पादन ठरवीत असते आणि क्षेत्रीय उत्पादनाची संरचना अंतिमत: क्षेत्रीय रोजगार ठरवीत असते." अशा प्रकारे क्लार्क, फिशर आणि कुझनेटस् यांच्या मते क्षेत्रीय उत्पादनाला प्रभावित करणारा प्रमुख घटक दरडोई उत्पन्न किंवा मागणी असला तरीही उत्पादनात होणारे क्षेत्रीय बदल त्यांच्याबरोबर रोजगारातही तशाच प्रकारचे क्षेत्रीय बदल घडवून आणतात. सायमन कुझनेटस् यांनी विकसित देशांच्या संदर्भात या सिद्धान्ताची अनुकूलता पडताळून पाहिली आणि क्षेत्रीय वितरणासंबंधीचा हा सिद्धान्त अशा देशांबाबत खरा ठरत असल्याचे मत दिले. परंतु या सिद्धान्तात काही महत्त्वपूर्ण चलांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून आले. (उदाहरणार्थ, किमतींचा उत्पादनावर होणारा परिणाम, उपभोक्त्यांच्या पसंतीत असणारी पर्यायता, घटक पर्यायतेच्या लवचिकतेत असणारे क्षेत्रीय फरक.) क्लार्क–फिशर–कुझनेटस् यांच्या सिद्धान्तात असणाऱ्या या मर्यादांमुळे हा सिद्धान्त सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये होणारे क्षेत्रीय बदल स्पष्ट करण्यास असमर्थ ठरला. या सिद्धान्तातील मर्यादांमुळे उत्पादन आणि रोजगारात होणारे वेगळ्या स्वरुपाचे प्रवाह स्पष्ट करण्यात या सिद्धान्ताला अपयश आले. विकसनशील देशांमध्ये घडून येणारे क्षेत्रीय बदल या कारणामुळेच क्लार्क यांच्या गृहितांशी जुळणारे नाहीत.

अर्थव्यवस्थेतील संरचना आणि आर्थिक विकासाच्या पातळीशी असणारा त्यांचा संबंध जाणून घेण्याच्या दृष्टीने होलिस चेनरी आणि सायमन कुझनेटस् यांनी बऱ्याच देशांच्या स्तरच्छेद ( cross-section ) आणि समय श्रेणी ( time series ) आकडेवारीचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले. त्यांनी या विश्लेषणाच्या आधारावर असे प्रस्थापित केले की, अर्थव्यवस्थेच्या संरचनेत आणि आर्थिक विकासाच्या पातळीत जवळचा संबंध असतो. त्यांनी केलेल्या विश्लेषणावरून आर्थिक वाढीची प्रक्रिया खालील टप्प्यांशी संबंधित आहे :

1 आर्थिक विकासाबरोबर श्रम आणि उत्पन्नाबाबत प्राथमिक क्षेत्राच्या वाट्यात घट होते.

2 उत्पन्नाबाबत निर्माणक क्षेत्राच्या वाट्यात वाढ होते परंतु श्रमाच्या वाढीत होणारी वाढ सापेक्षतेने कमी असते.

3 सेवा क्षेत्राबाबत श्रमाच्या प्रमाणात वाढ होते परंतु उत्पन्नाच्या होणाऱ्या वाढीत सातत्य नसून ही वाढ अनियमित स्वरुपाची असते.

अशा प्रकारे होलिस चेनरी आणि सायमन कुझनेटस् यांच्या मते आर्थिक विकासाच्या पातळीत होणाऱ्या वाढीबरोबर अर्थव्यवस्थेत असणाऱ्या तिन्ही क्षेत्रांच्या उत्पन्न आणि रोजगाराच्या संरचनेतही बदल होतात. सर्वप्रथम उत्पन्न आणि श्रमाचे प्रमाण प्राथमिक क्षेत्रात घटू लागते तद्नंतर निर्माणक क्षेत्रात उत्पन्नात वाढ होते. परंतु त्याचबरोबर या क्षेत्रात श्रमाच्या वाढीत होणारे प्रमाण सापेक्षतेने कमी असते. यानंतरच्या अवस्थेत सेवा क्षेत्रात उत्पन्नाचे प्रमाण वाढते परंतु त्याचबरोबर श्रमाच्या प्रमाणात होणारी वाढ अनियमित स्वरुपाची असते. अशा प्रकारे आर्थिक विकासाच्या पुढील अवस्थेत सेवा क्षेत्राची वाढ गुणात्मक आणि संख्यात्मक स्वरुपाची असते. सेवा क्षेत्राच्या अशा गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीची कारणे खालीलप्रमाणे आहेत :

(1) दरडोई उत्पन्नात होणाऱ्या वाढीमुळे काही विशिष्ट प्रकारच्या सेवांसाठी असणाऱ्या मागणीत वाढ होते; उदाहरणार्थ, वाहतूक, संपर्क साधने, मनोरंजनाची साधने, इत्यादी.

(2) आर्थिक विकासाच्या पुढील पातळीवर असताना अर्थव्यवस्थेत भांडवलप्रधान उत्पादन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात होतो, निर्माणक क्षेत्रात सात-त्याने होणाऱ्या उत्पादनासाठी बऱ्याच सेवांच्या संचांची गरज भासते आणि अर्थव्यवस्थेत अशा सेवा आणि त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या यंत्रणेसाठी मागणीत वाढ होते. उदाहरणार्थ, कच्चा माल आणि तयार मालाची वाहतूक करण्यासाठी चांगली वाहतूक यंत्रणा, अत्याधुनिक संपर्क साधने, व्यवस्थापकीय आणि तांत्रिकी कौशल्य, घाऊक व्यापाराचे जाळे, इत्यादी.

(3) वैयक्तिक व खाजगी उत्पन्नात वाढ झाल्याने काही विशिष्ट उपभोग्य वस्तूंच्या मागणीत वाढ होते. प्रामुख्याने ज्यांच्याबाबत मागणीची उत्पन्न लवचिकता अधिक असते अशा उपभोग्य वस्तूंचा यात समावेश होतो. उदाहरणार्थ, टिकाऊ उपभोग्य वस्तू, मनोरंजन व करमणुकीची साधने आणि सेवा.

(4) आर्थिक विकासाच्या प्रक्रियेशी शहरी-करणाची प्रक्रियाही निगडित आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाल्याने शासकीय कार्यामध्ये भर पडते. नवीन कायदे, नियम व प्रशासन या स्वरुपात शासकीय कार्यामध्ये वाढ होते. त्याचबरोबर लोकांच्या राहणीमानाच्या पद्धतीतही बदल होऊन नवीन प्रका-रच्या सेवांबाबत लोकांच्या गरजाही वाढतात; उदाहरणार्थ, शिक्षण, आरोग्य पर्यटन, इत्यादी.

अशा प्रकारे आर्थिक विकासाबरोबर अर्थव्यव-स्थेतील क्षेत्रीय संरचनेतही बदल घडून येतात. आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात प्राथमिक क्षेत्र हे उत्पन्न आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे असले तरी आर्थिक विकासाच्या पुढील टप्प्यांमध्ये निर्माणक क्षेत्र महत्त्वाचे ठरते आणि नंतरच्या टप्प्यात सेवा क्षेत्र उत्पन्न आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने सेवा क्षेत्राचे उत्पन्न वाढण्याच्या महत्त्वाची चर्चा करण्यापूर्वी 'सेवा क्षेत्र म्हणजे काय?' हे समजून घेणे महत्त्वाचे ठरेल. सुमारे दहापंधरा वर्षांपूर्वीपर्यंत अर्थशास्त्रज्ञ सेवांची तुलना 'बिगर-व्यापार वस्तूंशी' (non-traded goods) करीत असत परंतु अशा प्रकारची तुलना वास्तविकतेपासून दूर नेणारी ठरते. जे. भगवती (1987) यांनी सेवा आणि 'बिगर-व्यापार वस्तू' यात फरक दाखविण्याच्या दृष्टीने सेवांची विभागणी दोन प्रमुख वर्गांमध्ये केली आहे.

(1) ज्यांच्याबाबत सेवा वापरणाऱ्या आणि सेवा पुरविणाऱ्यांमध्ये भौतिक (physical) जवळीक असणे आवश्यक आहे अशा सेवांना 'बिगर-व्यापारी सेवा' म्हणता येईल.

(2) ज्यांच्याबाबत सेवा वापरणाऱ्या आणि पुरवि-णाऱ्यांमध्ये भौतिक जवळिकीची गरज नसते, मात्र भौतिक जवळीक उपयोगी ठरू शकेल; अशा सेवांना 'व्यापार सेवा' म्हणता येईल.

## 1 भौतिक जवळीक आवश्यक असणाऱ्या सेवा

**(अ) गतिशील पुरविणारा, अगतिशील वापरणारा :** या वर्गात अशा सेवांचा समावेश करता येईल की, ज्यांच्याबाबत जेथे सेवा वापरणारी व्यक्ती आहे तेथेच मूलभूत श्रम सेवांचा पुरवठा होणे आवश्यक असेल. अशा ठिकाणी, सेवा देणाऱ्यानेच सेवा घेणाऱ्याकडे जाणे आवश्यक असते, परंतु विरुद्ध दिशेने मात्र सेवांची देवाणघेवाण शक्य नसते. उदाहरणार्थ, श्रमाची मागणी आणि वापर करणाऱ्या व्यक्ती किंवा उद्योगांच्या दिशेनेच श्रमाचा पुरवठा होणे अपरिहार्य असते. 1970 साली मध्य-पूर्व देशांकडे श्रमाचा लोंढा जाणे हे याचेच एक उदाहरण आहे.

**(ब) गतिशील वापरणारा आणि गतिहीन पुरविणारा :** सेवांच्या या श्रेणीत सेवा वापरणाऱ्याला सेवा देणाऱ्या-कडे जाणे अपरिहार्य असते. कारण त्याशिवाय सेवा उपभोगणाऱ्याला दुसरा मार्गच नसतो. उदाहरणार्थ, एका विशिष्ट मोठ्या बाजारात (super market) खरेदी करण्यासाठी किंवा दवाखान्यात शस्त्रक्रिया कर-वून घेण्यासाठी सेवा घेणाऱ्याने सेवा देणाऱ्याकडे जाण्याला पर्यायच नसतो.

## 2 भौतिक जवळीक अनावश्यक असणाऱ्या सेवा

सेवांच्या या प्रकारामध्ये अशाही सेवा मोडतात की ज्यांच्या बाबतीत सेवा पुरविणाऱ्या आणि सेवा

वापरणाऱ्यांमध्ये भौतिक जवळकीची गरज नसते परंतु भौतिक जवळिकीचा उपयोग मात्र होऊ शकतो. अशा सेवांना 'दूरगामी सेवा' म्हणता येईल. अशा व्यवहारांबाबत भौगोलिक जवळीक असावयाला लागतेच असे नाही. भौगोलिक अंतर असूनही सेवा देणाऱ्या आणि घेणाऱ्यांमध्ये सेवांची देवाणघेवाण व्यवस्थितपणे होऊ शकते. उदाहरणार्थ, बँकिंग आणि विमा क्षेत्राद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा (प्रामुख्याने विकसित देशांच्या संदर्भात) या श्रेणीत मोडतील. विकसित देशांमध्ये पत्रोपत्री बँकांकडून कर्जे काढता येतात तसेच विमा-पत्रेही खरेदी करता येतात. संगणित्राच्या वाढत्या वापरामुळे अशा प्रकारच्या सेवांच्या देवाणघेवाणीत अधिकच भर पडल्याचे दिसून येते.

भौतिक जवळीक आवश्यक असणाऱ्या सेवांबाबत सेवांची देवाणघेवाण नेहमीच सुरळीतपणे होते असे नाही. बऱ्याच वेळेला अशा प्रकारच्या सेवांच्या देवाण-घेवाणीवर काही मर्यादा येतात. उदाहरणार्थ, श्रमाच्या गतिशीलतेवर येणारी बंधने, श्रमाच्या गतिशीलतेमुळे होणाऱ्या खर्चामुळे निर्माण होणाऱ्या मर्यादा, इत्यादी. परंतु आधुनिक तांत्रिक सुधारणा आणि तंत्रविज्ञानात पडणारी नवनवीन भर, इत्यादी कारणांमुळे भौतिक जवळिकीची गरज नसणाऱ्या सेवा अधिक प्रमाणात व्यापार क्षेत्रात येऊ लागल्या आहेत. त्यामुळे 'व्यापार सेवां' चे प्रमाण आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात वाढण्याकडे कल निर्माण झाला आहे.

सेवांबाबत असणाऱ्या वरील वैशिष्ट्यांव्यतिरिक्त सेवांची आणखी काही वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत.

**अमूर्तता** (intangibility)

जी व्यक्ती वस्तूच्या प्रत्यक्ष उत्पादनात सहभागी नसून उत्पादनप्रक्रियेत कोणत्या तरी टप्प्यात सहभागी असेल अशा व्यक्तीच्या उत्पादन प्रक्रियेतील सहभागाला सेवा उत्पादन म्हणावे लागेल. अशा प्रकारे उत्पादनात अदृश्यपणे सहभागी असणारी व्यक्ती सेवांचे उत्पादन करते असे म्हणावे लागेल.

**अवशिष्ट प्रवर्ग** ( residual category )

सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेत होणाऱ्या उत्पादनाची विभागणी तीन क्षेत्रांमध्ये करण्यात येते. त्यातील पहिले म्हणजे प्राथमिक क्षेत्र. या क्षेत्रात शेती, खाणकाम, वनीकरण, उत्खनन इत्यादींचा समावेश करण्यात येतो. दुसरे क्षेत्र म्हणजे निर्माणक क्षेत्र. या क्षेत्रात प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या उद्योगांचा समावेश करण्यात येतो. ज्यांचा समावेश प्राथमिक आणि निर्माणक क्षेत्रांमध्ये करण्यात येत नाही त्यांचा समावेश अविशिष्ट प्रवर्ग किंवा सेवा क्षेत्रात करण्यात येतो. अशा प्रकारे सेवा क्षेत्राचा उल्लेख बऱ्याच वेळेला 'अविशिष्ट क्षेत्र' म्हणून करण्यात येतो. परंतु महत्त्वाची बाब म्हणजे काही विकसित देशांमध्ये एकूण रोजगाराच्या 60 ते 70 टक्के रोजगार या 'अविशिष्ट क्षेत्रात' निर्माण झाल्याचे दिसून येते.

सेवा क्षेत्राच्या सर्व वैशिष्ट्यांचा विचार करून-सुद्धा सेवा क्षेत्रात असणाऱ्या सर्व व्यवहारांच्या आधारावर या क्षेत्राचे सर्वसाधारण, सर्वमान्य प्रवर्गीकरण करणे अवघड आहे. वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी आपआपल्या संशोधनांमध्ये सेवा क्षेत्राचे प्रवर्गीकरण करताना या क्षेत्रातील काही व्यवहारांचा आपल्या संशोधनात समावेश केल्याचे दिसते, तर काही ठिकाणी (संशोधन अभ्यासामध्ये) सेवा क्षेत्रातील काही व्यवहार सेवा क्षेत्रातून वगळल्याचेही दिसून येते. वेगवेगळ्या संशोधन अभ्यासांमध्ये सेवा क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या व्यवहारांची चर्चा करण्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या व्यवहारांचा विचार करणे अधिक उपयुक्त होईल आणि त्या आधारावर वेगवेगळ्या संशोधन अभ्यासात याबाबत करण्यात आलेले बदल अधिक चांगल्या प्रकारे करता येतील. भारतीय अर्थव्यवस्थेतील वर्गीकरण पुढे दिले आहे.

## सेवा क्षेत्रातील व्यवहारांची सूची

### राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण (TWO DIGIT LEVEL), 1987

6 घाऊक व्यापार, उपाहारगृह आणि विश्रामगृह

60 शेतीतील कच्चा माल, पशू, अन्न, पेय, मादक पदार्थ आणि कापड यांचा घाऊक व्यापार

61 लाकूड, कागद, कातड, चामड, फर, इंधन,

पेट्रोलियम, रसायन, काच, धातू आणि कच्चा माल यांचे घाऊक व्यापार
62 वाहतुकीशी संबंधित साधनसामग्री आणि सर्व प्रकारची यांत्रिक साधनसामग्री यांचा घाऊक व्यापार
63 इतर कोठेही न उल्लेखिलेल्या बाबींचा घाऊक व्यापार
64 अडत एजंट
65 खाद्य, खाद्यपदार्थ, पेये, तंबाखू आणि मादक पदार्थ यांचा किरकोळ व्यापार
66 कापडांचा किरकोळ व्यापार
67 इंधन आणि इतर घरगुती उपयोगी वस्तू आणि टिकाऊ वस्तूंचा किरकोळ व्यापार
68 इतर वर्गीकरण न केलेल्या बाबींचा किरकोळ व्यापार
69 उपाहारगृह आणि विश्रामगृह
7 परिवहन, दळणवळण आणि साठवण
70 भूमी वाहतूक
71 जल वाहतूक
72 हवाई वाहतूक
73 इतरत्र वर्गीकरण न केलेल्या वाहतुकीशी अनुषंगिक सेवा
74 साठवण आणि वखार सेवा
75 दळणवळण सेवा
8 वित्तव्यवस्था करणे, स्थावर संपदा आणि व्यापारी सेवा
80 बँक व्यवसाय, ज्यात वित्तीय सेवांचा समावेश असेल
81 विमा आणि भविष्य सेवा
82 स्थावर संपदा व्यवहार
83 कायदाविषयक सेवा
84 लॉटरीसंबंधी कार्ये
85 भाडे आणि भाडेपट्टी (वर्गीकृत वित्तीय व्यवहारांमध्ये वित्तीय भाडेपट्टी) (इतरत्र वर्गीकृत न केलेले)
86 व्यापार सेवा (इतरत्र वर्गीकृत न केलेले)
9 सामुदायिक, सामाजिक आणि व्यक्तिगत सेवा
90 सार्वजनिक प्रशासन आणि सुरक्षा सेवा
91 सेवा
92 शिक्षण, वैज्ञानिक आणि संशोधन सेवा
93 आरोग्य आणि औषधीय सेवा
94 सामुदायिक सेवा
95 करमणूक आणि सांस्कृतिक सेवा
96 दुरुस्ती सेवा
97 आंतरराष्ट्रीय सेवा
98 इतरत्र वर्गीकृत न करण्यात आलेल्या सेवा

कोलिन क्लार्क (1990) यांनी त्यांच्या 'The Conditions of Economic Progress' या ग्रंथात सेवा क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या व्यवहारांचे वर्गीकरण करताना त्यात प्राथमिक आणि निर्माणक क्षेत्रांतील व्यवहार वगळून उर्वरित सर्व व्यवहारांचा समावेश केला होता. काही ठिकाणी त्यांनी बांधकाम व्यवसायाचा समावेशही सेवा क्षेत्रात केल्याचे आढळून येते. सेवा क्षेत्राची व्याख्या करताना फिशर (1939) काही प्रमाणात गोंधळलेले दिसतात. त्यांच्या मते अंतिम उपभोगाशी संबंधित सेवा या स्पष्टपणे सेवा क्षेत्रात मोडतात, परंतु प्राथमिक आणि निर्माणिक क्षेत्राला सहायक असणाऱ्या सेवांचा समावेश मात्र सेवा क्षेत्रात करता येणार नाही. या कारणामुळेच त्यांनी 'परिवहन आणि किरकोळ व्यापार' यांचा समावेश सेवा क्षेत्रात केला नसावा. ए. एस. भल्ला (1977) यांनी त्यांच्या 'Role of Services in Employment Expansion' या निबंधात सेवा क्षेत्राची व्याख्या करताना त्यात परिवहन व दळणवळण, वीज व पाणी यांचा समावेश केलेला नाही. या सेवांचा समावेश सेवा क्षेत्रात न करण्याची कारणे स्पष्ट करताना त्यांनी असे म्हटले आहे की, या सेवांचा विचार केल्यास त्यांचे व्यवस्थापन, उत्पादनप्रमाण, भांडवलप्रधानता आणि तंत्रविज्ञान, इत्यादी बाबी निर्माणक क्षेत्रासारख्या असल्याने या सेवांचा समावेश सेवा क्षेत्रात करणे योग्य ठरणार नाही. जवळजवळ दशकापूर्वी जॉर्ज स्टिगूलर यांनी म्हटले आहे की, "सेवा क्षेत्रातील प्रवर्गीकरण आणि सीमारेषांबाबत कोणतेही अधिकारात्मक एकमत अस्तित्वात नाही." सेवा क्षेत्रासंबंधी असणाऱ्या अभ्यासांचे परीक्षण केल्यास स्टिगूलर यांच्या या विधानाला कोणत्याही प्रकारे आव्हान देता येत नाही. सेवा क्षेत्राच्या व्याप्तीबद्दल असणारे गोंधळ वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांच्या अभ्यासापुरतेच मर्यादित नाहीत तर एकाच अर्थशास्त्रज्ञाने केलेल्या वेगवेगळ्या अभ्यासामध्येही सेवा क्षेत्राच्या व्याख्येत एकरूपता नसल्याचे दिसून येते. सायमन कुझनेटस्[1] यांनी त्यांच्या पूर्वीच्या

अभ्यासात परिवहन व दळणवळण आणि सार्वजनिक उपयोगिता यांचा समावेश सेवा क्षेत्रात केला परंतु नंतरच्या अभ्यासांमध्ये त्यांना सेवा क्षेत्रातून वगळले.

अनुभवनिष्ठ अभ्यासांमध्ये सेवा क्षेत्राच्या व्याख्येबद्दल असणारे फरक लक्षात घेता, सेवा क्षेत्राच्या वर्गीकरणात समाविष्ट होणाऱ्या व्यवहारांबाबत कोणताही स्पष्ट निकष नसल्याचे जाणवते. तरीही बहुसंख्य अभ्यासांमध्ये वापरात येणारे मुख्य निकष खालील-प्रमाणे आहेत :

1. उपभोक्त्याची जवळीक

2. मूर्त उत्पादनाची उपस्थिती/अनुपस्थिती. मूर्त उत्पादनाचा संबंध असणाऱ्या निष्कर्षांबाबतही काही अडचणी निर्माण होतात. उदाहरणार्थ, दंततज्ज्ञ (dentist) जेव्हा कवळी तयार करून रुग्णाच्या तोंडात बसवितो तेव्हा अर्थातच तो मूर्त वस्तूंची निर्मिती करतो. परंतु उद्योगांच्या वर्गीकरणात दंतचिकित्सकाचा समावेश मात्र सेवा क्षेत्रात करण्यात येतो.

3. सेवा क्षेत्राच्या वर्गीकरणात वापरण्यात येणारा महत्त्वाचा निकष म्हणजे 'अविशिष्ट क्षेत्र'

## सेवा क्षेत्रात जलद गतीने रोजगारनिर्मिती होण्याबाबत असणारी गृहिते व दृष्टिकोन

गेल्या काही दशकांमध्ये इतर क्षेत्रांच्या तुलनेने सेवा क्षेत्राला महत्त्व प्राप्त झालेले आहे. स्थूल देशान्तर्गत उत्पादितात (GDP) असणारा सेवा क्षेत्राचा वाटा तसेच रोजगारनिर्मिती या दोन्ही बाबींचा विचार केल्यास असे दिसून येते की, इतर दोन्ही क्षेत्रांच्या तुलनेने सेवा क्षेत्राचा वाटा या दोन्ही बाबतीत सातत्याने वाढत गेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास असे दिसून येते की, 1950 साली राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा जवळजवळ 25 टक्के होता. 1960 साली यात वाढ होऊन हा वाटा 30 टक्क्यांपर्यंत वाढला आणि 1980–90 च्या दशकात हा 40 टक्क्यांपर्यंत वाढलेला दिसतो. भविष्यकाळातही आर्थिक वाढीबरोबर राष्ट्रीय उत्पन्न/उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा सातत्याने वाढण्याकडे कल राहील असे अनुमान आहे. सेवा क्षेत्राची वाढ याच गतीने होत राहिली तर एकविसाव्या शतकाच्या सुमाराला राष्ट्रीय उत्पन्नात निम्मा वाटा सेवा क्षेत्राचा राहील असे अनुमान आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत गेल्या 25 वर्षातील सेवा क्षेत्राच्या वाढीच्या दराचा विचार केल्यास असे दिसून येते की, सेवा क्षेत्राच्या वाढीचा दर प्राथमिक आणि निर्माणिक क्षेत्राच्या वाढीच्या अनुरूप आहे. 1970–71 सालापासून प्राथमिक क्षेत्रात वास्तविक उत्पन्न वाढीचा दर प्राथमिक आणि निर्माणिक क्षेत्राच्या वाढीच्या अनुरूप आहे. 1970–71 सालापासून प्राथमिक क्षेत्रात वास्तविक उत्पन्न वाढीचा दर 2 टक्के वार्षिक होता. निर्माणिक क्षेत्रात हा दर 5 टक्के असून सेवा क्षेत्रातील वास्तविक उत्पन्न वाढीचा दर वार्षिक 6 टक्के होता. यावरून असे म्हणता येईल की, गेल्या काही दशकांमध्ये इतर क्षेत्रांच्या तुलनेने सेवा क्षेत्राचा वाटा राष्ट्रीय उत्पन्नाच्या संदर्भात सातत्याने वाढत गेला आहे आणि सेवा क्षेत्राच्या वाढीचा दर लक्षात घेता भविष्यकाळात सेवा क्षेत्र (इतर क्षेत्रांच्या तुलनेने) अधिक महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

आर्थिक विकासाबरोबर इतर क्षेत्रांच्या तुलनेने सेवा क्षेत्रात घडून येणारी वाढ काही विशिष्ट अर्थव्यवस्थांबाबत लागू पडते असे नाही तर आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असणाऱ्या वेगवेगळ्या अर्थव्यवस्थांमध्येही हीच प्रवृत्ती दिसून येते (पाहा : तक्ता 1).

आर्थिक विकासाबरोबर सेवा क्षेत्रात होणाऱ्या वाढीचा अभ्यास बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेला आहे. या अभ्यासामध्ये सापडणारे काही प्रमुख प्रवाह आणि दृष्टिकोनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न येथे करण्यात आलेला आहे. तसेच हे दृष्टिकोन इतर देशांबाबत आणि भारताबाबत कितपत लागू पडतात याचा विचारही खालील चर्चेत करण्यात आलेला आहे. सेवा क्षेत्राबाबत असणाऱ्या वेगवेगळ्या अभ्यासांमध्ये जे मुख्य दृष्टिकोन आढळतात ते खालील-प्रमाणे आहेत.

**तक्ता 1**

**उत्पादन आणि व्यवसायामधील बदल (1960–80)**

| देश | स्थू. दे. उ. चे (GDP) वितरण (%) | | | | | | श्रमशक्तीची टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेती | | उद्योग | | सेवा | | शेती | | उद्योग | | सेवा | |
| | 1960 | 1981 | 1960 | 1981 | 1960 | 1981 | 1960 | 1981 | 1960 | 1981 | 1960 | 1981 |
| **आशिया** | | | | | | | | | | | | |
| भारत | 50 | 37 | 20 | 26 | 30 | 37 | 74 | 69 | 11 | 13 | 15 | 18 |
| पाकिस्तान | 46 | 30 | 16 | 26 | 38 | 44 | 61 | 57 | 18 | 20 | 21 | 23 |
| इंडोनेशिया | 50 | 24 | 25 | 42 | 25 | 34 | 75 | 55 | 8 | 15 | 17 | 30 |
| थायलंड | 40 | 24 | 19 | 28 | 41 | 48 | 85 | 76 | 4 | 9 | 12 | 15 |
| फिलिपिन्स | 26 | 23 | 28 | 37 | 46 | 40 | 61 | 46 | 15 | 17 | 24 | 37 |
| कोरिया गणराज्य | 37 | 17 | 20 | 39 | 43 | 44 | 66 | 34 | 9 | 29 | 25 | 37 |
| मलेशिया | 36 | 23 | 18 | 36 | 46 | 41 | 63 | 50 | 12 | 16 | 25 | 34 |
| **लॅटिन अमेरिका** | | | | | | | | | | | | |
| ब्राझिल | 16 | 13 | 35 | 34 | 49 | 53 | 52 | 30 | 15 | 24 | 33 | 46 |
| मेक्सिको | 16 | 8 | 29 | 37 | 55 | 55 | 55 | 36 | 20 | 26 | 25 | 39 |
| **औद्योगिक** | | | | | | | | | | | | |
| इटली | 13 | 6 | 41 | 42 | 46 | 53 | 31 | 11 | 40 | 45 | 30 | 44 |
| इंग्लंड | 3 | 2 | 43 | 33 | 54 | 65 | 4 | 2 | 48 | 42 | 42 | 56 |
| जपान | 13 | 4 | 45 | 43 | 42 | 53 | 33 | 12 | 30 | 39 | 37 | 49 |
| फ्रान्स | 10 | 4 | 39 | 35 | 51 | 61 | 22 | 8 | 39 | 39 | 39 | 53 |
| अमेरिका | 4 | 3 | 38 | 34 | 58 | 63 | 7 | 2 | 36 | 32 | 57 | 65 |

स्रोत : WORLD DEVELOPMENT REPORT 1983, pp. 152-53 & 188-89.

1 उत्पन्न व खर्च दृष्टिकोन

2 उत्पादकता दृष्टिकोन

3 रोजगार दृष्टिकोन

## 1 उत्पन्न व रोजगार दृष्टिकोन

या दृष्टिकोनात सेवांसाठी असणाऱ्या अंतिम मागणीत होणाऱ्या वाढीला महत्त्व देण्यात आले. या दृष्टिकोनात सेवांसाठी असणाऱ्या मागणीच्या संरचनेला एक स्पष्टीकरणात्मक चल मानण्यात आले आहे. या दृष्टिकोनाची मांडणी सूत्राच्या स्वरुपात खालील प्रकारे करता येईल.

$$Es > I > Eg$$

किंवा

$$\frac{Ys}{Cs} \times \frac{\Delta Cs}{\Delta Ys} > I > \frac{Yg}{Cg} \times \frac{\Delta Cg}{\Delta Yg}$$

याठिकाणी–

E = उत्पन्न मागणी लवचिकता

s = सेवा

g = वस्तू

मागणीला प्राधान्य देणाऱ्या या दृष्टिकोनात सेवांवर खर्च होणाऱ्या उत्पन्नाच्या सीमान्तिक प्रवृत्तीला महत्त्व देण्यात आले आहे. या दृष्टिकोनाला दुजोरा देणाऱ्या दाखल्यांमध्ये महत्त्वाचा दाखला म्हणून स्थूल देशांतर्गत उत्पादितासंबंधी असणाऱ्या आकडेवारीकडे बघता येईल. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, दरडोई उत्पन्न वाढीबरोबर सेवांवर यातील मोठा हिस्सा खर्च करण्यात येतो. दरडोई उत्पन्नात होणारी वाढ आणि सेवांवर होणाऱ्या वाढत्या खर्चातील संबंध प्रस्थापित करीत असताना खर्चाची सरचना आणि उत्पन्नाची पातळी यातील संबंध महत्त्वाचा ठरतो. याबाबत युक्तिवाद अशा प्रकारे करण्यात येतो की, उत्पन्नात वाढ झाल्यास सेवांसाठी असणारी मागणी वस्तूंसाठी असणाऱ्या मागणीच्या तुलनेने अधिक झपाट्याने वाढते. या कारणास्तव अर्थव्यवस्थेत सेवांचे महत्त्व सातत्याने वाढण्याकडे कल निर्माण होतो.

या दृष्टिकोनाची तपासणी काही संशोधन अभ्यासाच्या आधाराने करता येईल. या संदर्भात व्ही. फुच यांनी 1926-65 या कालखंडासाठी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेबाबत केलेले संशोधन महत्त्वाचे आहे. व्ही. फुच यांचे संशोधन वरील दृष्टिकोनास कोणत्याही प्रकारे दुजोरा देत नाही. फुच यांच्या अभ्यासात खरेदी संरचनेत स्तरच्छेद विश्लेषण (cross-section analysis) आणि समय श्रेणी (time series) आकडेवारीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यांच्या या विश्लेषणावरून असे दिसून येते की, सेवा क्षेत्राच्या वाढीस जबाबदार असणाऱ्या घटकांमध्ये उत्पन्नात होणारी वाढ आणि त्यायोगे मागणीत होणारा बदल हे घटक महत्त्वाचे नाहीत. कारण 1929 साली अमेरिकेत एकूण उत्पादनात सेवा क्षेत्राचा जेवढा वाटा होता तेवढाच वाटा 1965 साली देखील राहिला (स्थिर खरेदीशक्ती असणाऱ्या डॉलरमध्ये मोजमाप केली असता). रॉबर्ट समर्स[2] (1985) यांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, 1975 साली अमेरिकेत 50 टक्के खर्च सेवांवर केला जात असे. परंतु त्यांच्या अभ्यासातील अत्यंत गरीब राष्ट्रांमध्ये (जेथे दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादित अमेरिकेच्या 10 टक्के उत्पादनापेक्षाही कमी होते) सेवांवर होणारा खर्च एकूण खर्चाच्या 25 टक्के खर्चापेक्षा जास्त नव्हता. परंतु रॉबर्ट समर्स यांच्या निष्कर्षांना काही प्रमाणात आव्हान देता येते. कारण, (1) औद्योगिक देशांमध्ये श्रम सापेक्षतेने महाग असते; सेवा क्षेत्रात श्रम सर्वाधिक महत्त्वाचा उत्पादन घटक असतो. या कारणाने औद्योगिक उत्पादनाच्या तुलनेने सेवांची किंमत अधिक असते; (2) सेवा बहुतांश बिगर व्यापार वस्तू असतात, त्यामुळे व्यापार वस्तूंच्या तुलनेने सेवांच्याबाबत आंतरराष्ट्रीय व्यापारात होणाऱ्या चढउतारांचा सेवांच्या किमतीवर फारसा परिणाम होत नाही; परिणामतः स्थूल देशांतर्गत उत्पादिताची आकडेवारी सेवांच्या वास्तव वाटयाला (एकूण खर्चात) वाढवून दाखविते आणि विकसनशील आणि मागास देशांबाबत ही आकडेवारी सेवांचा वाटा कमी असल्याचे दाखविते. रॉबर्ट समर्स यांनी त्यांच्या अभ्यासात आंतरराष्ट्रीय पातळीवर एकूण खर्चापैकी सेवांवर होणाऱ्या खर्चाची तुलना केली. असे करीत असताना त्यांनी खर्चाची तुलना चलाच्या क्रयशक्तीच्या आधारावर केली. क्रयशक्तीच्या निकषावरून असे दिसून आले की, 1975 साली अमेरिकेच्या स्थूल देशांतर्गत उत्पादितात वास्तविक सेवांचा वाटा भारताएवढाच होता (38 टक्के). रॉबर्ट समर्स यांचे हे निष्कर्ष 'रोजगार व उत्पन्न दृष्टिकोना'चे खंडन करतात. "आर्थिक विकासाबरोबर मागणी वाढल्याने सेवांचा विस्तार होतो," या परिकल्पनेला समर्सच्या निष्कर्षामुळे धक्का पोहोचतो. सेवा क्षेत्रातील काही उप-क्षेत्रांबाबत सेवांसाठी असणारी मागणीची लवचिकता एकापेक्षा अधिक असू शकते; उदाहरणार्थ, घरबांधणी, आरोग्य आणि इतर उपभोग्य सेवा; परंतु करणुकीची साधने, शिक्षण आणि शासकीय सेवांबाबत मात्र मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

'रोजगार व उत्पन्न दृष्टिकोना'ला भारतीय अर्थव्यवस्थेकडूनही दुजोरा मिळताना दिसून येत नाही. भट्टाचार्य आणि मित्रा (1990) यांनी याबाबत केलेल्या विवेचनावरून CSO आणि National Accounts Statistics वर आधारलेल्या आकडेवारीवरून) असे दिसून येते की, भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात 1980 च्या काळात सेवांवर होणरा खर्च एकूण खर्चाच्या 20 टक्के होता. यावरून असे म्हणता येईल की, उत्पन्नात होणाऱ्या वाढीचा परिणाम सेवांसाठी असणाऱ्या मागणीवर न होता उपभोग्य वस्तूंसाठी असणाऱ्या मागणीवर झालेला आहे. 1970-

71 ते 1986–87 या कालखंडात मागणीची सीमान्तिक प्रवृत्ती 0·76 अनुमानण्यात आली. या प्रवृत्तीत अल्पकाल आणि दीर्घकालात फारसा फरक नसल्याचेही निदर्शनास आणण्यात आले. भट्टाचार्य आणि मित्रा यांच्या मते उपभोगाची सीमान्तिक प्रवृत्ती सापेक्षतेने अधिक असून त्यापैकी उपभोग वस्तूंवर होणारा खर्च चार–पंचमांश असल्याने असा निष्कर्ष काढण्यात आला की, उत्पन्नात वाढ झाल्यास त्यामुळे उपभोग्य वस्तूसाठीच मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

'उत्पन्न व रोजगार दृष्टिकोना' कडे क्लार्क, कुझनेटस्, फिशर आणि चेनरी यांच्या परिकल्पनेच्या दृष्टिकोनातूनही बघता येईल. या अर्थशास्त्रज्ञांनी उत्पादन आणि रोजगार यांच्यात होणारे क्षेत्रीय बदल (प्राथमिक क्षेत्राकडून निर्माणक आणि सेवा क्षेत्राकडे) देशांतर्गत मागणीत होणाऱ्या बदलांच्या संदर्भात स्पष्ट केले. विकसित देशांच्या संदर्भात आर्थिक विकासाबरोबर हा बदल प्रमाणबद्ध पद्धतीने होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते आर्थिक विकासाबरोबर रोजगार आणि उत्पादनाचे प्रमाण शेती क्षेत्रापासून निर्माणक क्षेत्राकडे आणि निर्माणक क्षेत्रापासून अंततः सेवा क्षेत्राकडे वळणारे असते. भारताच्या संदर्भात अशा प्रमाणशीर बदलाचा विचार करता असे दिसून येते की, येथेही अशा प्रकाराचे क्षेत्रीय बदल घडून आले आहेत. एकूण राष्ट्रीय उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा कमी होऊन निर्माणक क्षेत्राच्या वाटयात वाढ झाली आहे, तर नंतरच्या अवस्थेत सेवा क्षेत्राच्या वाटयात अधिक वाढ झाली आहे. उत्पादनाबाबत भारतीय अर्थव्यवस्थेत क्षेत्रीय बदल जरी घडून आले असले तरी हे क्षेत्रीय बदल आंशिक स्वरुपाचे आहेत असे म्हणावे लागेल. कारण उत्पादनाबाबत होणाऱ्या क्षेत्रीय बदलांबरोबर रोजगाराबाबत मात्र हे क्षेत्रीय बदल त्याच प्रमाणात घडून आलेले दिसत नाहीत. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पादन आणि रोजगाराबाबत घडून आलेले क्षेत्रीय बदल प्रमाणशीर नाहीत (पाहा : तक्ता 2). या कारणास्तव असे म्हणता येईल की, कुझनेटस्, क्लार्क, फिशर आणि चेनरी यांच्या परिकल्पनेला भारतीय अनुभवावरून आंशिक दुजोरा मिळतो, परंतु पूर्णपणे दुजोरा मिळत नाही.

## 2 उत्पादकता दृष्टिकोन

**तक्ता 2**

**श्रमशक्ती आणि स्थूल देशांतर्गत उत्पादितासंदर्भात भारतातील क्षेत्रीय वितरण**

| कालखंड | प्राथमिक | निर्माणक | सेवा |
|---|---|---|---|
| 1950–51 | 56.5 | 15.0 | 28.5 |
| | (72.1) | (10.7) | (17.2) |
| 1960–61 | 52.1 | 18.7 | 29.2 |
| | (71.8) | (12.2) | (16.0) |
| 1970–71 | 45.8 | 22.3 | 31.9 |
| | (72.1) | (11.2) | (16.7) |
| 1980–81 | 39.6 | 24.4 | 36.0 |
| | (68.8) | (13.5) | (17.7) |
| 1990–91 | 33.1 | 27.8 | 38.7 |
| | (66.8) | (12.7) | (20.5) |
| 1993–94 | 31.9 | 26.9 | 41.2 |

**टीप** : कंसातील आकडेवारी कामगारांची टक्केवारी दर्शविते.

**स्रोत** : Singh & Sharma (1995), INDIAN JOURNAL OF LABOUR ECONOMICS.

या दृष्टिकोनानुसार सेवा क्षेत्रातील रोजगारात होणाऱ्या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे त्या क्षेत्राची कमी उत्पादकता होय. इतर क्षेत्रांच्या तुलनेने सेवा क्षेत्रात दरडोई उत्पादकतेत होणारी वाढ सर्वात कमी असते. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की, विशिष्ट उत्पादनासाठी कामगारांची गरज प्राथमिक आणि निर्माणक क्षेत्रात अधिक प्रमाणात कमी होती परंतु सेवा क्षेत्रात मात्र कामगारांच्या वापरात / गरजेत होणारी घट इतर क्षेत्रांच्या मानाने कमी प्रमाणात कमी होती. या दृष्टिकोनाची मांडणी सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे करता येईल :

$$\frac{\Delta\left(\frac{Ys}{Ls}\right)}{\left(\frac{Ys}{Ls}\right)} < \frac{\Delta\left(\frac{Yg}{Lg}\right)}{\left(\frac{Yg}{Lg}\right)}$$

याठिकाणी –

Ys= सेवा क्षेत्रातील उत्पन्न

Ls= सेवा क्षेत्रातील कामगार

Yg= वस्तू क्षेत्रातील उत्पन्न

Lg= वतू क्षेत्रातील कामगार

सेवा क्षेत्रातील कामगारांची उत्पादकता सापेक्षतेने कमी असण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1 उद्योगांच्या तुलनेने सेवा क्षेत्रात दरडोई कामगारांच्या कामाच्या तासात अधिक प्रमाणात घट होते.

2 सेवांच्या तुलनेने इतर उद्योगांमध्ये कामगारांच्या गुणवत्तेत अधिक प्रमाणात वाढ होते. औद्योगिक कामगारांच्या पगारात होणारी वाढ याचे एक स्पष्टीकरण म्हणून मानता येईल. अर्थात औद्योगिक कामगारांच्या वेतनात होणाऱ्या वाढीचे बरेच श्रेय औद्योगिक श्रमिक संघांना देता येईल. परंतु औद्योगिक कामगारांची वेतन वाढ आणि औद्योगिक व सेवा क्षेत्रातील कामगारांच्या वेतनात असणारी तफावत ही मोठ्या प्रमाणात त्यांच्यात असणाऱ्या कौशल्य पातळीतील तफावतीमुळे आहे असे म्हणावे लागेल.

3 उद्योगांमध्ये दरडोई कामगार–भांडवलाचे प्रमाण सेवा क्षेत्रांच्या तुलनेने बरेच अधिक असते.

4 सेवा क्षेत्राच्या तुलनेने उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिकी बदल/सुधारणा झाल्या आहेत.

या संदर्भात इतर देशांमध्ये झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे योग्य ठरेल. व्ही. फुच यांनी अमेरिकेतील सेवा क्षेत्राचा अभ्यास (1929–65 या कालखंडासाठी) करून असे निदर्शनास आणले की, शेती क्षेत्रात वार्षिक सरासरी बदलाचा दर (विशिष्ट उत्पादनासाठी कामगारांच्या गरजेत होणारी घट) 3.4 टक्के होता. उद्योगांबाबत हा दर 2.2 टक्के होता तर सेवांबाबत हा दर फक्त 1.1 टक्के इतका होता. केन्ड्रिक (1985) यांनीही अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात सेवा क्षेत्रातील उत्पादकतेचा अभ्यास केला. त्यांनी त्यांच्या अभ्यासातून असे निदर्शनास आणले की, अमेरिकेतील अर्थव्यवस्थेत वस्तू उत्पादनात कामगारांच्या उत्पादकता वाढीचा सरासरी वार्षिक दर (साडे तीन दशकांपर्यंत) 2.8 टक्के राहिला. सेवा क्षेत्राबाबत मात्र उत्पादकता वाढीचा दर 1.9 टक्के राहिला. अशा प्रकारे व्ही. फुच आणि केंड्रिक यांचे अभ्यास 'उत्पादन दृष्टिकोना'ला दुजोरा देणारे आहेत.

भारतीय सेवा क्षेत्रात कामगारांची उत्पादकता मोजताना सूर्यनारायण (1995) यांनी असे म्हटले आहे की, "स्थूल देशांतर्गत उत्पादित वाढीचा दर आणि रोजगार वाढीचा दर यांच्या प्रमाणाला स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या संदर्भात रोजगाराची लवचिकता म्हणता येईल. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, रोजगाराची लवचिकता ही संकल्पना एका विशिष्ट क्षेत्रातील स्थूल देशांतर्गत उत्पादितात एक टक्क्याने वाढ झाल्यास त्यामुळे त्या विशिष्ट क्षेत्रात रोजगार वाढीचा दर मोजण्यास उपयोगी ठरते. एका क्षेत्राबाबत रोजगार लवचिकता एकापेक्षा अधिक असल्यास त्या क्षेत्रात उत्पादकतेत होणारी घट सूचित होते. रोजगाराची लवचिकता एकाएवढी असल्यास उत्पादकतेची पातळी स्थिर असल्याचे सूचित होते. रोजगार लवचिकता एकापेक्षा कमी असल्यास उत्पादकतेत होणारी वाढ सूचित होते. भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख उत्पादन क्षेत्रांची रोजगार लवचिकता तक्ता 3 वरून कळून येते. या तक्त्यावरून असे दिसून येते की, सेवा क्षेत्रातील रोजगार लवचिकता सर्व क्षेत्रांच्या सरासरी लवचिकतेपेक्षा अधिक असली तरीही लवचिकता एकापेक्षा कमी आहे. याचा अर्थ, सेवा क्षेत्रात उत्पादकतेत वाढ होत आहे, परंतु सापेक्षतेने सेवा क्षेत्रातील उत्पादकता वाढीचा दर इतर क्षेत्रांच्या तुलनेने कमी आहे. सेवा क्षेत्रातील या वैशिष्ट्यांचे काही महत्त्वपूर्ण परिणाम संभवतात. एक म्हणजे, 1992-93 या वर्षातील सेवा क्षेत्रातील स्थूल देशांतर्गत उत्पादिताचा विचार केल्यास त्यामुळे सेवा क्षेत्रातील कमी उत्पादकता तर सूचित होतेच पण त्याबरोबर सेवा क्षेत्रात रोजगारनिर्मितीक्षमता अधिक असल्याचे पण निदर्शनास येते. या कारणामुळे सेवा क्षेत्राच्या वाढीचा वेग तीव्र झाल्यास, या क्षेत्राबरोबर अर्थव्यवस्थेतील वाढ तर अधिक प्रमाणात होईलच, त्याचबरोबर रोजगारनिर्मि–

तक्ता 3

भारतातील प्रमुख उत्पादक क्षेत्रांमध्ये रोजगार लवचिकता (स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या संदर्भात)

| क्षेत्र | 1972–73 ते 1977–78 | 1978–79 ते 1983 | 1983 ते 1987–88 | 1987 ते 1991 |
|---|---|---|---|---|
| 1 शेती | 0·64 | 0·49 | 0·36 | – |
| 2 खाणी व उत्खनन | 0·95 | 0·67 | 0·87 | – |
| 3 उत्पादन | 1·05 | 0·628 | 0·26 | 0·19 |
| 4 बांधकाम | 0·35 | 1·00 | 1·00 | 1·12 |
| 5 वीज, गॅस व पाणी पुरवठा | 1·67 | 0·74 | 0·48 | – |
| 6 वाहतूक, साठा, दळणवळण | 0·76 | 0·92 | 0·35 | 0·36 |
| 7 सेवा | 0·80 | 0·99 | 0·42 | 0·65 |
| 8 सर्व क्षेत्रे | 0·61 | 0·55 | 0·38 | 0·45 |

स्रोत : Singh & Sharma (1995), INDIAN JOURNAL OF LABOUR ECONOMICS, Vol. 38.

तीचा वेगही वाढण्यास मदत होईल. वरील चर्चेवरून असे म्हणता येईल की, भारतीय अनुभवावरून 'उत्पादकता दृष्टिकोना'ला पुष्टी मिळते.

## 3 रोजगार दृष्टिकोन

या दृष्टिकोनानुसार सेवा क्षेत्रातील रोजगाराचा निर्माणक क्षेत्रातील रोजगाराशी सहसंबंध असतो. सूत्रस्वरुपात वरील दृष्टिकोनाची मांडणी खालील-प्रकारे करता येईल :

$$\frac{\Delta Ls}{Ls} = f\left(\frac{\Delta Lm}{Lm}\right)$$

याठिकाणी –

$\Delta Ls$ = सेवा क्षेत्रातील रोजगारात होणारा बदल

$Ls$ = सेवा क्षेत्रातील रोजगार

$\Delta Lm$ = निर्माणक क्षेत्रातील रोजगारात होणार बदल

$Lm$ = निर्माणक क्षेत्रातील रोजगार

वॉल्टर गेलन्सन (1963) यानी 1953–54 ते 1963–64 या कालखंडासाठी (दृष्टिकोनाच्या संदर्भात) 25 देशांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यांच्या या अभ्यासात त्यानी सेवा क्षेत्रातील रोजगार आणि निर्माणक क्षेत्रातील रोजगारात सहसंबंध दाखविणाऱ्या काही कारणांची कारणमीमांसा केली आणि या अभ्यासाच्या आधारावर काही निष्कर्ष काढले ते पुढीलप्रमाणे आहेत :

1 निर्माणक क्षेत्रात असणाऱ्या प्रत्येक अतिरिक्त शंभर कामगारांमागे सेवा क्षेत्रात त्यांच्या कितीतरी पटीने कामगार संख्येत वाढ होते.

2 निर्माणक क्षेत्रात उत्पादन वाढीचे प्रमाण जेवढे अधिक असेल (निर्माणक क्षेत्रात दरडोई उत्पादन पातळी अधिक असून या क्षेत्रातील रोजगारातही वाढ झाली असल्यास) तर सेवा क्षेत्रातही रोजगारनिर्मिती अधिक प्रमाणात होऊ शकेल. परंतु निर्माणक क्षेत्रात रोजगारात वाढ होऊन त्याचबरोबर या क्षेत्रातील कामगारांच्या उत्पादकतेत प्रमाणशीर घट झाली असल्यास मात्र सेवा क्षेत्रातील रोजगारात अतिरिक्त वाढ फारशी होणार नाही.

3 आधुनिक तंत्रविज्ञान आणि निर्माणक क्षेत्राच्या उत्पादकतेत होणारी वाढ यांचा विचार करता, निर्माणक क्षेत्रातील रोजगारनिर्मितीक्षमतेवर मर्यादा येईल. अशा परिस्थितीत रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने सेवा क्षेत्र महत्त्वाची भूमिका

बजावू शकेल.

या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेबाबत झालेल्या काही अभ्यासावरून असे दिसून येते की, प्राथमिक आणि निर्माणक क्षेत्राच्या उत्पन्नात वाढ झाल्याने सेवांसाठी असणाऱ्या मागणीत वाढ होईल आणि परिणामत: सेवा क्षेत्राच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार होऊन या क्षेत्राची वाढ होऊन त्याच्या रोजगार-निर्मितीक्षमतेत वाढ होईल. परंतु 1980 नंतरचा कालखंड बघितल्यास (संदर्भ : तक्ता 3) भारतीय निर्माणक क्षेत्राची रोजगार लवचिकता सातत्याने कमी होताना दिसते. 1960–88 या कालखंडासाठी बांधित मूल्याच्या संदर्भात निर्माणक क्षेत्राची रोजगार लवचिकता 0·23 असल्याचे दिसते. 1980 या दशकाचा विचार करता, निर्माणक क्षेत्राची रोजगार लवचिकता 0·2 पेक्षाही कमी असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर निर्माणक क्षेत्राचा सेवा क्षेत्रातील रोजगारनिर्मितीशी असणारा संबंध भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात कमकुवत असल्याचे जाणवते.

भट्टाचार्य आणि मित्रा (1990) यांनी भारतीय निर्माणक संघाशी निगडित सेवा क्षेत्रातील उत्पन्न आणि उत्पादनाचे प्रमाण शोधावयाचा प्रयत्न केला आहे. त्यांनी 1950–51 ते 1986–87 या कालखंडासाठी सेवा क्षेत्रातील प्रत्येक उप-क्षेत्राच्या वास्तव उत्पन्नाच्या लवचिकतेचा संबंध वस्तूंच्या उत्पादन आणि उत्पन्नाशी लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते सेवा क्षेत्रातील स्थावर मालमत्ता घटाचा अपवाद सोडता, सेवा क्षेत्राशी निगडित उत्पन्न वाढीचा वेग वस्तू उत्पादनाशी संबंधित उत्पन्नापेक्षा अधिक होता. त्यामुळे भट्टाचार्य आणि मित्रा यांचे असे मत झाले की, सेवा क्षेत्रातील उत्पन्न वाढ आणि निर्माणक क्षेत्रातील उत्पन्न वाढीचा परस्पर संबंध नसून सेवा क्षेत्रातील उत्पन्न वाढ स्वतंत्र आहे. सेवा क्षेत्राच्या वाढीच्या संदर्भात बहिर्जात (exogenous) आणि उत्प्रेरित (वस्तूंच्या वाढीमुळे निर्माण झालेले) घटकांमध्ये फरक केल्यास असे दिसून येते की, बहिर्जात घटकांचा (उदाहरणार्थ, शहरीकरण, लोकसंख्या वाढ, व्यापारीकरण, इत्यादी) सेवा क्षेत्रातील वाढीवर झालेला परिणाम उत्प्रेरित घटकांच्या परिणामापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. अशा प्रकारे भट्टाचार्य आणि मित्रा यांनी भारतीय सेवा क्षेत्राच्या वाढीचा संबंध निर्माणक क्षेत्राच्या वाढीशी नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

प्रस्तुत लेखाचा उद्देश वाचकांना भारतीय सेवा क्षेत्रात होणाऱ्या वाढीच्या काही पैलूंची माहिती देणे असा जरी असला तरी या क्षेत्रासंबंधी जे संशोधनपर अभ्यास झालेले आहेत त्यांचा थोडक्यात मागोवा घेणे हाही होता. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व सातत्याने वाढत आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते एकविसाव्या शतकापर्यंत भारतीय राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा जवळजवळ 50 टक्क्यांपर्यंत वाढेल. प्रस्तुत लेखात या सेवा क्षेत्राच्या काही पैलूंबद्दल माहिती देण्यात आली असली तरी या क्षेत्रातील काही महत्त्वाच्या पैलूंचा प्रस्तुत लेखात समावेश झालेला नाही. उदाहरणार्थ, रोजगारनिर्मितीबाबत सेवा क्षेत्र सर्वात (इतर क्षेत्रांच्या तुलनेने) महत्त्वाची भूमिका बजावत असला तरी या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगाराचे स्वरूप काय? या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगारापैकी किती रोजगार संघटित क्षेत्रात आणि किती रोजगार असंघटित क्षेत्रात निर्माण होतो? रोजगारनिर्मिती करणारे सेवा क्षेत्रातील मुख्य उपक्षेत्र कोणते? या उपक्षेत्रात रोजगारनिर्मिती अधिक होण्यास कारणीभूत असणारे घटक कोणते?, इत्यादी. या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी सेवा क्षेत्रात निर्माण होणारे उत्पन्न, उत्पादन आणि रोजगारासंबंधी अधिक संशोधन होण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या संशोधनाचा उपयोग भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगारनिर्मिती करण्याची क्षमता असणाऱ्या उप-क्षेत्रांची ओळख पटवून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल.

## संदर्भ टीपा

1 कुझनेटस् यांच्या 'Modern Economic Growth' (1966) या ग्रंथाची तुलना त्यांच्याच 'Quantitative Aspects of Economic Growth of Nations, III, Industrial Distribution of Income and Labour Force by States 1919-55' (1958) या ग्रंथांशी केल्यास.

2 रॉबर्ट समर्स (1985) यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय तुलना करणाऱ्या प्रकल्पाच्या (International Comparison Project) आकडेवारीचा आधार घेऊन वेगवेगळ्या देशांमध्ये

सेवांवर होणाऱ्या खर्चांचा तुलनात्मक अभ्यास केला. समर्सच्या अभ्यासात पुढील देशांची निवड नमुना म्हणून करण्यात आली (1975 साली दरडोई वास्तविक स्थूल देशांतर्ग उत्पादिताच्या आधारे चढत्या क्रमाने देशांची नावे) : मालवी, केन्या, भारत, पाकिस्तान, श्रीलंका, झांबिया, थायलंड, फिलिपिन्स, कोरिया गणराज्य, मलेशिया, कोलंबिया, जमेका, सीरिया, अरब गणराज्य, ब्राझिल, रुमानिया मेक्सिको, युगोस्लाविया, इराण, उरुग्वे, आयर्लंड, हंगेरी, पोलंड, इटली, स्पेन, इंग्लंड, जपान, ऑस्ट्रेलिया, नेदर्लंड, बेल्जियम, फ्रान्स, लक्झेंबर्ग, डेन्मार्क, जर्मनी, अमेरिका.

## संदर्भ सूची


1 Bhalla, A. S. (1970), "Role of Services in Employment Expansion," INTERNATIONAL LABOUR REVIEW, May.

2 Bhagvati, Jagdish (1987), "International Trade In Services and Its Relevance for Economic Development" in THE ENCERGING SERVICE SECTOR, Edited by Orio Grains Giarini, Pergamon Press 1987.

3 Bhattacharya, B. B. and Mitra, Arup (1990), "Excess growth of Tertiary Sector in Indian Economy", ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, Nov. 3,1990.

4 Clark, Colin (1940), 'THE CONDITIONS OF ECONOMIC PROGRESS', Macmillan & Co., London.

5 Fisher, A. G. B. (1945), ECONOMIC PROGRESS AND SOCIAL SECURITY.

6 Fuch, V. 'THE SERVICE ECONOMY', National Bureau of Economic Research, New York.

7 Galenson, Walter (1963), "Economic Development and Expansinon of Employment", INTERNATIONAL LABOUR REVIEW, June 1963, pp. 505-19.

8 Jaroslaw, Wieczorek (1995), "Sectoral Trends in World Employment and Shift Towards Services", INTERNATIONAL LABOUR REVIEW Vol. 134, No. 2.

9 Kendrick, J. W. (1985), "Measurement of Output and Productivity in Service Sector" in Inman R. P. (Ed), MANAGING THE SERVICE ECONOMY: PROSPECTS AND PROBLEMS, Cambridge University Press, Cambridge.

10 Kuznets, S. (1971), ECONOMIC GROWTH OF NATIONS, The Belkanap Press, Harvard University Press, Cambridge.

11 Kuznets, Simon (1959), "SIX LECTURES ON ECONOMIC GROWTH Free Press U. S. A.

12 Mitra, A (1988) Disproportionality of Service Sector : A Note", SOCIAL SCIENTIST.

13 Singh Sharma and Sharma, Shyam (1995), "Employment Generation in Service Sector", THE INDIAN JOURNAL OF LABOUR ECONOMICS, Vol 38, No.4.

14 Suryanarayan, S. S. (1995), "The Services Sector in India : Structure, Characteristics and Role in Economic Development", INDIAN JOURNAL OF ECONOMICS, Vol. 38, No. 1.

15 World Bank (1983), WORLD DEVELOPMENT REPORT, Washington D. C.


□ □

# पाणी उपयोगितेचे खाजगीकरण व विनियमन : जागतिक अनुभवाचे धडे*

जेनिस ए. बीकर **

अनुवाद

बाळकृष्ण कुलकर्णी ***

[ सारांश

पाणी आणि जलनिस्सारण उद्योगांच्या जागतिक खाजगीकरणाच्या प्रयोगामुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. यामध्ये खाजगी जलसेवा उपलब्ध करणाऱ्यांवर आर्थिक विनियमन (regulation) लावावयाचे काय आणि ते कसे असे प्रश्न उभे राहतात. खाजगीकरणाच्या व विनियमनाच्या अनेक प्रतिकृती यात आल्या आहेत. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, आणि अर्जेंटिना या देशांनी भिन्नभिन्न असे मार्ग सुचविले आहेत. सरकारी मालकीच्या या उद्योगाचे खाजगीकरण करताना त्यातून उद्भवणारी एकाधिकाराची पिळवणूक शक्ती, इतर धोरणात्मक ध्येये, अर्थव्यवस्थेची कार्यदक्षता, आर्थिक विकास, पर्यावरणाचे संरक्षण, समन्याय (equity) अशा समस्यांवर मात करण्यासाठी राष्ट्राला संस्थात्मक तयारी करावयाला हवी.

## प्रास्ताविक

जेव्हा आपण पाण्याच्या व जलनिस्सारणाच्या वापराच्या खाजगीकरणाचा अभ्यास करतो तेव्हा जागतिक राजकीय–आर्थिक खाजगीकरणाची चळवळ या अर्थाने एक अस्तित्वात येत असलेली प्रतिक्रात्मक घटना म्हणून अनेक प्रश्न उभे राहतात. यासाठी अमेरिकेत, अमेरिकेच्या विविध राज्यांत, शहरात अनेक संस्थात्मक प्रयोग केले गेले. सध्या जागतिक प्रयोगशाळेत असे प्रयोग केले जात आहेत. खाजगी सेवा उपलब्ध करणाऱ्यांचे विनियमन करावयाचे काय आणि ते कसे याबाबतीत जागतिक अनुभवावरून, अमेरिकेत परस्परविरोधी प्रतिकृती आणल्या गेल्या आहेत[1]. या सगळ्यांचा फार खोलवर परिणाम अमेरिकेच्या खाजगीकरणाच्या प्रयोगावर झाला आहे.

अमेरिकेतील इतर उपयोगिता उद्योगांपेक्षा जलउद्योग हा प्रामुख्याने सरकारी मालकीखाली आहे. धोरण ठरविण्यासंबंधी खाजगीकरणाबाबत विविध

* Water International, 22; 1997 या अंकात प्रसिद्ध झालेला लेख.

** Janice A Beecher, सेंटर फॉर अर्बन पॉलिसी अॅन्ड दि एन्व्हायरमेंट, इंडियाना युनिव्हर्सिटी – पर्दू युनिव्हर्सिटी, इंडियानापोलिस, अमेरिका.

*** भूतपूर्व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.

सैद्धान्तिक आणि व्यावहारिक विचार मांडले गेले आहेत. युरोप व लॅटिन अमेरिकेतील जल उद्योगाच्या खाजगीकरणाच्या अनुभवाने खाजगीकरणाकडे विशेष रस घेऊन पाहिले जात आहे. यात भर म्हणून सेवा उद्योग हा नैसर्गिकरीत्या एकाधिकाराचा असतो आणि त्यावर बाजारप्रणालीचा, स्पर्धेचा परिणाम होत नाही हे शंभर वर्षांहून अधिक कालापासून दृढ झालेले मत अमेरिकेतील आणि इतर सार्वजनिक सेवा उद्योगांच्या अनुभवावरून बदलले जात आहे. दूरसंचार दळणवळण व ऊर्जा या दोन क्षेत्रांत तांत्रिकदृष्ट्या आर्थिक आणि सरकारी धोरणात इतके नाविन्य निर्माण झाले की, या उद्योगांतील एकाधिकाराच्या संकल्पना लोप पावल्या जात आहेत आणि त्यांची जागा स्पर्धा घेत आहे. इतकेच नव्हे तर, जो जलउद्योग अगदी एकाधिकार आहे असे समजले जात होते त्यातही बदल होत आहे. एकाधिकार सत्ता सतत टिकून असल्यास विनियमनाच्या बाबीकडे काणाडोळाच होतो. तथापि खाजगीकरणाच्या विविध प्रतिकृती सादर केल्याने विनियमनाच्याही विविध प्रतिकृती निर्माण झाल्या.

जलउद्योगाच्या आणि जलनिस्सारण सेवा उद्योगाच्या कार्यात्मक आणि मालकी हक्काची जबाबदारी सरकारी न राहता संपूर्णतः किंवा अंशतः खाजगी क्षेत्राकडे जाणे यालाच आपण खाजगीकरण म्हणतो (2). या विषयावर खाजगीकरणाचे जे विविध मार्ग अस्तित्वात आले आहेत त्यांचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. मूलतः उपयोगितेच्या जिंदगींची मालकी कुणाकडे असते यावरून खाजगीकरणाची दोन क्षेत्रांत विभागणी केली जाते. खाजगी मालकीमध्ये मूलतः जिंदगींची निर्मिती, हस्तांतर खाजगी किंवा सेवा गुंतवणुकीमध्ये भाग घेतलेल्यांकडे जाते; पण काही बाबतीत खाजगीकरणामध्ये सरकारी मालकी तशीच ठेवली जाते आणि कराराने खाजगी लोकांकडून विविध सेवा करविल्या जातात. खाजगी मालकी असलेल्या सेवा असल्या तरी, काही वेळा त्यांच्यावर आर्थिक बंधने असतात; विशेषतः किंमतींवर सरकारी नियंत्रणे असतात; उदाहरणार्थ, इंग्लंड. दुसरा भाग जरा गुंतागुंतीचा आहे. कराराने दिलेल्या खाजगी संस्थांचे विनियमन करावयाचे की नाही आणि करावयाचे असेल तर त्याची मर्यादा किती असावी या पर्यायाने यात गुंतागुंत निर्माण होते. काही बाबतीत सरकारी एकाधिकार असूनसुद्धा जरी काही सेवा कराराने केल्या जात असतील तरी त्यांचे योग्य विनियमन केलेले असते; उदाहरणार्थ, फ्रान्स. याशिवाय आणखी दुसऱ्या बाबतीत, विशेषतः जिथे स्थानिक सेवांना दीर्घ मुदतीची कर्जे द्यावयाची असतात तेव्हा लोकांना सेवा उपयोगिता देण्याबाबत खाजगी क्षेत्राचा जास्त सहभाग असेल तिथे सरकारी यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणावर विनियमन केलेले असते; उदारणार्थ, अर्जेंटिना.

उपयोगिता उद्योगांच्या बाबतीत धोरण ठरविताना संरचनात्मक बदल हे कारण व परिणाम दोन्हीही होऊ शकेल. अमेरिकेत जलउद्योग तुटक व विस्कळित असल्याने तिथे धोरण ठरविण्यासाठी खूप अडचणी येतात. शिवाय खाजगीकरणाचे फायदे आणि ते मिळविण्याच्या विविध मार्गातील स्पर्धा यामुळे धोरण ठरविण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत. अमेरिकेत खाजगी मालकीची गुंतवणूक केलेल्या उपयोगिता उद्योगांवर प्रामुख्याने राज्य सार्वजनिक उपयोगिता आयोगाचे विनियमन असते. काही किरकोळ बाबीत विनियमन नसते. नगरपालिकेकडे असलेल्या उपयोगितांवर निर्बंध नाहीत. अर्थात काही राज्यांत अशा नगरपालिकेच्या उपयोगितांवर राज्याची काही अंशी बंधने आहेत तो भाग वेगळा. कराराने दिलेल्या उपयोगितांचे विनियमन करणे हे आयोगाच्या कक्षेत येत नाही. अर्थात आयोगाची कक्षा कुठपर्यंत असावी, कशी असावी कुठे विनियमन नसावे याबाबतीत विविध राज्यांमध्ये अनिश्चितता दिसून येते.

अमेरिकेच्या आर्थिक विनियमनाच्या, वित्तीय, करविषयक आणि इतर धोरणांत खाजगी जलउद्योगात स्पर्धा कशी आणावयाची किंवा तिचा विकास कसा घडवून आणावयाचा याचे चित्र दिसत नाही. विनियमनामुळे खाजगीकरणात अडचणी निर्माण होतात, कारण त्या कारणाने खाजगी नफा व नाविन्याच्या प्रक्रियेत गोंधळ होऊन त्याचा कार्यदक्षतेवरही परिणाम होतो. त्यामुळे खाजगी उपयोगितांवर तसेच सरकारच्या कारभारावरसुद्धा ताण पडतो. यात भरीस भर म्हणून खाजगी मालकीच्या बाजारांपेक्षा बिगर–विनियमित करारांच्या बाजारांचा विकास द्रुतगतीने झाला. सध्या अमेरिकेत संयुक्त सरकारच्या व राज्यांच्या धोरणात असा बदल केला जात आहे की जेणेकरून खाजगी–

करणाला प्रोत्साहन मिळेल. याबाबतीत जागतिक अनुभवाचा उपयोग राज्यांना आपल्या विनियमनात्मक धोरणांच्या परिणामांचे मल्यमापन करण्यासाठी होईल.

### खाजगीकरणाची चळवळ

देशातील राजकीय व आर्थिक प्रणालीचा तसेच परिस्थितीचा सरकारच्या खाजगीकरणाला चालना देण्यासाठी, राजकीय पटलावर खाजगीकरणाला आणण्यासाठी नेहमीप्रमाणेच परिणाम होत असतो. सावास (Savas) (3) यांनी खाजगीकरण का असावे यासाठी चार सयुक्तिक अनुकूल मतप्रणाली सांगितल्या आहेत. खाजगीकरणात सरकारचा सहभाग कमी म्हणून आदर्शवादी, अधिक धंदा म्हणून व्यापाराच्या दृष्टीने फायद्याचा, लोकप्रिय आणि व्यावहारिक असे चार गुण असतात. ढोबळरीत्या युरोपमधील खाजगीकरण हे आदर्शवादी आहे असे म्हणावे लागेल. अर्थात त्यात वाढत्या प्रमाणात व्यापारवाद व व्यावहारिक बाजू हल्ली जास्त दिसून येत आहे. अमेरिकेतील खाजगीकरणात पूर्वी व्यावहारिक मतप्रणाली जास्त होती. सध्या मात्र आदर्शवाद व व्यापारीकरणाचा जास्त प्रभाव दिसून येत आहे, कारण उपयोगिता क्षेत्रात खाजगी लोकांच्या पुरवठ्यात खूपच वाढ झाली आहे.

फक्त समाजवादातच नव्हे तर विविध राजकीय मतप्रणालीच्या सरकारांमध्येही वस्तूंचा पुरवठा व उपयोगिता या मूलतः सरकारी मालकीच्या उद्योगांपासूनच मिळालेल्या आहेत. समाजोपयोगी सेवा या अनेक देशांत सामाजिक किंवा सरकारी एकाधिकार आहेत. उपयोगितांचा एकाधिकार, कार्यपद्धतीतील सरकारीकरण आणि मालकी या बाजू यात आल्या. शीतयुद्ध थांबल्यावर अनेक राष्ट्रांमध्ये अशा सरकारी उपयोगिता उद्योगांतील भांडवलाचे खाजगी संस्थांकडे हस्तांतरण, मालकीचे हस्तांतरण, केले जात आहे; म्हणजेच खाजगी उपयोगिता उद्योग वाढीस लागले आहेत. भांडवलशाहीमध्ये स्पर्धा, बाजारयंत्रणा कार्यदक्ष असल्याने एक आदर्शवादी अर्थव्यवस्था वाटते. पण व्यावहारिकदृष्ट्या खाजगीकरणाचे जे गुण आहेत त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

सरकार जेव्हा सरकारी उद्योगाचे खाजगीकरण करू पाहते तेव्हा सर्वसाधारणपणे खालील गोष्टींकडे लक्ष दिलेले असते : (1) सरकारला पैसा हवा असतो. (2) सरकारकडे पैशाची चणचण असूनसुद्धा उपयोगिता पद्धतीत वाढ झाली पाहिजे; (3) सरकारी व्यवस्थापनापेक्षा खाजगी व्यवस्थापन जास्त कार्यदक्ष (efficient) असते; (4) भांडवलाच्या खाजगी मालकीस परवानगी देऊन सरकार भांडवलशाहीस खत पाणी घालते; (5) सरकार स्पर्धेला वाव देऊन आणि एकाधिकाराला वगळून उद्योगाची पुनर्रचना करू पाहते[4].

आर्थिक विकासाचा एक व्यूह म्हणून जल व जलनिस्सारण यासारख्या आधारभूत संरचना (*infrastructure*) उद्योगांचा वेगाने विकास होण्याकरिता व्यावहारिकदृष्ट्या योग्य म्हणून खाजगीकरणाकडे पाहिले जाते[5]. अनंत कालापासून जल व जलनिस्सारण उद्योग अस्तित्वात असल्याने यातील यंत्रसामग्री जुनी व टाकाऊ झालेली असते. जुनी सामग्री बदलावी तर खूप मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागेल. यासाठी विकसनशील देशांत या सुविधा सुधारण्यासाठी व वाढविण्यासाठी खाजगी क्षेत्रातील भांडवल गुंतवणुकीला एक आकर्षण प्राप्त होईल, कारण अशा देशांत सरकारला राजकोषीय अडचणी खूप भेडसावतात. गुणवत्तेच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने युरोप व अमेरिकेत पिण्याच्या पाण्याच्या खाजगीकरणाचे महत्त्व वाटते. खाजगीकरणाकडे तांत्रिक नवप्रवर्तनाचे व आर्थिक कार्यदक्षतेचे साधन म्हणून पाहिले जाते. त्यामुळे एकूण भांडवली गुंतवणुकीची व व्यवहार प्राप्तीची गरज कमी होते. खाजगीकरणात अनुमापी अनुकूलतांना (economies of scale) महत्त्व आहे. श्रमपरिव्यय कमी झाल्याने, जलउपयोगिता उपलब्ध करून देण्यातील तंत्रात बदल केल्याने, व्यवस्थापनातील नाविन्यामुळे, अत्याधुनिकतेमुळे उत्पादनाच्या प्रमाणात वाढ झाल्याने ज्या अनुमापी अनुकूलता निर्माण होतात त्यामुळे बचतीचे प्रमाण वाढते. मानवी भांडवल व पैशाच्या स्वरुपातील भांडवल अधिक कार्यदक्षपणे वापरात आणण्यासाठीसुद्धा काही देशांत खाजगीकरणाला वाव दिला जातो.

आंतरराष्ट्रीय गुंतवणूक करणाऱ्या समाजाकडूनही खाजगीकरणाच्या चळवळीला खतपाणी घातले जाते. जागतिक बँकेने पैशाच्या स्वरूपात व बौद्धिक–

दृष्टचा खाजगीकरणात आतापर्यंत भरपूर प्रमाणात गुंतवणूक केली आहे. जागतिक बँकेने दहाबारा राष्ट्रांतील खाजगीकरणाच्या प्रकल्पांना सढळ हाताने मदत केली आहे. स्पर्धात्मक उद्योगांना मदत करणे कसे फायदेशीर असते यावर खूप चर्चा बँकेतील कर्मचारी व अधिकारीवर्ग यांनी केलेली आहे[6]. खाजगी गुंतवणूकदार खाजगीकरणाकडे एक चांगली संधी म्हणून पाहतात. 1994 मध्ये 'जागतिक खाजगीकरण निधी'ची (Global Privatisation Fund) स्थापना झाली. गुंतवणूकदारांच्या लक्षात आले की, यापुढे सरकारी मालकी असलेल्या उद्योगांचे जलद गतीने खाजगीकरण होणार. कॅनडा, अमेरिका या देशात थोड्या प्रमाणात पण ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, लॅटिन अमेरिका, आशिया, पूर्व व मध्य युरोप, पश्चिम युरोप, स्कँडिनेव्हियन राष्ट्रे, इत्यादी विकसित व विकसनशील राष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर सरकारी उद्योगांचे खाजगीकरण होणार असल्याने खाजगी गुंतवणूक करणाऱ्या लोकांना आकर्षण वाटावे म्हणून या निधीची स्थापना केली[7]. अशा खाजगीकरणाच्या गोष्टींना खूप प्रसिद्धी दिली गेली. त्याचप्रमाणे अनेक कार्यशाळा घेतल्या गेल्या आणि पसिद्धीपत्रकें वाटली गेली[8].

जागतिक खाजगीकरणाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे[9]. 107 राष्ट्रांतील 1,566 आधारभूत संरचना (infrastructure) प्रकल्पांकडे खाजगीकरणाचे ऑक्टोबर 1996 पर्यंत लक्ष गेले. सन 1980 च्या मध्यापासून त्यातील काही प्रकल्पांचे खाजगीकरणाचे प्रस्ताव पुढे आले, काहींचे खाजगीकरण पूर्ण झाले तर काहींचे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. या सर्व प्रकल्पांचे एकंदरित मूल्य 870 अब्ज डॉलर होते. यात 108 अमेरिकेत ऊर्जा प्रकल्प (55 अब्ज डॉलर); 148 रस्ते, पूल, बोगदे (75.2 अब्ज डॉलर), 75 जल किंवा जलनिस्सारण प्रकल्प (412.8 अब्ज डॉलर); 23 रेल्वे प्रकल्प (13.9 अब्ज डॉलर), 15 विमानतळे (31 अब्ज डॉलर) आणि 19 सागरी बंदरे (2.2 अब्ज डॉलर) यांचा समावेश आहे. सन 1985 पासून खाजगीकरणाचा अनुनय करणारी दहा राष्ट्रे प्रकल्पांच्या किमतीनुसार उतरत्या क्रमाने पुढीलप्रमाणे आहेत : जपान, इंग्लंड, मलेशिया, हाँगकाँग, चीन, मेक्सिको, अर्जेंटिना, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व फिलिपिन्स. खाजगी आधारभूत संरचना उद्योगांच्या जागतिकीकरणाची सुरुवात 1980 च्या मध्यावर झाली. भूमध्य समुद्रातील बोगद्याचा अवाढव्य प्रकल्प (15.5 अब्ज डॉलर) हे या बाबतीतील पहिले पाऊल होते.

## जागतिक खाजगी गुंतवणूकदार

खाजगीकरणाच्या चळवळीच्या आंतरराष्ट्रीय अधिष्ठानाचा केंद्रबिंदू म्हणजे खाजगी गुंतवणूकदारांची प्रतिमा होय. जल क्षेत्रात गुंतवणूकदारांच्या मालकीच्या मोठ्या उपयोगिता व त्यांच्याशी संलग्न संस्था आणि विविध आंतरराष्ट्रीय बिगर उपयोगिता महामंडळे यांचा समावेश होतो. बिगर उपयोगिता खाजगी गुंतवणूकदारांमध्ये एकात्मिक जलसेवा संस्था, करारावर काम करणाऱ्या संस्था, अभियांत्रिकी, तंत्रवैज्ञानिक व नियोजन करणाऱ्या संस्था, गुंतवणूक करणाऱ्या संस्था, कर्जाऊ रकमा उपलब्ध करून देणाऱ्या संस्था येतात [5]. या सर्व खाजगी गुंतवणूकदारांचा व संस्थांचा डोळा मोठ्या आधारभूत संरचना प्रकल्पांवर असतो.

आंतरराष्ट्रीय बाजारक्षेत्रात, विशेषत: करारावर करावयाच्या कामांत, जल व जलनिस्सारणाच्या प्रकल्पांत इंग्लंड व फ्रान्स यांचा सिंहाचा वाटा आहे. अमेरिकेतील करारावर काम करीत असलेल्या कितीतरी व्यवसाय संस्था ब्रिटिश व फ्रेंच महामंडळांच्या ताब्यात आहेत. उदारणार्थ, मेटकाफ अँड एड्डी सर्व्हिसेस (कोम्पॅनी जनरेल देस ऑक्स नियंत्रित), व्हीलअॅबरेटर (कोम्पॅनी जनरेल देस ऑक्सच्या मालकीची), प्रोफेशनल सर्व्हिसेस ग्रुप (कोम्पॅनी जनरेल देस ऑक्स नियंत्रित), जे. एम. एम. ऑपरेशनल सर्व्हिसेस (लिओनेस देस ऑक्स नियंत्रित). आपल्या अनेक दुय्यम व संलग्न व्यवसाय संस्थांच्या माध्यमातून फ्रान्सच्या जनरेल व लिओनेस आणि ब्रिटनच्या सेव्हन ट्रेंट वॉटर आणि अँग्लिकन वॉटर पी. एल. सी. या व्यवसाय संस्था अमेरिकेत विशेष कार्यमग्न आहेत.

इंडियानापोलिस, इंडियाना यामध्ये मोठ्या जल निस्सारण योजनेत करारावर काम करणाऱ्या विदेशी संस्था दिसतात. आता एक कोडे आहे की, या जागतिक खाजगीकरणाचा अमेरिकेच्या जलसेवेवर कसा परिणाम होतो? कारण, एक तर अमेरिकेची जलसेवा

संस्था आंतरराष्ट्रीय संस्थांकडून उपभोक्त्याची भूमिका घेते, उपभोक्त्यांची सेवा देण्यात आंतरराष्ट्रीय बाजारात ती स्पर्धकही आहे आणि काही प्रकल्पांमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थेची सहभागीही आहे [10]. आणखी एक गुपित गोष्ट म्हणजे, आर्थिक विनियमनाच या गुंतागुंतीच्या नात्यावर कसा परिणाम होतो तो मुद्दा ! विनियमनाच्या बाबतीत अमेरिकेतील अनिश्चित धोरणाचे निश्चितच गंभीर परिणाम दिसून येतील.

## खाजगीकरणांच्या प्रारुपांची तुलना

खाजगीकरणाच्या स्पर्धात्मक उपक्रमांत इंग्लंड, फ्रान्स, व अर्जेंटिना हे देश पुढे आहेत.

### इंग्लंड

इंग्लंड हा जगातील उपयोगिता सेवा खाजगीकरणाच्या क्षेत्रात महत्त्वाचा देश आहे. ऐंशीच्या दशकात हा देश राष्ट्रीयीकृत जिंदगींच्या खाजगीकरणाचीच भाषा बोलत होता. विमान सेवा, अवकाश सेवा, तेल, वायू, तारासंच ( cable ), दूरध्वनी या उद्योगांत खाजगीकरणाला सुरुवात झाली [11]. हायमनच्या भाषेत, "इंग्लंडने यात खरी सुरुवात केली आणि इतर राष्ट्रांनी त्या पावलावर पाऊल ठेऊन ही प्रक्रिया पुढे चालू ठेवली" [4]. जलउद्योगाच्या खाजगीकरणाच्या आधी प्रादेशिकीकरण व राष्ट्रीयीकरण झाले. 1973 मध्ये जल कायद्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला. थेम्स्, सेवर्न ट्रेंट, नॉर्थ वेस्ट, अँग्लियन, यॉर्कशायर, सदर्न, वेल्स, वेसेक्स, साऊथ वेस्ट, नॉर्थम्बरियन असे दहा पाण्याचे विभाग पाडले गेले आणि या दहा भागांवर केन्द्र सरकारचे विनियमन आले. अशा तऱ्हेने प्रादेशिकीकरणामुळे एक प्रकारची सुसूत्रता आली. परंतु जबाबदारी कशी ठेवावयाची, गुणवत्तेची मांडणी कशी करावयाची ही समस्या तशीच राहिली [13]. खाजगीकरणाच्या आधी म्हणजे 1974 ते 1989 पर्यंत आर्थिक अडचणी, कामकाजातील अकार्यदक्षता, भांडवल गुंतवणुकीवर आलेल्या मर्यादा, पर्यावरणासंबंधी झालेले खटके, गुणवत्ता व अपेक्षा यासंबंधी समस्या उद्भवल्या. खाजगीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मात्र गुणवत्तेचे मोजमाप व्हावयास लागले. राजकीय प्राधान्यातून आणि युरोपीय आर्थिक समाज यानी जी पर्यावरणात्मक मापके, मानदंड ठेवले होते त्यानुसार 1989 मध्ये खाजगीकरणाला सुरुवात झाली. जागतिक बाजारात सहभाग व खाजगी संस्थांचे विविधीकरण यादृष्टीनेही खाजगीकरणाकडे पाहिले गेले [14]. 1986 च्या श्वेतपत्रिकेत सर्व फायदे नमूद केले आहेत [15]. जल अधिकारामध्ये सरकारची लुडबूड कमी, भांडवलाशी जवळीक, विविध गुंतवणूकीच्या मार्गांची उपलब्धता, कामातील कार्यदक्षतेची तुलना, चांगल्या कार्यदक्ष संचालकांची गतिशीलता, स्पर्धात्मक कामाची देशीविदेशी संधी, उपभोक्त्याला व कामगारांना भागभांडवल विकत घेण्याची संधी अशा गोष्टी मिळू लागल्या. कार्यदक्षतेत वाढ झाल्याने चांगली सेवा, त्यांच्या कमी झालेल्या किमती, पर्यावरणाचे संरक्षण, इत्यादी बाबी लोकांना मिळू लागल्या.

प्रादेशिक सत्तेमध्येसुद्धा खाजगीकरण आल्याने स्वतःचा पैसा स्वतः उभारावयाचा तसेच पर्यावरणाच्या आरोग्याच्या नियमांचा भंग केल्यास कायदेशीर इलाज या गोष्टी आल्या. लोकांना जबाबदार राहण्याची स्थितीही सुधारली. इंग्लंडमधील नवीन खाजगी जलसेवा संस्थांनी खाजगी भांडवल निर्मितीसाठी आवाहने केली. देशात व परदेशात तशी संधी निर्माण करण्याचे प्रयत्न झाले [15]. खाजगीकरणामुळे ब्रिटिश सत्तेलासुद्धा आर्थिक विनियमनाचे धोके कोणते, पर्यावरणाचे धोके कोणते, व्यापाराच्या दृष्टीने धोके कोणते हे ठरविणे सोपे झाले [14].

या ब्रिटिश सेवा खाजगीकरणाच्या प्रारुपाने अमेरिकेतही खूप लक्ष वेधून घेतले गेले. अर्थात अमेरिकेतील खाजगीकरण व ब्रिटिश खाजगीकरण यात फरक आहे (तक्ता 1 पाहा). इंग्लंडमध्ये जलउद्योगाचे आधी प्रादेशिकीकरण व राष्ट्रीयीकरण झाले नसते तर खाजगीकरणाचा तेथील आत्ताचा मार्ग निराळा दिसला असता. इंग्लंडमध्ये खाजगीकरण वरून खालपर्यंत आलेले दिसून येईल तर अमेरिकेत नेमके याउलट घडले. स्वायत्त संस्थेची घटना असल्याने खाजगीकरण खालून वर असे गेलेले दिसेल.

### फ्रान्स

नगरपालिकेची कामे खाजगी संस्थांना देण्याची ऐतिहासिक पद्धती फ्रान्समध्ये दिसून येते. पाण्याच्या गुणवत्तेच्या समस्यांबाबत आरोग्य व पर्यावरण खाते याकडून विनियमन होत होते परंतु आर्थिक विनियमन

### तक्ता 1

**अमेरिका व इंग्लंडमधील खाजगीकरणाची तुलना**

| निकष | अमेरिका | इंग्लंड |
|---|---|---|
| सरकार | संघ राज्य | एकात्म |
| खाजगीकरणाला उत्तेजन | मूलतः व्यावहारिक पण आदर्शवादात व व्यापारीकरणात वाढ होत आहे. | मूलतः आदर्शवादी पण व्यावहारिक व व्यापारीकरणात वाढ होत आहे. |
| खाजगीकरणाची अमलबजावणी | खालून वरपर्यंत | वरपासून खालीपर्यंत |
| जलसेवा व्यवस्था | स्थानिक गरजांनुसार 55,000 सामाजिक जलसेवा व्यवस्था | नदी खोऱ्यांनुसार दहा प्रादेशिक जल-विभाग तयार केले; त्यांचे राष्ट्रीयीकरण 1973 मध्ये झाले. |
| सेवांची मालकी | 80 टक्के सामाजिक आणि नफ्याशिवाय; 20 टक्के खाजगी. | 1989 नंतर संपूर्ण खाजगीकरण |
| विनियमनाची संरचना | स्वतंत्र, बहुक्षेत्रीय अधिकाराचे बहुसदस्य राज्य आयोग; समाजाच्या मालकीच्या व्यवस्थांचे मर्यादित विनियमन | पाण्यासाठी एकच प्रशासक; इतर क्षेत्रांसाठी इतर प्रशासक |
| विनियमनाची प्राधिकारी ( authority ) | संसदसदृश, प्रशासकीयसदृश, न्यायालयसदृश विधानसदृश | प्रशासकीय स्वातंत्र्य |
| विनियमनाची पद्धती | महसुलाच्या गरजांवर आधारलेली विनियमित, दरावर आधारलेली, प्रत्याय दरावर आधारलेली | कमाल किमतीशी निगडित विनियमन, निर्देशांकानुसार बदल, दर्जा व कार्य-दक्षता यांशी समायोजन. |
| विनियमनाचा आढावा | व्यावहारिक चातुर्य (prudence) | संपादन (performance) |
| दाद मागण्याचे व्यासपीठ | राज्य व संघराज्य न्यायालये | एकाधिकार आयोग |

मात्र स्पर्धेतून व करारांच्या अटीतून होत असे [16]. फ्रान्समध्ये तीन-चतुर्थांश नागरिकांना पाणी खाजगी संस्थांकडून मिळते; जलनिस्सारण, सांडपाण्याचा निम्मा निचरा खाजगी संस्थांकडून होतो. दोन उद्योग संस्था अशा आहेत की त्यांचा फार मोठा प्रभाव फ्रान्सच्या बाजारात आणि जागतिक बाजारात दिसून येतो. कोम्पानी जनरेल देस ऑक्स आणि लियोनेस देस आक्स या जलउद्योग संस्था जगात अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर आहेत [10]. यातील पहिली संस्था 1853 मध्ये स्थापन झाली सन 1993 मध्ये 28 अब्ज डॉलर इतक्या किमतीची जलसेवा देणारी विक्री संस्था असलेली ही जगातील सर्वात मोठी खाजगी जलसेवा संस्था होय. अमेरिकेच्या युनायटेड वॉटर मॅनेजमेंट अँन्ड सर्व्हिस या एका मोठ्या जलसेवा संस्थेत फ्रान्सच्या वरील संस्थेचा मोठ्या प्रमाणात भांडवली सहभाग आहे. फ्रान्सच्या या संस्थेच्या तुलनेत अमेरिकेच्या संस्था खूपच लहान आहेत.

दुसरी मोठी संस्था, लियोनेस देस ऑक्स, यामध्ये 1990 मध्ये 1,10,000 च्या वर कामगार आहेत; यात जलसेवेशी निगडित 12,000 कामगार आहेत; जगातील 26 दशलक्ष जलसेवा उपभोक्त्यांशी आणि 14 दशलक्ष जलनिस्सारण सेवा उपभोक्त्यांशी या संस्थेचा संबंध येतो. अर्थात हा सर्व व्यवहार संपूर्ण दोषमुक्त नाही. 1994 च्या अहवालात काही भ्रष्टाचाराच्या गोष्टी निदर्शनास आल्या आहेत[18]. जलसेवा उद्योग हा एक जागतिक उद्योग आहे असे फ्रान्स समजतो. फ्रान्सने सध्या अमेरिकेच्या जल व जलनिस्सारण उद्योगात आपला कायमचा ठसा नोंदविला आहे. करारावर आधारलेल्या तीन मोठ्या अमेरिकी उद्योग संस्थांचे विनियमन फ्रान्सकडे आहे. जागतिक संस्थांच्या सहभागामुळे इंडियानापेलिस हे जलसेवेच्या खाजगीकरणाचे प्रयोग करणारे सर्वात महत्त्वाचे राज्य असेल.

### अर्जेंटिना

जागतिक बँकेच्या साहाय्याने अर्जेंटिना सरकारने 1990 मध्ये खाजगीकरणाचा प्रयोग सुरू केला[21]. ब्युनोस आयर्ससारख्या मोठ्या शहरातील जल व जलनिस्सारण पद्धतीचे मे 1993 मध्ये खाजगीकरण करण्यात आले. स्पर्धेला जास्त वाव आहे अशी नवीन आर्थिक विनियमन व्यवस्था अर्जेंटिनाने अमलात आणली. चार फ्रेंच, स्पॅनिश, ब्रिटिश आणि तीन अर्जेंटिनातील गुंतवणूकदार यांच्या गटाकडून ही कामे स्पर्धेतून करवून घेतली जातात. सरकारकडून काही सवलती त्यांना मिळतात. तीस वर्षांच्या सवलतींमध्ये सरकारकडे या उद्योगाची मालकी ठेवली जाते पण कारभाराची जबाबदारी मात्र या खाजगी संस्थेकडे असते. पुनर्वसन, विकास, दूषित पाण्यापासून जलसामग्रीचे संरक्षण ही सर्व कामे खाजगी संस्थांनी करावयाची असतात[21]. एक तांत्रिक सल्लागार समिती नेमली जाते आणि ती समिती आपला अहवाल सरकारकडे ठराविक वेळी सादर करते. अशी 'इटॉस' (ETOSS) ही संघटना ब्युनोस आयर्समध्ये सरकारने स्थापन केली आहे.

## अमेरिकेच्या उपयोगिता सेवा उद्योगाचे आंतरराष्ट्रीय उपक्रम

गुंतवणूकदारांच्या मालकीच्या जलउद्योगात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अमेरिकेने हळूहळू प्रवेश केला आहे. युरोपच्या तुलनेने जरी हा प्रवेश सावधानतेने केलेला असला तरी अमेरिकेतील आधुनिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापनातील कुशलता यामुळे तिला जगात खूप मोठा वाव आहे. बऱ्याचशा मोठ्या गुंतवणूकदारांच्या मालकीच्या विनियमित खाजगी उद्योगांत अमेरिकेने युरोपमधील तशाच तऱ्हेच्या उद्योगांच्या सहकार्याने प्रवेश केला आहे. अमेरिकेतील जलउद्योग संस्थेने जागतिक बँकेला मध्य व दक्षिण अमेरिकेत व्यवस्थापन सेवा द्यावयाला सुरुवात केली आहे. तसेच इतर ठिकाणी तशाच सेवा देण्याची संधी अमेरिका पाहात आहे [18]. इग्लंडमधील अँग्लियन वॉटर पी. एल. सी. या जल व जलनिस्सारण उद्योगाच्या संयुक्त सहकार्याने उद्योग काढण्यासाठी अमेरिकेने प्रयत्न केले आहेत. या संयुक्त उद्योगाचे नावही 'अमेरिकन अँग्लियन एनव्हायरमेंटल टेक्नॉलॉजिज' असे ठेवले आहे. हा उपक्रम नगरपालिकांच्या जलनिस्सारणाचे खाजगीकरण करण्यावर भर देत आहे [22] [23].

अमेरिकेच्या जलउद्योगाच्या संरचनेमुळे तिच्या कार्यावर काही मर्यादा आल्या आहेत. ब्रिटन व फ्रान्सच्या अवाढव्य उद्योगाच्या मानाने अमेरिकेतील सर्वात मोठे जलउद्योगही लहान वाटतात. अमेरिकेची प्रतिकृती परंपरागत असल्याने तिचे स्वरूप केन्द्रीभूत विनियमनाच्या एकाधिकारी सेवा असेच राहिले आहे. इतर सार्वजनिक सेवा उद्योगाच्या मानाने अमेरिकेतील जल व जलनिस्सारण उद्योग हा जास्त परंपरागत असा वाटतो. मात्र जागतिक बाजारात गेल्याने त्यात योग्य तो बदल होत आहे. विशेषतः आर्थिक विनियमनामुळेच जागतिक बाजारात या उद्योगाची वाटचाल मंदावली आहे. या आर्थिक विनियमनामुळे अमेरिकेच्या जागतिक सहभागात अडचणी निर्माण झाल्या आहेत. विविध देशांत निरनिराळी आर्थिक धोरणे असल्याने अशा आर्थिक विनियमनाला काही अर्थ प्राप्त होत नाही. सेवा उद्योग आणि बिगर सेवा उद्योग तसेच स्पर्धात्मक सेवा उद्योग आणि बिगर स्पर्धात्मक सेवा उद्योग अशी विभागणी झाल्याने अमेरिकेच्या प्रयत्नांना मर्यादा पडतात.

## विनियमनाचे जागतिक पर्याय

खुला बाजार की सरकार यातूनच एकाची निवड करावयाची म्हणजे दोन अपूर्ण अशा पर्यायातूनच

निवडणे होय. ही बाब खाजगीकरणामुळे जास्त प्रकाशात आली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापकद्वय विकर्स आणि यारो यांच्या मतानुसार कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क अपूर्णताच दर्शवितो. खाजगीकरणामुळे सरकारीकरणाचे दोष कमी केले जातात पण त्याचबरोबर खुल्या बाजारामुळे निर्माण होणारे दोषही वाढीस लागतात. तसेच विनियमन हासुद्धा सरकारी मालकीला किंवा स्पर्धेला अपूर्ण पर्याय होतो. तक्ता 2 या प्रतिमानांची तुलना दर्शवितो.

जोपर्यंत एकाधिकार शक्ती काम करते तोपर्यंत सरकारने कोणत्या तरी पद्धतीने तिकडे लक्ष ठेवणे गरजेचे असते. जागतिक बँकेच्या खाजगीकरणाच्या आठ अनुभवांपैकी दुसरा अनुभव सांगतो की, "एकाधिकाराच्या यशस्वी खाजगीकरणासाठी विनियमनाची अतिशय गरज असते". जिथे सरकारी मालकी असते तिथे पूर्वीपासून थोडीफार सरकारी बंधने येतातच. आणखी जास्त प्रमाणावर विनियमनाची गरज नाही. अर्थात आर्थिक जबाबदारीचा, सत्तेचा विचार केल्यास अशा तऱ्हेने मालकी हक्क सरकारी क्षेत्राकडून खाजगी क्षेत्राकडे वळवावयाचा असेल तर थोडेफार विनियमन क्रमप्राप्त होते. अगदी अलीकडे अस्तित्वात येणाऱ्या जल उद्योगातील स्पर्धेमध्येसुद्धा आर्थिक बंधने असलीच पाहिजेत. इंग्लंडच्या ॲलन बूकरच्या मते, "पाणीपुरवठा हा वस्तुतः एकाधिकारच आहे आणि म्हणून जरी पाणीपुरवठा, शुद्धीकरण व ग्राहकसेवा याबाबतीत प्रत्यक्ष स्पर्धेला वाव दिला तरी किमानपक्षी या सर्व व्यवस्थेच्या व्यवहारावर कायम स्वरुपी विनियमनात्मक बंधने असलीच पाहिजेत".

काही ठिकाणी बाजार अपयशी ठरतात, एकाधिकाराची शक्ती वाढते म्हणूनच विनियमनाची गरज भासते असे नाही तर काही सुरक्षितता असाव्या लागतात; कारण खाजगी संस्था नेहमीच लोककल्याण साधतील असे नसते. खाजगीकरण केलेल्या सेवापद्धतीचे विनियमन करण्याचा मूलभूत हेतू म्हणजे त्या

**तक्ता 2**

**उपयोगिता संपादनाची खातरजमा करणारी पर्यायी प्रारुपे**

| प्रारुपे | संपादनाचे मार्गदर्शक तत्व | प्रयत्नाचे केन्द्र | प्रेरणा | जबाबदारी ठेवण्याची यंत्रणा | उपभोक्त्याच्या संरक्षणाची यंत्रणा | वर्तणुकीच्या नियंत्रणाची यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| सरकारी मालकी | सेवा | किमतीवर नियंत्रणे | राजकीय पाठिंबा | मतदार | सरकारी अधिकाऱ्याकडे तक्रारी | निवडणुका व इतर राजकीय प्रक्रिया |
| आर्थिक विनियमन | व्यावहारिक चातुर्य | कामाचे प्रमाण गाठण्याचा प्रयत्न | कामाचे प्रमाण गाठणे | दर देणारे | विनियमन करणाऱ्यांकडे तक्रारी | नियम व विनियमन |
| स्पर्धा | कार्यदक्षता | परिव्यय नियंत्रण | नफा | ग्राहक | उपभोक्त्याची निवड | बाजार स्पर्धा, लढण्याची पात्रता (contestability) |

सेवांच्या किमती आटोक्यात असाव्यात, सेवेची गुणवत्ता राखली पाहिजे, खाजगी क्षेत्राचे आकर्षण वाढीस लागले पाहिजे आणि त्याचबरोबर सरकारी धोरणाची मूलतत्त्वेही फलद्रूप झाली पाहिजेत. अमेरिकेच्या सेवा विनियमनाच्या प्रारुपामध्ये खाजगी गुंतवणूकदार, सामाजिक सेवा आणि सार्वजनिक हित यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ब्यूनोस आयर्सच्या अनुभवाचा पाठपुरावा करणाऱ्या जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी खाजगी क्षेत्राच्या व्यवहाराचे संचालन व विनियमन करण्याच्या गरजेवर भर दिला आहे.

## विनियमनात्मक व्यवस्थेची स्थापना

खरोखरच बाजार स्पर्धात्मक असतील आणि बाजारातील उणिवा दूर करण्यासाठीच सरकारी विनियमन मोठ्या प्रमाणावर असेल तर खाजगीकरणाला अतिशय चांगले वातावरण आहे असे म्हणावे लागेल. विकर्स व यारो यांच्या मते, "व्यापक बाजार तसेच विनियमनात्मक व संस्थात्मक सुयोग्य वातावरण यशस्वी खाजगीकरणाला मदत करतात". जेव्हा परंपरागत एकाधिकारामध्ये बाजार यंत्रणा कोलमडते आणि व्यवसाय संस्थेत स्पर्धेचा लोप होतो त्यावेळेस स्पर्धेमुळे व योग्य विनियमनामुळे एकाधिकार शक्तीवर अंकुश राहतो. ही स्थिती खाजगीकरणास पोषक ठरते.

आर्थिक विनियमन कितपत स्थिर व कायदेशीर आहे यावर खाजगीकरणाचे यश अवलंबून असते. राजकीय सत्ता कशा तऱ्हेची आहे, तिचे विभाजन कसे झाले आहे, राजकीय पक्षांच्या ढवळाढवळीत आर्थिक विनियमन टिकून राहते की नाही यावर खाजगीकरणाचे भवितव्य अवलंबून असते. जागतिक बँक व इतर आंतरराष्ट्रीय कर्ज देणाऱ्या संस्था या राजकीय स्थिरतेला साहजिकच जास्त महत्त्व देतात. राजकीय स्थिरतेमुळे कर्ज फेडीची शक्ती वाढीस लागते आणि त्यामुळे विश्वासही वाढीस लागतो. विनियमन करणाऱ्या संस्थांना असणारे राजकीय स्वातंत्र्य ही फार महत्त्वाची बाब आहे.

अमेरिकेत अत्यंत चांगली राजकीय स्थिती आढळून येते. कारण तेथे घटनात्मक पाया अत्यंत स्थिर असून संसदीय, न्यायालयीन व कार्यकारी घटक यांच्यात कायदेशीर पक्का धागा आहे. आर्थिक विनियमनामध्ये या सर्व यंत्रणेचा समन्वय तिथे साधलेला आहे. राजकीय परिस्थितीवर आर्थिक विनियमन अवलंबून असते. उपभोक्त्यांचे हित पाहणाऱ्या संस्था कशा काम करतात आणि त्यांना घटनात्मक संरक्षण कितपत आहे यावरसुद्धा खाजगीकरणाचे यशापयश अवलंबून असते.

## उद्‌भवणाऱ्या विनियमनाची प्रारुपे

सेवा विनियमनाची प्रारुपे निर्माण करणाऱ्या तज्ज्ञांना अमेरिकेची किंमत तसेच प्रत्याय दराचे विनियमन करणारे प्रारुप मोहित करते. अर्थात याला कारण म्हणजे अमेरिकेच्या विनियमन प्रारुपात स्थापित तत्त्वे, प्रथा व टिकून राहण्याची शक्ती हे गुण आहेत. परंतु अमेरिकेच्या प्रारुपामध्येही काही दोष आहेत हे अमेरिकेतील विनियमन पद्धती सुचविणारे तज्ज्ञ दाखवून देतात. त्यांचे म्हणणे असे की, विनियमनाची अमलबजावणी करणे अमेरिकेच्या पद्धतीत त्रासदायक आहे. शिवाय नफ्यावर विनियमन ठेवणारी ही पद्धती असल्याने खाजगीकरणाला अडथळाच निर्माण होतो. कार्यदक्षतेला प्रोत्साहन असले पाहिजे पण या पद्धतीत ते मिळत नाही. अमेरिकेचे प्रारूप इतर देशांच्या प्रारुपाहून वेगळे कसे आहे ते तक्ता 3 मध्ये दाखविले आहे.

जागतिक खाजगीकरणाच्या प्रक्रियेत जमेका व न्यू झीलंडने फ्रान्सचे प्रारुप अमलात आणले आहे. यामध्ये केन्द्रीय विनियमनाची पद्धती नसते. नगरपालिकेच्या करार पद्धतीवरच जास्त भर दिला आहे आणि तंटा निर्माण झाल्यास न्यायसंस्थेकडून तिचे निराकरण केले जाते. चिलीच्या विनियमनामध्ये राष्ट्रीय जकात मंडळाचे महत्त्व जास्त आहे. प्रत्यक्ष संपादनाचा (performance) आढावा, स्पर्धेचे मोजमाप आणि नफ्यातील भागीदारी यावर तेथे भर दिलेला आहे. प्रारुपावर अमेरिका व इतरत्र खूप चर्चा व वादविवाद होतात. ब्रिटिश प्रारुपामध्ये वार्षिक कमाल किमतींना खूप महत्त्व आहे. प्रत्येक संस्थेला वार्षिक कमाल किमती बांधून दिलेल्या आहेत. या मर्यादा किरकोळ किंमत निर्देशांक आणि अधिकचा 'क्ष' घटक

## तक्ता 3

**जलसेवा विनियमनाचे जागतिक पर्याय**

| देश | बाजार प्रारूप | विनियमनात्मक प्रारूप |
|---|---|---|
| अमेरिका | अतिविविधता; बऱ्हंशी सरकारी मालकीच्या, काही थोड्या खाजगी मालकीच्या. करार सेवांची पद्धती. | बऱ्हंशी सरकारी मालकीच्या उपयोगितांवर स्थानिक नियंत्रण; खाजगी मालकीच्या व काही सरकारी मालकीच्या उपयोगितांचे राज्य सार्वजनिक उपयोगिता आयोगाकडून किंमत / प्रत्याय दर या आधारे विनियमन. |
| इंग्लंड | खाजगी मालकी व व्यवहारांचे आर्थिक विनियमन. | कमाल किंमतीवर आधारलेले केन्द्रीभूत प्रलोभनात्मक विनियमन; तलचिन्ह ( benchmark ) स्पर्धा; एकमेव स्वतंत्र प्रशासक (पाणी कार्यालय). |
| फ्रान्स | सरकारी मालकीसह खाजगी कंत्राटदारांना सवलती. | नगरपालिकेकडून करार व विनियमन; निर्देशांकीकरण (indexing); संपादनाचा (performance) आढावा. |
| अर्जेंटिना | सरकारी मालकीसह कंत्राटदारांना सवलती आणि सरकारी विनियमन. | विनियमनात्मक संस्थेकडून किंमत संरक्षण; व्यवहार करार; दीर्घकालीन नियोजन; बिगर किंमत जबाबदाऱ्यांकरिता लाभ व दंडात्मक कारवाई. |

यावर आधारलेल्या आहेत. यात दर पाच वर्षांनी बदल करण्याची मुभा आहे. विनियमनामुळे उद्‌भवणाऱ्या धोक्याला आणि अनिश्चिततेला या मध्यममार्गी प्रारुपामुळे खीळ बसते. खाजगी संस्थेच्या परिव्ययाचा अभ्यास यात केला जातो. स्पर्धा टिकविण्यासाठी तशाच तऱ्हेच्या दुसऱ्या मार्गाचाही विचार येथे केला जातो. नैसर्गिक वायू, वीज, दळणवळण, दूरसंचार या क्षेत्रांत बाजार वाढविण्यासाठी व स्पर्धा टिकविण्यासाठी सामयिक वहनाच्या पद्धतीचा उपयोग केला तसाच उपयोग जल उद्योग खाजगीकरणामध्ये ब्रिटनने केला.

इतर देशांत विनियमनाचे काम बहुसदस्य आयोग करतात, परंतु इंग्लंडमध्ये ते ऑफिस ऑफ वॉटर सर्व्हिसेस या एकाच यंत्रणेकडून पाहिले जाते. ऊर्जा व दूरसंचार यांचे विनियमन करणाऱ्या संस्था वेगवेगळ्या आहेत. अशा तऱ्हेने स्वतंत्र यंत्रणा असल्यामुळे प्रशासकीय कार्यदक्षतेच्या बाजूने काही फायदे असले तरी त्याचे काही तोटेही आहेत. कमाल किंमती विनियमन अधिकाऱ्याच्या मर्जीनुरूप ठरतात. ही संस्था प्रशासकीय गुंता व राजकीय वाद यापासून दूर नाही. बाजारपेक्षा ज्यादा नफा, भागधारकांना वेतनेतर लाभ (perquisites), व्यवस्थापकांना जादा बोनस अशा गोष्टींनी सेवा खाजगीकरणाच्या प्रक्रियेला थोडेसे गालबोट लागले आहे. किंमतीचे संरक्षण मिळाल्याने सेवा संस्थांनी ज्यादा कार्यदक्षता दाखविण्याऐवजी ज्यादा नफाच कमावला असे दिसून आले. या विनियमन प्रारुपाचे ब्रिटनमधील शिल्पकार स्टिफन लिटलचाईल्ड यानीसुद्धा या दोषांच्या बाबतीत कबुली दिली आहे.

## खाजगीकरण व विनियमनाची आव्हाने

याबाबतीत मुख्य आव्हान म्हणजे स्पर्धात्मक धोरणांच्या उद्दिष्टांचा समन्वय साधणे हे आहे. समाजाची कार्यदक्षता, आर्थिक विकास, पर्यावरण व समन्याय (equity) यांच्याशी उपयोगितेच्या संपादनाचा संबंध असल्याने त्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. या चार उद्दिष्टांमध्ये तोल साधला पाहिजे. कधीकधी एखादे मोठे सामाजिक उद्दिष्ट साधावयाचे असेल तर लहान ध्येयांना सोडचिठ्ठी देणे भाग पडते.

आर्थिक कार्यदक्षता साधणे हे खाजगीकरणाचे मुख्य उद्दिष्ट असते. आर्थिक विकास हे त्याच्याशीच अगदी निगडित असलेले समष्टीय पातळीवरील उद्दिष्ट आहे. अनेक देशांत खाजगीकरणाला चालना देणारा घटक म्हणजे विकासाचा गाडा पुढे नेणाऱ्या आणि जीवनमान वाढविणाऱ्या महत्त्वाच्या आधारभूत संरचना उद्योगांत गुंतवणूक करण्याची इच्छा. यातून व्यापारी व वित्तीय लाभ मिळतात. मात्र पर्यावरणाच्या समस्या त्यामुळे निर्माण होतात.

विकसनशील जगात स्पर्धात्मक मूल्यांमध्ये समतोल साधणे ही गुंतागुंतीची बाब असते. अतिस्पर्धात्मक बाजारात टिकून राहण्यासाठी परिव्यय घटविणे आवश्यक असते. परंतु त्यामुळे अल्पकालीन नफ्याच्या मोहाने तसेच आर्थिक अभिवृद्धी साधण्यावर भर दिल्यामुळे पर्यावरणाची वाताहात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दीर्घकालीन दृष्टिकोनानुसार, पर्यावरणाचा दर्जा वाढला की आर्थिक मूल्यांचेही संवर्धन होते. खाजगीकरणाच्या धोरणाची अमलबजावणी करताना पर्यावरण रक्षणाची प्रमाणके निश्चित करून त्यांचा आग्रह धरणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. स्पर्धा व पर्यावरण यात संघर्ष असण्याचे कारण नाही. पर्यावरणाची काही उद्दिष्टे बाजाराधिष्ठित यंत्रणेमधूनही साधता येतात.

खाजगीकरणाच्या प्रक्रियेत उपयोगिता व्यवस्थापकांवर नवीन 'पर्यावरणीय जबाबदारी' (environmental accountability) येते. तसेच बरेच राजकीय दबाव असूनही पर्यावरणीय मूल्ये शाश्वत ठेवणारी 'पुरेशी सुदृढ' (sufficiently robust) अशी विनियमनाची व्यवस्थाही येते. सार्वजनिक उपयोगितांमुळे नैसर्गिक पर्यावरणाला फार मोठी किंमत द्यावी लागणार नाही याकडे विनियमन संस्था लक्ष देऊ शकते. जागतिक संदर्भात, विनियमन संस्थेने भौगोलिक सीमारेषांच्या पलीकडेही पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तरीही खाजगीकरण आणि पर्यावरण किंवा नियोजन यांची उद्दिष्टे यामध्ये संघर्ष असण्याचे कारण नाही. खाजगीकरणाबरोबरच योग्यप्रकारे विनियमनाची व्यवस्था असेल तसेच संपादनासाठी चांगली प्रलोभने असतील तर त्यातून धोरणात्मक लक्ष्ये अधिक कार्यदक्षतेने आणि कमी परिव्ययात साध्य करता येतील.

समन्याय (equity) हे योजनाकार व राजकारणी यांच्यासमोर एक मोठे आव्हान आहे, साधनसामग्रीची कमतरता असते तेव्हा तर हा प्रश्न फारच बिकट होतो. जगातील बऱ्याच भागांत समन्यायाचा प्रश्न हा मूलतः सेवा उद्योगातील सेवा उपभोक्त्यांना परवडणाऱ्या आहेत काय याच्याशी निगडित आहे. आर्थिक कार्यदक्षतेचे तत्त्व लागू केल्यास लोकसंख्येच्या मोठ्या भागाला सेवा देताच येणार नाही. उपभोक्त्यांच्या खरेदीशक्तीनुसार कमीअधिक गुणवत्तेच्या सेवा द्यावयाच्या तर पर्यावरणीय न्यायाचा गंभीर प्रश्न उद्भवतो. काही ग्राहकांना उत्पादन परिव्ययापेक्षाही कमी किमतीला सेवा उपलब्ध करणे म्हणजे एक प्रकारे अकार्यदक्षतेला निमंत्रण ठरते; याची अमलबजावणी त्रासदायक होते. यातून दुसरा मार्ग म्हणजे, अशा ग्राहकांना सामाजिक सुरक्षा कवच उपलब्ध करून देण्यासाठी सरकारी अथवा खाजगी स्रोतांकडून अर्थसाहाय्य मिळवून देणे.

जागतिक धोरणात्मक अर्थव्यवस्थांत सार्वजनिक उपयोगितांसहित (public utilities) सरकारी मालकीच्या उद्योगांचे खाजगीकरण करण्याकडे कल वाढत जाणार आहे. जलउद्योग व जलनिस्सारण सेवा या एकदम जागतिक स्तरावर गेल्या आहेत आणि स्पर्धात्मक झाल्या आहेत. या उद्योगांच्या संरचनेत यापुढे नाट्यपूर्ण बदल होत राहतील. एका बाजूने कार्यदक्षता वाढविण्यासाठी आणि आर्थिक लक्ष्ये गाठण्यासाठी स्पर्धाशक्तीची वाढ करणे आणि दुसऱ्या बाजूने पर्यावरणीय व समन्यायाच्या लक्ष्यांना तिलांजली न देणे

यांचा उत्तम संयोग साधण्याचे आव्हान सर्वच राज्यकर्त्यांपुढे उभे आहे. जागतिक खाजगीकरणाच्या प्रयोगांतून मिळणारा महत्त्वाचा धडा म्हणजे सरकारे व त्यांचे नागरिक यांचे हितसंबंध चांगल्या प्रकारे साधण्यासाठी आर्थिक विनियमनाला आपली भूमिका पार पाडता येईल एवढेच नव्हे तर आपली भूमिका पार पाडली पाहिजे. विनियमन ही प्रयोगात्मक प्रक्रियेचा एक भाग आहे. यासंबंधीची नवी प्रारुपे यापुढेही येत राहतील आणि त्यातून विनियमन करण्याची सरकारांची शक्ती वाढून खाजगीकरणाला वचनपूर्ती करणे शक्य होईल.

## संदर्भ सूची


1 Gaylc, Dennis J., and Jonathan N. Goodrich, eds., PRIVATIZATION AND DEREGULATION IN GLOBAL PERSPECTIVE, Quorum Books, New York, NY, U.S.A., 1990.

2 Beecher, Janice G., Richard Dreese, and John D. Stanford, REGULATORY IMPLICATIONS OF WATER UTILITY PRIVATIZATION, The National Regulatory Research Institute, Columbus, OH. U. S., A., 1995.

3 Savas, E. S., PRIVATIZATION : THE KEY TO BETTER GOVERNMENT, Chatham House, Chatham, NJ, U.S.A., 1987, p. 5.

4 Hyman, Leonard S., "Privatization : the Hows and the Whys," PUBLIC UTILITIES FORTNIGHTLY, Feb. 1, 1993, p. 18.

5 Lambert, Walter, David Sherman, Patrick Cairo, and Peter Talbot, "Privatization Opportunities in New Markets," Strategic Research Institute Conference on Public-Private Partnership, New York, NY, U.S.A. March 30, 1994.

6 "The Staff Debate," OUTREACH, No. 3, The World Bank, Washington, D. C., U.S.A., July 1992.

7 PROSPECTUS SUMMARY, The Global Privatization Fund, March 4, 1994.

8 Palmer, George F., et al., THE EIU GLOBAL PRIVATIZATION MANUAL, The Economists Intelligence Unit, London, U K., 1994.

9 "1996 International Major Projects Survey," PUBLIC WORKS FINANCING, Vol. 100, October 1996.

10 "Deep Pocket Players Line Up for Another Round of Wastewater Privatization," and "Tally Eaux : French Water Giants Think Big, Long and Smart," PUBLIC WORKS FINANCING, Vol. 75, June 1994, pp. 13 and 17.

11 Hemming, Richard, and Ali M. Mansoor, PRIVATIZATION AND PUBLIC ENTERPRISES, International Monetary Fund, Washington, D.C. U.S.A. 1989.

12 Okun, Daniel A., REGIONALIZATION OF WATER MANAGEMENT : A REVOLUTION IN ENGLAND AND WALES, Applied Science Publishers, London, U. K. 1977.

13 Eastman, Glyn, "Privatization vs. Municipal Wastewater Services," SRI Conference on Public-Private Partnerships, New York, NY, U. S. A., March 29-30, 1994.

14 Meredith, Sandra, "Water Privatization; The Dangers and the Benefits," LONG RANGE PLANNING, Vol. 25, No. 4, Aug. 1992, pp. 72-81.

15 "Privatization of the Water Autho-

ities in England and Wales." A White Paper Presented to Parliament, as reported in David Haarmeyer, "Privatizing Infrastructure, Options for Municipal Water-Supply Systems," POLICY INSIGHT, Vol. 15, Oct. 1992, pp. 20-21

16 Untitled presentation on Compagnie Generale des Eaux, SRI Conference on Public-Private Partnerships, New York, NY, U. S. A., March 29-30, 1994.

17 Cairo, Patrick R., "Delegated Municipal Services for the Water System Industry in France," WATERSCAPES '91, Saskatoon, SK, Canada, June 2-8, 1991.

18 "Internationalization and Privatization : New Challenges and Opportunities in Cahngin Water Industry," NARUC (NATIONAL ASSOCIATION OF REGULATORY UTILITY COMMISSIONERS) BULLETIN, No. 49-1991, Dec. 2, 1991.

19 "Lyonnaise des Eaux," CHAMPS-ELYS'EES, Dec. 1994 (translated).

20 Montgomery, William, and Samuel Nunn, "Privatization, Participation, and the Planning Process: A Case Study of Wastewater Treatment Infrastructure." PUBLIC WORKS MANAGEMENT AND POLICY, July 1996, pp. 43-59.

□ □

## मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन चौथे

### अर्थमीमांसा – वैज्ञानिक की कलात्मक ?

**लेखक : नी. वि. सोवनी**

किंमत रु. 250 ( सूट 10 टक्के )

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

सूट वजा जाता निव्वळ किंमत रु. 225 पुढील पत्त्यावर मनी ऑर्डर / डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक-पोस्टने पाठविला जाईल. डिमांड ड्राफ्ट पुणे येथील व्यापारी बँकेच्या शाखेवर देय असावा आणि तो '**मराठी अर्थशास्त्र परिषद**' या नावाने काढावा.

**पत्ता :** डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029.

# मुंबईतील राखी व्यवसाय *

स्वाती वैद्य **

भारतामध्ये अमलात आणल्या जाणाऱ्या आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमांचे परिणाम हे प्रत्यक्ष तसेच तात्त्विक पातळीवर अभ्यासले गेले पाहिजेत. बाजार–प्रणालीचा वापर व बाजारातील मागणीपुरवठा यांच्या परस्परसंबंधाद्वारे उपलब्ध साधनसामग्रीचे पुनर्नियोजन हे मूळ उद्देश ठेऊन आर्थिक सुधारणा राबविल्या जात आहेत असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. यासंदर्भात भारतासारख्या मजुरांची संख्या मुबलक असणाऱ्या देशांमधील लघु व अतिलघु उद्योगांकडे रोजगारनिर्मिती करणारे उद्योग म्हणून मोठ्या आशेने बघितले जाते. लघु व अतिलघु उद्योगांनी प्रामुख्याने व्यापलेल्या अनौपचारिक क्षेत्रात ( informal sector ) रोजगार–निर्मिती सातत्याने वाढते आहे ही परिस्थिती खरी असली तरीही या रोजगाराचा दर्जा मात्र फारच निम्न आहे.

अर्थव्यवस्थेमधील रोजगाराच्या वाढत्या अनौपचारिकीकरणामुळे नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगाराचा दर्जा (एकूण वेतन, श्रमाचे स्वरूप, कामाचे स्वरूप, कामाची उपलब्धता, नोकरीतील स्थैर्य, इत्यादी सर्वसाधारण निकष लावल्यास) सातत्याने घसरतो आहे हे मान्य करावे लागते. म्हणूनच अनौपचारिक क्षेत्रामधील नव्याजुन्या विविध उद्योगांचे स्वरूप तपशिलामध्ये समजून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत लेखामध्ये मुंबईतील राख्या तयार करून विकण्याच्या उद्योगाचा व्यष्टीय आढावा घेण्यात आलेला आहे. अभ्यासाचे वर्ष 1993–94 आहे. राख्यांच्या व्यवसायाची नोंद घेणे हा प्रमुख उद्देश असलेल्या या अभ्यासांतर्गत प्रत्येकी सहा घाऊक व किरकोळ विक्रेते आणि बारा दलाल व मजूर (घर–बसल्या काम करणाऱ्या स्त्रिया) यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती घेण्यासाठी आंशिक संरचित मुलाखत अनुसूचीचा ( semi–structured inter–view schedule ) वापर करण्यात आला होता. विक्रेते वगळता जवळजवळ सर्वच ठिकाणी दोन वेळा भेटी देऊन मुलाखत पूर्ण केली. यापैकी पहिल्या भेटी–मध्ये व्यवसायासंबंधी सर्वसाधारण माहिती गोळा

* श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्या–पीठ यानी एम. ए. पदवीसाठी मान्य केलेल्या लघु-प्रबंधाच्या आधारे तयार केलेला लेख. मार्गदर्शक : वीणा देवस्थळी.

** अधिव्याख्याता, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

करणे, व्यक्तिगत (जात, शिक्षण, घराचे स्वरूप, इत्यादी) स्वरुपाचे तथ्य संकलन करण्यावर भर दिला. दुसऱ्या भेटीमध्ये आर्थिक गुंतवणूक, मोबदला, कामाचे व ते मिळविण्याचे स्वरूप अशा अधिक खोलातील गोष्टींबाबतचे तपशील गोळा केले.

घाऊक विक्रेते वगळता इतर सर्वांची निवड यादृच्छिक (random) पद्धतीची होती. निवडलेले सहा घाऊक विक्रेते मात्र त्या बाजारातील 'मोठे मासे' म्हणूनच सर्वत्र गणले जातात व किरकोळ विक्रेते, दलाल व काही प्रमाणात मजूर या सर्वांनाच त्यांची नावे माहिती होती. जूनचा पहिला आठवडा ते ऑगस्टचा दुसरा आठवडा एवढाच काल दरवर्षी राख्यांचा व्यवसाय खरा जोमात असतो.

## राखी व्यवसायाची ठळक वैशिष्ट्ये

राखी व्यवसाय हा पारंपरिकरित्या चालत आलेला उद्योग असून तो संपूर्णतः अनौपचारिक उद्योगाचा भाग आहे. बरेचसे सांस्कृतिक व पारंपरिक कारणांशी संबंधित असलेले उद्योग हे अनौपचारिक क्षेत्राशी निगडित असतात. राखी व्यवसायाचे वस्तुनिर्मिती व विक्री हे दोनही स्तर संपूर्णतः नैमित्तिक (seasonal) स्वरुपाचे आहेत. वर्षभरात जेमतेम चार ते पाच महिने राख्यांचा व्यवसाय आपले वेगळे अस्तित्व दाखवू शकतो. या कालावधीमध्ये प्रामुख्याने राख्यांकरिता खास कच्च्या मालाची खरेदी, प्रत्यक्षात राख्या बनविल्या जाणे आणि राख्यांची विक्री या तीन गोष्टींचा समावेश होतो. वर्षाचे उरलेले महिने राखी व्यवसाय हा स्वतंत्र उद्योग म्हणून अस्तित्वात नसतो. परंतु राख्यांसाठी आवश्यक कच्चा माल तयार करणाऱ्या इतर अनेक उद्योगांमध्ये राखी व्यवसाय जणू विलीन होऊन जातो. राख्या बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालामध्ये प्रामुख्याने रेशीम धागे, जरी पट्टे व दोरे, स्पंज, प्लॅस्टिक कागदाची चांदी, मणी, विविध सुबक चकत्या, इत्यादी सुमारे शंभर दीडशे वस्तूंचा अंतर्भाव होतो. या वस्तू विविधोपयोगी असल्यामुळे त्यांना वर्षभर मागणी असते. राखी व्यवसायामधून येणारी मागणी हा त्यातील एक लहानसा भाग असतो.

राखी व्यवसायाचे वस्तुनिर्मिती (manufacturing) व विक्री (marketing) असे दोन स्तर ढोबळपणे करता येतात. या दोनही स्तरांमधील सहभागी होणाऱ्या राखी व्यावसायिकांच्या कामाच्या, गुंतवणुकीच्या व मिळणाऱ्या मोबदल्याच्या स्वरुपात खूपच विविधता दिसून येते. राखी व्यवसायाची सुरुवात कच्च्या मालाची खरेदी येथून आणि शेवट हा तयार राख्यांची अंतिम ग्राहकाकडे विक्री यामध्ये होतो. विक्री या स्तरावर राखी व्यावसायिकांचे घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते हे दोन प्रकार आढळून येतात. राख्या तयार करण्याचे काम ही या व्यवसायामधील मध्यवर्ती स्वरुपाची कृती. या पायरीवर तर खूपच वैविध्य दिसून येते. या पायरीवर दलाल (middle persons) व मजूर (प्रामुख्याने घरबसल्या काम करणाऱ्या स्त्रिया) यांचा समावेश होतो. इथे नमूद करण्यात आलेली कार्यपद्धती ही मुंबईतील राखी व्यवसायाचे जे सर्वेक्षण केले त्यावर आधारलेली आहे. स्थल बदलानुसार या कार्यपद्धतीमध्ये थोडेफार बदल आढळू शकतात.

कोणत्याही आर्थिक देवाणघेवाणीच्या वाढत्या बाजारीकरणामुळे त्या त्या व्यवसायाशी संबंधित विक्रीच्या स्तरावर सहभाग असणाऱ्यांचे महत्त्व वाढू लागते. मात्र त्याचवेळी प्रत्यक्ष वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या मोठ्या स्तराकडे दुर्लक्ष होण्यास सुरुवात होते. किंबहुना प्रत्यक्ष वस्तुनिर्मितीशी संबंधित असलेल्यांचे अस्तित्व जरी गृहीत धरले जात असले तरी त्यांचा एकूण व्यवसायातील सहभाग हा अगदी क्षुल्लकच आहे असे भासविले जाते. थोडक्यात, एखाद्या व्यवसायाच्या वाढत्या व्यापारीकरणामुळे त्या व्यवसायाशी संबंधित वस्तूच्या निर्मिती प्रक्रियेत ज्यांचा सहभाग आहे त्यांच्या योगदानाची वास्तविक हवी तितकी दखल घेतली जात नाही. याचा साहजिक परिणाम वस्तू निर्मिती व वस्तू विक्री या वर नमूद केलेल्या दोन स्तरांवर सहभागी होणाऱ्यांच्या मोबदल्यावर होतो. दोन्ही स्तरांवरील सहभागी घटकांना मिळणाऱ्या मोबदल्यातील तफावत वाढते. वाढती तफावत पुन्हा एकदा दोन स्तरांचे विभाजन घट्ट करते. व्यवसायांतर्गत विषमता वाढविते.

प्रस्तुत लेखाचा विषय असणाऱ्या राखी व्यवसायातील श्रमविभागणीचे स्वरूप या विधानांना पुष्टीच देते. या व्यवसायाच्या कार्यपद्धतीअंतर्गत विशिष्ट श्रम-

विभागणीला बरेच महत्त्वाचे स्थान आहे.

## राखी व्यवसायातील श्रमविभागणी

(1) **घाऊक विक्रेते / खरेदीदार :** प्रामुख्याने कच्च्या मालाची बाहेरगावाहून (कलकत्ता, सुरत, दिल्ली, जयपूर) तसेच अल्प प्रमाणात मुंबईमधून खरेदी करणे, कच्च्या मालाची विक्री करणे, तयार राख्यांची खरेदी करणे (बाहेरगावाहून आणलेला तयार माल अधिक मुंबईतील विकलेल्या कच्च्या मालापासून बनविलेला पक्का माल), तयार राख्यांची घाऊक बाजारामध्ये विक्री करणे अशा कामांमध्ये गुंतलेला हा बाजारातील कार्यशाली गट असतो.

(2) **किरकोळ विक्रेते :** घाऊक विक्रेत्यांकडून तयार राख्या घेणे आणि त्यांची किरकोळीने विक्री करणे. विशेष म्हणजे क्वचित एखाद्या किरकोळ विक्रेत्याने कच्चा माल विकत घेऊन घरबसल्या राख्या तयार करून त्या विकण्याचा यशस्वी प्रयत्न केलेलाही दिसून येतो.

(3) **दलाल :** घाऊक विक्रेत्यांकडून कच्चा माल विकत घेणे वा कच्च्या मालाची उचल घेणे आणि पैसे द्याव-याच्यावेळी रीतसर घाऊक विक्रेता मागेल तितका 'वटाव' देणे, हा कच्चा माल घराजवळील गरीब व गरजू स्त्रियांमध्ये वाटून त्यांच्याकडून राख्या बनवून घेणे, तयार झालेला पक्का माल ज्यांच्याकडून कच्च्या मालाची उचल घेतली त्याच घाऊक विक्रेत्याला तो म्हणेल त्या किमतीला आणि सांगेल तितक्या वटावाच्या वजावटीला त्याला विकणे, कच्चा माल रोखीने घेतलेला असेल तर मालाची घाऊक बाजारात विक्री करणे, इत्यादी कामे दलाल करतात. काही दलाल स्वतःच्या कच्च्या मालाची खरेदी स्वतःच बाहेरगावी जाऊन करतात आणि पक्क्या मालाची विक्रीसुद्धा निम्न-घाऊक (semi-wholeselling) स्तरावर करताना दिसतात.

(4) **मजूर :** यात प्रामुख्याने घरबसल्या काम कर-णाऱ्या 18 ते 50 या वयोगटातील स्त्रिया आढळून आल्या. क्वचितप्रसंगी 18 वर्षांखालील मुली स्वतंत्रपणे राख्या बनविताना आढळल्या. परंतु घरातील आईला लहान मुलांनी मदत करण्याचे प्रमाण भरपूर आहे. मुले शाळेतून आल्यानंतर खेळण्याची जागा ही पाव-सामुळे पूर्ण भिजलेली असल्याने घरात बसून राख्या करताना आईला जमेल तशी मदत करतात असे दिसून आले. परंतु त्यांच्या मदत करण्याला 'बालमजुरी' असे म्हणणे उचित ठरणार नाही.

अशा पद्धतीची संरचना श्रमविभागणी अंतर्गत राखी व्यवसायामध्ये बघावयाला मिळते. विविध पात-ळ्यांवर चाललेले काम, त्या त्या पातळीवर काम करणारी वेगवेगळी माणसे आणि त्यांच्या त्यांच्या कामाचा विक्री वा वस्तू वाटपाशी जसा संबंध आहे त्यानुसार त्यांना मिळणारा आर्थिक मोबदला आणि एकूणच व्यवसायांतर्गत मिळणारी सत्ता (power) हे ठरणार असते. राखी व्यवसायामधील श्रमविभागणी-मध्ये जसे वैविध्य आढळते तसेच वैविध्य श्रमविभागणी अंतर्गत विविध स्तरांमधील सहभागी व्यक्तींना मिळ-णाऱ्या मोबदल्यातही आढळून येते.

## श्रमविभागणीमधील स्थान, गुंतवणूक व मोबदला यामधील विविधता

राखी व्यवसायामधील श्रमविभागणीच्या संरच-नेमध्ये सर्वात महत्त्वाचे स्थान हे घाऊक विक्रेत्यांना आहे. मुंबईमधील राखी घाऊक बाजार हा दक्षिण मुंबईमधील भुलेश्वर भागातील भोईवाड्याची तिसरी गल्ली (तिसरा भोईवाडा) व दागिना बाजार या दोन गल्ल्यांमध्ये एकवटलेला आहे. या दोन गल्ल्यांमध्ये केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणामधून सहा प्रमुख घाऊक विक्रेत्यांची नावे बाजारातील 'मोठे मासे' म्हणून पुढे आली. या सहा घाऊक विक्रेत्यांच्या मुलाखती घेऊन त्याद्वारे घाऊक विक्रेत्यांच्या कामाचे आणि त्यांच्या गुंतवणूक व मोबदल्याचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला.

ज्यांची मुलाखत घेतली अशा सहा घाऊक विक्रेत्यांपैकी केवळ एकच फक्त कच्चा माल विकणारा होता. एक घाऊक विक्रेता केवळ पक्का माल (तयार राख्याच) विकणारा आढळला. उरलेले चार घाऊक विक्रेते हे कच्च्या मालाची तसेच पक्क्या मालाची विक्री या दोन्हीही गोष्टी करताना आढळले. या चारही जणांचा दलालांशी निकटचा संबंध होता हे ओघाने आलेच. हे चारही जण कच्च्या मालाच्या

किमती ठरविताना आणि कच्च्या मालाची उचल दिल्यानंतर बटाव ठरविताना दलालांवर संपूर्ण वर्चस्व गाजवितात. तक्ता 1 मध्ये घाऊक विक्रेत्यांनी ऑगस्ट 1993 च्या राख्यांसाठी केलेली गुंतवणूक, झालेली एकूण विक्री व स्थूल नफा यांचा तपशील दिलेला आहे. त्यावरून हे दिसून येते की, घाऊक विक्रेत्यांची गुंतवणूक ही सुमारे रु. 50,000 ते रु. 3,00,000 पर्यंत असते. या गुंतवणुकीवर त्यांना 25 ते 100 टक्के या दरम्यान नफा मिळविता येतो. सर्वसाधारणपणे प्रत्येक घाऊक विक्रेता सुमारे 2 ते 6 महिने इतका कालपर्यंत हे पैसे गुंतवितो. याचाच अर्थ, अवघ्या 2 ते 6 महिन्यांमध्ये गुंतविलेले 50,000 ते 3,00,000 रुपये वसूल होऊन त्यावर सुमारे 25 ते 100 टक्के या दरम्यान निव्वळ नफा कमावता येतो. शिवाय राखी व्यवसायासारख्या पूर्णतः हंगामी व अनौपचारिक उद्योगामधून मिळविलेल्या या उत्पन्नापैकी किती उत्पन्नाची सरकारदरबारी नोंद होते याचा थांगपत्ता लागणे निव्वळ अशक्य आहे. इतक्या कमी कालावधीत इतक्या प्रमाणात पैसा मिळविणे सावकारालादेखील कठीणच जाईल. पण मुळामध्ये एवढा नफा निर्माण होतो कोठे? तो घाऊक विक्रेत्यांनाच होतो की त्या नफ्याच्या निर्मितीच्या ठिकाणापासून ( place of origin of the surplus ) त्याचा संचय होण्यास सुरुवात होते? या व अशा इतर प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता राखी व्यवसायामधील श्रमविभागणीचे विविध स्तर आणि या सर्व स्तरांमधून राखी व्यवसायामध्ये सहभागी असलेल्या माणसांकडे आपल्याला वळावे लागते.

किरकोळ विक्रेते हा राखी व्यवसायामधील विक्रीच्या स्तरावरील अंतिम व अतिशय महत्त्वाचा असा टप्पा आहे. किरकोळ विक्रेते सर्वसाधारणतः 10 ते 15 दिवस राख्या विकताना आढळतात. या दिवसांमध्ये या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर उलाढाल होते. या कालावधीत पाऊस जास्त पडल्यास किरकोळ विक्रेत्यांचे अमाप नुकसान होते. यामागे प्रमुख दोन कारणे संभवतात : (अ) राख्यांची किरकोळीने विक्री करणाऱ्यांमध्ये बहुसंख्येने फेरीवाले आढळतात. दुकानाकरिता पक्क्या इमारतीचा अभाव आणि काही ठिकाणी तर रस्त्यावरच तात्पुरते दुकान थाटणे अशी परिस्थिती असल्याने पावसामुळे विक्रीकरिता ठेवलेल्या राख्यांचे नुकसान होते. (आ) बहुतेक किरकोळ विक्रेते घाऊक बाजारामधून रोखीने खरेदी करतात. म्हणूनच पावसामुळे राख्या खराब झाल्या म्हणजे गुंतविलेले मुद्दलच वाया जाते; नफा मिळविणे दूरच. अशा तऱ्हेने किर-

**तक्ता 1**

**घाऊक विक्रेत्यांची गुंतवणूक, एकूण उलाढाल व नफा**

| घाऊक विक्रेता क्र. | वय (वर्षे) | राखी व्यवसायामधील अनुभव (वर्षे) | राखी व्यवसायामधील काल (प्रतिवर्ष महिने) | गुंतवणूक (लाख रु.) | उलाढाल (लाख रु.) | स्थूल नफा (लाख रु.) (5)–(4) | स्थूल नफा ( % ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | 50 + | 15–17 | 2–3 | 1.4–2 | 4–5 | 2.6–3 | 40–65 |
| 2 | 35 + | 20 हून अधिक | 2–3 | 2–3 | 4–6 | 2–3 | 100 |
| 3 | 30 + | 15 हून अधिक | 4–6 | – | 2 | – | 10–100* |
| 4 | 35 + | 18 | 5–6 | 1–1.5 | 2–3 | 1–1.5 | 100 |
| 5 | 25 | 15 | 2–3 | 0.5–0.6 | 0.75 | 0.15–0.25 | 25–50 |

* या घाऊक विक्रेत्याने अंदाजे सांगितलेले आकडे.

कोळ विक्रीमध्ये घाऊक विक्रीपेक्षा अधिक जोखीम असते हे स्पष्ट होते. याशिवाय किरकोळ विक्रेते हे रोखीने व्यवहार करीत असल्याने (उचल घेतल्यास ती परत करताना दर आठवड्याला 10 टक्के वा काही वेळा दर दिवसाला 2 टक्के इतका वटाव द्यावा लागतो) घाऊक विक्रेते जो काही माल लावतील त्यावर अवलंबून असतात. तरीसुद्धा राख्या विकणे हा केवळ 10 ते 15 दिवसांचा व्यवसाय असूनही त्या 10–15 दिवसांत किरकोळ विक्रेत्यांची संपूर्ण महिन्याची कमाई वसूल होते असे दिसून आले. राख्या विकण्याचा व्यवसाय हा भरपूर फायदा करून देणारा असल्याचे किरकोळ विक्रेत्यांनी मान्य केले. म्हणजेच उपलब्ध असलेला अल्प काल, जागेची वानवा, पाऊस, रोखीने माल खरेदी, इत्यादी सर्व घटक फारसे अनुकूल नसूनही किरकोळ विक्रेत्यांना मोठ्या प्रमाणावर नफा मिळविणे शक्य होते ते कसे? तक्ता 2 मध्ये राख्यांचे विविध प्रकार, त्यांची घाऊक बाजारातील किंमत (किरकोळ विक्रेत्यांची खरेदी किंमत) आणि त्याच राख्यांचा किरकोळ बाजारातील भाव यांची तुलना केलेली आहे. तसेच त्यावरून विशिष्ट प्रकारच्या राखीमागे किरकोळ विक्रेत्यांना अंदाजे किती नफा होतो हे दिसून येईल. किरकोळ विक्रेत्यांना होणारा नफा हा केवळ राख्या विकत घेणाऱ्या ग्राहकांच्या मार्फतच होतो. या नफ्याचा आणि प्रत्यक्ष वस्तुनिर्मितीमध्ये ज्यांचा सहभाग आहे अशा दलालांचा तसेच घरबसल्या राख्या तयार करून नगावर वेतन मिळविणाऱ्या स्त्री मजुरांचा कोणताही संबंध इथे येत नाही. किरकोळ विक्रीचा स्तर हा वस्तुनिर्मितीच्या स्तरापासून पूर्णतः वेगळा राहून स्वतंत्र असल्याप्रमाणे दिसतो.

राखी व्यवसायामधील प्रत्यक्ष वस्तुनिर्मितीच्या स्तरावर सहभागी होणाऱ्या दलाल व मजूर या दोन घटकांची सखोल माहिती करून घेण्यापूर्वी मुळामध्ये प्रत्यक्ष राख्या तयार करण्याचे काम कशा प्रकारे चालते याविषयी थोडक्यात माहिती करून घेणे आवश्यक आहे. राख्या तयार करण्याचे काम हे प्रामुख्याने मुंबईमधील गरीब वस्त्यांमधील (जुन्या चाळी आणि धारावी, इत्यादीसारख्या शहरभर सर्वत्र पसरलेल्या झोपडपट्ट्यांतील) स्त्रिया करतात. या स्त्रिया घरबसल्या नगावारी वेतनावर (piece rate wages) राबणाऱ्या मजूर असून त्यांना कच्च्या मालाचा पुरवठा दलालांमार्फत होतो. हे दलाल त्याच वस्तीमध्ये आसपास राहणारे पुरुष असतात. दलाल लोक मुंबईमधील घाऊक बाजारामधून कच्चा माल आणतात. हा कच्चा माल त्यांनी याअगोदर नमूद केल्याप्रमाणे घाऊक विक्रेत्यांकडून खरेदी (रोखीने वा उचल घेऊन) केलेला असतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्त्री–मजुरांनी तयार केलेल्या राख्या दलाल पुन्हा त्याच घाऊक विक्रेत्यांना विकतात. नंतरच त्या घाऊक बाजारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतात. त्या किरकोळ विक्रेते खरेदी करून नंतर अंतिम ग्राहकाला विकतात.

## प्रत्यक्ष वस्तुनिर्मिती स्तर : दलाल

राखी व्यवसायामधील जवळजवळ प्रत्येक पायरीवर दलालांचा सहभाग आढळून येतो. प्रत्येक पायरीवर जे कामाचे स्वरूप असेल त्यानुसार दलाल वर्गाच्या सहभागाचे प्रमाण कमीजास्त होताना दिसून येते. या सहभागावर दलालांचे स्थान अवलंबून असते. ते श्रमाच्या सहभागापेक्षा पैशाच्या रूपातील सहभागाला अधिक महत्त्व देते असे स्पष्टपणे जाणवते. दलालांच्या कामामध्ये कच्च्या मालाची खरेदी, कच्च्या मालाचे वाटप, एकूण वस्तू निर्मितीसाठी आयोजन आणि अंतिमतः पक्क्या मालाची घाऊक विक्रेत्यांकडे विक्री या गोष्टींचा प्रामुख्याने समावेश असला तरीही त्यात खूपच वैविध्य आढळते. काही दलाल कच्च्या मालाची उचल घेतात त्यामुळे पक्का माल (तयार राख्या) त्याच घाऊक विक्रेत्याला तो म्हणेल त्या किमतीला (कच्चा तसेच पक्का माल) आणि म्हणेल तितक्या 'वटावाला' विकणे त्यांच्यावर बंधनकारक राहते. काही दलाल तयार केलेल्या राख्यांमधील काही टक्के माल घाऊक विक्रेत्यांकडे विकतात आणि उरलेला भाग स्वतःच तात्पुरते दुकान थाटून अर्ध–घाऊक (semi–wholeselling) पद्धतीने विकतात. अर्थातच स्वतंत्रपणे विक्री करणाऱ्यांमध्ये बहुतांश कच्चा माल पूर्णतः रोखीने खरेदी करणारे किंवा किमान काही प्रमाणात रोखीचा व्यवहार करणारे दलालच अशा पद्धतीने विक्री करू शकतात. काही दलाल तर किरकोळ विक्रीदेखील करताना दिसतात. या अभ्यासादरम्यान केलेल्या तथ्य संकलनामध्ये एकूण 12 दलालांच्या मुलाखती घेतल्या. त्या 12 पैकी 2 स्त्रिया होत्या.

## तक्ता 2

### विविध प्रकारच्या राख्यांचे घाऊक व किरकोळ बाजारातील भाव

| राखीचा प्रकार | घाऊक बाजारातील भाव (ग्रोस) (रु.) | घाऊक बाजारातील नगावारी भाव (रु.) | किरकोळ बाजारातील नगावारीभाव (रु.) | किरकोळ बाजारातील नगावारी नफा (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | **लोकप्रिय राख्या** | | |
| छोटा गोंडा | 9.00 | 0.06 | 1.00 | 0.90 |
| मोठा गोंडा | 15.00 | 0.10 | 1.25–2.00 | 1.15–1.90 |
| चांदी व छोटा गोंडा | 18.00 | 0.12 | 1.25–2.00 | 1.12–1.87 |
| चांदी व मोठा गोंडा | 21.00 | 0.15 | 2.00–2.50 | 1.85–2.35 |
| साधी चोटी | 20.00–25.00 | 0.15 –0.20 | 2.50–3.00 | 1.86–2.82 |
| जरी चोटी | 23.00–30.00 | 0.159–0.208 | 2.50–3.00 | 2.34–2.80 |
| | | **शोभिवंत राख्या** | | |
| झल्ला | 35.00–60.00 | 0.24–0.41 | 2.00–3.00 | 1.76–2.58 |
| चरक राखी | 40.00–72.00 | 0.27–0.50 | 2.00–3.00 | 1.85–2.50 |
| | | **स्पंज राख्या** | | |
| छोटी स्पंज राख्या | 24.00 प्रति 24 राख्यांना | 1.00 | 2.00 | 1.00 |
| मोठी स्पंज राख्या | 30.00–40.00 प्रति 16 राख्यांना | 1.85–2.50 | 2.00–3.50 | 0.13–1.00 |
| | | **महागड्या राख्या** | | |
| पाकिटातील राखी | 5.00–15.00 नगास | 5.00–15.00 | 6.00–20.00 | 1.00–5.00 |
| चंदनाची राखी * | 15.00–20.00 नगास | 15.00–20.00 | — | — |
| तवक राखी * | 45.00–60.00 नगास | 45.00–60.00 | — | — |

* या राख्यांची विक्री किरकोळ विक्रेते करीत नाहीत.

## तक्ता 3
### दलालांचे प्रकार व गुंतवणूक

| गुंतवणूक (रु.) | केवळ वस्तुनिर्मिती | वस्तुनिर्मिती व अर्ध-घाऊक व्यापार | वस्तुनिर्मिती व किरकोळ विक्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| 0–5,000 | 1 | – | 1 | 2 |
| 5,000–25,000 | 3 | – | 1 | 4 |
| 25,000–50,000 | 1 | 1 | 1 | 3 |
| 50,000–75,000 | – | 2 | – | 2 |
| 75,000–1,00,000 | – | 1 | – | 1 |
| **एकूण** | **5** | **4** | **3** | **12** |

तक्ता 3 मध्ये दिल्यानुसार दिसून येते की, 12 दलालांपैकी पाचजण हे केवळ कच्चा माल विकत घेऊन पक्का माल तयार करण्याचे आयोजन करणे आणि नंतर तो घाऊक विक्रेत्यांना विकणे हे काम करतात (केवळ वस्तुनिर्मिती). उरलेल्या सातपैकी चारजण हे अर्ध-घाऊक व्यापार करतात तर बाकीचे तीन जण किरकोळ विक्री करतात. एकूण कामाच्या स्वरुपामध्ये जरी हे वैविध्य आढळले तरीही त्यांना या कामामधून मिळणाऱ्या नफ्याच्या दरामध्ये मात्र फारसा फरक आढळत नाही. तक्ता 4 मध्ये दाखविल्याप्रमाणे केवळ वस्तुनिर्मितीमध्ये सहभागी असलेल्यांना 30 ते 50 टक्क्यांपर्यंत नफा मिळतो. तयार केलेल्या राख्यांची किरकोळीने विक्री करणाऱ्यांना 15 ते 40 टक्के नफा मिळतो तर जे अर्ध–घाऊक व्यवहार करतात त्यांना 37·5 ते 70 टक्क्यांपर्यंत नफा होतो. शेवटच्या दोनही प्रकारच्या दलालांनी मजुरांकडून करवून घेतलेल्या राख्यांची दोन टप्प्यांमध्ये विक्री केल्याचे दिसते : (1) घाऊक विक्रेत्यांना त्यांनी ठरविलेल्या भावाला राख्या विकणे आणि (2) उरलेल्या वा सगळ्याच राख्या तात्पुरते दुकान उभारून / भाड्याच्या जागेत स्वतःच अर्ध–घाऊक पद्धतीने किंवा किरकोळीने विकणे. याअगोदर नमूद केलेल्या शेवटच्या दोन प्रकारांमध्ये मोडणाऱ्या ज्या 7 जणांसाठीची नफ्याची टक्केवारी इथे दिलेली आहे ती वर सांगितलेल्या दोन टप्प्यांमधील विक्रीमधून होणाऱ्या एकूण नफ्याची टक्केवारी आहे. थोडक्यात, केवळ वस्तुनिर्मिती करणाऱ्या दलालांना 30 ते 50 टक्के नफा मिळतो तर अर्ध–घाऊकवाल्यांना कमीत कमी 37·5 टक्के मिळविणे शक्य होते. याउलट किरकोळ विक्रेत्यांचा कमीत कमी नफा मात्र केवळ 15 टक्के इतका कमी असतो. राखी विकणाऱ्या सर्वसाधारण किरकोळ विक्रेत्यांना जी जोखीम घ्यावी लागते एकतर त्याचा हा परिणाम असावा अथवा ज्या दलालांनी किरकोळीने जितक्या राख्यांची विक्री केल्याचे सांगितले त्या राख्या घाऊक बाजारामध्ये दर्जा व रंग, रूप, इत्यादींच्या कसोटीस न उतरणाऱ्या ठरलेल्या होत्या. अशा रीतीने सर्वसाधारण राख्यांपेक्षा ज्यांचा दर्जा सुमार आहे त्या राख्यांना किरकोळ बाजारातही सर्वसाधारण राख्यांपेक्षा कमी

## तक्ता 4
### दलालांचा प्रकार व मिळणारा नफा

| दलालांचा प्रकार | संख्या | मिळणाऱ्या नफ्याची टक्केवारी |
|---|---|---|
| केवळ वस्तुनिर्मिती | 5 | 30–50 |
| वस्तुनिर्मिती व अर्ध–घाऊक व्यापार | 4 | 37·5–70 |
| वस्तुनिर्मिती व किरकोळ विक्री | 3 | 15–40 |

किमत मिळाल्याने अशी किरकोळ विक्री करणाऱ्या दलालांचा नफा कमी असल्याचे दिसून येते.

दलालांच्या कामाचे स्वरूप आणि त्याना मिळणाऱ्या मोबदल्यामध्ये असे वैविध्य दिसत असताना बहुतांश दलालांचे सामाजिक वास्तव मात्र सारखेच असते. बहुतांश दलाल हे उत्तर प्रदेशामधील प्रतापगड या जिल्ह्यामध्ये आढळून येणाऱ्या 'पटवा' या अनुसूचित जमातीचे आहेत. 'पटवा' जातीमधील लोक 'पटवा' याच नावाने ओळखले जातात. आणि रेशमाच्या लड्या, दोऱ्या, इत्यादींपासून विविध वस्तू विशेषत: माळा पटविणे, जरीपट्टा व रेशीम एकत्र विणून पट्टे बनविणे, रेशीम लड्यांना कलात्मक रीतीने गुंडाळून विचित्र शोभिवंत वस्तू, अलंकार बनविणे आणि मुख्यत: राख्या तयार करणे अशा कामात कुशल आहेत. प्रस्तुत अभ्यासादरम्यान ज्या बारा दलालांच्या मुलाखती घेतल्या त्यापैकी आठजण 'पटवा' होते आणि त्यापैकी प्रत्येकाच्या मते राख्यांचा व्यवसाय हा त्यांच्या जातीचा परंपरागत धंदा आहे. मुंबईत हा धंदा केवळ काही महिनेच असला तरीही हे सर्वजण वर्षभर रेशीम लड्यांशी संबंधित वस्तूंशीच व्यवसायामध्ये असतात. त्यामागे पुन्हा एकदा जातीचा परंपरागत व्यवसाय असण्याचेच कारण दिले गेले. हे 'पटवा' व इतर दलाल स्वत:देखील राख्या तयार करतात. किंबहुना राख्यांच्या नवीन डिझाईनचा नमुना तयार करून तसे काम मजुरांना शिकविणे हा त्यांच्या कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

दलालांच्या कामामध्ये कच्च्या मालाची खरेदी, राख्यांचे नवीन डिझाईन बनविणे वा बाजारात आलेले नवे डिझाईन आत्मसात करणे, त्याचे शिक्षण मजुरांना देणे, स्वत: केलेल्या गुंतवणुकीमधून नफा जास्तीत जास्त मिळवून देईल अशा प्रकारच्या राख्या मजुरांकडून बनवून घेणे आणि शेवटी या पक्क्या मालाची विक्री करणे असे वैविध्य आढळून येते. इतक्या विविध प्रकारची कामे एकटा दलाल करीत नाही. दलालांच्या या सर्व कामांमध्ये त्यांच्या घरातील माणसांचा, विशेष: स्त्री सदस्यांचा, लक्षणीय सहभाग असतो. बहुतांश दलाल हे पुरुष असतात, (ज्या बारा दलालांच्या मुलाखती घेतल्या त्यापैकी केवळ दोनच स्त्रिया होत्या परंतु त्या व्यतिरिक्त दलाल म्हणूनच राखी व्यवसायामध्ये सामील होणाऱ्या स्त्रियांबद्दल कोणतीही माहिती मिळाली नाही). पुरुष दलालांच्या घरामध्ये असणारी त्यांची बायको हीसुद्धा राख्या तयार करते. घराच्या आसपास राहणाऱ्या मजुरांना काम (कच्चा माल) पुरविणे, त्यानी तयार करून आणलेल्या राख्या मोजून घेणे, नवीन डिझाईन मजुरांना शिकविणे, इत्यादी सर्व कामे या दलालांच्या बायकांना करावी लागतात. प्रत्यक्ष राख्या बनविण्यामधील त्यांचे योगदानही दुर्लक्ष करण्यासारखे क्वचितच नसते. सर्वसाधारण मजूर एखाद्या प्रकारच्या डिझाईनच्या जेवढ्या राख्या एका दिवसात बनवेल तेवढ्याच राख्या या बायकादेखील बनवितात. थोडक्यात, दलालांच्या घरातील स्त्रियांनी राख्या या मोबदला न घेता बनविलेल्या असतात तसेच राख्या बनविण्याव्यतिरिक्त संयोजन व देखरेख या स्वरुपाची अनेक कामेही त्या 'घरचा व्यवसाय' असे म्हणून विनामोबदला करतात. म्हणजे दलालांच्या स्तरावर विनामोबदला वापरले जाणारे हे घरगुती श्रम अर्थशास्त्रीयदृष्टया जरी परिव्ययाचा भाग नसले तरी मुद्दामहून नोंद न घेतल्यास एक प्रकारे दलालांच्या नफ्याचा आकडा फुगवितात. हे ध्यानात घेतल्यानंतर दलालांना मिळणाऱ्या कमीत कमी 15 टक्के ते जास्तीत जास्त 70 टक्के नफ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून जातो. किंबहुना छुप्या परिव्ययाची नोंद न घेता दाखविलेला सुमारे 15 ते 70 टक्के नफा हा फुगविलेला आहे याची खात्री दलालांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवरून जाणवते. सर्वच दलाल हे मजुरांप्रमाणेच गरीब व त्याच गरीब वस्त्यांमध्ये राहणारे, शिक्षणाचा फारसा गंध नसलेले आणि राख्या बनविण्यासाठी जी पारंपरिक कौशल्ये माहिती असणे आवश्यक असते ती व तेवढीच कौशल्ये माहिती असणारे होते. त्यांचे पोट (मजुराप्रमाणेच) अक्षरश: हातावर होते. राखी व्यवसाय हा ज्या शहरी अनौपचारिक उद्योग क्षेत्र (urban informal sector) या क्षेत्रामधील एक व्यवसाय आहे त्या क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने केलेल्या व्याख्येशी तंतोतंतपणे जुळणारा व्यवहार हा दलालांच्या स्तरावर दिसून येतो.

कोणत्याही प्रकारच्या उत्पादन व्यवसायामधील (औपचारिक वा अनौपचारिक) श्रमसंबंध हे त्या त्या व्यवसायानुसार व व्यवसायामधील उत्पादक घटकांच्या

संयोगाच्या भिन्नतेनुसार बदलते असतात. राखी व्यवसायाच्या या अभ्यासांतर्गत या व्यवसायामधील श्रमासंबंधीचे स्वरूप समजून घेण्यासाठी 24 घरांमधील घरबसल्या राख्या बनविण्याचे काम करणाऱ्या प्रत्येकी एका मजुराच्या मुलाखती घेतल्या. मुलाखती घेतलेल्या सर्व स्त्रियाच होत्या, कारण प्रामुख्याने स्त्रियाच राख्या बनविण्याचे काम करतात. सुरुवातीला राख्या बनविणाऱ्या स्त्रियांचा शोध घेणे हे फारच अवघड जाईल अशी अपेक्षा होती. परंतु साधारणतः जून महिन्याच्या मध्यावर जेव्हा राख्यांचा व्यवसाय खऱ्या अर्थाने जोर घेतो त्यावेळी अशा स्त्रिया शोधून त्यांची मुलाखत घेण्याचे काम करणे बरेच सुकर झाले. ज्या घराच्या दारामध्ये व खोलीतही इतस्त्र जर रेशमाच्या लड्यांचा ढीग, 'चरकी' नावाचे राख्या बनविताना वापरले जाणारे एक छोटे हत्यार, मोठी कात्री, स्पंज टिकल्या, इत्यादी साहित्य दिसते त्या घरामध्ये राख्या बनविल्या जातात असे खुशाल समजावे आणि दार वाजवावे आणि खोलीतून दारापाशी आलेल्या स्त्रीला प्रश्न विचारून मुलाखतीला सुरुवात करावी. सर्वच स्त्रियांनी मुलाखतीसाठी पुरेसा वेळ दिला आणि व्यवसायासंबंधीची माहितीदेखील न कंटाळता, जबाबदारीने दिली. या स्त्रियांचे एक वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण मुलाखतीच्या वेळेत त्यांच्या हातात काम असे. बहुतेक वेळा राख्या बनविण्याचे तर क्वचित कधी इतर घरकाम वगैरे हातातले काम बाजूला सारून बोलत बसणे शक्य नाही म्हणून ही तारेवरची कसरत त्या करीत होत्या.

ज्या चोवीस घरांमध्ये मुलाखती घेतल्या त्यामध्ये एकूण 49 जण या ना त्या प्रकारे राखी बनविण्यामध्ये सहभागी होते. त्यापैकी 39 स्त्रिया, 8 लहान मुले व 3 पुरुष होते. चोवीस स्त्रियांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या, कारण उरलेल्या पंचवीस जणांचा सहभाग हा त्या स्त्रियांना हातभार लावण्यापुरता होता. तक्ता 5 नुसार बारा स्त्रिया एकट्यानेच राख्या बनवीत होत्या. नऊ घरांमधून दोन किंवा तीनजण राख्या बनविण्याचे काम करीत होते. यामध्ये स्त्रिया, मुले व पुरुष या तिघांचा समावेश असला तरी सर्वच ठिकाणी स्त्रियांवरील कामाचा बोजा हा अधिक होता. ज्या घरांमधून चार किंवा अधिक जण राख्या बनवीत होते अशी केवळ तीनच घरे आढळली. ज्यांची मुलाखत घेतली अशा एकूण चोवीस स्त्रियांपैकी अकरा अविवाहीत व सापत्य तर दोन सापत्य विधवा होत्या. केवळ तीन जणींना त्यांची लहान मुले थोडीफार मदत करतात असे समजले. आठ घरांमध्ये दोन वा अधिक स्त्रिया राख्या बनविण्याचे काम करीत होत्या. बारा जणी एकट्यानेच राख्यांचे काम करीत होत्या.

तथ्य संकलनासाठी निवडलेल्या चोवीस घरांचे सरासरी दरडोई मासिक उत्पन्न हे सुमारे 430 रुपये होते आणि कुटुंबातील सदस्य संख्या सरासरी 5·04 होती. उत्पन्नाची ही पातळी आणि मुंबईमधील महागाई व खर्चाचे स्वरूप लक्षात घेता यातील तेरा कुटुंबे ही कर्जबाजारी होती यात नवल वाटू नये. उरलेल्या अकरा घरांमध्ये निदान तथ्य संकलनाच्या वेळेपर्यंत तरी कर्ज काढलेले नव्हते. परंतु त्यांची परिस्थितीदेखील अगदी हातावरचे पोट अशीच होती. वेळप्रसंगी उपाशी राहून कर्जाच्या आणि कर्ज देणाऱ्या सावकाराच्या विळख्यातून दूर राहण्याची धडपड त्या घरां-

**तक्ता 5**

**प्रत्येक घरामधील मजुरांची संख्या**

| मजूर संख्या | घरांची संख्या |
|---|---|
| 0–1 | 12 |
| 2–3 | 9 |
| 4 वा अधिक | 3 |

एकूण घरांची संख्या – 24
एकूण मजुरांची संख्या – 49
एकूण स्त्री मजुरांची संख्या – 38
एकूण मुलांची (मदतनीस) संख्या – 8
एकूण पुरुष मदतनिसांची संख्या – 3

मधल्या मोठ्या माणसांनी, विशेषतः स्त्रियांनी, केलेली होती. घराघरामधील आर्थिक परिस्थितीचे हे स्वरूप लक्षात घेता या घरांमध्ये राखीव नविण्यामधून आलेला प्रत्येक पैसा हा उपासमार टाळणारा, म्हणून अत्याव-श्यक आहे, हे लक्षात येते. म्हणूनच राखी व्यवसाय बंद असतानाच्या कालात वर्षभर कोणते काम करून पैसा मिळविला जातो हे जाणून घेणे आवश्यक ठरते. वर्षभर या सर्व कुटुंबांमध्ये रेशीम लडयांशी संबंधित इतर छोटयामोठ्या स्वरुपाचे अलंकार बनविणे, माळा करणे, हेअर पिन, हेअर बँड बनविणे अशी कामे करून राखीच्या मोसमात जेवढे उत्पन्न मिळविले जाते तेवढे मिळवितात. या सर्व प्रकारच्या कामात घरातल्या स्त्रियाच प्रामुख्याने सहभागी होतात. थोडक्यात, राखीच्या हंगामात राख्या करणे, हेअर बँड, इत्यादी बनविण्याच्यावेळी ते करणे असे विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन त्या त्या हंगामात स्त्रिया करतात. एवढेच नव्हे तर काम बदलले तरीही काम पुरविणारा दलाल बदलत नाही.

अशा रीतीने वर्षभर सतत कोणत्या ना कोणत्या स्वरुपाच्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या, मिळणाऱ्या अत्यल्प मोबदल्यावर विनातक्रार काम करणाऱ्या आणि मिळणारा जवळजवळ सर्व मोबदला घरखर्चासाठी वापरणाऱ्या स्त्रियांना 'मजूर' न म्हणता, त्यांच्या कामाला 'काम' न म्हणता केवळ 'फावल्या वेळात घरबसल्या वेळेचा सदुपयोग करणे' असे म्हणणे ही त्या स्त्रियांची व त्यांच्या अमाप कष्टांची क्रूर चेष्टा, हेटाळणीच ठरेल. परंतु दैवदुर्विलास तो हा की त्या स्त्रियादेखील स्वतःला मजूर समजत नाहीत. कारण घरबसल्या केलेल्या कामाला अर्थशास्त्रपासून सामान्य माणसापर्यंत कोणीच 'काम' म्हणून मान्यता देत नाही.

या कुटुंबांचे मासिक उत्पन्न आणि दिवसाकाठी बनविल्या जाणाऱ्या राख्या यामधील संबंध सांगणाऱ्या तक्ता 6 वरून दिसून येते की, बहुसंख्य घरांमध्ये दोन ते चार ग्रोस (एक ग्रोस = 144 नग) इतक्या राख्या रोज बन विल्या जातात त्या ठिकाणी घरातील इतर माणसे स्त्रीला मदत करतात असे दिसून आले. राख्या बनविणाऱ्या या स्त्रिया त्यांची इतर अनेक घरगुती कामे ( विना-मोबदला करावी लागणारी ) आणि घराबाहेरची मोबदला मिळवून देणारी (यात घरबसल्या करता येणारी राखीसारखी कामेदेखील आली) कामे यामध्ये त्याना उपलब्ध असलेल्या वेळेची विभागणी करतात. दोनही प्रकारची कामे योग्य त्या वेळेत पार पाडणे म्हणजे तारेवरची एक कसरतच असते. घरापासून काही अंतरावर असलेल्या सार्व-जनिक नळावरून पाणी आणणे आणि पाण्याच्याच वेळात कपडे, भांडी, इत्यादी पाण्याची कामे करणे

**तक्ता 6**

**कुटुंबाचे मासिक उत्पन्न व तयार केल्या जाणाऱ्या राख्या**

| कुटुंबाचे मासिक उत्पन्न (रु.) | तयार केल्या जाणाऱ्या राख्या (ग्रोस) 0–2 | 2–4 | 4–6 | 6–8 | 8–10 | 10 वा अधिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 500 हून कमी | – | 1 | – | – | – | – | 1 |
| 500–1,000 | – | 2 | – | – | – | 1 | 3 |
| 1,000–1,500 | – | 7 | – | – | – | – | 7 |
| 1,500–2,000 | – | 1 | 1 | – | – | 1 | 3 |
| 2,000–2,500 | – | 2 | 1 | – | 1 | 1 | 5 |
| 3,000 हून अधिक | – | – | 1 | 1 | 3 | – | 5 |
| **एकूण** | **–** | **13** | **3** | **1** | **4** | **3** | **24** |

यासाठी सुमारे दोन ते तीन तास आणि दोन वेळेच्या स्वयंपाकाची तयारी करून अन्न शिजविणे यासाठी पाच ते सहा तास जातात. रोजचे धान्य व भाज्या, मीठ–मिरची, इत्यादी खरेदी करावे लागते. म्हणजे रोजच काय वस्तू परवडतील आणि त्या घरच्यांच्या कशा पुरवठ्यास पडतील याची भ्रांत असते. कामाच्या आणि काळजीच्या गाड्यात राख्या वा इतर वस्तू बनविण्यासाठी वेळ देणे म्हणजे "फावल्या वेळाचा सदुपयोग" असे म्हणणे उचित ठरणार नाही. राख्या बनविण्यामुळे मिळणारे पैसे हे त्या घरामधील अन्न–पाण्याव्यतिरिक्त जे इतर खर्च असतात ते पुरविण्याच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे आहेत.

तक्ता 7 मध्ये दाखविल्यानुसार राखीच्या विविध प्रकारानुसार आणि त्या मुंबईस कोणत्या ठिकाणी बनविल्या जात आहेत त्यानुसार मोबदल्यामध्ये फरक पडतो हे समजून येते. हा फरक आणि राख्या बनविणाऱ्या स्त्रियांचे कौशल्य वा अनुभव यांचा काहीही संबंध दिसत नाही. घाटकोपर या मुंबईतील पूर्व उपनगरामधील झोपडपट्टीत राहणाऱ्या दोन मजुरांना मिळणाऱ्या मोबदल्यामधील फरकावरून ही गोष्ट स्पष्ट होईल. सुमारे चाळीस वर्षांपासून राख्या बनविण्याचे काम करणाऱ्या एका विधवा स्त्रीला कोणत्याही प्रकारची राखी संपूर्णपणे बनविण्यासाठी प्रत्येक ग्रोस राख्यामागे अवघे रु. 3 ते 5 इतका मोबदला मिळतो. याउलट तिकडेच राहणाऱ्या एका शाळकरी मुलीला एक ग्रोस इतक्या स्पंज राख्यांवर शोभिवंत टिकल्या चिकटविण्यासाठी रु. 3 मिळतात आणि गोंड्यांच्या राखीसारखा सोपा प्रकार करण्यासाठी रु. 4 प्रत्येक ग्रोसमागे मिळतात. एकूणच, मजूर कोणत्या राख्या बनविणार आणि त्यांना त्यासाठी किती दाम मिळणार हे ठरविणारा काहीच नियम नाही की पद्धती नाही. सारेच संपूर्णतः अनौपचारिक, अनिश्चित व गोंधळाच्या स्वरूपाचे. मजुरीच्या संदर्भातील हे गोंधळाचे स्वरूप अर्थातच दलालांनी निर्माण केलेले असून या गोंधळाशिवाय दलालांच्या अस्तित्वालाच धोका पोचेल असे आहे. थोडक्यात, मजुरांना अत्यल्प मोबदला देऊन दलाल लोक त्यांची धाऊक विक्रेते जी पिळवणूक करतात त्याची भरपाई करतात असे म्हणता येईल.

राख्यांच्या या व्यवसायामध्ये अशा पद्धतीने स्त्रियांच श्रमविभागणी अंतर्गत असलेल्या उतरंडीच्या सर्वांत खालच्या पायरीवर आहेत. राखीच्या व्यवसायामधील वस्तू विक्री व निर्मिती या दोन स्तरांवर अशा पद्धतीची उतरंडीची संरचना दिसून येते.

## निष्कर्ष

संपूर्णतः हंगामी असलेल्या या व्यवसामधील सर्वच स्तरांवरील सहभागी घटकांना घ्यावी लागणारी

**तक्ता 7**

**मुंबईमध्ये विविध ठिकाणी मिळणारा मोबदला**

(रुपये / ग्रोस)

| राखीचा प्रकार | भायखळा | धारावी | घाटकोपर | वडाळा |
|---|---|---|---|---|
| चांदी राखी | 2·5–3·5 | – | 0·5–2·0 | 2–3 |
| गोंडा राखी | – | – | 1·5–4·0 | 4 प्रत्येकी 1,000 राख्यांसाठी ते 4 प्रत्येक ग्रोससाठी |
| चोटी राखी | – | – | 2–5 | 6–7 |
| छल्ला राखी | 4 | – | 2–3·6 | – |
| चरक राखी | – | 12·5–25·0 | 5–15 | 3 |
| टिकल्या स्पंज राखी | 0·75–1·00 | – | 3 | 0·9–2·00 |
| साधी स्पंज राखी | 2–3 | – | – | – |

जोखीम आणि त्याना मिळणारा मोबदला यामध्ये फरक आहे. घाऊक विक्रेते जेवढी गुंतवणूक करतात त्याच्या सुमारे 25 ते 70 टक्के नफा त्याना मिळतो. घाऊक विक्रेते या सर्व व्यवसायावर संपूर्ण नियंत्रण ठेवतात.

किरकोळ विक्रेत्यांना घ्यावी लागणारी जोखीम बरीच असली तरीही त्याना मिळणारा नफादेखील बराच असतो. किरकोळ विक्रेते आणि प्रत्यक्ष वस्तु-निर्मिती स्तर यांचा फारच अल्प संबंध येतो. प्रत्यक्ष वस्तुनिर्मितीची किंमत आणि त्याच राख्यांची किरकोळ विक्रीच्याबाजारात केली जाणारी किंमत यामध्ये बरीच तफावत आहे.

वस्तू विक्री तसेच वस्तू निर्मिती या दोन भिन्न परंतु परस्परावलंबी स्तरांची सांगड घालण्याचे आणि प्रत्यक्ष वस्तू निर्मितीसाठी उत्पादन घटकांची जुळणी करण्याचे महत्त्वाचे काम दलाल करतात. तुलनेने दलालांना मात्र फारच अल्प मोबदला मिळतो. बरेचसे दलाल हे एकाच जातीमधील आहेत आणि त्यांच्या मते राख्या बनविण्याचे काम हे त्यांच्या जातीचेच काम आहे.

संपूर्णः घरबसल्या काम ही या व्यवसामधील वस्तुनिर्मितीची पद्धती आहे. प्रामुख्याने स्त्री मजूर वस्तुनिर्मिती करतात आणि त्याना अत्यल्प मोबदला मिळतो.

अशा तऱ्हेने राख्यांचा व्यवसाय हा शहरी अनौप-चारिक उद्योग क्षेत्रामधील एक व्यवसाय असून या व्यवसायामधील सर्वच सहभागी घटक हे कोणत्याही कामगार संघटनेचे सभासद नसून असंघटित आहेत. तथापि व्यवसायांतर्गत नियोजन व श्रमविभागणीची उतरंड पूर्णतः निश्चित झालेली आहे.

## संदर्भ टीपा


1 Sethuraman, S. V. (ed.) (1981), THE URBAN INFORMAL SECTOR IN DEVELOPING COUNTRIES; EMPLOYMENT, POVERTY AND ENVIRONMENT, Geneva, International Labour Office, pp. 13-25.


□ □


## पूर्वीच्या अंकांतील लेखांच्या झेरॉक्स प्रती

ज्या अभ्यासकांना 'अर्थसंवाद' च्या खंड 1, अंक 1 पासून तो आजपर्यंतच्या 'अर्थसंवाद' मधील कोणत्याही अंकातील एखाद्या लेखाची प्रत झेरॉक्स करून पाहिजे असेल तर ती करून पाठविण्याची सुविधा 'अर्थसंवाद' ने सुरू केली आहे. त्यासाठी केवळ झेरॉक्स करण्याचा खर्च संबंधितांकडून आकारला जाईल. अभ्यासकांना पूर्वीचे अंक पुरविता येत नसल्याने ही पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचा फायदा अभ्यासकांनी जरूर घ्यावा.

**प्रमुख संपादक**

# अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक, 1997

यशवंत राराबीकर *

दरवर्षीप्रमाणे यंदाही ऑक्टोबर महिन्यात स्वीडनच्या रॉयल स्वीडिश विज्ञान अकादमीने 1997 चा अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक जाहीर केले. यंदाही हे पारितोषिक गेल्या वर्षीप्रमाणेच दोन अर्थशास्त्रज्ञांना देण्यात आले आहे. पारितोषिकाची रक्कम 7.5 दशलक्ष स्वीडिश क्रोना ( स्वीडनचे चलन ) (म्हणजे 9,92,000 अमेरिकी डॉलर किंवा 3.57 कोटी भारतीय रुपये) ही त्यांना विभागून देण्यात आली आहे. हे दोन अर्थशास्त्रज्ञ म्हणजे मायरॉन जे. शोल्स (Myron J. Scholes) आणि रॉबर्ट सी. मेर्टन (Robert C. Merton) हे असून दोघेही अमेरिकेतील आहेत. यापैकी शोल्स हे स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझिनेसमध्ये सन्मान्य प्राध्यापक (Professor Emeritus) असून मेर्टन हे हार्वर्ड विद्यापीठाच्या बिझिनेस स्कूलमध्ये प्राध्यापक आहेत. अनुजात वायदेपत्रांचे (derivatives) मूल्य ठरविणाऱ्या नवीन पद्धतीबद्दल त्यांना हे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येत आहे असे या अकादमीने आपल्या गौरव लेखात (citation) म्हटले आहे.

1969 पासून अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक द्यावयाला सुरुवात झाली. 1997 पर्यंत, म्हणजे गेल्या 29 वर्षांत, अशी 29 पारितोषिके दिली गेली. त्यापैकी 23 पारितोषिके ( सुमारे 79 टक्के ) अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञांना दिली गेली तसेच या 29 वर्षांत 42 अर्थशास्त्रज्ञांना हे पारितोषिक मिळाले त्यापैकी 27 अर्थशास्त्रज्ञ (सुमारे 64 टक्के) अमेरिकेतीलच आहेत. यावरून अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञांचे या पारितोषिकावरील वर्चस्व लक्षात येते.

या वर्षीचे दोघेही पारितोषिक विजेते विचाराने परिपक्व असले तरी वयाने फार मोठे नाहीत. दोघेही साठीच्या आतलेच आहेत. शोल्स यांचा जन्म 1941 चा; म्हणजे ते 56 वर्षांचे आहेत. मेर्टन हे त्यांच्याहीपेक्षा लहान आहेत; त्यांचे वय आज 53 वर्षे आहे. अर्थात याहीपेक्षा कमी वयाच्या अर्थशास्त्रज्ञांना हे

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, नाशिक.

पारितोषिक पूर्वी मिळाले आहे आणि ते अर्थशास्त्रज्ञ म्हणजे केनेथ ॲरो. त्याना 1972 चे नोबेल पारितोषिक वयाच्या एक्कावन्नाव्यावर्षी मिळाले. साठीच्या आत हे पारितोषिक मिळाल्याची इतरही अर्थशास्त्रज्ञांची उदाहरणे आहेत, पण क्वचित व तुरळक: पॉल सॅम्युअल्सन यांना पंचावन्नाव्या वर्षी 1970 चे, विल्यम शार्प यांना 1990 चे पारितोषिक वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी तर रॉबर्ट ल्यूकास यांना 1995 चे पारितोषिक अठ्ठावन्नाव्या वर्षी. परंतु बहुतेकदा ते साठीसत्तरीतल्या किंवा त्याहूनही अधिक वयाच्या अर्थशास्त्रज्ञांना देण्यात आले आहे.

## वित्तीय अर्थशास्त्र क्षेत्र

या वर्षीचे नोबेल पारितोषिक या दोन अर्थशास्त्रज्ञांना त्यांच्या वित्तीय अर्थशास्त्रातील ( Financial Economics ) एका विशिष्ट महत्त्वाच्या कूट समस्येवरील तोडगा शोधून काढण्याबद्दल देण्यात आले आहे; अशा रीतीने वित्तीय अर्थशास्त्र क्षेत्रातील मूलभूत संशोधनाबद्दल ते दिले आहे. वित्तीय क्षेत्रातील कार्याबद्दल नोबेल पारितोषिक देण्याची ही दुसरी वेळ आहे. पहिल्यांदा ते देण्यात आले ते 1990 मध्ये हॅरी मार्कोविट्स, मेर्टन मिलर आणि विल्यम शार्प या तीन अमेरिकी अर्थशास्त्रज्ञांना. ते त्याना रोखेसंग्रह विविधता ( portfolio diversification ) आणि कार्यदक्ष भांडवल बाजार ( efficient capital market ) यासंबंधीच्या त्यांच्या मूलभूत संशोधनाबद्दल देण्यात आले. यावरून नोबेल पारितोषिकाचे क्षेत्र केवळ सैद्धान्तिक अर्थशास्त्रापुरते ( theoretical economics ) मर्यादित राहिले नसून वित्तीय अर्थशास्त्राकडेही त्याचा कल होऊ लागला आहे असे म्हणता येईल.

## उभयतांचे संशोधन

या दोन अर्थशास्त्रज्ञांनी केलेले संशोधन काही एकत्रितपणाने केलेले नाही, तर प्रत्येकाने स्वतंत्रपणाने केले आहे. परंतु दोघांपुढची संशोधनाची समस्या किंवा विषय एकच होता आणि त्या समस्येची जी उत्तरे त्यानी आपापल्या संशोधनातून शोधून काढली ती आपापल्या प्रतिमान आणि सूत्रांच्या स्वरुपात मांडली.

वित्तीय बाजार आणि शेअर बाजार यांचा जरी दिवसेंदिवस विस्तार होत असला तरी या बाजारांत उलाढाल करणाऱ्यांपुढे एक कूट समस्या नेहमी उभी ठाकलेली असे आणि तिचे समाधानकारक उत्तर काही कोणी देऊ शकत नसे. ती समस्या म्हणजे, अशा बाजारांमधून मूळ समभागांचे जे समभाग पर्याय ( stock / share options ), तसेच इतर मूळ प्रतिभूतींचे जे प्रतिभूती पर्याय ( security options ) आणि अनुजात वायदेपत्र ( derivatives ) वापरले जातात त्या पर्यायांचे व अनुजात वायदेपत्रांचे किंमतनिर्धारण ( pricing ) कसे करायचे ? असे किंमतनिर्धारण यथायोग्य रीतीने करण्यावरच अशा बाजारातील व्यवहार जोखीम टाळून सुरळीतपणाने पार पडणे अवलंबून असते. शोल्स आणि मेर्टन यानी आपल्या संशोधनातून पर्याय किंमतनिर्धारण प्रतिमाने ( Options Pricing Models : OPM ) शोधून काढली आणि गणिती सूत्रांच्या ( formulaes ) स्वरुपात ती मांडली. ती त्यानी पंचवीस वर्षांपूर्वी, म्हणजे 1973 मध्ये, मांडली आणि तेव्हापासून ती जागतिक शेअर बाजारात व अनुजात वायदेपत्रांच्या बाजारात जोखीम टाळून यश संपादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरली असून त्यांचा सार्वत्रिक वापर केला जात आहे. त्यांचे हे संशोधन नाविन्यपूर्ण असल्याने त्याना हे नोबेल पारितोषिक देण्यात येत आहे असे नोबेल समितीने आपल्या निर्णयात म्हटले आहे.

## पर्याय ( Options ) म्हणजे काय ?

या उभयतांचे वर सांगितलेले संशोधन आकलन होण्यासाठी समभाग पर्यायांचा अर्थ समजावून घेणे जरुरीचे आहे. त्यासाठी अगोदर अनुजात वायदेपत्र ( derivatives ) म्हणजे काय हे लक्षात घेतले पाहिजे, कारण समभाग पर्याय हे एक प्रकारचे अनुजात वायदेपत्रच असतात. अनुजात वायदेपत्र ही नेहमीची प्रत्यक्ष आणि मूळ पतपत्रे नसतात; तर या मूळ पतपत्रांबाबत केल्या जाणाऱ्या वायद्यातून निर्माण होणारी परंतु स्वतंत्र अशी वायदेपत्रे असतात. "वायदे बाजारातील वायदेपत्रांवर आणखी एक वायद्याचा मजला चढविला म्हणजे जे होते ते निराळे वायदेपत्रच असते." ती स्वतंत्र पत्रांपासून, त्यांच्याबाबतीत केलेल्या वायद्यांमधून उद्‌भवत असल्याने (derive होत असल्याने), त्याना

'अनुजात वायदेपत्रे' (derivatives) असे म्हटले जाते. त्यांचे मूल्य मूळ पतपत्र / वायदेपत्राच्या मूल्यावर अवलंबून असते. अशा अनुजात वायदेपत्रांचा वापर तसा बराच जुना आहे. परंतु अलीकडच्या काळातील दूरसंदेश क्षेत्रातील प्रचंड प्रगतीमुळे त्यांची संख्या आणि त्यांचे व्यवहार खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. तसेच त्यांचा वापर करून सट्टयाचे व्यवहार करण्याचे प्रकारही खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत.

समभाग पर्याय हा अनुजात वायदेपत्राचाच एक प्रकार आहे. असे पर्याय म्हणजे एक प्रकारचे वित्तीय वायदेपत्रच असते. शेअर बाजारात नोंदविल्या गेलेल्या (listed) समभागांवर ती काढली जातात. असे पर्याय समभागांवर जसे काढले जातात तसेच इतर प्रतिभूतीं-वर देखील काढले जातात. त्याना प्रतिभूती पर्याय (security options) म्हटले जाते. अनुजात वायदेपत्रांप्रमाणेच या पर्यायांचे मूल्यदेखील मूळच्या समभागाच्या किंवा प्रतिभूतीच्या मूल्यावर अवलंबून असते.

पर्याय दोन प्रकारचे असतात: (1) खरेदी पर्याय (call option), (2) विक्री पर्याय (put option). खरेदी पर्याय हे विशिष्ट समभागावर काढलेले खरेदी वायदापत्र असते. त्या समभागाची विक्री करणारा हा अशा खरेदी पर्यायाचा निर्माता (creator) असतो, तर त्यांची भविष्यात खरेदी करणारा गुंतवणूकदार हा त्याचा धारक (holder) असतो. खरेदी पर्याय म्हणजे या उभयतांमध्ये झालेले वायदापत्र किंवा करारपत्र असते. त्यानुसार असा पर्याय धारण करणाऱ्यास ते समभाग आज निश्चित केलेल्या किमतीला विशिष्ट तारखेस किंवा त्यापूर्वी खरेदी करण्याचा अधिकार प्राप्त होतो, परंतु त्याच्यावर बंधन किंवा जबा-बदारी मात्र कोणतीही नसते. मात्र त्याला त्याने आपला पर्याय प्रत्यक्ष कार्यवाहीत (exercised) आणेपावेतो त्या समभागावरील लाभांश (dividend) मिळू शकत नाही किंवा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क त्या समभागावर प्राप्त होत नाही. आज निश्चित केलेल्या किमतीला 'कार्यवाही मूल्य' (exercise price) किंवा 'Striking price' किंवा 'वायदा मूल्य' (contract price) म्हणतात. खरेदी पर्यायाला 'क्रय पर्यायाधिकार' असाही शब्द वापरला जातो. तो अधिक अर्थवाही म्हणून अधिक उचित वाटतो. विक्री पर्याय किंवा विक्रय पर्यायाधिकार (put option) हा असाच परंतु याच्या उलट म्हणजे समभागाची आज निश्चित केलेल्या किमतीला विशिष्ट तारखेस किंवा त्यापूर्वी विक्री करण्याचा अधिकार ते पर्याय धारण करणाऱ्या विक्रेत्यास देणारा असतो.

पर्यायांच्या या दोन प्रकारांपैकी पहिल्या प्रकारा-वर, म्हणजे खरेदी पर्यायावर (call option), शोल्स आणि मेर्टन यानी लक्ष केन्द्रित केले आणि त्यांच्या किमत निर्धारणाबाबतची प्रतिमाने तयार केली.

## थोडा पूर्वेतिहास

1973 मध्ये शोल्स आणि मेर्टन यानी आपली वेगवेगळी प्रतिमाने स्वतंत्रपणाने करण्यापूर्वी कित्येक वर्षे आधीपासून या पर्याय किमतनिर्धारणाच्या समस्येबद्दल संशोधन आणि लिखाण चालू होते. सन 1900 मध्ये फ्रेंच गणिती लुई बॅचेलियर (Loui Bachelier) यानी तर या विषयावरील आपला डॉक्टरेटचा शोधप्रबंधच सादर केला होता. त्यानी त्यात मांडलेले प्रतिमान हे या विषयावरील पहिले प्रतिमान मानले पाहिजे. परंतु ते सदोष होते, कारण त्यानी एकतर ऋण समभाग किमतींची (negative stock prices) शक्यता मान्य केली होती आणि दुसरे म्हणजे गैरवाजवी पर्याय किमतींची (Unreasonable Option Prices) शक्यताही गृहीत धरली होती. त्यानंतर 1960 च्या दशकाच्या सुरुवातील विविध अर्थशास्त्रज्ञांनी सुधारलेली प्रतिमाने तयार करण्याचे प्रयत्न केले. त्यात प्रामुख्याने केस स्प्रेंकल (Case Sprenkle), जेम्स बॉनेस (James Boness) आणि पॉल सॅम्युअल्सन (Paul Samuelson) यांची नावे घ्यावी लागतील. परंतु त्यांची प्रतिमानेदेखील पर्याय किमतनिर्धारणाच्या कूट समस्येचे समाधानकारक उत्तर देण्याच्या दृष्टीने सदोष आणि अपूर्ण होती. सॅम्युअल्सन यानी आपल्या प्रति-मानात असे मानले होते की, समभाग पर्यायावर मिळ-णारा प्रत्याय (return) हा मूळ समभागावर मिळ-णाऱ्या मोबदल्याहून नुसताच भिन्न नव्हे तर अधिक असतो. या गृहितामुळे मूल्यांतरपणन (arbitrage) अपरिहार्यपणे अस्तित्वात येऊन त्यामुळे समभाग पर्याय मूल्यांकनच कठीण होईल हे स्पष्ट झाले. पुढे 1973

मध्ये शोल्स आणि मेर्टन यांनी जी प्रतिमाने तयार केली त्यात मुख्य अट च मुळी मूल्यांतरपणनाचा अभाव ( no-arbitrage condition ) ही होती. मूल्यांतरपणन म्हणजे एखाद्या समभागाच्या किमतीत दोन शेअर बाजारांमध्ये जर फरक असेल तर अशा समभागांची कमी किमतीच्या बाजारातून खरेदी केली जाऊन जास्त किमतीच्या बाजारात वहन ( traffic ) आणि विक्री केली जाईल.

अशा रीतीने समभाग पर्याय किंमतनिर्धारणाच्या बाबतीत समाधानकारक सूत्र नसल्याने समभाग पर्यायांचा वापर व व्यवहार फारसा लोकप्रिय होत नव्हता. त्यांची उलाढाल आणि बाजार फारसा वाढत नव्हता. शोल्स आणि मेर्टन यांनी क्रान्ती घडवून आणली. 1973 च्या त्यांच्या सूत्रांनी पर्यायांच्या वापराला आणि व्यवहारांना एकदम ऊर्जितावस्था प्राप्त झाली; ती इतकी की, आज जागतिक अनुजात वायदेपत्रांचा बाजार, जो 55 ट्रिलियन डॉलर (55 वर 12 शून्ये) इतका प्रचंड झाला आहे आणि त्यात पर्याय व्यापाराचा ( options trading ) हिस्सा फार मोठा आहे.

## ब्लॅक–शोल्स प्रतिमान

मायरॉन शोल्स हे जरी नोबेल पारितोषिकाचे एक मानकरी असले तरी त्यांनी मांडलेले प्रतिमान व सूत्र त्यांचे एकट्याचे नाही. ते व त्यांचे मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील सहकारी ख्रिस्तवासी फिशर ब्लॅक यांनी मिळून ते प्रतिमान तयार केले आणि त्यासंबंधीचा त्यांचा लेख ' The Pricing of Options and Corporate Liabilities ) हा 'जर्नल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नियतकालिकाने आपल्या मे–जून 1973 च्या अंकात प्रसिद्ध केला. यात गमतीचा भाग असा की, या दोघांनी आपली प्रतिमाने आणि हा लेख त्याआधी दोन वर्षे लिहिला होता पण एकाही वित्तीय नियतकालिकाने तो प्रसिद्ध केला नाही. एका मोठ्या वित्तीय नियतकालिकाने तर तो नाकारून साभार परत पाठविला ! काही परीक्षकांनी ( referees ) तर तो अतिशय क्लिष्ट असून त्यात काही अर्थशास्त्रीय मूल्य नाही असा यावर अभिप्राय दिला.

हे प्रतिमान तयार करण्यात ब्लॅक यांचा एवढा मोठा सहभाग होता की ते एकट्या शोल्स यांच्या नावाने ओळखले न जाता दोघांच्या नावाने, म्हणजे ब्लॅक–शोल्स प्रतिमान म्हणूनच, अमेरिकेत आणि पाश्चात्य जगतात ओळखले जाते. तसेच ब्लॅक जर आज हयात असते तर त्यानाही स्वीडिश अकादमीने या पारितोषिक विजेत्यांमध्ये निश्चितच सहभागी करून घेतले असते. परंतु दुर्दैवाने त्यांचे 1995 मध्ये निधन झाले. नोबेल पारितोषिक दिवंगतांना न देण्याचा नियम असल्याने ते या बहुमानास मुकले.

त्यांचे हे प्रतिमान मुळात त्यांच्या जोखीम व्यवस्थापनाच्या (risk management) संशोधनावर उभारलेले आहे. वर सांगितलेली मूल्यांतरपणनाच्या अभावाची अट (no -arbitrage condition) ही त्यांच्या प्रतिमानाचा आधार आहे. या अटीचा उपयोग करून त्यांनी सैद्धान्तिकदृष्ट्या भक्कम आणि व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त असे सूत्र खरेदी पर्यायाची (call options) इष्टमत किंमत (optimal price) ठरविण्यासाठी शोधुन काढले. ते पुढीलप्रमाणे आहे.

ब्लॅक–शोल्स यांचे मूळ सूत्र (formula)

$$C(S,t) = SN(d_1) - e^{-r(T-t)} N(d_2)$$

या सूत्रातील संज्ञांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे–

C = विशिष्ट अनुजात वायदेपत्र प्रतिभूतीचे ( derivative security ) मूल्य
S = समभागाची किंमत
t = कालावधी

यावरून, C (S, t) = अनुजात वायदे पत्र प्रतिभूतीचे मूल्य हे समभागाची किंमत आणि कालावधी यांचे फल असते हा अर्थ.

N (·) = प्रमाणित संचित सर्वसामान्य वितरण फल (Standard cumulative normal distribution function)

T = विशिष्ट भविष्यकालीन तारीख = मुदतपूर्ती दिनांक ( maturity date )

e = कार्यवाही किंमत ( exercise price or strike price )

r = अपेक्षित व्याज दर = अपेक्षित मोबदल्याचा दर (expected rate of interest or expected rate of return )

[स्रोत: The New Palgrave: A DICTIONARY OF ECONOMICS 1987, p. 331.]

त्यांचे हे प्रतिमान चार घटकांवर अवलंबून आहे: (1) समभाग प्रतिभूती पर्यायाचा कालावधी, (2) प्रतिभूतीची प्रचलित किंमत ( current price ) आणि कार्यवाही किंमत (exercise price or strike price) यातील फरक, (3) जोखीमरहित मत्तेवरील (risk-free asset) मोबदल्याचा दर आणि (4) मूळ समभाग वा प्रतिभूती यांच्या किमतीतील चंचलता किंवा विचलन (volatility). पर्यायाचा कालावधी जेवढा मोठा असेल तेवढा तो पर्याय अधिक मूल्यवान असेल. तसेच कार्यवाही किमतीच्या मानाने प्रचलित किंमत जेवढी जास्त असेल तितका तो पर्याय अधिक आकर्षक ठरेल. चंचलता किंवा विचलन याबाबतीत असे म्हणता येईल की, जर एखाद्या समभागाचे किंवा प्रतिभूतीचे मूल्य महिनोन महिने विशिष्ट पातळीवर अगदी स्थिर असेल तर त्याच्या पर्यायाला बाजार असणार नाही. यावरून असे म्हणता येईल की, इतर घटक समान असता, मूळ समभाग वा प्रतिभूती यांच्या किमतीतील विचलन जेवढे मोठे असेल तेवढी त्याच्या पर्यायाची किंमत जास्त असेल.

किमतनिर्धारणाचे हे प्रतिमान आणि सूत्र स्पष्ट करीत असतानाच ब्लॅक–शोल्स यानी समभागपर्याय व्यापारातील जोखिमी कमी कशा करता येतील याविषयीही मार्गदर्शन केले आहे. अशा खरेदी पर्याय व्यापारात (call options trading) पर्याय निर्मात्याला (creater or writer) अमर्यादित जोखीम पत्करावी लागते. अशी जोखीम कशी टाळता येईल किंवा निदान ती कमीत कमी कशी करता येईल यासाठी त्यानी सांगितलेले उपाय आणि केलेले मार्गदर्शन हे या दोघांचे महत्त्वाचे योगदान मानावे लागेल.

## मेर्टन यांचे योगदान

रॉबर्ट मेर्टन यानी पर्याय किमतनिर्धारणाचे वेगळे प्रतिमान आणि सूत्र शोधून काढले आणि ते 1973 मध्येच 'The Theory of Rational Option Pricing ) या लेखात मांडले. हा लेख 'बेल जर्नल ऑफ इकॉनॉमिक अँण्ड मॅनेजमेंट सायन्स' या नियतकालिकाने प्रसिद्ध केला. प्रस्तुत लेखकाला मेर्टन यांचे सूत्र आणि प्रतिमान उपलब्ध होऊ शकले नाही त्यामुळे ते येथे उद्धृत करता आले नाही. मेर्टन यांच्या सूत्राचे वैशिष्ट्य असे आहे की, त्यानी ते अशा रीतीने बसविले आहे की ते केवळ समभाग पर्यायांच्या किमतनिर्धारणापुरतेच नव्हे तर अधिक व्यापकपणाने उपयोगात आणता येईल.

मेर्टन यांना पिंडच मुळी वित्तीय बाजारात आणि शेअर बाजारातील व्यवहारात रस घेणारा होता. त्यांच्याबद्दल असे सांगतात की, त्यानी बाराव्या अवघ्या दहाव्या वर्षीच आपला पहिला शेअर विकत घेतला! गणित हा त्यांचा विषय. कॅलिफोर्नियातील महाविद्यालयात पदवीच्या वर्गात शिकत असताना ते सकाळी 6·30 वाजताच उठत असत; हेतू असा की, शेअरचे प्रमुख बाजार सुरू होताक्षणीच त्यांना समभाग पर्याय आणि परिवर्तनीय रोखे यांच्या व्यवहारात भाग घेता यावा. पुढे ते मॅसाच्युसेटस् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्राध्यापक म्हणून असताना पॉल सॅम्युअल्सन यानी त्यांचे गणिती ज्ञान आणि वित्तीय बाजारातील व्यवहारांची आवड यांची सांगड घालण्याची प्रेरणा दिली. त्यातूनच त्यांना पुढे कंपन्यांच्या एकूणच देयतेचे मूल्यांकन करण्याच्या एकसंध सिद्धान्ताची पायाभरणी करता आली आणि तो त्यानी विकसित केला.

या त्यांच्या एकसंध सिद्धान्तातच ( unified theory of valuation of corporate liabilities) त्यानी मूल्यांकन प्रतिमान आणि सूत्र इतके व्यापक आणि सामान्यीकृत ( generalised ) करून मांडले की आज लक्षावधी शेअर बाजार व्यावसायिक विविध प्रकारच्या वायदापत्रांच्या मूल्यांकनासाठी ते वापरत आहेत. त्याबरोबर मेर्टन यानी आपल्या प्रतिमानातून या पर्यायांचे व्यवहार करताना येणाऱ्या जोखिमा कशा टाळता येतील किंवा कमी करता येतील यासंबंधीच्या उपायांबाबतही मार्गदर्शन केले आहे.

अशा रीतीने यावर्षीच्या नोबेल पारितोषिक

विजेत्या अर्थशास्त्रज्ञांनी वित्तीय बाजारांच्या क्षेत्रात केलेले योगदान मूलगामी, महत्त्वाचे आणि व्यावहारिक-दृष्टचा अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळेच नोबेल पारितोषिक समितीचे अध्यक्ष बर्टिल नसलँड ( Bertil Nusland ) म्हणाले की, "या दोघांनी शोधलेली आणि विकसित केलेली प्रतिमाने आणि सूत्रांची पद्धती ही आश्चर्यकारक ( wonderful ) आहेत. अनुजात वायदेपत्रांच्या बाजारातील यशाच्या कारणांपैकी ही प्रतिमाने आणि सूत्रे महत्त्वाचे कारण आहेत."

## संदर्भ टीपा

1 सोवनी, नी. वि., 'अर्थ शब्दांची वाट पाहे', **अर्थसंवाद**, खंड 21, अंक 1, एप्रिल-जून 1997, पान 57.

## संदर्भ सूची


1 Mishra, Banikanta, 'A Nobel for Hamlet', THE ECONOMIC TIMES, 17 October 1997, p. 8.

2 Mulji, Sudhir 'Labour of the Laureates', BUSINESS STANDARD, Mumbai, 21 October, 1997.

3 Goswami, Onkar, 'Options Rule, OK', BUSINESS INDIA, November 3-16, 1997.

4 Chaudhari, Somenath, 'Three Cheers for Practical Economics', BUSINESS WORLD, 7 November, 1997.

5 NEW PALGRAVE DICTIONARY OF ECONOMICS, 1987, eds. John Eatwell, Murray Milgate & Peter Newman, pp. 331, 745-54.

6 दोशी, रवीन्द्र, 'अर्थशास्त्रातील नोबेलची श्रेयमालिका,' **अर्थसंवाद**, खंड 16, अंक 4, पृष्ठे 312-21,

7 Puttaswamaiah, K., NOBEL ECONOMISTS : LIVES AND CONTRIBUTIONS, Volumes 1, 2 & 3, Indus Publishing C mpany, New Delhi, 1995.


# परिशिष्ट

## मेर्टन आणि ब्लॅक-शोल्स यांचे काही प्रमुख संशोधनपर लेख

### (अ) रॉबर्ट मेर्टन


1 (1973), 'The Theory of Rational Option Pricing', BELL JOURNAL OF ECONOMIC & MANAGEMENT SCIENCES, 4 (1), Spring, pp. 141-83.

2 (1973), 'An Intertemporal Capital Asset Pricing Model', ECONOMETRICA, 41 (5), September, pp. 867-87.

3 (1976), 'Option Pricing When Underlying Stock Returns are Discontinuous,' JOURNAL OF FINANCIAL ECONOMICS, 3 (1-2).

4 (1977), 'On the Pricing of Contingent Claims and the Modigliani-Miller Theorem', JOURNAL OF FINANCIAL ECONOMICS, 5, November, pp. 241-50.

5 'Options', entry in the NEW PALGRAVE ; A DICTIONARY OF ECONOMICS, 1987, Vol. 3, pp. 745-51.


### (आ) ब्लॅक-शोल्स


1 Black, F. and Scholes, M. (1972), 'The Valuation of Option Contracts and a Test of Market Efficiency', JOURNAL OF FINANCE, 27 (2), May, pp. 399-417.

2 Black, F., Jensen, M. and Scholes, M. (1972), 'The Capital Asset Pricing Model : Some Empirical Tests' in STUDIES IN THE THEORY OF CAPITAL MARKETS, ed. M. C. Jensen, New york, Praeger.

3 Black, F. and Scholes, M. (1973), 'The Pricing of Options and Corporate Liabilities', JOURNAL OF POLITICAL ECONOMY, 81 (3), May-June, pp. 637-54.

4 Black, F. and Scholes, M. (1974), 'The Effects of Dividend Yield and Policy on Common Stock Prices and Returns', JOURNAL OF FINANCIAL ECONOMICS, 1 (1), May, pp. 1-22.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक याना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील आणि कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे, इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या/अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डर 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते पुणे येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद'च्या अंकात दिली जातील.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह-खजिनदार

# रुपयाची परिवर्तनीयता
## ( प्रेरणा, प्रक्रिया आणि धोके )

शि. ना. माने *

### प्रेरणा

आज उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या नकाशावरील देशाच्या भौगोलिक सीमारेषा अधिकाधिक पुसट होत आहेत. जगाच्या एकात्मीकरणाच्या प्रक्रियेत (वैश्विक खेडे) देशापेक्षा स्पर्धा जास्त महत्त्वाची ठरत आहे. मी जर भारतीय बनावटीच्या टेल्को ट्रक (भौतिक भांडवल) खरेदी केला तर टेल्को कंपनीला पैसे मिळतात आणि मला ट्रक मिळतो. परंतु मी जर टोयोटा कंपनीचा ट्रक खरेदी केला तर मला ट्रक मिळाला तरी पैसे देशाबाहेर जपानकडे गेले हे अर्थकारण आज कालबाह्य ठरले आहे. तेवढ्याच पैशात जास्त कार्यक्षम जपानी ट्रकसेवा मला जास्त फायदेशीर ठरणार आहे. जपानी ट्रक जास्त उत्पादक आहे, कारण त्याच्या उत्पादनात अद्ययावत तंत्रविद्येचा वापर करण्यात आला आहे. तंत्रविद्येचा प्रश्न शिक्षणाशी निगडित आहे. म्हणजे देशाचा आर्थिक विकास जास्त गतिमान करावयाचा असेल तर तेथे मानवरूपी भांडवलाचा पुरवठा वाढविणे आणि ते शक्य नसेल तर विदेशातून तंत्रविद्येची गरजेनुसार आयात करणे, असे दोन पर्याय निर्माण होतात. भारत हा विकसनशील देश आहे आणि तंत्रविद्याविभूषित मानवरूपी भांडवलाच्या उत्पादनाची प्रक्रिया कालबद्ध आहे. अशा वेळी जलद विकासाचे आवेग (impulses) गुंतवणूकक्षम भांडवलाचा ओघ घेतात, परंतु त्या विकासाच्या आवेगांना तसेच संवेगाला ( momentum ) एका गोष्टीचे भान ठेवणे जरूर आहे. ती गोष्ट म्हणजे विकासप्रक्रियेला प्राप्त झालेले एक आधुनिक परिमाण. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते रॉबर्ट इ. लुकास यांच्या शब्दात, "मानवरूपी भांडवलाचे संचयन हे अभिवृद्धीचे प्रमुख इंजिन आहे आणि राष्ट्रातील राहणीमानातील फरकाचा उगम मानवरूपी भांडवलाच्या संचयनातील फरकात असतो." जागतिक बँकेच्या एका अभ्यासानुसार आज आर्थिक अभिवृद्धीतील मानवरूपी भांडवलाचा हिस्सा सर्वाधिक (64 टक्के) असून नैसर्गिक आणि भौतिक भांडवलाचे हिस्से अनुक्रमे 20 टक्के आणि 16 टक्के

* भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, सातारा.

आहेत. दुसऱ्या शब्दांत, रुपयाच्या परिवर्तनीयतेची प्रेरणा स्वयंपोषित ठरावयाची असेल तर मानवरूपी भांडवलाच्या संचयनाची किमान पातळी अत्यावश्यक ठरते. त्याचा पुढे योग्य ठिकाणी विचार करू. त्यापूर्वी चलनाच्या परिवर्तनीयतेच्या संकल्पनेचा संक्षेपात विचार करू.

## प्रक्रिया

रुपयाची भांडवली खात्यावरील पूर्ण परिवर्तनीयता (येथून पुढे 'रुपयाची परिवर्तनीयता' असे वाचावे) ही एक केवळ 'घटना' नसून ती एक 'प्रक्रिया' आहे. ती कशी यशस्वी होईल हा केवळ राजकीय प्रश्न नसून प्रामुख्याने तो संस्थात्मक स्वरुपाचा प्रश्न आहे. त्या प्रश्नाकडे त्या दृष्टिकोनातून पाहणे जरूर आहे.

"ज्यावेळी एका चलनाचा दुसऱ्या चलनात किंवा सुवर्णात मुक्तपणे विनियम घडून येऊ शकतो त्यावेळी त्या चलनाला परिवर्तनीय चलन संबोधले जाते," अशी पेंग्विन डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये (पृ. 96) परिवर्तनीयतेची व्याख्या देण्यात आली आहे. रुपयाची प्रस्तावित परिवर्तनीयता म्हणजे रुपयाच्या स्वरुपातील गुंतवणूकक्षम भांडवलाचा अन्य देशाच्या चलनात मर्जीनुसार आणि मुक्तपणे विनिमय घडून येणे. म्हणजे भांडवल भारतात येण्याचा आणि भारताबाहेर जाण्याचा प्रवाह अनिर्बंधपणे चालू राहण्याची प्रक्रिया. त्याव्यतिरिक्त चलनाच्या सुवर्णातील मुक्त परिवर्तनीयतेचा भाग आज इतिहासजमा झाला आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना ट्रिफिन (1960) म्हणतात त्याप्रमाणे आज पैशाचा आधार हे देशाच्या मध्यवर्ती बँकेतील राखीव मत्तेच्या साठ्याचे उद्दिष्ट संपुष्टात आले आहे. त्याची जागा आंतरराष्ट्रीय व्यापारातील तात्पुरत्या स्वरुपातील तूट भरून काढणे आणि विनिमय दराचे स्थैर्य टिकविणे या उद्दिष्टांनी घेतली आहे. हा एक क्रान्तीकारक बदल ध्यानात घेऊनच रुपयाच्या परिवर्तनीयतेचा विचार करणे सयुक्तिक ठरते.

1997–98 च्या केन्द्रीय अर्थसंकल्पातील एका प्रस्तावानुसार नेमलेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी उप–अधिशासक एस. एस. तारापोर यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास गटाने रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या संबंधातील आपला अहवाल दिनांक 3 जून, 1997 रोजी बँकेच्या गव्हर्नरांना ( अधिशासकांना ) सादर केला. रुपयाच्या परिवर्तनीयतेकडे जाणाऱ्या 'मार्गाचा नकाशा मांडण्याचे' काम (to lay the road map) या अभ्यास गटाकडे सोपविले होते. त्या गटाने शिफारस केल्याप्रमाणे रुपयाच्या परिवर्तनीयतेचा अवधी तीन वर्षांचा (1997–98 ते 1999–2000) असून तिची कार्यवाही तीन टप्प्यांत होणार आहे.

रु. 1 लक्षापेक्षा अधिक गुंतवणूक रक्कम असलेली व्यक्ती आता भारतीय बँकेऐवजी अमेरिकेच्या किंवा जर्मनीच्या अधिक स्पर्धात्मक व्याज दर देणाऱ्या डॉलर किंवा डी–मार्क ठेवींमध्ये गुंतविण्यास स्वतंत्र असेल, पुरेशा साधनसामग्रीअभावी खोळंबून राहिलेले किंवा विविध सरकारी नियंत्रणांच्या भोवऱ्यात दबलेले प्रकल्प सुरू करण्याठी जास्त कार्यक्षम भांडवल प्रवाह अनिर्बंधपणे सुरू होईल अशी अपेक्षा आहे. प्रकल्पांचे भांडवली परिव्यय आंतरराष्ट्रीय परिव्यय पातळीकडे झुकण्याच्या प्रवृत्तीचे होतील आणि प्रकल्प परिव्यय घसरेल. परिणाम ? विकासाची प्रक्रिया जास्त गतिशील होईल. तसेच अल्पावधीत असामान्य किंवा अकल्पित वित्तीय स्वरुपातील लाभ देणाऱ्या परंतु समष्टीय पातळीवर अनावश्यक / अनुत्पादक ठरणारी फोफावणाऱ्या 'हरित कुरणांना' (green pastures) आपोआप अटकाव बसेल.

## मापदंड ( Pre-Conditions )

1997–98 ते 1999–2000 या तीन वर्षांचे वेळापत्रक अभ्यास गटाने तयार केले आहे. त्या कालात रुपयाची परिवर्तनीयता पूर्ण व्हावयाची आहे. आणि ती यशस्वी होण्यासाठी अभ्यास गटाने एकूण 52 पथ्ये/मापदंड सांगितले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे मापदंड असे :

( अ ) 1997–98 ते 1999–2000 या कालात स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे स्थूल राजकोषीय तुटीचे गुणोत्तर 1997–98 च्या प्रस्तावित 4·5 टक्क्यांवरून 3·5 टक्क्यांवर आणणे.

(आ) सरकारच्या कर्जाची परतफेड करणाऱ्या–

साठी एकत्रित ऋण निवारक निधीची निर्मिती करणे.

(इ) राजकोषीय लेखांकन (fiscal accounting) पारदर्शी आणि जागतिक पातळीवर तुलनीय (comparable) असणे जरूर आहे.

(ई) त्या कालात भावफुगवट्याचा सरासरी दर 3 टक्के आणि 5 टक्के या टप्प्यात असणे आवश्यक आहे. (1996–97 मध्ये तो 5·93 टक्के होता.)

(उ) सरकारी क्षेत्रातील बँकांच्या स्थूल अपालनक्षम सत्तांचे (NPA) प्रमाण सध्याच्या 13.7 टक्क्यांवरून 5 टक्के करणे आणि सरासरी रोकड संचिती गुणोत्तर (CRR) सध्याच्या 9 टक्क्यांवरून 3 टक्क्यांपर्यंत कमी करणे.

(ऊ) अधिक 5 आणि उणे 5 या टप्प्यातील विनिमय दराविषयी भारतीय रिझर्व्ह बँकेचे व्यवहार पारदर्शी असणे जरूरआहे. त्यासाठी तिला आजच्यापेक्षा जास्त आणि पुरेशी स्वायत्तता हवी.

(ए) ठेवींवरील व्याज दरांचे निर्नियंत्रण करणे.

(ऐ) विदेशी भांडवल बाजारात सहभागी होण्यावरील सध्याचे निर्बंध मागे घेणे.

(ओ) काही बिगर बँक वित्तीय संस्थांना (NBFI) अधिकृत अभिकर्ता (agent) म्हणून मान्यता देणे.

(औ) अखेरच्या वर्षात (1999–2000) प्राथमिक बाजारात सरकारी प्रतिभूती विक्रीस काढण्याच्या कार्याला भारतीय रिझर्व्ह बँकेने संपूर्णपणे रामराम ठोकणे.

हे आणि दुसरे कित्येक, संयुक्त व जालीम जबाबदारीचे मापदंड पाहिल्यानंतर पहिली आणि दुसरीच्या वर्गातील मुलाच्या अरुंद पाठीवरील आतापर्यंतच्या ओझ्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. उपरोक्त मापदंडांपैकी काही मापदंडांच्या बाबतीत पावले टाकण्यास अगोदरपासूनच सुरवात झाली आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हटली पाहिजे. उदाहरणार्थ, सप्टेंबर 1994 मध्ये तदर्थ राजकोष पत्रावर किंवा अस्थायी सरकारी हुंडीवर (Ad-hoc Treasury Bill) मर्यादा घालण्यात आली. मार्च 1997 पासून ही मर्यादित सुविधा संपुष्टात आली. परंतु तिच्या जागी अर्थोपाय अग्रिम (Ways and Means Advance) ची सुविधा सुरू करण्यात आली. तसेच बँकांमधील स्पर्धेला पोषक असे पतविषयक धोरण लागू करण्याच्या भूमिकेतून भारतीय रिझर्व्ह बँक आज तौलनिक दृष्टिकोनातून अधिक स्वायत्त संस्था म्हणून तिची कार्ये पार पाडू लागली आहे. त्याचा पुरावा म्हणजे 1996–97 वर्षातील भावफुगवट्याचा सरासरी दर 5·93 टक्के पातळीवर नियंत्रित करण्यात भारतीय रिझर्व्ह बँक यशस्वी ठरली आहे. परंतु आगामी तीन वर्षात रुपयाच्या परिवर्तनीयतेशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे संबंधित अशा उर्वरित मापदंडांत उल्लेखित संस्था सकारात्मक प्रतिसाद देतील याविषयी आज निश्चितपणे निर्णय करणे कठीण काम आहे. उदाहरण म्हणून चालू खात्यावरील तुटीच्या प्रश्नाचा संक्षेपात विचार करू. या कळीच्या प्रश्नाचा येथे विचार करण्याचे एक कारण आहे. पाठीमागे उल्लेख केलेल्या मापदंडात 3·5 टक्के स्थूल राजकोषीय तुटीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे आणि राजकोषीय तुटीचा कार्यात्मक संबंध चालू खात्यावरील तुटीशी पोहोचतो.

आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाचा (BoP) निर्देशक म्हणून चालू खात्यावरील तुटीची चर्चा करताना अभ्यास गटाने 25 टक्के ऋण व्यवस्थापन गुणोत्तराशी (Debt Servicing Ratio) 2 टक्के इतका चालू खात्यावरील तुटीच्या गुणोत्तराचा मापदंड 'सुसंगत' ठरविला आहे. त्यावेळी त्या 2 टक्के गुणोत्तरावरील संरोधाकडे (constraint) लक्ष वेधून अभ्यास गट म्हणतो की, जसे विदेशी ऋणाचे प्रमाण वाढत जाते तसा विदेशांकडून मिळणाऱ्या कमाईचा अधिकतर हिस्सा ऋण व्यवस्थापनासाठी अग्रक्रमाने खर्च करण्याची प्रक्रिया सुरू होते. त्याचा परिणाम असा होतो की, एरवी आयातीसाठी उपलब्ध होणारी साधनसामग्री ऋण व्यवस्थापनात जिरून जाते आणि ही प्रक्रिया अभिवृद्धीला हानीकारक ठरते. असा प्रकारचा इशारा देऊन अभ्यास गटाने 25 टक्के आणि

2 टक्के ही गुणोत्तरे निर्धारित केली आहेत. आंतर-राष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाचा अभ्यास करणाऱ्या नवख्या विद्यार्थ्याला सहजपणे समजण्यायोग्य अशी अभ्यास गटाने सरल आणि सुबोध चर्चा केली आहे. परंतु येथे कळीचा प्रश्न आहे 25 टक्के आणि 2 टक्के गुणोत्तरांशी सुसंगत ठरणाऱ्या अर्थकारणाचा किंवा धोरणाभिमुख अर्थ-शास्त्राचा (Political Economy). राज्ये आणि केन्द्र यांच्या वित्तव्यवस्थापनाशी चालू खात्यावरील तूट संबंधित आहे. पाठीमागील वर्षात काही राज्ये आणि केन्द्र यांचा महसुली खर्च वाढत आहे. अधिक भयावह गोष्ट अशी की, वाढणाऱ्या महसुली खर्चाचा सर्वाधिक हिस्सा पगार आणि पेन्शन या बाबींवर खर्च होत आहे. योजना-बाह्य खर्चाची परिस्थिती निराळी नाही. खर्च कपातीच्या योजनांची कार्यवाही झाली नाही; उलट कडवा आणि संघटित विरोध झाला. अशा प्रकारे सरकारी वित्तव्यवस्थेतील अनिर्बंधपणे वाढणाऱ्या महसुली खर्चाच्या 'अभयारण्याला' आवर घातल्याशिवाय चालू खात्यावरील तूट 2 टक्के पातळीवर कोण, कशी आणि कधी नियंत्रित करणार ?

## धोके

रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या मार्गावरील खरे धोके वेगळेच आहेत. पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे आज आर्थिक अभिवृद्धीच्या प्रक्रियेवर सर्वाधिक प्रभाव मानवरूपी भांडवलाच्या (ज्ञानाच्या) संचयनाचा आणि विकासाचा पडतो. तारापोर अभ्यास गटाने कित्येक मापदंड निर्धारित केले. ते आवश्यकही आहेत. परंतु ते पुरेसे नाहीत. जवळजवळ सर्व मापदंड निव्वळ घातांकीय (exponential) आणि परिगणकीकृत (quantified) स्वरूपाचे आहेत. सुदैवाने ते पूर्ण होऊ शकले तरी रुपयाच्या परिवर्तनीयतेची प्रक्रिया स्वयं-पोषित (self–sustained) ठरत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, रुपयाच्या परिवर्तनीयतेचे यश घातांकीय आणि परिगणकीकृत मापदंडांच्या पलिकडील मानवरूपी विकास निर्देशांकावर (HDI) अवलंबून आहे. कदाचित मानवरूपी विकास निर्देशांक तारापोर अभ्यास गटाच्या संदर्भ चौकटीत बसणारे नसतीलही. म्हणून त्याचा विचार करण्यात आला नाही. त्यामुळेच रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या मार्गावरील खरे धोके आणि गतिरोधके दुर्लक्षित राहिली. केवळ म्हणूनच त्या अनुरोधाने आपणाला येथे पुढील चर्चा करणे भाग आहे.

भारतातील मानवरूपी निर्देशांकाची आजची स्थिती असमाधानकारक आहे 'The Economist' साप्ताहिकात (मार्च 29 – एप्रिल 4, 1997) नवीन जगातील शिक्षणाच्या स्थितीविषयी 'Education and Economics' मथळ्याचा अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे. त्याचा सारांश उधृत करण्याचा मोह अनावर होतो. "नवीन जागतिक अर्थव्यवस्थेत शिक्षण ही आर्थिक यशाची गुरुकिल्ली असे म्हटले जाते; परंतु शिक्षणातील यशाची गुरुकिल्ली कोणती (कोठे) आहे? " भारतीय संदर्भात हा प्रश्न जास्त मार्मिक आणि बोलका ठरतो. त्याचा पुरावा पुढील काही निर्देशांकांवरून मिळू शकतो.

(अ) आजही जवळजवळ 40 टक्के लोक (36 कोटी) दारिद्र्य रेषेखाली आहेत. म्हणजे आजची गरिबांची संख्या 1951 मधील एकूण लोकसंख्येइतकी आहे. दारिद्र्य आणि बेकारी यांच्यातील सहसंबंध ध्यानात घेतला तर गरीब लोक शिक्षण, आरोग्य पोषण, शुद्ध पाण्याचे पाणी, आविष्कार स्वातंत्र्य, इत्यादी सुविधांपासून / मूलभूत गरजांपासून कमी-जास्त प्रमाणात वंचित आहेत. निर्वाह पातळीखालील व्यक्तींकडून देशाच्या स्थूल उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ करण्याची अपेक्षा कशी करता येईल ?

(आ) 45 टक्के मुले शाळेत जात नाहीत. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या (1997-2002) भूमिकापत्रात 7 टक्के अभिवृद्धी दराचे लक्ष्य निर्धारित होत असताना आणि त्या योजनेचे आकारमान रु. 8,75,000 कोटी इतके निश्चित केले जात असताना 45 टक्के निरक्षरांच्या मानवरूपी विकास निर्देशांकाची 'पण लक्षात कोण घेतो ?' अशी अवस्था आहे. 7 टक्के अभिवृद्धी दराचा तसेच अब्जावधी खर्चाच्या योजनेच्या अशा प्रतिमानाचा हा विपर्यास (travesty) तर नव्हे ? असेल, तर तो का निर्माण होतो ?

(इ) गळती (drop-out) आणि अनुत्तीर्णता (failure) यांचा एकत्रित परिणाम म्हणजे कुंठितता (stagnation). ती आपल्या शिक्षण व्यवस्थेला मिळालेला एक शाप आहे. 1968 पासून धोरण म्हणून

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आपण स्वीकार केला असला तरी यु. एन. डी पी. मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या मानवरूपी विकास अहवालांच्या मालिकेतील पहिला अहवाल 1990 मध्ये प्रसिद्ध होऊनही मानवरूपी विकास निर्देशांकाचे देशाच्या आर्थिक विकासातील स्थान आपल्या धोरणकर्त्यांना पूर्णपणे उमगले नाही. मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्दिष्टाची नवव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत वारंवार झालेली चालढकल हा त्याचा सज्जड पुरावा आहे.

निव्वळ युक्तिवादासाठी नाव नोंदणीचे (enrolment) सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट 100 टक्के पूर्ण झाले असे समजले तरी त्याच्या पुढील टप्प्यांतील शाळेतील हजेरी पुस्तकातील नाव नोंदणी केलेल्या मुलामुलींना वास्तविक अर्थाने पटावर टिकऊन ठेवण्याचा (retention) प्रश्न शिल्लक राहतोच. आणि समजा, नाव नोंदणीचे आणि पटावर टिकऊन ठेवण्याचे अशी दोन्ही उद्दिष्टे आज 100 टक्के पूर्ण झाली, तरी दरम्यानच्या काळात उद्योग तसेच व्यवसाय संस्थांना हवे असलेले मनुष्यबळ आणि शाळा–महाविद्यालयातून औपचारिक शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेले शिक्षित (सुशिक्षित नव्हे) यांच्यातील रुंदावणाऱ्या दरीचा एक नवीन प्रश्न निर्माण होतो. दुसऱ्या शब्दांत, ही दोन उद्दिष्टे पूर्ण झाली तरी प्रश्न आणि ती उद्दिष्टे पूर्ण झाली नाहीत म्हणून प्रश्न, अशी शृंगापत्ती निर्माण होते. तिचे एक प्रमुख कारण म्हणजे कुंठिततेच्या स्वरूपातील टाळण्यायोग्य असा मोठ्या प्रमाणावरील अपव्यय ( waste ) टाळता आला नाही. उपलब्ध माहितीनुसार 1971–72 मध्ये पहिलीत दाखल झालेल्या 100 मुलांपैकी 1972–73 मध्ये 67 मुले दुसरीत होती. 1975–76 मध्ये पाचवीत ती 39 होती. आणि 1978–79 मध्ये आठवीत फक्त 26 मुले होती. त्याच कालातील मुलींच्या बाबतीत ते प्रमाण अनुक्रमे 65 टक्के, 34 टक्के आणि 19 टक्के होते. अशा प्रकारच्या अपव्ययाची पालकांपासून चालकांपर्यंतची विविध कारणे आहेत. त्यांची विस्ताराने चर्चा करण्याचे हे ठिकाण नव्हे.

(ई) मानवरूपी भांडवलाच्या निर्मितीत तसेच उपलब्ध श्रमशक्तीच्या वाजवी वापरात विरूपणे ( distortions ) निर्माण करणाऱ्या बालमजुरांची सुप्त श्रमशक्ती तिच्या विकासापूर्वीच खुरटली जात आहे. बालमजुरांच्या प्रमाणाची कल्पना पुढील काही अंदाजांवरून येऊ शकेल.

(1) श्रम मंत्रालय – 44 दशलक्ष

(2) नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च – 1994 मध्ये 179 दशलक्ष मुलांपैकी 90 दशलक्ष मुले शाळेत जात नव्हती. म्हणजे ती सर्व बालमजूर होती.

(3) 1981 ची जनगणना – 81 दशलक्ष

(4) आंतरराष्ट्रीय श्रम संघटन – 44 दशलक्ष

(5) सुब्रह्मण्यम स्वामी अभ्यास गटाचा अहवाल (1996) – 25 दशलक्ष. या अहवालानुसार प्रतिवर्षी बालमजुरांच्या संख्येत 4 टक्के भर पडते. आणि हा अभिवृद्धी दर लोकसंख्येच्या अभिवृद्धी दराच्या जवळजवळ दुप्पट आहे.

विविध कारखान्यांतील / आस्थापना संस्थांतील इतक्या मोठ्या प्रमाणात सक्तीने काम करणाऱ्या बालमजुरांच्या अत्यल्प वेतनाचा विचार केल्यास त्या बाल–मजुरांच्या स्वरूपातील कारखान्यांचा विकल्पी परिव्यय जास्त असतो. परिणाम ? ते कारखाने मायकेल इ. पोर्टरप्रणीत (1990) 'स्पर्धात्मक फायद्याच्या' ( competitive advantage ) आभासावर उत्पादन करीत असतात. म्हणजे त्यांचा तथाकथित स्पर्धात्मक फायदा आभासी किंवा भ्रामक असतो. जागतिकीकरण व स्पर्धात्मकता यांच्या प्रक्रियेत यशस्वीपणे सहभागी होण्याच्या हेतूने करावयाच्या रुपयाच्या परिवर्तनीयतेला अशा कारखान्यांकडून / आस्थापनांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळणार नाही. स्वतंत्र मानवरूपी साधन–सामग्री विकास मंत्रालय असताना आणि 1986 पासून बालमजूर (प्रतिषेध व विनियमन) कायदा लागू असताना परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नाही.

अर्थव्यवस्थेच्या स्पर्धात्मकतेच्या दृष्टिकोनातून 'साक्षरता' या शब्दाला एक विशिष्ट अर्थ आहे. 'Human Development Report' (1990) च्या व्याख्येनुसार "सभ्य राहणीमानाचा उपभोग घेण्या–

इतपत साधनसामग्रीवर अधिकार (command) असणे म्हणजे साक्षरता." भारतातील तथाकथित साक्षरता आणि बालमजूर यांचा एकत्रित विचार केला तर आज 18 ते 20 कोटी मुलांच्या मानवरूपी विकास निर्देशांकाचा कळीचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही वर्षानंतर ही मुले प्रौढ होतील. त्यावेळी त्यांचा माता-पित्यांचा आधार तुटलेला असेल. त्या नवप्रौढांकडे पुरेशी क्रयशक्ती असणार नाही. तोपर्यंत दुसरे देश अनेक योजने पुढे गेलेले असतील. अशा वेळी त्या नव-प्रौढांच्या दृष्टिकोनातून 7–8 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक अधिवृद्धी दर किती आश्वासक ठरतो ? आणि प्रचंड प्रमाणात मानवरूपी साधनसामग्री अवरुद्ध किंवा कुंठित असणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात रुपयाची परिवर्तनीयता किती अर्थपूर्ण ठरते ?

(उ) निगम नेतृत्व ( corporate leadership ) :

रुपयाच्या परिवर्तनावर थेट परिणाम करणारी परंतु तिचा आतापर्यंत विचार केला नाही अशी रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या प्रश्नाची आणखी एक बाजू म्हणजे भारतात निगम जगात एका नवीन शैलीच्या नेतृत्वाच्या वर्गाचा उदय होत आहे. विशेषत: 1991–92 नंतर या नवीन नेतृत्वाला अधिक गति मिळाली. सर जमशेटजींची कल्पकता आणि मचोदना (drive), लक्ष्मणराव किर्लोस्करांचा निश्चय आणि चिकाटी, वैकुंठभाई मेहतांची निर्मळ निष्ठा आणि पद्मश्री विखे पाटलांची निर्णयक्षमता हे अभिजात गुण आज इतिहासजमा झाले आहेत. या नवीन नेतृत्वशैलीचे एक (आणि कदाचित एकमेव) ठळक वैशिष्ट्य म्हणजे झटपट श्रीमंत होण्याच्या महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या नेतृत्वापुढे आराध्यदैवत (icon) म्हणून तात्काळ उभे राहतात ते रिलायन्स उद्योगाचे धिरूभाई अंबानी. त्या नवीन नेतृत्वाने नेतृत्वगुणसंपन्न इतिहासाचा योग्य बोध घेतला नाही असे खेदाने कबूल केले पाहिजे. अशा युगांताच्या कारणांची चर्चा करण्याचे हे ठिकाण नव्हे. परंतु एक गोष्ट निश्चित. जागतिक अर्थव्यवस्थेचा संदर्भ साधून स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धात्मक फायद्याच्या उद्दिष्टाला नवीन नेतृत्व किती पोषक प्रतिसाद देईल याविषयी मन साशंक आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या नवउपक्रमींची पुढील काही गुणवैशिष्ट्ये आढळतात त्यांचा उल्लेख करू.

(1) 'संनियंत्रक' (monitor) म्हणून कार्यभाग पार पाडणारे.

(2) 'मोठ्या प्रमाणावर (सरकारचा आश्रय) आश्रित असणारे' (high dependency ratio).

(3) 'प्रवक्ता' (spokesperson).

(4) 'हार्डवेअर' स्वरुपाचे. (स्पर्धात्मक फायद्यांच्या आणि पर्यायाने रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या दृष्टिकोनातून 'हार्डवेअर' स्वरुपाच्या नेतृत्वापेक्षा 'सॉफ्टवेअर' स्वरुपाच्या नेतृत्वाची अधिक गरज आहे.)

(5) 'पाखंडी' (heretic). (अश्रद्ध किंवा अभिजात नेतृत्वगुणांच्या विरोधी असणारे.)

वरील गुणवैशिष्ट्यांनी युक्त नेतृत्वशैलीची अधिक अवनत किंवा अपभ्रष्ट रूपे स्पष्ट करण्यासाठी केवळ नमुना म्हणून काही व्यक्तींच्या नावांचा उल्लेख केला तर तो गैर ठरू नये. कुविख्यात तेजीवाले (bull) हर्षद मेहता, एम. एस. शूजचे पवन सचदेव, दादर जनता सहकारी बँकेचे शिवाजी मोरे आणि सी. आर. बी. कॅपिटलचे 'ठकसेन' सी. आर. भन्साळी.

भारताप्रमाणे दुसऱ्या देशांतही या शैलीचे निगम नेतृत्व आढळते. फरक इतकाच की, तेथील कायदे, भारतातील कायद्यांप्रमाणे ढिसाळ आणि ढगळ नसतात आणि वारंवार पद्धतीय अपयशावर ( systemic failure ) दोष झटकून रिकामे होण्याची प्रवृत्ती त्या देशांत क्वचितच दिसते. सर्वसाधारणपणे, भारतातील निगम नेतृत्वाच्या ठिकाणी व्यवस्थापकीय कौशल्ये जरूर आहेत. परंतु अभाव आहे तो भागांकीकृत मूल्ये ( shared values ) जपण्याचा किंवा स्वतःच्या फायद्यात सहकाऱ्यांना सहभागी करण्याच्या प्रवृत्तीचा. निगम नेतृत्वाची इष्ट आणि अनिष्ट बाजू स्पष्ट करताना 'Competitive Advantage of Nations' (1990) या विख्यात ग्रंथाचे लेखक म्हणतात, "...स्पर्धात्मक आव्हाने पेलण्यासाठी, आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि त्याच्याही पुढे त्यांची संघटने (कंपन्या) प्रगतीपथावर ठेवण्यासाठी नेते त्या संघटनांना ऊर्जेचा स्रोत पुरवितात ( energize ). माहिती मर्यादित करणारे अडथळे आणि नवप्रवर्तनाला

प्रतिबंध करणाऱ्या गोष्टी यांच्यावर मात करण्यासाठी ते मार्ग शोधतात ... ते (नेते) आंतरराष्ट्रीय संदर्भातही विचार करतात ... अनेक कंपन्यांच्या बाबतीत नेतृत्वाची (ही) संकल्पना संपुष्टात आली आहे. बऱ्याच कंपन्यांच्या बऱ्याच व्यवस्थापकांनी स्पर्धात्मक फायद्याच्या संकल्पनेच्या खऱ्या आधारांचा चुकीचा अर्थ लावलेला असतो. वित्तीय कामगिरी सुधारणे, सरकारी साहाय्यासाठी विनवणी करणे आणि स्पर्धकांशी युत्या करून आणि त्यांच्यामध्ये विलिनीकरण करून स्थैर्य प्राप्त करणे यातच ते गुंतून राहतात." पोर्टर यांच्या वर्णनाचा उत्तरार्ध भारतातील नवउपक्रमींना सुसंगत ठरतो. नवीन शैलीच्या नेतृत्वाचा आजच्या वेगाने प्रसार होत गेला तर अर्थव्यवस्थेच्या प्रचंड प्रमाणावरील सुप्त स्पर्धात्मक फायद्यांपुढे मोठे आव्हान निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यात मोठ्या प्रमाणावरील अवरुद्ध मानवरूपी साधनसामग्रीची भर पडून रुपयाची परिवर्तनीयता धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

## निष्कर्ष

जगाच्या एकात्मीकरणाची प्रक्रिया जास्त गतिमान होत आहे. स्पर्धा ही त्या प्रक्रियेची वाहक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात पुरेसे भांडवल आणि अद्ययावत तंत्रविद्या यांच्या अभावी अभिवृद्धीचे आवेग अवरुद्ध होतात. पायाभूत संरचना–विकास प्रकल्प अडून किंवा खोळंबून राहतात. देशांतर्गत सुप्त स्पर्धात्मक फायद्यांचा प्रत्यक्षात लाभ घेता येत नाही. आंतरराष्ट्रीय स्पर्धेपासून अलिप्त देशांतर्गत भांडवलाची उत्पादक आणि सामाजिक दृष्टिकोनातून आवश्यक क्षेत्रात अपेक्षेप्रमाणे गुंतवणूक होत नसताना वित्तीय संपन्नतेचे ( affluence ) अकल्पित लाभ देणारी गुंतवणुकीची 'हरित कुरणे' निर्माण होतात. एका बाजूला अत्यधिक भांडवलीकरण होत असताना दुसऱ्या बाजूला भांडवलाचे अधिक प्रत्याय दर देणाऱ्या गुंतवणूक संधी गमावल्या जातात. हे टाळण्यासाठी एक प्रतितोलक म्हणून रुपयाची परिवर्तनीयता समर्थनीय ठरते. तिच्या अंतर्गत देशात येणाऱ्या आणि देशाबाहेर जाणाऱ्या भांडवलाचा मुक्त संचार वाढणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भांडवलावरील व्याज दर आणि भांडवलाची कार्यदक्षता यांची तुलना होऊन त्याचा इष्टतम वापर अटळ ठरेल. हे सर्व अपेक्षेप्रमाणे घडून येण्यासाठी अर्थातच काही पथ्ये पाळावी लागणार आहेत. तारापोर अभ्यास गटाने एकूण 52 मापदंड निर्धारित केले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे मापदंड आपण पाहिले. बहुसंख्य मापदंड निव्वळ धातांकीय आणि परिगणकीकृत स्वरुपाचे आहेत. त्यांचा आधार असलेल्या मानवरूपी भांडवलाचा प्रथम विचार होणे आवश्यक आहे. कारण आज आर्थिक विकास प्रक्रियेत मानवरूपी भांडवलाचा (ज्ञानाचा) तौलनिक हिस्सा सर्वाधिक (64 टक्के) आहे. आणि ही गोष्ट जागतिक तथ्य म्हणून स्वीकारण्यात आली आहे. तसेच आज भारतातील मानवरूपी भांडवल मोठ्या प्रमाणात अवरुद्ध स्वरुपात आहे. त्याचे साधार विश्लेषण आपण केले. म्हणून रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या बाबतीत सारे काही आलबेल आहे असे समजणे चूक आहे.

रुपयाच्या परिवर्तनीयतेचा भाग असो वा नसो, त्या आधारभूत मानवरूपी भांडवलात समावेश होणारे विविध निर्देशक पुरेशा प्रमाणात विकसित आणि उपलब्ध न झाल्यामुळे दीर्घकालात रुपयाची परिवर्तनीयता स्वयंपोषित कशी ठरेल असा प्रश्न निर्माण होतो. निव्वळ धातांकीय आणि परिगणकीकृत मापदंडांवर नेहमीच विसंबून राहणे समर्थनीय ठरत नाही. ते मापदंड निर्धारित तीन वर्षांत पूर्ण होतीलही. त्यानंतर पुढे काय ? स्थिर बदलापायी जगात ( the world of constant change ) दुर्लक्षित मानवरूपी विकास निर्देशकांच्या परिस्थितीत रुपयाच्या परिवर्तनीयतेला अभिप्रेत असलेली स्पर्धा आणि तिच्या माध्यमातून अपेक्षित स्पर्धात्मक फायदे, लगेच किंवा नंतर, धोक्यात आल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून मानवरूपी भांडवलाचा पुरेशा प्रमाणात विकास होईपर्यंत रुपयाची परिवर्तनीयता पुढे ढकलणे जास्त श्रेयस्कर ठरते.

□ □

# टिपणे

## 1

# भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सैद्धान्तिक आधार

**सु. गो. भानुशाली**

( अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, कोल्हापूर. )

'अर्थसंवाद'च्या जानेवारी-मार्च 1996 (खंड19, अंक 4, पृष्ठे 341–49 ) या अंकात 'भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचे सैद्धान्तिक आधार' हा लेख मी लिहिला होता. तद्नंतर 'Economic and Political Weekly 'च्या फेब्रुवारी 22–28, 1997 ( खंड 32, अंक 8, पृष्ठे M – 31 ते M 44 ) या अंकात धनमंजरी साठे यांचा 'Import Intensity of Exports of India' असा लेख प्रकाशित झाला आहे. त्याआधारे तयार केलेले हे टिपण.

माझ्या उपरोक्त लेखात उद्धृत केलेल्या ढोलकिया बंधू, सिद्धार्थन आणि सिग यांच्या संशोधनाचा या लेखात उल्लेख केला असून स्वतः साठे यांच्या 'Journal of Indian School of Political Economy' (जानेवारी-मार्च, 1995, पृष्ठे 93–103) या अंकात प्रकाशित झालेल्या लेखात काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे 1951–52 ते 1983–84 या कालावधीत भारतीय उद्योगांची निर्यातघनता 6.7 वरून 12.4 टक्क्यांपर्यंत वाढली असे दाखवून दिले आहे.

प्रस्तुत लेखात साठे यानी 1,521 व्यवसाय संस्थांच्या 'Dart I Ltd., तयार केलेल्या आकडेवारीचा उपयोग केलेला आहे. 1989-90 ते 1992–93 असा या लेखासाठी घेतलेला कालावधी आहे. 1991 मध्ये अंगिकारण्यात आलेल्या देशांतर्गत आणि बाह्य उदारीकरणाच्या धोरणामुळे आयातपर्यायी धोरणाऐवजी निर्यातीवर जास्त भर देण्याचे धोरण अंगिकारण्यात आले. इतर अनेक धोरणात्मक उपायांबरोबरच रुपयाचा मूल्यऱ्हास करणे आणि आयात उदारीकरणाचे धोरण अमलात आणण्यात आले. या

**तक्ता 1**

**पाच उत्पादन गटातील उद्योगांची विक्री, निर्यात, निर्यातीसाठी**

( टक्केवारी )

| उद्योग गट | एकूण विक्रीतील हिस्सा | | | | निर्यातीतील हिस्सा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1989–90 | 1990–91 | 1991–92 | 1992–93 | 1989–90 | 1990–91 | 1991–92 | 1992–93 |
| 1 मूलभूत उद्योग | 24·48 | 23·30 | 24·04 | 23·82 | 20·30 | 15·77 | 17·91 | 21·66 |
| 2 मध्यस्थित वस्तू उत्पादक उद्योग | 26·82 | 25·83 | 25·52 | 26·82 | 14·93 | 17·67 | 15·21 | 17·05 |
| 3 भांडवली वस्तू उत्पादक उद्योग | 17·14 | 17·33 | 17·33 | 16·06 | 21·14 | 21·07 | 20·04 | 14·93 |
| 4 (अ) टिकाऊ वस्तू उत्पादन करणारे उद्योग | 5·23 | 5·54 | 5·02 | 4·88 | 5·23 | 4·13 | 4·59 | 4·67 |
| 5 (आ) नाशवंत वस्तू उत्पादन करणारे उद्योग | 26·30 | 27·98 | 28·07 | 29·47 | 38·39 | 41·33 | 42·24 | 41·66 |

उदारीकरणाच्या धोरणामुळे निर्यातीतील आयात घटकाचे प्रमाण घटले का ? आयातीत (imported) निविष्टींच्या ऐवजी पर्यायी देशी निविष्टी वापरण्याचे प्रमाण वाढले का ? आयातीत तंत्रविज्ञाचा प्रत्यक्ष परिव्यय कमी झाला का ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नमुना म्हणून निवडलेल्या उद्योगांच्या उत्पादनाचा निव्वळ देशांतर्गत उत्पादनात (दोन्ही चालू किमतीप्रमाणे) 1990–91 मध्ये 42.92 टक्के, 1991–92 मध्ये 49.80 आणि 1992–93 मध्ये 52.17टक्के होता. म्हणजे 1991–92 च्या तुलनेत या उद्योगांच्या निव्वळ देशांतर्गत उत्पादनाच्या हिश्श्यात 1992–93 मध्ये 4·76 टक्क्यांनी वाढ झाली.

नमुना म्हणून निवडलेल्या 1,521 उद्योगांची निर्यात घनताही मोजली आहे. त्यासाठी पुढील सूत्र वापरण्यात आले.

$$\text{निर्यात घनता} = \frac{\text{अगोदरच्या वर्षातील निर्यातीत यावर्षी झालेला शेकडा बदल}}{\text{अगोदरच्या वर्षातील विक्रीमूल्यात यावर्षी झालेला शेकडा बदल.}}$$

या उद्योगांची निर्यात घनता 1990–91 मध्ये 4·51 टक्के, 1991–92 मध्ये 5·29 टक्के आणि 1992–93 मध्ये 6.28 टक्के होती. म्हणजे 1992–93 या वर्षात निर्यात घनता 18.71 टक्क्यांनी वाढली. यावरून या उद्योगांच्या देशांतर्गत उत्पन्नातील हिश्श्यातील वाढीच्या दरापेक्षा (4.76 टक्के) निर्यातीच्या हिश्श्यातील वाढीचा दर(18.71) जवळजवळ चौपट होता.

लेखिकेने या नमुना उद्योगांची आयातघनताही मोजली आहे. यासाठी वापरलेले सूत्र असे :

$$\text{आयात घनता} = \frac{\text{आयातीत कच्च्या मालाच्या वार्षिक बदलाचे शेकडाप्रमाण}}{\text{विक्रीतील वार्षिक बदलाचे शेकडा प्रमाण.}}$$

वापरलेली कच्च्या मालाची आयात आणि निर्यातीची आयात घनता

| आयातीतील हिस्सा | | | | निर्यातीची आयातघनता | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1989–90 | 1990–91 | 1991–92 | 1992–93 | 1989–90 | 1990–91 | 1991–92 | 1992–93 |
| 13·33 | 13·44 | 13·15 | 10·22 | 7·17 | 8·61 | 6·59 | 4·24 |
| 19·97 | 18·76 | 18·67 | 17·88 | 14·59 | 10·73 | 11·63 | 9·42 |
| 5·80 | 6·39 | 5·69 | 5·44 | 2·99 | 3·07 | 2·55 | 3·27 |
| 0·74 | 0·89 | 0·87 | 0·78 | 1·56 | 2·19 | 1·71 | 1·51 |
| 60·14 | 60·49 | 61·61 | 65·66 | 17·09 | 14·79 | 13·10 | 14·16 |

नमुना उद्योगातील आयातघनता 1990–91 मध्ये 11.09 टक्के होती, ती 1991–92 मध्ये 10·26 टक्के आणि 1992–93 मध्ये 10·10 टक्के इतकी होती. 1990–91 च्या तुलनेत 1992–93 मध्ये आयात घनता 8.93 टक्क्यांनी घटली. आयाती–तील काही घट 1991–92 मध्ये योजलेल्या आयात संकोचाच्या धोरणाचा परिणाम असू शकेल.

96 उद्योगांतील 1,521 व्यवसाय संस्थांचे मूलभूत वस्तू, मध्यस्थित वस्तू, भांडवली आणि उप–भोग्य वस्तू उत्पादन करणाऱ्या चार गटांमध्ये आणि उपभोग्य वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगांची टिकाऊ आणि नाशवंत माल उत्पादन करणाऱ्या उपगटांमध्ये विभागणी करून त्यामधील विक्री, निर्यातघनता आणि आयातघनता यांची चर्चा केली आहे. 1989–90 ते 1992–93 या चार वर्षांच्या कालात एकूण विक्री–तील वरील पाच गटांतील उद्योगांचे प्रमाण जवळजवळ तेच राहिल्याचे आढळते. पण या कालावधीतील एकूण निर्यातीतील पाच घटक उद्योगांचे प्रमाण लक्षणीय–रित्या बदलले आहे. तसेच निर्यातीत वापरल्या गेलेल्या आयातीत कच्च्या मालाच्या प्रमाणातही लक्षणीय बदल झालेला दिसून येतो. त्यावरून नमुना उद्योगांच्या निर्यातीची आयात सघनता मोजलेली आहे. मूलभूत वस्तू, मध्यस्थित वस्तू आणि नाशवंत वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगांत ती बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे, टिकाऊ वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगांत थोडी कमी झाल्याचे तर भांडवलीवस्तू उत्पा-दन करणाऱ्या उद्योगांत निर्यातीची आयात सघनता वाढ-ल्याचे दिसून येते. ही आकडेवारी तक्ता 1 मध्ये दिली आहे. (मूळ लेखात ही आकडेवारी विस्ताराने तक्ता 4, 5, 6 आणि 8 मध्ये दिली आहे.)

साठे यानी निर्यातीची आयात सघनता मोजली आहे; त्यासाठी वापरलेले सूत्र :

$$\text{निर्यातीची आयात सघनता} = \frac{\text{निर्यातीसाठीची आयातीत कच्च्या मालाची आवश्यकता}}{\text{एकूण निर्यातीतील या उद्योगांचा हिस्सा.}}$$

'अर्थसंवाद'मधील लेखात मानस भट्टाचार्य, डी. सिंग आणि धोलकिया बंधू यानी वापरलेल्या सूत्रांपेक्षा (पृष्ठ 344) हे सूत्र वेगळे आहे; यातील घटकही वेगळे आहेत. मानस भट्टाचार्य प्रतिएकक उत्पादनातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आयात घटकांचे मूल्य विचारात घेतात. त्यात कच्चा माल, भांडवली वस्तू, यंत्रांचे सुटे भाग तसेच तंत्रविज्ञानाचा समावेश होतो. शिवाय आयात मूल्य छेदस्थानी आणि निर्यात मूल्य अंशस्थानी घेण्यात आले आहे. डी. सिंग यानी निर्यातीची आयात सघनता मोजलेली नसून वापरलेल्या एकूण निविष्टींची आयात सघनता मोजलेली आहे. धोलकीया बंधूंनी आयात निविष्टींचे गुणोत्तर मोजून [ पृष्ठ 344,5 (आ) ] निर्यातीची आयात सघनता मोजलेली आहे. तुलनात्मक अवलोकनासाठी ही चारही सूत्रे तक्ता 2 मध्ये दिलेली आहेत.

**तक्ता 2**

**निर्यातीची आयात सघनता मोजण्याची सूत्रे**

| लेखक | सूत्र |
|---|---|
| 1 धनमंजिरी साठे | निर्यातीसाठीची आयातीत कच्च्या मालाची आवश्यता / एकूण निर्यातीत या उद्योगांचा हिस्सा |
| 2 मानस भट्टाचार्य | क्षेत्राच्या निर्यातीचे एकूण मूल्य / त्या क्षेत्रातील प्रतिएकक उत्पादनातील आणि अप्रत्यक्ष आयात घटकांचे मूल्य |
| 3 डी. सिंग | उत्पादनात वापरलेल्या आयात कच्च्या मालाचे आणि भांडवली वस्तूंचे मूल्य / त्या उत्पादनात वापरलेल्या एकूण कच्च्या आणि भांडवली वस्तूंचे मूल्य |
| 4 डी.एच.आणि बी.एच. धोलकिया | आयात निविष्टींचे मूल्य / एकूण निर्यात |

धोलकीया बंधूंच्या आकडेवारीप्रमाणे निर्यात क्षेत्राची आयात सघनता निर्यात क्षेत्रात 3.48 टक्के आणि एकूण भारतीय अर्थव्यवस्थेत 2·19 टक्के होती. त्यानी विविध वर्षांची आकडेवारी दिलेली नसल्यामुळे तुलनात्मक विश्लेषण करता येत नाही. साठे यांच्या लेखात दिलेल्या आकडेवारीप्रमाणे (तक्ता 7, पृष्ठ M-32) निर्यातीची आयात सघनता 1989–90 मध्ये 10·90 टक्के होती; 1990-91 मध्ये 10·10 टक्के, तर 1991-92 आणि 1992–93 मध्ये 8·98 टक्के होती. या 1,521 व्यवसाय संस्थांच्या केलेल्या गट वर्गीकरणानुसार येणारी निर्यातीची आयात सघनता तक्ता 1 मधील पाचव्या रकान्यात दिली आहे. मूलभूत उद्योग, मध्यस्थित वस्तू उत्पादक उद्योग आणि विनाशी वस्तू उत्पादन करणारे उद्योग यात ती बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे, टिकाऊ वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगांत ती थोडी कमी झाल्याचे तर भांडवली वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगांत ती वाढल्याचे दिसून येते.

निर्यातीची आयात सघनता कमी होण्याची दोन कारणे साठे यानी दिलेली आहेत एक, कमी आयात सघनता असलेल्या वस्तूंच्या बाजूने निर्यातीच्या रचनेत ( composition of exports ) झालेला बदल आणि दोन, उद्योगातील आयात सघनतेतील घट. अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाचा लाभ परंपरागत वस्तू उत्पादन करणाऱ्या नव्या आणि जुन्या उद्योगांना झाल्याचे जाणवते. उदारीकरणाच्या कालावधीत अभियांत्रिकी उद्योगांना आपली निर्यात वाढविता आली नाही. साहजिकपणे ज्या उद्योगांची निर्यातीची आयात सघनता वाढत जाते त्या उद्योगांना प्राप्त होणारे विदेशी चलनाच्या निव्वळ आवकीचे गुणोत्तर घटत जाते. आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचे निर्णय घेण्याच्या दृष्टीने हे निष्कर्ष महत्त्वपूर्ण आहेत.

## आयात तंत्रविज्ञानाच्या परिव्ययाचा दर

साठे यानी या लेखात आयात तंत्रविज्ञान, स्वामित्व धन, लाभांश, आणि व्याज यांचा एकूण खर्च यांचा उद्योगावरील भार मोजण्याचा प्रयत्न केला आहे. 'अर्थसंवाद' मधील लेखात तक्ता 1 मध्ये व्ही. एस. सिद्धार्थन यांच्या दिलेल्या तंत्रविज्ञान आयातीच्या

## तक्ता 3

**नमुना उद्योगांचा तंत्रविज्ञान आयातीच्या प्रत्यक्ष परिव्ययाचा दर, निर्यात घनता आणि आयात घनता**

| उद्योग | आयातीच्या प्रत्यक्ष परिव्ययाचा दर | | | | निर्यात घनता | आयात घनता |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1989–90 | 1990–91 | 1991–92 | 1992–93 | 1992–93 | 1992–93 |
| 1 नत्रयुक्त खते | 9·35 | 1·99 | 1·93 | 1·91 | 0·29 | 13·92 |
| 2 कापड उद्योगातील यंत्रसामग्री | 1·89 | 1·46 | 2·22 | 2·26 | 11·77 | 11·93 |
| 3 संगणित्र | 1·53 | 3·45 | 5·51 | 9·46 | 3·07 | 16·70 |
| 4 औषधे | 0·46 | 0·39 | 0·34 | 0·66 | 9·77 | 14·83 |
| 5 घरात वापरली जाणारी उपकरणे | 0·39 | 0·59 | 0·34 | 0·69 | 2·57 | 6·93 |
| 6 साखर | 0·21 | 0·12 | 0·23 | 0·08 | 1·20 | 0·13 |

सघनतेशी तो मिळतो पण त्यापेक्षा व्यापक संकल्पना साठे यानी वापरलेली आहे. तंत्रविज्ञान आयातीच्या प्रत्यक्ष परिव्ययाचा दर मोजण्यासाठी वापरलेले सूत्र असे :

$$\text{तंत्रविज्ञान आयातीच्या प्रत्यक्ष परिव्ययाचा दर} = \frac{\text{उद्योगाची तंत्रविज्ञान फी + स्वामित्वधनाचे दिलेले पैसे + व्याजाचे आणि इतर दिलेले पैसे}}{\text{त्याच उद्योगाचे विक्री मूल्य}} \times 100$$

उद्योगांचा हा दर 1989–90 मध्ये 1·15 इतका होता तो 1990-91 मध्ये 0.88 इतका कमी होऊन 1991–92 मध्ये पुन्हा 1·15 इतका होऊन 1992–93 मध्ये 1.65 इतका वाढला. 'Economic and Political Weekly' मधील लेखात दिलेल्या आकडेवारीच्या (तक्ता 14 आणि 9 D) आधारे काही उद्योगांच्या तंत्रविज्ञान आयातीच्या प्रत्यक्ष परिव्ययाचा दर, निर्यात घनता आणि आयात घनता यांचे आकडे दिले आहेत (तक्ता 3). तक्ता 3 मधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, नत्रयुक्त खते उत्पादन करणारा उद्योग देशी तंत्रविज्ञान विकसित करण्यात खूप यशस्वी झाला असला तरी कच्च्या मालाच्या आयातीवर बराच अवलंबून असून निर्यात फारशी करीत नाही. संगणित्र उद्योगाचे विदेशी तंत्रविज्ञानावरील अवलंबित्व वाढले असून उत्पादनातील एकूण आयातीच्या मानाने निर्यात प्रमाण कमी आहे. म्हणजे या उद्योगांनी आयात उदारीकरणाचा लाभ घेतला असला तरी निर्यात वाढविण्यात ते फारसे यशस्वी झालेले नाहीत.

या प्राथमिक अभ्यासातून लेखिकेने काढलेला निष्कर्ष आशावादी आहे. नमुना उद्योगांची आयात सघनता कमी होत आहे. आणि आयात पर्यायी निविष्टांचा वापरही कमी होत आहे. नमुना उद्योगांची निर्यात सघनता (विशेषतः परंपरागत उद्योगांची) वाढत आहेत, आयात उदारीकरणाचे धोरण अमलात आणूनसुद्धा हे घडत आहे हे विशेष. आयात सघनता कमी असलेल्या परंपरागत उद्योगांचे निर्यात संपादन परंपरागत असलेल्या उद्योगांपेक्षा जास्त चांगले आहे.

□ □

## 2

# सहभागी वन व्यवस्थापन

**ऋचा घटे**

(अधिव्याख्याता, अर्थशास्त्र विभाग नागपूर विद्यापीठ, नागपूर.)

1862 पासून शासनाने वनविभागामार्फत वनांचे व्यवस्थापन व संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. परंतु आजची वनांची स्थिती बघता हा प्रयत्न अयशस्वी झाल्याचे उघड आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाचा 23 टक्के भूभाग वनाच्छादित होता आणि ही टक्के-वारी 33 पर्यंत वाढविणे पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक मानले गेले. परंतु सुदूर संवेदन संस्थेने(Romote Sensing Agency) केलेल्या पाहणीनुसार प्रत्यक्षात आज 19 टक्के भूभागावरही पुरेसे जंगल नाही. या सत्य-स्थितीला कारणीभूत असणाऱ्या सर्व घटकांचा ऊहापोह सरकारी विभाग, अभ्यासक, पर्यावरण विशेषज्ञ, कार्य-कर्ते व बिगर सरकारी स्वायत्त संस्था या सर्वांनी केला. याचा परिणाम म्हणून 1980 च्या वनसंरक्षण कायद्यावर कडाडून टीका झाल्यानंतर 1988 साली नवीन वनधोरण जाहीर झाले. फक्त नफा आणि सरकारी महसुलाला प्राधान्य देण्याच्या संकुचित दृष्टिकोनाला तसेच नोकरशाहीचे वर्चस्व कायम राखण्याच्या सवयींना फाटा देऊन केलेला हा पहिला सरकारी प्रयत्न होता. पर्यावरणाचे समतोल राखणे आणि वनात व वनाभोवती राहणाऱ्या लोकांच्या मूलभूत गरजा भागविणे ही दोन उद्दिष्टे नवीन वनधोरणांतर्गत मान्य करण्यात आली. तसेच ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापनाचा (Joint Forestry Management) पर्याय आवश्यक असल्याचे लक्षात घेतले गेले.

## सहभागी वनव्यवस्थापनाची पार्श्वभूमी

ब्रिटिश राजवटीत अनिर्बंधित जंगलतोड करण्यात आली. भरपूर वनवैभव आणि शाही नौसेनेला सतत लागणारा लाकूडफाटा या दोन कारणांनी वनांची अविवेकी व अनावश्यक तोड करण्यात आली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिशांचीच वननीती अवलंबिल्याने होणाऱ्या तोट्यांचा दूरदर्शी विचार भारत सरकारने केला नाही आणि ब्रिटिश वननीती जशीच्या तशी स्वीकारली. पिढ्यानपिढ्या जंगलात राहून परंपरागत समजुती व पद्धतींनी वनांचे संरक्षण करणाऱ्या आदि-वासींना वन व्यवस्थापनामध्ये कधीही सहभागी केले गेले नाहीं. याउलट वन, जमीन, पाणी यासारख्या नैसर्गिक साधनसामग्रीच्या सामुदायिक मालकीच्या पद्धतीकडे दुर्लक्ष केले गेले. वनात राहणाऱ्या वनवासींची अशी समजूत करून देण्यात आली की वनसंपत्ती त्यांची नसून शासनाची आहे. आणि शासनाच्या कृपेने त्याना आवश्यक तेवढे सरपण, गवत, लाकूडफाटा आणि रानमेवा गोळा करण्याची व वापरण्याची मुभा देण्यात आली आहे. या सरकारी धोरणामुळे वन आणि वनवासी यांच्यातील भावनिक दुवा नष्ट झाला आणि जे माझे नाही ते मी जपणार नाही ही वृत्ती वाढायाला मदत झाली. वनविभाग वनसंपदेचे एकछत्री सम्राट झाले आणि या संपदेचा सरकारी महसुलाच्या दृष्टिकोनातून विचार करून राजकोष भरण्याकडेच लक्ष केन्द्रित केले गेले.

वनाच्छादित भूभागाप्रमाणेच सरकारी महसूल-देखील सतत कमी होत असल्याचे लक्षात आल्यावर तसेच लोकांच्या सहभागाशिवाय वनसंवर्धन व वन-संरक्षणाचे काम अशक्य असल्याचे निश्चित झाल्यामुळे सहभागी वनव्यवस्थापनाची कल्पना प्रत्यक्षात आणण्याचे ठरले. त्याआधी सहभागी व्यवस्थापनाचे प्रयोग वन, पाणी, सामुदायिक कुरण, यासारख्या साधनसामग्रीच्या संरक्षणासाठी बऱ्याच देशांत यशस्वीरित्या झालेले आहेत.[1] जागतिक बँकेनेदेखील लोकसहभागाचा आग्रह धरला आणि त्यामुळे या कामाला खरी गती मिळाली.

## सहभागी वनव्यवस्थापनाची योजना

'आपल्या गावाजवळील वनांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्यांना उत्पन्नात पन्नास टक्के हिस्सा' या घोषवाक्यासह महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने 16 मार्च, 1992 रोजी ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापनाचा शासन निर्णय लागू केला. 'वनक्षेत्रातील अवैध तोड निरनिराळ्या कारणास्तव

वाढतच चालली आहे आणि या अनिष्ट प्रवृत्तीला आळा घालण्यास केवळ शासकीय यंत्रणा व कायदा उपयुक्त ठरणार नाही' हे सुरुवातीलाच कबूल करून 'वनसंपत्तीच्या संरक्षणात जनतेच्या सहकार्याची नितांत गरज आहे' हेही मान्य केले. या योजनेची तत्त्वे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत :

(1) खेडेगावाजवळच्या असलेल्या अवनत क्षेत्राचे पुनरुज्जीवन वनसंरक्षण समित्यांद्वारे केले जाईल. या समितीवर गावातील जवळजवळ सर्व कुटुंबांना प्रतिनिधित्व मिळेल.

(2) वनक्षेत्राचे संरक्षण, रोपांचे संगोपन, इत्यादी जबाबदाऱ्या वनसंरक्षण समिती स्थानिक लोक स्वीकारतील.

(3) वनसंरक्षण समिती एक कार्यकारी मंडळ नियुक्त करेल आणि ते या योजनेचा तपशील तयार करेल तसेच योजनेच्या अमलबजावणीसाठी आवश्यक ते निर्णयही घेईल. परंतु सर्व धोरणात्मक बाबी वनसंरक्षण समितीच्या संमतीने अंतिम करण्यात येतील.

(4) अवनत वनक्षेत्राचे पुनरुज्जीवन झाल्याने मिळणाऱ्या वनोपजांचा फायदा वनसंरक्षण समिती/स्थानिक जनतेस काही मापदंडानुसार द्यावयाचा आहे.

(5) ही योजना राबविण्यासाठी स्वायत्त संस्थांचा उपयोग करून घेणे शक्य आहे, परंतु स्वायत्त संस्थांना कोणत्याही प्रकारचा फायदा अनुज्ञेय नाही.[2]

प्रत्येक गावासाठी वनविभागाचे तीन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभागाचे दोन अधिकारी व कार्यकारी मंडळातील दोन लाभार्थींनी मिळून 10 वर्षांसाठी कार्य आयोजन (working plan) तयार करण्याचे सुचविण्यात आले आहे. कार्य आयोजनेत अंतर्भूत राहणाऱ्या बाबी अशा आहेत : नैसर्गिक पुनरुत्पत्तीचे क्षेत्र व वृक्षांची घनता वाढविण्याबाबत योजना तयार करणे, लागवडीच्या प्रजातीची शिफारस करणे, वनीकरणाचे स्वरूप निश्चित करणे, भूजल संचारण कार्य, सरहद्दीचे सीमांकन व देखभाल करणे. अशा प्रकारे तयार करण्यात आलेल्या कार्य आयोजनेप्रमाणे वनसंरक्षण समितीने कार्यवाही करावयाची असते. वनसंरक्षण समितीत गावातील प्रत्येक घरातून एक व्यक्ती सदस्य असणे आवश्यक आहे.

वनसंरक्षण समितीने ज्या वनक्षेत्राचे निदान 10 वर्षे संरक्षण केले असेल अशा वनक्षेत्रातील उत्पादन परिपक्वतेत आल्यावर त्याचे वाटप करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्याचे काम वनअधिकाऱ्यांनी करावयाचे असते. वनक्षेत्र अथवा रोपवन क्षेत्राला इजा न करता वनसंरक्षण समितीच्या सभासदांना खालील गोष्टी विनामूल्य मिळण्याची योजना आहे :

(1) वाळून, गळून पडलेल्या झाडांच्या फांद्या, फळे, फुले बीज (काजू वगळून) आणि पाने (तेंदू वगळून).

(2) इमारती फाटे, जळाऊ लाकूड वन विभागाने काढल्यावर वनसंरक्षण समितीच्या सदस्यांना ते अग्रक्रमाने उपलब्ध करून देण्यात येईल.

(3) भूमीहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या व्यक्तींना अग्रक्रम देऊन गवत, सरपण, वनोपजांचा पुरवठा करण्याची सोय.

## सहभागी वन व्यवस्थापनाची सद्यःस्थिती

1990 पासून 'सहभागी वन व्यवस्थापन' आणि 'लोकांचा सहभाग' या दोन कल्पना वन खात्याच्या झाल्या. परंतु 'लोकांपासून' वनांचे संरक्षण करण्याची सवय असलेल्या 'लोकांसाठी' व 'लोकांच्या सहयोगाने' वनाचे संरक्षण करता येण्याविषयी शंकाच होती, अजूनही आहे. पश्चिम बंगाल, ओरिसा, आणि शेजाऱ्च्या मध्य प्रदेशात सहभागी वन व्यवस्थापनेचे यशस्वी प्रयोग होऊनही महाराष्ट्रातील उच्चपदस्थ वनाधिकाऱ्यांना मात्र हा कल्पनाविलासच वाटतो. ठरविल्याप्रमाणे प्रत्येक वनवृत्तातून दोन गावे सहभागी वन व्यवस्थापनासाठी निवडली गेली आहेत. पण या गोष्टीला पाच वर्षे लोटूनही वनसंरक्षण समितीची स्थापना सर्वत्र झालेली नाही. जिथे ही समिती आहे तिथे क्वचितच काही काम सुरू झाल्याचे दिसते. वनाधिकारी या परिस्थितीसाठी गावकऱ्यांच्या निष्क्रियतेला दोष देतात.

गावकऱ्यांची भूमिका थोडी वेगळी आहे. त्यांच्या मते इतकी वर्षे वनतोडीसाठी त्यांना जबाबदार धरण्यात आले पण खरे तर वनाधिकाऱ्यांच्या आश्रयाने लाकूड व्यापारी व चोरांनी जंगलाचा नाश केला आहे. त्यामुळे आता जेव्हा वन अधिकारी त्यांच्याकडे जातात आणि सहभागी वन व्यवस्थापनेची योजना मांडतात तेव्हा त्यांच्याकडे संशयानेच बघितले जाते. तसेच दहा वर्षे वन संरक्षणाचे काम करून, त्यासाठी वेळ, कष्ट घालविल्यावर अखेर त्यांना फायदा मिळेलच असा विश्वास गावकऱ्यांना वाटत नाही. त्यांना अशी भीती वाटते की सरकार पुन्हा एकदा कायदा बदलून सर्व नैसर्गिक मालमत्तेवर आपला संपूर्ण हक्क कशावरून बजावणार नाही ? सहभागी वन व्यवस्थापनाची स्थिती-सुद्धा वेगवेगळ्या गावामध्ये वेगवेगळी आहे. जिथे वनाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष घातले आहे आणि लोकानीही सहयोग दिला आहे तिथे कामाची प्रगती चांगली आहे. परंतु जिथे लोकानीच या कामात पुढाकार घेतला आहे तिथे कामाची प्रगती झपाट्याने आणि फारसे अडथळे न येता होत आहे.[3] या पार्श्वभूमीवर लोकांचा तिसरा मुद्दा असा आहे की, जिथेजिथे गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन वनसंरक्षणाचे काम याआधीच केले आहे तिथेतिथे वनविभागाने या कामाचे श्रेय लाटले आहे. त्यामुळे गावकरी सहभागी वन व्यवस्थापनाच्या बाबतीत त्यांची भूमिका व व्यवस्था, त्यांचा ताबा याबाबतीत अजूनही आश्वस्त नाहीत.[4] या सर्व आरोप-प्रत्यारोपातून सहभागी वन व्यवस्थापनाचे काम बरेच रखडले आहे. तरीही याबाबतीत काही उल्लेखनीय अपवाद आहेत.

## विदर्भातील एक उल्लेखनीय प्रयोग

आपल्या शेतात झाडांची लागवड करण्याचे, तसेच गावाभोवती वनीकरणाचे फायदे लक्षात आल्याने पश्चिम महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी गेल्या दहापंधरा वर्षांपासूनच सामाजिक वनीकरणाच्या योजनांचा लाभ घेतला गेला. विदर्भातही गडचिरोली जिल्ह्यातील लेखा–मेंढा, चंद्रपूर जिल्ह्यातील सायगाठा येथे गावकऱ्यांनी स्वतःच पुढाकार घेऊन वन संरक्षण व संवर्धनाचे काम काही वर्षांपूर्वीच सुरू केले. बुलढाण्यातील काही गावांचा अनुभव फारच बोलका आणि थोडा वेगळा आहे.

खामगाव–बुलढाणा रस्त्यावर 25 ते 30 किलोमीटरच्या क्षेत्रात येणाऱ्या डोंगर खंडाळा, टाकरखेडा, करवंट, श्रीकृष्ण नगर, देव्हारी, बोथा, मांडवी आणि काळेगांव या गावांमध्ये आठ महिन्यापूर्वी सहभागी वन व्यवस्थापनाची एक वेगळीच सुरुवात झाली. या सर्व गावांच्या भोवती बऱ्यापैकी जंगल आहे आणि पिढ्यान्पिढ्या जंगलातून सरपण, चारा वगैरेचा लाभ गावकरी घेत आहेत. पण सुमारे दहा वर्षांपासून सभोवतालच्या जंगलामध्ये काठियावाडी आणि मेंढपाळांचा प्रवेश झाला. काठियावाडी आपल्या प्रत्येकी हजार दीडहजार गाईगुरांसकट फिरतात आणि दुधाचा धंदा करून भरपूर पैसा मिळवितात. ते एखाद्या गावातील काही एकर जमीन विकत घेऊन आपली वसाहत करतात आणि आजूबाजूच्या जंगलात अवैधरित्या आपल्या गुरांना चरवितात. गुरांच्या खुरांमुळे झाडांचे फुटवे नष्ट होतातच त्याशिवाय काठियावाडी अंजन झाडांच्या फांद्या तोडून जंगलाचे बरेच नुकसान करतात. हीच तऱ्हा मेंढपाळांची. कित्येक वर्षे हे सातत्याने सुरू असल्यामुळे गावकऱ्यांच्या गुरांना चारा मिळणे कमी झाले आणि जंगलाचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला. तेव्हा या सर्व गावकऱ्यांनी एकत्रित येऊन उप वनसंरक्षकांना निवेदन दिले आणि वन विभागाच्या मदतीने काठियावाडींना हुसकावून लावले. सबळ राजकीय पाठबळ असलेल्या मेंढपाळांच्या अवैधरित्या चरणाऱ्या मेंढ्या पकडून आणि दंड करून मेंढ्यांचे चरणेही नियमित केले. या कृतीचा प्रत्यक्ष फायदा ताबडतोब दिसून आला. सहा महिन्यातच जंगलात गवताची भरपूर वाढ झाली आणि गावकऱ्यांना चारा आणायला लागणारे कष्ट कमी झाले. याने प्रोत्साहित होऊन आता या सर्व गावांमध्ये वनसंरक्षण समिती तयार करण्यात आली आहे आणि आता गावकरी गावाच्या विकासाच्या योजनांचा विचार करावयाला लागले आहेत. सहभागी वन व्यवस्थापनाचे / संरक्षणाचे काम वनसंरक्षण समिती स्थापण्याच्या आधीच खऱ्या अर्थाने सुरू झाल्याचे हे एक उदाहरण. जंगल राखण्याचे काम फक्त मोजके वन कर्मचारी करू शकत नाहीत, त्यासाठी लोकांचा सहभाग आवश्यक आहे हे गावकरी व वन अधिकारी या दोघांच्या लक्षात आले आहे. असे परस्पर सामंजस्यच सहभागी वन व्यवस्थेचा पाया असावयाला हवे.

## सहभागी वन व्यवस्थापनाच्या समस्या

सहभागी वन व्यवस्थापन योजनेचे अभ्यासकांनी, कार्यकर्त्यांनी, स्वायत्त संस्थांनी स्वागत केले असले तरी काही मूलभूत प्रश्न सर्वांनाच भेडसावत आहेत. जागतिक बँक व देणग्या देणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी भारतातील वनांच्या संरक्षणासाठी इतकी उत्सुकता दाखविण्याचे कारण काय? लोकांना अधिकार देऊन ही वनसंपदा राखण्यात उत्सुक असणाऱ्या या विदेशी संस्थांच्या हेतूबद्दल शंका येते. तसेच वनवासींसाठी काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी अशीही शंका व्यक्त केली आहे की, आदिवासींनी वनांवरील आपले अधिकार आक्रमकपणे मांडण्याची सुरुवात केल्यामुळे त्यांचे लक्ष विचलित करण्याचा तर हा प्रयत्न नाही? याशिवाय उद्‌भवणाऱ्या इतर काही समस्या खालील-प्रमाणे आहेत.

(1) शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे 'ग्रामीण परिसरातील अप्रगत व अवनत वन व वनेतर क्षेत्राचा उपयोग या कार्यक्रमात प्रामुख्याने केला जाणार आहे.' अवनत वन असल्यास ग्रामस्थांना वनसंवर्धनासाठी व त्यातून फायदे मिळविण्यासाठी फार काळ वाट पाहावी लागते आणि इतक्या कालानंतर ते फायदे मिळतीलच हा विश्वास नसतो. तसेच सध्या चांगल्या स्थितीत असणाऱ्या जंगलांना तसेच टिकवून ठेवण्याची देखील ही योजना राबविणे आवश्यक आहे. नाही तर आधी वनांचा नाश करावा आणि मग सहभागी वन व्यवस्थापनाचे फायदे घ्यावे या भूमिकेला प्रोत्साहन मिळते.

(2) सध्या खेड्यांमध्ये दारिद्र्य आणि बेकारीची परिस्थिती बिकट असल्याने त्वरित काहीच लाभ न मिळता, दहा वर्षानंतर मिळणाऱ्या फायद्याकडे बघण्यापेक्षा अवैध वृक्षतोड करून चार पैसे मिळविणे अधिक सयुक्तिक वाटते. तेव्हा ग्रामस्थांना वन संरक्षणासाठी काही तरतूद करणे आणि या कामासाठी तरुण बेकारांना मोबदला देणे आवश्यक आहे.

(3) सरपण, चारा आणि आवश्यक लाकूडफाटा गावालगतच्या जंगलातून उपलब्ध झाला नाही तर गावाच्या वनाचे संरक्षण करावयाचे पण त्यापलिकडच्या वनाची तोड करावयाची अशीही शक्यता आहे. यामुळे वन व्यवस्थापनाचे उद्दिष्ट पूर्ण होत नाही.

(4) काही वनसंरक्षण समित्यांचा असाही अनुभव आहे की, समिती झाल्यापासून वन विभागाने संरक्षणाच्या कामातून अंग काढून घेतले आहे. वनसंरक्षण समितीला अवैध जंगलतोड किंवा चराई थांबविण्याचे अधिकार कायद्याने दिले नसल्यामुळे वन विभागाच्या सक्रिय सहभागाशिवाय वन संरक्षणाचे काम होऊच शकत नाही.

(5) वन संरक्षणाच्या नावाखाली जर वृक्षतोड पूर्णपणे थांबविली आणि अवैध वृक्षतोड व चराईवर निर्बंध घातले तर त्याचा परिणाम सरपण व चाऱ्याच्या किमतीवर लगेच होतो.[5] या गोष्टी जर गावकऱ्यांना माफक दरात उपलब्ध करून दिल्या नाहीत तर वनसंरक्षण अशक्य होते.

(6) सहभागी वन व्यवस्थापनाच्या योजनेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी कुठलीच विशेष तरतूद केलेली नाही. वनांचा व इतर नैसर्गिक साधनसामग्रीच्या विनाशाचा सर्वात अधिक दुष्परिणाम स्त्रियांवर होतो. तसेच वनांच्या संरक्षणासाठी झालेल्या सर्व चळवळींमध्ये स्त्रियांचा पुढाकार आणि सक्रिय सहभाग होता, याला इतिहास साक्ष आहे. तरीही स्त्रियांसाठी शासनाच्या परिपत्रकात ही बाब लक्षात घेतली गेलेली नाही.

(7) जागतिक बँकेने सहभागी वन व्यवस्थापनाला आर्थिक पाठबळ पुरवावयाचे कबूल केले होते पण या गोष्टीला पाच वर्षांचा कालावधी लोटला, काही ठिकाणी वनसंरक्षण समित्या स्थापल्या गेल्या, उप-वनसंरक्षकांनी गावकऱ्यांच्या मदतीने कार्य-आयोजनाचा आराखडा तयार केला, पण त्यापुढचे काम पैशाच्या अभावी अडकून पडले आहे. जागतिक बँकेकडून निधी अजूनही आलेला नाही.

वर उल्लेखिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधणे जसे आवश्यक आहे तसेच समस्यांचे निराकरण करण्याचीही आवश्यकता आहे आणि ते शक्यही आहे. सद्यःपरिस्थितीत सहभागी व्यवस्थापनाला पर्याय नाही हे वनविभाग आणि गावकऱ्यांना मनोमन पटणे आणि त्यासाठी लागणारी तडजोड परस्पर सामंजस्य व विश्वासाने करण्याची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल आणि वनांवर अवलंबून राहणाऱ्या आणि वनात राहणाऱ्या लोकांच्या दैनंदिन गरजा भागविणे या 1988 च्या वन धोरणात उल्लेखिलेल्या उद्दिष्टद्वयाचा खऱ्या अर्थाने पाठपुरावा करावयाचा असेल तर वनव्यवस्थापन परस्पर सहयोगानेच करावे लागेल.

### संदर्भ टीपा


1 Mukherjee Neela, 'Forest Management and Survival Needs : Community Experience in West Bengal,' ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, Dec. 9, 1995.

2 ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एस. एल. एफ. – 1091 / प्र. क्र. 119/91 फ–11, मंत्रालय, मुंबई, दि. 16 मार्च 1992.

3 Menon, Ajit, 'Constructing the Local, Decentralising Forest Management,' EPW, Aug. 26, 1995.

4 Sundar, N., Mishra, A., Pater, N., 'Defending the Dalki Forest : 'Joint' Forest Management in Lapanga,' EPW, Nov. 9-16, 1996.

5 Pattnaik, B. K. and Brahmachari, A.' 'Community - Based Forest Management Practices : Field Observations from Orissa', EPW, April 13, 1996.


□ □

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यवाहांच्या पत्त्यातील बदल

परिषदेचे कार्यवाह आता मंगळवेढ्याऐवजी पुण्यास राहावयास गेले आहेत. त्यांचा नवीन पत्ता पुढीलप्रमाणे आहे :


डॉ. आ. गो. पुजारी, कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि प्रपाठक, नेहरू, सामाजिकशास्त्र विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, **पुणे** 411 037, ( **दूरध्वनी** : 440856 / 436888 / 425068 )


सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन यापुढील सर्व पत्रव्यवहार मंगळवेढ्याऐवजी पुण्याच्या पत्त्यावर करावा ही विनंती.

**रवीन्द्र दोशी**

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

*ग्रंथ परीक्षण -1*

# विसाव्या शतकातील अर्थशास्त्रीय विचार

Dubhashi, P. R. (1995), **ECONOMIC THOUGHT OF THE TWENTIETH CENTURY AND OTHER ESSAYS,** Concept Publishing Company, New Delhi, Pages 277, Price Rs. 400.

सी. पं. खेर *

पी. आर. दुभाषी यानी 1990 पर्यंत वेळोवेळी जे लेख व परिक्षणे प्रसिद्ध केली त्यांचे संकलन या पुस्तकात झालेले आहे. (लेखांच्या शेवटी प्रसिद्धीची तारीख दिली असती तर बरे झाले असते.) या संकलित 35 लेखांचे सहा भाग केलेले आहेत. ते असे: (1) अर्थशास्त्रीय विचार, (2) विकास योजना, (3) विकासाचे व्यवस्थापन, (4) दारिद्र्य, (5) विकास आणि पर्यावरण आणि (6) जागतिक आर्थिक व्यवस्था.

पुस्तकाचे शीर्षक असलेला, या पुस्तकातील पहिला लेख 'विसाव्या शतकातील अर्थशास्त्रीय विचार' हा असून तो म्हणजे सिडनहॅम कॉलेजात दिलेले 1990 चे सुमंत मुरंजन स्मृती व्याख्यान आहे. या लेखात अर्थविज्ञानात दोन शतकातून कसा बदल होत गेला याचा धावता आढावा आहे. ॲडाम स्मिथच्या 'अदृश्य हाता'- पासून सुरुवात करून ब्रिटनमधील थॅचर वादापर्यंत त्यांनी वाचकाला आणून सोडले आहे.

हा आढावा त्रोटक वाटतो. समोवतालच्या परिस्थितीचे विश्लेषण करून तर्कनिष्ठ प्रमेये मांडणारे असे जर अर्थशास्त्र असेल (ॲडाम स्मिथचे असे अर्थशास्त्र होते) तर ती परिस्थिती आणि प्रमेये यांची सांगड घालून परिस्थितीनुसार प्रमेये कशी बदलत गेली हे दाखविणारा हा आढावा हवा. किंवा पुढे (रिकार्डोनंतर) अर्थशास्त्र हे अप्रतिरूप (**abstract**) व बौद्धिक कसरतीचे (सीमान्तिक संकल्पना व अर्थमीती) कसे बनत गेले आणि ते वास्तवतेशी कसे फटकून चालले आहे हे दाखविणारा हा ऐतिहासिक आढावा हवा. वास्तविक हे दाखविण्याचे कार्य अर्थशास्त्राच्या अध्यापकांचे आहे. परंतु गालब्रेथ यानी म्हटल्याप्रमाणे परंपरागत अध्ययन आणि अध्यापन यांच्या परिघातून बाहेर पडायला अध्यापक तयार नाहीत. दुभाषी यानी प्रस्तावनेत सांगितल्याप्रमाणे अर्थशास्त्राचा त्यांचा अभ्यास कधीच पाठ्यपुस्तकी नव्हता. तो व्यवस्थापन व कार्यसंपादन यांच्याशी सतत मेळ

* अर्थशास्त्राचे अभ्यासक, पुणे.

घालणारा होता. यामुळे अर्थशास्त्राच्या मर्यादा, एकांगीपणा ते विद्यार्थ्यांना विशद करून सांगतील अशी अपेक्षा होती.

अर्थशास्त्राच्या मर्यादांची दुभाषी याना असलेली जाणीव 4 मे, 1983 च्या त्यांच्या 'Financial Express' मधील लेखात स्पष्ट झालेली आहे. 'अर्थ–शास्त्राची प्रस्तुतता आणि अप्रस्तुतता' हा तो लेख आहे. (या शीर्षकापुढील प्रश्नचिन्ह संपादकानी गाळले असे दुभाषी या लेखावरील जे. प्रकाश यांच्या प्रति–क्रियेला उत्तर देताना नमूद करतात. पण या संग्रहात ते शीर्षक जसेच्या तसे घेतात.) "मानवी प्रेरणा व वर्तणूक यांच्यामागील विविध मानसशास्त्रीय आणि सामाजिक अंगांची दखल घेऊन अर्थशास्त्रज्ञांनी आपली प्रमेये मांडलेली नाहीत. क्लिष्ट प्रतिमाने तयार कर–ण्यात आणि ती प्रकृष्ट व अगम्य भाषेत प्रतिपादण्यात ते गुंगून गेले आहेत. यामुळे सृष्टीविज्ञानाशी अर्थशास्त्र तुल्यबळ राहील असा भ्रम त्यानी निर्माण केला आहे" (पृ. 41). विकसनशील देशांतून संघटना व तंत्र–विज्ञान यांच्या परस्पर प्रतिक्रियांचे दर्शन घडविणारे नवेनवे अर्थशास्त्र हवे असे दुभाषींना वाटते. हे त्यानी तळमळीने मांडलेले आहे. वास्तविक 'भारतीय अर्थ–शास्त्र' म्हणून अर्थशास्त्रीय सिद्धान्तांपासून अलग करून जे शिकविले जाते ते चुकीचे असून विकासाच्या अर्थशास्त्राचा ते अविभाज्य अंग बनावयाला हवे. सामा-जिक आणि राजकीय घटनांचे त्यावर होणारे परिणाम यांचेही त्यात विश्लेषण हवे. (यासाठी विजय जोशी आणि आय. एम. डी. लिटल यांची पुस्तके पाहावीत.)

विकसनशील देशांनी विकासाचे अर्थशास्त्र शिकावे, विकसित देशांना लागू पडणारे (उदाहरणार्थ, केन्सचे) अर्थशास्त्र इथे निरुपयोगी ठरते. विकासाच्या अर्थशास्त्रात योजनेला महत्त्व येते आणि भारतात सुरुवातीपासूनच याबाबतीत मतभेद बोकाळलेले आहेत. ग्रामीण उद्योगांचे इथे संरक्षण व्हावे का? किती काल? का आधुनिक यंत्रोद्योगांवर आधारून व्यापक आणि सघन यांत्रिकीकरण करावे? कोणकोणत्या उद्योगांतून? तंत्रविज्ञान कोणते हवे? शूमाकर यानी पुरस्कारल्या–प्रमाणे ते मध्यम प्रकारचे नको का? म. गांधी यांच्या कल्पनेप्रमाणे खेडी स्वयंपूर्ण व्हावयाला नकोत का? गांधींचे असे जर काही अर्थशास्त्र (हिंदू संस्कृतीप्रमाणे व्यक्तीच्या अध्यात्मिक उन्नतीहून अलग) असेल तर त्याचा व्यापक स्वीकार का करू नये? हे प्रश्न आजही विचारले जात आहेत. दुभाषी यांचा कल खेड्यांचा विकास व मध्यम प्रकारच्या तंत्रविज्ञानाचा स्वीकार याकडे झुकलेला दिसतो.

परंतु प्रत्यक्षात लोकसंख्येच्या विस्फोटामुळे वाढत्या मूलभूत गरजा तत्काल भागविण्याची निकड, पाश्चिमात्य सुविधांनी निर्माण केलेली प्रलोभने, आणि त्यांचा शहरी श्रीमंतांनी स्वीकार करून त्यांचे कष्ट कमी झाल्याच्या प्रदर्शनाचा प्रभाव, मोठ्या कारखा–न्यांची वस्तू विक्रीसाठी जाहिरातीद्वारा आक्रमकता, मध्यम तंत्रविज्ञानाच्या उपलब्धतेचा पूर्ण अभाव, शिवाय संरक्षणासाठी प्रभावी, जटिल तंत्रविज्ञानाचा अवलंब करण्याचा अपरिहार्यपणा, या सर्वांमुळे मध्यम तंत्र–विज्ञानाचा स्वीकार कसा अवघड, दिरंगाईचा किंवा अशक्य बनला आहे हे दुभाषी विशद करून सांगत नाहीत.

विकासाच्या ढाच्यात क्षेत्रीय विकासाच्या महत्–त्वाकडे दुभाषी आपले लक्ष वेधून घेतात (पृष्ठे 114–15). क्षेत्रीय विकासात मध्यवर्ती विकास केन्द्रे – वर्धनध्रुवी खेडी (growth poles) – निर्माण करणे जरुरीचे आहे. ही केन्द्रे सभोवतालच्या 9-10 खेड्यांना जोडतील; तिथे बाजार, दुरुस्ती केन्द्रे, कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या गिरण्या (वटणी गिरण्या, भात–सडीच्या गिरण्या, इत्यादी), उद्योग शिक्षण देणाऱ्या (आय. टी. आय.) शाळा, इत्यादी असतील. परंतु अशी केन्द्रे स्थापण्याकडे योजनाकारांनी, राज्यांनी दुर्ल–क्षच केले आहे. हे चुकीचे असल्याने अशी विकासकेन्द्रे निर्माण करण्याच्या आवश्यकतेवर ते भर देतात.

क्षेत्रीय विकासप्रक्रियेत सिंचन प्रकल्पातील जल–प्रदाय क्षेत्रीय विकासाचा (CADA) समावेश होतो. दुभाषी याचा नुसता उल्लेख करतात (पृष्ठे 108 व 113). ते स्वतः अशा जलप्रदाय क्षेत्रीय विकासाचे अधिकारी होते (मलप्रभा-घटप्रभा सिंचन प्रकल्प जल-प्रदाय क्षेत्रीय विकासाधिकारी) तेव्हा हा विकास घडविताना कोणत्या अडचणी येतात, दिरंगाई कुठे, का, कशी होते आणि यातून मार्ग कसा काढावयास हवा याचे विवेचन यात येईल असे मला वाटले होते. पण त्यात माझा अपेक्षाभंग झाला.

योजनेबद्दलच्या दुभाषी यांच्या दोन लेखांकडे

खास लक्ष दिले जाते. यात त्यांनी योजनांच्या एकात्मतेवर भर दिला आहे. अर्थतज्ज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापनतज्ज्ञ, संख्याशास्त्रज्ञ आणि राजकारणी या सर्वांचा योजनांबद्दलच्या – प्रकल्पांबद्दलच्या कल्पनांचा मेळ घातला गेल्याशिवाय योजनेची उद्दिष्टे सफल होणारी नाहीत हे त्यांनी स्पष्टपणे मांडलेले आहे (पृष्ठे 159–66). कोणत्या प्रकारची योजना हवी, विकासाचा वेग किती हवा, विभाजनाचा ढाचा कसा हवा याबद्दलची निवड व निर्णय राजकीय आहेत. हे निर्णय झाल्यावर ते लोकांना पटवून देण्याचे, कोणते शक्य व कोणते अशक्य होते हे सांगण्याची आणि त्यातून झालेल्या निवडीची जबाबदारी घेण्याचे कार्य राजकारण्यांचे आहे. निवड एक करावयाची आणि लोकांना दुसरेच सांगावयाचे यामुळे प्रकल्पांच्या विश्वासार्हतेलाच धक्का पोहोचतो. कोणते प्रकल्प सुसंगत आहेत, त्यांचे उद्देश साध्य होण्यात कोणत्या मर्यादा आहेत हे स्पष्टपणे सांगण्याचे कार्य अर्थतज्ज्ञांचे आहे. त्यांना लागणारी आकडेवारी पुरविण्याचे कार्य संख्याशास्त्रज्ञांचे आहे. तसेच राज्यकर्त्यांनी निवडलेले योजनाप्रकल्प कार्यवाहीत आणण्याचे कार्य व्यवस्थापनाचे असले तरी कोणता प्रकल्प राबविता येईल, कोणता नाही हे निर्भयपणे मांडण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. हे खरे आहे. परंतु अशी निर्भय प्रामाणिकता, सचोटी कुठे आहे? असल्यास त्याची कदर कोण करतो? तंत्रज्ञ प्रकल्पाच्या यशस्वितेबद्दल इशारा देतात, सामाजिक लाभपरिव्ययाचे हिशेब मांडून प्रकल्प किफायतशीर नसल्याचे अर्थतज्ज्ञ सांगतात, संख्याशास्त्री त्याचे गणित मांडून दाखवितात आणि तरीही राज्यकर्ते आपलाच हेका चालवितात आणि शेवटी समाजाचेच नुकसान होत असल्याने घोळ झाल्याचे, घाई केल्याने दिरंगाई झाल्याचे अनुभवास येते (विशेषतः सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत). राज्यकर्त्यांनीही तज्ज्ञांचे ऐकण्याची शिस्त पाळावयाला हवी. पण हे त्यांना कुणी शिकवावयाचे?

योजना प्रकल्पाच्या विविध टप्प्यांतील प्रगतीच्या आढाव्याचे महत्त्व, दुभाषी यांच्या प्रतिपादनानुसार, फार मोठे आहे. प्रकल्पाशी संबंधित विविध खात्यांची सांगड घालणे, त्यात कोणत्या व कुठे त्रुटी आहेत आणि त्या त्रुटी कशा नाहीशा करावयाला हव्यात हे पाहणे, कार्यदक्ष मनुष्यबळाची नियुक्ती करणे, इत्यादींचा आढावा घेणारी एक समिती हवी (प्रत्येक खात्यात) असे दुभाषी सुचवितात.

1990 च्या बहुचर्चित आर्थिक सुधारणांवरही एक लेख इथे आहे. "अटकाव करणारी तर्कदुष्ट नियंत्रणे चालविणाऱ्या, अडथळे आणणारी जंगली प्रशुल्के नाहीशी करणाऱ्या आणि अनुत्पादक सरकारी खर्च कमी करून राजकोषीय तूट कमी करणाऱ्या आर्थिक सुधारणा राबवीत असताना सर्व क्षेत्रांत – कारखाने आणि कचेऱ्यांतून – उत्पादकता वाढवून सामाजिक शिस्तीचे कसे निर्माण होईल हे पाहावयाला हवे आणि त्यासाठी राष्ट्रीय वृत्तीचे पुनरुत्थान करावयाला हवे, सामाजिक शिस्त आणि उच्च श्रमनीती निर्माण करावयाला हवी" (पृ. 205) असे दुभाषी सांगतात. परंतु सामाजिक शिस्त व उच्च श्रमनीती आजवर का निर्माण झाली नाही याचा शोध ते घेत नाहीत. निवृत्तीचे तत्त्वज्ञान, शेकडो वर्षे चाललेली क्रूर परकीय आक्रमणे, जातीने केलेली घरभेदी व पिळवणूक, स्वराज्य म्हणजे शेजाऱ्यावर चढाई व लूट, एकमेकांचे पाय खेचणारे द्वेषजन्य दारिद्र्य, आणि आत्मतुष्टीने नवीन शास्त्रीय उपक्रमाचा धिक्कार यात तर या बेशिस्तीचे मूळ नसेल ना? याबद्दलचे आवश्यक विश्लेषण यात आढळत नाही. आर्थिक सुधारणा या सद्यःस्थितीत खुल्या बाजारावर भर देणाऱ्या आहेत. खुल्या बाजाराचे काही नियम आहेत. पूर्वीची गळचेपी नियंत्रणे उठवीत असताना ते नियम काटेकोरपणे पाळले जातील हे पाहणारी, दोषी व्यक्तींना कठोरपणे शिक्षा करणारी, सरकारी / संस्थात्मक देखरेखी व्यवस्था अपरिहार्य आहे आणि ती आर्थिक सुधारणा आणतानाच जोडीने निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे हे विसरता कामा नये.

सगळ्याच लेखांचा परामर्श घेणे इथल्या मर्यादेपलीकडचे आहे. साधारणपणे 1980 च्या दशकात जे जे प्रश्न उपस्थित झाले त्यावर दुभाषी यांनी आपली त्या त्या वेळची प्रतिक्रिया त्यांच्या वेळोवेळी लिहिलेल्या लेखांतून व्यक्त केलेली आहे. 1995 मध्ये हे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. तेव्हा 1990 ते 1994 च्या आर्थिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात या लेखांतून व्यक्त झालेल्या विचारांचे सूत्रबद्ध व सलगपणे उपसंहारात्मक प्रतिपादन दुभाषी यांनी या लोकसंग्रहाला शेवटी जोडावयाला हवे होते असे वाटल्यावाचून राहात नाही. □ □

ग्रंथ परीक्षण –2

# साम्राज्यवाद स्थापण्याचे प्रयत्न

Davison, Budhoo L. (1990), ENOUGH IS ENOUGH, Published in North America by the Apex Press, New York, pages 116.

मृणालिनी फडणवीस *

1920 मध्ये मावळलेल्या भांडवलवादाला व साम्राज्यवादाला परत 1980 सालानंतर पुढे आणण्याचे कार्य जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी करीत आहे. खऱ्या अर्थाने 1944 सालापासूनच या दोन्ही संस्थांचा हा प्रयत्न चालू आहे. आर्थिक विकास वेगवान बनविण्याकरिता विदेशी मदतीशिवाय पर्याय नाही अशी जाणीवच आता न्यूनविकसित देशांना करून दिली जात आहे. विदेशी साहाय्य व कर्ज मागत असताना या जागतिक संस्थांच्या कडक अटी मान्य केल्याशिवाय पर्याय उरलेला नाही. विकसित राष्ट्रे म्हणतात की, तिसऱ्या जगातील देशांना अधःपतनापासून वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे; या देशांच्या हिताकरिता कार्ये केली जातील आणि अशी कार्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून सहज साधता येतील. खाजगीकरणाला राबवा असे उद्‌गार या संस्था काढत आहेत. विकसित देशांचा यात मोठा हातभार आहे. पण प्रत्यक्षात हे सर्व प्रयत्न कसे खोटे आहेत हे उघडपणे सांगण्याचे आणि या दोन्ही जागतिक संस्थांच्या कार्यांचे खरे स्वरूप उघड करण्याचे कार्य डेविसन एल. बुधो यांनी 'Enough is Enough' या पुस्तकाद्वारे केले आहे. लेखकाने जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीची 20 वर्षांची प्रदीर्घ सेवा करून 18 मे, 1988 साली राजीनामा दिल्यानंतर एक खुले पत्र आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे व्यवस्थापकीय संचालक कमडेससना पाठविले. हे पत्र पुस्तकरूपात छापलेले असून त्यात या दोन्ही जागतिक संस्थांच्या विभिन्न कार्यांची माहिती दिली आहे. ती कार्ये न्यूनविकसित देशांना घातक ठरतात. ही पत्रस्वरुपात दिलेली माहिती 116 पानांमध्ये स्पष्ट केली असून, लेखकाचे राजीनामा देण्याचे कारण त्रिनिदाद आणि टोबॅगो हे गरीब देश जागतिक बँकेच्या धूर्त धोरणाला कसे बळी पडले आहेत याचे विश्लेषण करून त्यातून स्पष्ट केले आहे.

डेव्हिसन एल. बुधो ग्रेनेडा या देशाचे निवासी आहेत. त्यांचे शिक्षण लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे झाले. 1966 साली आंतरराष्ट्रीय नाणे निधीमध्ये

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

त्यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड झाली. 1966 ते 1988 या 20 वर्षांच्या कार्यकालापैकी 12 वर्षे त्यानी नाणे निधी व जागतिक बँकेचे वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्य केले. गुयाना येथे ते नाणे निधीचे प्रतिनिधित्व करीत होते. त्यानी कॅरिबियन व लॅटिन अमेरिकेन देशांचा अभ्यास करून काही महत्त्व-पूर्ण पुस्तके प्रकाशित केली. नाणे निधीच्या संचालकाला सादर केलेला राजीनामा त्यानी 1987 साली लिहा-वयाला घेतला आणि 1988 साली तो सादर केला. या पत्रात लेखकाने स्पष्ट केले आहे की, नाणे निधीने केलेल्या अपराधी कार्याबद्दल ( criminal action ) जगाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने त्याना सर्व बाबी खुल्या करणे अधिक योग्य वाटत आहे. बुधोनी या सर्व बाबी इतर प्रसिद्धी माध्यमातूनही लोकांसमोर मांड-ण्याचा प्रयत्न केला. पण त्याला विरोध झाला आणि प्रामुख्याने बी. बी. सी. ला सांगण्यात आले की, त्यांचे असे विचार प्रकाशात यावयाला नको आणि त्याना 'नायका'चा दर्जा द्यावयाला नको. अशा तऱ्हेने प्रसिद्धीचे सर्व माध्यम त्यांच्याकरिता बंद करण्यात आले.

या पत्राचे प्रयोजन स्पष्ट करून लेखकाने कम-डेसेस याना प्रश्न विचारले आहेत आणि त्यानुसार या पत्रात तीन प्रमुख बाबींचा उल्लेख केला आहे.

(1) तिसऱ्या देशात राहणाऱ्या माणसांचे झालेले शोषण आणि त्यांच्या हिताविरुद्ध केलेल्या नाणे निधीच्या कार्याबद्दल माहिती दिली आहे.

(2) त्रिनिदादच्या श्रम संघटनेचे अध्यक्ष ऐरॉल मॅकलिऑड यानी त्यांच्या देशाची सांख्यिकी माहिती आणि जागतिक बँकेने दिलेल्या सांख्यिकी माहितीची तुलना केली आहे.

(3) लेखकाने स्पष्ट केले आहे की, सांख्यिकीय अनियमितपणा फार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जागतिक बँकेने जाहीर केलेले आकडे प्रत्यक्ष आकड्यां-पेक्षा वेगळेच आहेत, असे लेखकाला आढळून आले.

या पत्राची विभागणी पाच विभागांमध्ये केलेली आहे. पहिल्या भागातच लेखकाने सांगितले आहे की, त्यानी 1,000 दिवस नाणे निधीचे कामकाज सांभाळले आणि काम करत असताना त्याना लक्षात आले की लॅटिन अमेरिका, कॅरिबिया आणि आफ्रिकी देशांना जे कार्यक्रम राबवावयाला सांगितले (लेखकाच्या भाषेत कार्यक्रमरूपी औषधी पाजली) (पृ. 2, परिच्छेद 1) आणि युक्त्या सुचविल्या ( bag of tricks ), त्या या सर्व अर्थव्यवस्थांच्या आर्थिक व्यवस्थेला पोकळ कर-णाऱ्या होत्या आणि सतत पोकळ करीत राहिल्या.

लेखकाने परखडपणे मांडले आहे की, हे राजी-नामा पत्र त्याना बिनामोबदल्याचे स्वातंत्र्य देणारे आहे. त्यांच्या डोळ्यासमोर गरीब आणि उपाशी लाखो लोकांचे रक्त नद्यांप्रमाणे वाहताना दिसत आहे. म्हणून ते म्हणतात, " Mr. Camdessas, the blood is so much, you know, it runs in rivers. it dries up too; it cakes all over me; some-times I feel that there is not enough soap in the whole world to cleanse me from the things that I did do in your name and in the names of your predecessors, and under your official real."

लेखकाने असे सर्व लोकांसमोर मांडणे हे एक आव्हान मानून नाणे निधीच्या व्यवस्थापकीय संचाल-कानी या पत्राचे उत्तर देण्यावर भर दिला आहे. त्यांचा विश्वास आहे की, त्यांचे आरोप पाश्चिमात्य समा-जाला हलवून देणारे आहेत तसेच जागतिक आर्थिक व्यवस्थेला व कुशलतेला आव्हान देणारे आहेत. लेख-काच्या मते वाचकांसमोर असा प्रश्न उभा राहील की, नाणे निधीने आतापर्यंत केलेले कार्य किंवा या संस्थेचा उद्देश मानवताविरोधी आहे काय? त्याचवेळेस हा विचार बराच चर्चिला जाईल आणि लवकरच संपुष्टातही येईल असे लेखकाने गृहीत धरले आहे.

जवळपास अशीच माहिती ' Economic and Political Weekly, May 17-24, 1997 (पृष्ठे 1068-69) या अंकात विजय प्रसाद यानी पेरू या देशासंबंधी दिली आहे आणि प्रामुख्याने नाणे निधीच्या वाढत्या साम्राज्यवादाची चर्चा केली आहे.

बुधोंना अनेक वर्षांपासूनच जाणवत होते की, त्यानी केलेले कार्य हीन भावनेचे आहे आणि या

कारणानेच त्यांनी हे पत्र लिहावयाला घेतले. कारण, सामान्य माणसांची स्थिती बघून त्यांना असे वारंवार वाटत होते की, या संस्थेची अशी कृत्ये न पटण्या-सारखी आहेत. त्यांना पहिल्या जगातून तिसऱ्या जगात या सर्व बाबी सविस्तर पोहोचवाव्यात असे वाटत होते. लेखकाला असे वाटते की, पहिल्या जगाने हे सर्व तयार केलेले कचऱ्याचे ढीग आहेत आणि त्यात तीन अब्ज लोक आतापर्यंत भरडले गेले आहेत ( " A Large expendable garbage heap of three billion souls " ). त्यांच्या असेही निदर्शनास आले की, या संस्थेचे अधिकारी तिसऱ्या जगाला दोषी मानतात; पण प्रत्यक्षात नाणे निधीचे सर्व सदस्यच अफरातफर करीत असून जणू संपूर्ण जगात कॅन्सर पसरवीत आहेत आणि असे करण्यास त्यांच्या उच्च अधिकाऱ्यांचा ( high priests, पृ. 3, परिच्छेद 5 ) अधिक हातभार होता.

दुसऱ्या विभागात लेखकाने ' RULC ' (Relative Unit Labour Cost – सापेक्ष एकक श्रम परिव्यय ) निर्देशांकाची चर्चा केली आहे (पृ. 15, परिच्छेद 1 ). या निर्देशांकाचा वापर नाणे निधीने प्रथमच केला आहे. आणि त्याला न्यूनविकसित देशांकरिता एक प्रमुख निर्देशक म्हणून ( key indicator ) वापरला आहे. दुसऱ्या देशाबरोबर व्यापार करताना त्यातील विविध बाबींचा अभ्यास करण्याकरिता या निर्देशांकाचा उपयोग केला जातो. याचा उपयोग देशाचे उत्पन्न व त्यातून विदेशी कर्जाच्या परतफेडीकरिता देखील करण्यात येत आहे. त्रिनिदाद व टोबॅगो या देशांमध्ये या निर्देशांकाचा वापर काही वर्षांपूर्वीच सुरू करण्यात आला. नाणे निधी हा निर्देशांक अशा प्रकारे तयार करून देतो की न्यूनविकसित देशांना हे धोरण एका औषधासारखे मिळण्याव्यतिरिक्त काही उपाय उरत नाही असे लेखकाने म्हटले आहे.

या भागात त्यांनी इतरही बाबींचा चिकित्सक अभ्यास केलेला असून नाणे निधीच्या कार्यामध्ये 'युक्तीच्या पिशवी'चा ( bag of tricks ) विशेष उल्लेख केलेला आहे. याला लेखकाने नाणे निधीचे एक प्राणघातक शस्त्र मानले आहे. या युक्तीच्या पिशवीत त्यांनी काही बाबींचा विशेष उल्लेख केला आहे; उदाहरणार्थ, चलनाचे अवमूल्यन, वास्तविक वेतन दरात कपात, सरकारी क्षेत्रातून श्रमिकांची कपात, मागणी व्यवस्थापन लंगडे पाडणे, इत्यादी. या धोरणामध्ये चलनाचे अवमूल्यन करून निर्यातीत वाढ करण्याची युक्ती या सदस्य राष्ट्रांना सांगण्यात आली. पण एकदा या युक्तीकडे वळल्यानंतर आर्थिक क्षेत्रात प्रचंड गोंधळ निर्माण होतो याची कल्पनादेखील न्यूनविकसित राष्ट्रांना नसते. एकदा हे धोरण स्वीकारल्यानंतर आणि ते अनुसरल्यानंतर मग मागे वळून पाहता येत नाही एवढेच नव्हे तर, अधिक अटी मान्य कराव्या लागतात. त्याचवेळेस विदेशांनी दिलेल्या (दुसऱ्या शब्दात, त्यांच्याकडून घेतलेल्या) कर्जाचा बोजा वाढलेला असतो. अशा प्रकारे नाणे निधीचे सदस्य होणे, न्यूनविकसित देशांनी विकासाकरिता नाणे निधीकडून प्रथम कर्ज घेणे, त्यांच्या अटी पाळणे, विकासात किंचित भर पडून परत त्यात उतार दिसू लागणे, परत कर्ज घेण्याची वेळ येणे, असे दुष्टचक्र चालतच राहते.

याबरोबरच इतर परिणामही दिसू लागतात. श्रमिकांच्या वेतनात वाढ होते; विनिमय दरात फेर-बदल होतो; काही उद्योगांच्या उत्पादनात वाढ होते तर काही क्षेत्रे मात्र पूर्णपणे दुर्लक्षित राहतात. असे सर्व बदल घडत असल्याने या देशांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देता येत नाही. या सर्व घटना लेखकाने प्रत्यक्षात अनुभवलेल्या आहेत.

त्रिनिदाद व टोबॅगो या दोन्ही देशांमध्ये RULC निर्देशांकाच्या माध्यमाने वरील चक्र 1985 साला-पासून सुरू झाले. हा निर्देशांक त्या देशांच्या आर्थिक परिस्थितीशी जुळणारा नव्हता. याला लेखकाने ' Manufactured Statistical Indices ' असे नाव दिले आहे. लेखक म्हणतात की, हा निर्देशांक कोण-त्याही न्यूनविकसित देशाच्या वास्तविक परिस्थितीशी जुळणारा नसतो. उलट नाणे निधीला असे अपेक्षित असते की, हा निर्देशांक अमलात आणण्याकरिता न्यून-विकसित देशांनी त्यांच्या आर्थिक स्थितीत आवश्यकते-नुसार बदल करून घ्यावेत असे आदेश या देशांना दिले जातात आणि त्यानुसार त्यांच्या आर्थिक परिस्थितीत प्रचंड बदल करणे आवश्यक असते. असे बदल करणे सोपे नसते. म्हणून निर्देशांकाला अमलात आणण्यास अनेक अडचणी येतात.

या दोन्ही देशांची सांख्यिकी माहिती पडताळ-ल्यास असे लक्षात येते की, 1985 साली नाणे निधी-नुसार हा निर्देशांक या देशांमध्ये 145·8 टक्क्यांची आर्थिक वाढ दर्शवीत होता तर प्रत्यक्षात मात्र ती वाढ 69 टक्केच होती. गेल्या पाच वर्षांमध्ये ही वाढ प्रत्य-क्षात 66 टक्के होती. तर नाणे निधीकडून ती 164·7 टक्के दर्शविण्यात आली. नाणे निधीच्या स्टाफ रिपोर्ट-मध्ये अशा बऱ्याच चुका आढळतात. या अहवालाचे नाव 'Recent Economic Development' (RED) आहे. यात लेखकाच्या मते अनेक आंतरिक चुका आहेत आणि त्या कधीच सुधारता आल्या नाहीत. या निर्देशांकाचा चुका सुधारण्याकरिता काहीही उप-योग झाला नाही. म्हणून दुष्टचक्राचे सावट या देशांवर वाढत गेले. लेखकाने या पद्धतीला 'absurd' मानले आहे.

यापुढे नाणे निधीच्या जशा सूचना येत होत्या त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने या देशांना अवमूल्यन करावे लागत होते. असे आजही चालूच आहे. 1987 मध्ये या देशांना सांगण्यात आले की, नाणे निधीच्या सर्वच अटी मान्य करणे आवश्यक आहे. लेखकाने या पद्ध-तीला 'गरम बटाटा टाकणे" अशी उपमा देऊन ही पद्धती या देशांना सहन करण्यासारखी नव्हती असे स्पष्ट केले.

त्याचा परिणाम असा झाला की, स्थूल राष्ट्रीय उत्पादिताच्या 9 टक्के न फेडलेली सरकारी बिले तुंबून होती. या देशांची दुसरी मुख्य समस्या म्हणजे खनिज तेलाची निर्यात कमी झालेली होती आणि निर्यातीतील तूट वाढून 13 टक्क्यांपर्यंत पोहोचली होती. लेखकाच्या मते यासंबंधित नाणे निधीने प्रसिद्ध केलेले आकडे आणि वास्तविक आकड्यांत 33 टक्क्यांचा फरक होता. अशी आर्थिक स्थिती निर्माण झाली असतानाच या दोन्ही देशांत निवडणुका होऊन नवी सरकारे आलेली होती आणि नवीन आर्थिक स्थितीला तोंड देण्याकरिता नाणे निधीच्या सूचनेनुसार अर्थसंकल्प तयार करण्यात येत होते. नाणे निधीने त्यांना सुचविले होते की, नवीन कर्जे अधिक प्रमाणात घ्या आणि सर-कारी खर्च कमी करा तसेच खाजगीकरण वाढवा.

या दोन्ही देशांच्या विदेशी कर्जाबाबत लेखकाने निराशा व्यक्त करून सांगितले आहे की, तेलाचा उत्तम साठा असणाऱ्या देशांची स्थिती कर्जात बुडल्यामुळे अत्यंत वाईट झाली होती. त्यांचा आयातीच्या परत-फेडीकरिता शिल्लक शुद्ध संकोष अत्यंत कमी व्हाव-याला लागला. इक्वेडोर, नायजेरिया हे पेट्रोल उत्पा-दनात जास्त श्रीमंत देश आहेत. या देशांची स्थिती-देखील अशीच झाली. असेच इंडोनेशिया, मेक्सिको, दक्षिण कोरिया व तैवानमध्ये घडले. त्या काळात दक्षिण आशियाई देशांवर असे प्रयोग सुरू केले नव्हते.

लेखकाने विदेशी कर्जाला एका मोठ्या भारी भक्कम स्टीम रोलरची उपमा दिली आहे आणि या स्टीम रोलररूपी धोरणाचा उपयोग खालीलप्रमाणे केला आहे (पृ 19, परिच्छेद 7) :

(1) मोठ्या प्रमाणात सरकारी क्षेत्र कमी करा.

(2) किंवा या क्षेत्राचे पुनर्वटन (reorganisation) करा.

(3) पुनर्गुंतवण (recapitalisation) करा; म्हणजे लवकरात लवकर खाजगीकरण आणा.

(4) अपगुंतवणूक (disinvestment) वाढवा.

(5) पेट्रोलियम पदार्थांची वाढ करा, त्यांना पुनर्चलित (reactivation) करा.

(6) कृषी व व्यापारात खाजगी व विदेशी गुंतवणूक वाढवा.

(7) पेट्रोल कर आणि देशी करांच्या स्वरूपात बदल करा.

एका देशाच्या मूळ समस्येवर नाणे निधीने कधीच विचार केला नाही अशी खंत लेखकाने व्यक्त केली आहे. उलट अशी सक्ती करण्यात आली होती की, वरील उद्देशांना थोडादेखील धक्का लागावयाला नको. नाणे निधीने त्रिनिदाद व टोबॅगोत करण्यात येणाऱ्या अवमूल्यनाच्या पद्धतीला एका आराखड्याद्वारे व आकडे देऊन स्पष्ट केले होते. त्याला लेखकाने नाणे-निधीचे 'Statistical monkey business' म्हटले आहे. कारण अवमूल्यन करण्याची स्थिती या देशांची

नव्हती. तरीही नाणे निधी या देशांवर सांख्यिकी पद्धतीद्वारे सक्ती करीतच होता. ही पद्धती यशस्वी व्हावी म्हणून या देशांकरिता देण्यात येणारी विदेशी मदत मुद्दाम बंद पाडण्यात आली (freezing of funds). दिवसेंदिवस हे देश फार वाईट स्थिती भोगत आहेत. लेखक म्हणतात, जेव्हा देशात अशा आर्थिक आणि वित्तीय अडचणी येतात तेव्हा अशा देशांना नाणे निधीच्या अशा धोरणांना (deadliest medicine, पृ. 27, परिच्छेद 5) मान्य केल्याशिवाय दुसरा कोणताही उपाय शिल्लक राहात नाही.

लेखकाने या पत्राच्या तिसऱ्या भागात असांख्यिकीय (non-statistical) बाबींवर अधिक भर दिला आहे. त्रिनिदाद व टोबॅगोकरिता नाणे निधीने विशेष अहवाल तयार केला आणि आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता बरेच कार्यक्रम सुचविले. या सुधारणांना 'संरचनात्मक समायोजनातील प्रयत्न' (structural adjustment effort) असे नाव देण्यात आले. या पद्धतीला राबविण्याकरिता विविध कर्जे देण्यात आली. या कर्जांच्या अटींमध्ये अवमूल्यन करण्यावर भर होताच. गरिबांवर वर्धित कर लावा (value added tax) असे आवर्जून सांगण्यात आले.

लेखकाने विशेष भर देऊन सांगितले आहे की, नाणे निधीचा या देशांना या कार्यक्रमाला स्वीकारा म्हणून विशेष आग्रह होता. असे तातडतोब केल्याने येणारे दिवस या देशांच्या विकासाकरिता नवीन मार्ग दाखवितील असा आशेचा किरणही दाखविण्यात आला. जमेकाचे उदाहरण याठिकाणी दिलेले असून या देशासोबत नाणे निधीच्या वाटाघाटी 1980 सालापासून सतत चालू होत्या. असेच समायोजनेचे कार्य त्या देशामध्ये चालले आणि जमेकाची स्थिती एका रिकाम्या टोपलीसारखी झाली. तरीदेखील नाणे निधीने त्यांच्या अटी अधिक कठोरतेने (वर उल्लेखिल्याप्रमाणे गरम बटाटा टाकणे) राबविण्यास भाग पाडले. नाणे निधीचाच जमेकावर आरोप होता की, या देशाचे अधिकारी देशाची आंतरिक सत्य परिस्थिती सांगत नाहीत म्हणून असे घडते. नाणे निधीच्या सदस्यांनी (high priests) वरील नमूद केलेल्या सर्व अटी परत अमलात आणण्यावर जोर दिला आहे. त्यामुळे जमेकाची जी स्थिती झाली होती तीच त्रिनिदाद व टोबॅगोची झाली आहे. म्हणून लेखकाने यासारख्या स्थितीला 'even handedness' असे म्हटले आहे (पृ. 38, परिच्छेद 1). नाणे निधी मात्र असे सर्व घडवून आणण्यात यशस्वी झाली.

नाणे निधीच्या कार्याचे हे स्वरूप पाहून काही देशांनी त्याला विरोध केला. 24 मे, 1989 मध्ये नाणे निधी सदस्यांनी सांगितले की, प्रत्येक कर्ज घेणारा देश त्यांना त्यांच्या देशाची सत्य परिस्थिती सांगत नाही, म्हणून नाणे निधीच्या कार्यात अडथळे येतात. पण काही राष्ट्रांनी विरोधी चळवळ चालू ठेवली. पेरू, घाना, इजिप्त, टांझानिया, इत्यादी राष्ट्रांनी या विरोधी कार्यात पुढाकार घेतला आणि अनेक लेखांच्या प्रकाशनातून जनजागृतीचे कार्य चालू ठेवले.

लेखकाचे असे प्रामाणिक मत आहे की, अशी जनजागृती जगभर व्हावयाला हवी आणि जगातील प्रत्येक स्त्री व पुरुषाने नाणे निधीने तयार केलेली अटींची साखळी तोडण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. 1944 सालापासून चालू असलेली नाणे निधीची कार्ये तिसऱ्या जगाला निर्बल करीत आहेत आणि या देशांना त्याचा कोणताही फायदा मिळू शकला नाही अशी निराशा लेखकाच्या लिखाणातून जाणवते.

नाणे निधीने 1944 सालापासून ज्या बहुउद्देशीय व्यापार आणि शोधन व्यवस्थेच्या सोई तिसऱ्या जगाकरिता करण्याचे योजिले होते. त्याला फारसे महत्त्व दिले नाही. न्यूनविकसित देशांच्या मुख्य समस्यांकडे कधीच लक्ष दिले नाही. 1950 साली या देशांच्या विकासाकरिता योजिलेल्या योजना कागदोपत्री राहिल्या तर नाणे निधीच्या अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक आकांक्षा आणि शक्तींना तसेच चैन व भौतिक सुखांना वाढविण्याचे प्रयत्न मात्र भरपूर झाले.

'Pax Atlantica' व 'Pax honey pot' (मधाची वाटी) या शब्दांचा उपयोग लेखकाने चौथ्या भागात केलेला आहे. याचा अर्थ असा की, तिसऱ्या जगात सर्व बदल घडवून आणण्याकरिता अधिकारी वर्गाला भरगच्च पगार व सोई दिल्या जातात. त्याकरिता निरंकुश धोरणाचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र (अॅडॅम स्मिथनी सांगितलेले) नाणे निधीने प्रथम

स्वीकारले (पृ. 46, परिच्छेद 3). कोणत्याही सामाजिक कल्याणकारी योजनांवर भर देण्यात आला नाही. लेखकाच्या मते असे केल्यानेच राजा आणि भिकाऱ्याची भूमिका नाणे निधी तयार करू शकली. गरीब वर्गाच्या आकांक्षा कधीच पूर्ण होऊ शकल्या नाहीत.

न्यूनविकसित देशांविरुद्ध सुरू केलेल्या योजनांना राबविण्याकरिता या निधीचा एक विशेष अधिकारी वर्ग होता. सर्व धोरणांना आकार देण्यात त्याची मुख्य भूमिका होती. या अधिकारी वर्गात युरोप व उत्तर अमेरिकेतील तंत्रज्ञ व जाणकारांची अधिक संख्या ठेवण्यात आली. त्यामुळे कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेताना या तज्ज्ञांचा प्रभाव पडतो आणि निर्णय नाणे निधीच्या ठरविलेल्या योजनेनुसार होतो. यावर बुधोंनी प्रखर टीका केली असून या सर्व पद्धतीचा प्रथम जगाला कसा फायदा मिळत गेला याचा उल्लेख केला आहे. तिसरे जग कायम दबावात राहिले आणि त्याचे भरपूर शोषण झाले.

मधाच्या वाटीसंबंधी अधिक खुलासा लेखकाने दिला आहे. नाणे निधीच्या अधिकाऱ्यांना जगातील सर्वोत्तम वस्तू भेट म्हणून दिल्या जातात. या वर्गाच्या भौतिक सुखात कशी वाढ होईल याची काळजी घेतली जाते. लेखक म्हणतात की, ही भौतिकवादाची पुनरावृत्तीच होय ( materialism breeds materialism ). हा असा वाढता भौतिकवाद मानवतेकडे दुर्लक्ष करतो आणि न्यूनविकसित देशांच्या सामाजिक न्यायाला महत्त्व देत नाही. ही संस्था आत्माविहीन ( soulless ) आहे असे उद्गार लेखकाने काढले आहेत (पृ. 52–53). बुधोंच्या मते हे नवीन नसून 1944 सालापासूनच नाणे निधी अधिकारी वर्गाकरिता अशाच सुविधा देत आला आहे. स्वतः लेखक नाणे निधीच्या कार्यकारी मंडळात असल्याने त्यांनी त्यांच्या मधाच्या वाटीचा उल्लेख केला आहे. त्यांच्या पगार व इतर सवलतींची संपूर्ण रसाळ माहिती त्यांनी दिली आहे. त्यांचा पगार तेव्हा 1,43,000 अमेरिकी डॉलर होता. त्याशिवाय कार्यकारी प्रवासाचे भाडे आणि इतर लाभ वेगळेच. लेखकाच्या कुटुंबियांना हव्या त्या सोयी उपलब्ध होत्या. ज्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबांचा आकार मोठा होता त्यांच्या मुलांना शिक्षण, वैद्यकीय सोई आणि त्याप्रमाणे अधिक वेतनसुद्धा दिले जात असे. या सोई व पगार तिसऱ्या जगाच्या पंतप्रधान किंवा राष्ट्रपतीच्या पगारापेक्षा 10 पटीने अधिक होत्या. अधिकाऱ्यांना स्वतःच्या घरी जाताना उत्कृष्ट आरामाच्या सोईसवलती उपलब्ध केल्या जातात.

तिसऱ्या जगाच्या वित्तमंत्र्यांना व मध्यवर्ती बँकेच्या लोकांना अशी मधाची वाटी आणखी आकर्षक करून दिली जात असे. या वर्गाला सांगण्यात येत होते की, नाणे निधी त्यांना सहकार्य देईल आणि त्यांनी निधीला सहकार्य द्यावे. लेखकाने त्याला, " I stretch your back and you stretch mine " या शब्दांत मांडले आहे (पृ. 56, परिच्छेद 3).

तिसऱ्या जगात पुनर्निर्माणाची प्रक्रिया सुरू झाल्याने त्या देशांच्या आर्थिक विकासात काही विशेष भर पडली नाही. त्यामुळे निधीने विस्तारित व्यापक स्वरुपाची योजना सुरू केली. ती म्हणजे ' Establishment of Enhanced Adjustment Facility ' (ESEF). या योजनेच्या अंतर्गत न्यूनविकसित देशांना आर्थिक साहाय्य देणे, एस. डी. आर. चे प्रमाण वाढविणे, इत्यादी बाबी समाविष्ट केल्या.

या योजना प्रत्यक्षात यशस्वी व्हाव्यात म्हणून नाणे निधीच्या वार्षिक सभेत अधिक आकर्षक सोईसवलती दिल्या जात होत्या. या सभेत तिसऱ्या जगाच्या अधिकाऱ्यांना सातआठ दिवस चैन व मजा करू दिल्यानंतर पुढील वर्षाचे आमंत्रण दिले जाते. आणि योजनांसंबंधी अटी आणखी अवघड केल्या जात होत्या. अशा देशांतील दारिद्र्यनिर्मूलनाचे कार्य फक्त नावापुरतेच राहात होते. ESAF ची सर्व सूत्रे जागतिक बँक व नाणे निधीच्या हातातच होती. इतर न्यूनविकसित देशांच्या सभासदांना या पद्धतींचे गूढ सांगितले जात नव्हते. तेव्हा या योजनांचा पहिला टप्पा कसा गाठावयाचा हे बुधोंसारख्या अधिकाऱ्यांना माहीत नव्हते. तिसऱ्या जगातील सामान्य माणसांना तर याची काहीच कल्पना नव्हती.

तिसऱ्या देशाचे दारिद्र्य आणि नाणे निधीच्या कार्यक्रमासंबंधी माहिती लेखकाने या पत्राच्या या चौथ्या भागात दिलेली आहे. नाणे निधीच्या अधिकारी

वर्गाने वरील कार्यक्रमाबाबत आणि दारिद्र्यनिर्मूलना–संबंधी वरवर केलेल्या कार्याबद्दल बरीच टीका केली. नाणे निधीने अशा देशांचे वार्षिक अहवाल सादर करण्याव्यतिरिक्त या कामात कोणतीच प्रगती केली नाही. नाणे निधीच्या काही संशोधकांनी 1988 साली जगभर फिरून यासंबंधी निबंध तयार केले आणि UNICEF नावाची नवीन संस्था सुरू केली. या संस्थेने-देखील न्यूनविकसित देशांना स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करा, किमतींमध्ये स्थैर्य आणा असे नेहमीप्रमाणेच उपाय सुचविले. लेखकाच्या मते नाणे निधीने फार महत्त्वाचे काम केले असे मुळीच नाही. उलट या संस्थांच्या काही अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणेच न्यून–विकसित देशांवर टीका केली की, पुरेशी भांडवल–निर्मिती न झाल्याने तिसरे जग मागासलेले आहे.

तिसऱ्या जगाच्या लोकांचे दारिद्र्य दूर होईल अशी आशा बाळगली जात होती. पण लेखकाने पर–खडपणे मांडले आहे की, प्रत्यक्षात मात्र झाले ते असे : " He spoke of a mountain, but when the time came for delivery, he could only pro–duce a mouse " (पृ. 65). न्यूनविकसित देशांचा 1945 सालापासून युद्धसामग्रीवर खर्च सातत्याने वाढत आहे. 1980 मध्ये तिसऱ्या देशांनी 60 अब्ज डॉलर सैन्य व शस्त्रांवर खर्च केला आहे. 1983 पर्यंतच यात 50 टक्क्यांनी वाढ करण्यात आली. या वर्षी तिसऱ्या जगातील कुपोषित लोकांचा आकडा 500 लक्ष होता. त्यात 75 टक्के लोकांना पिण्याचे पाणीही पुरेसे मिळत नव्हते. तरीदेखील तिसऱ्या देशातील अधिकारी वर्ग मोठ्या प्रमाणात युद्धसामग्रीवर खर्च करावयाला तयार होते. त्यामुळे तिसऱ्या जगातील बहुतांश लोकांनी आपल्या अर्थसंकल्पाची संरचना बद–लली होती. या देशांना वित्तीय स्थैर्य आणणे आणि संरचनात्मक समायोजन करणे आवश्यक होते. 11 टक्के हिस्सा दारिद्र्यनिर्मूलनावर खर्च करण्यात यावा आणि संरक्षणावरील खर्च 5 टक्के असावा अशी अट होती. या पद्धतीने गरिबांचे अधिक शोषण होऊ लागले. कारण युद्धसामग्री मोठ्या प्रमाणात विकत घेतल्यानंतर त्या पैशाची परतफेड करण्यासाठी गरिबांवर अधिक कर, अप्रत्यक्ष करात वाढ, आणि सार्वजनिक सेवेत कपात इत्यादी मार्ग अनुसरण्यात आले.

हे देश जागतिक बँकेच्या हातातले बाहुले झालेले आहेत. जागतिक बँकेने पूर्वीच जोर देऊन स्पष्ट केले होते की, प्रत्येक देशाच्या सार्वभौमत्वाकडे लक्ष देणे त्याला आवश्यक वाटत नाही. त्यामुळे एका बाजूने मानवी शोषण आणि दुसऱ्या बाजूने जेट–रॉकेटची खरेदी करणे असे विरोधी स्वरूप दिसून येते. म्हणून अशा धोरणाला धरून वित्तीय समायोजन केले जात होते. याला प्रसिद्धी देण्याकरिता जागतिक बँकेने 'वित्त व विकास' या शीर्षकाखाली स्वतःचेच अभिनंदन करणारे प्रकाशन (self-congratulation publication) काढले आहे. त्यात या देशांच्या दारि–द्र्याच्या स्थितीचा काहीच विचार केलेला नाही.

आता स्थिती अशी आहे की, तिसऱ्या जगाच्या मूळ समस्या इतक्या वाढल्या आहेत की, त्यांची सर्व उद्दिष्टे पूर्ण करणे अत्यंत कठीण झाले आहे. एक समस्या दूर झाल्यास दुसरी समस्या उभी राहते. याला अपवाद असलेले देश आहेत युगोस्लाविया आणि ग्रेनेडा. या देशांनी सामाजिक सुरक्षिततेत बरीच समाधान–कारक प्रगती केली आहे. या पत्रात लेखक लिहितात की, नाणे निधीने मागील दशकात (1980–90) समाजवादी देशांना त्यांच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल करावा असे आवाहन केले. त्याकरिता पाश्चिमात्य पद्धती स्वीकारून मुक्त व्यापाराकडे वळावे म्हणजे तेथील दारिद्र्य दूर होईल असे सुचविले. तेव्हाच लेखकासह इतर अधिकाऱ्यांकडे तिसऱ्या जगात रीगनचा पैसावाद (Reaganite monetarism) पोहोचवि–ण्याचा आग्रह धरला (पृ. 82–83). तेव्हा लेखकाच्या लक्षात आले की, त्यांच्यापैकी काही अधिकारी असे करण्यास उत्सुक होते, कारण अधिकाऱ्यांचे वेतन त्या–वेळेस बरेच वाढविण्यात आले, सवलती व सोयी वाढ–विल्या गेल्या. त्याचबरोबर पुढील उपायही अमलात आणले :

(1) या देशांच्या वित्तव्यवस्थेवर बाह्य प्रतिबंध लावण्याकरिता कर्ज समिती स्थापन केली गेली आणि तिची सर्व सूत्रे नाणे निधीच्या हातात होती.

(2) सल्ला देण्याकरिता व पुनर्मूल्यांकन कर–ण्याकरिता एक समिती स्थापन करण्यात आली. त्याच्या काही विशेष अटी, तांत्रिक सल्ला व दुरुस्त्या सांगण्यात आल्या.

(3) क्षेत्रीय सहकारी समिती देशाच्या आर्थिक मूल्यांकनाकरिता स्थापन करण्यात आली आणि आवश्यकतेनुसार निर्णय घेण्याचे अधिकार तिला देण्यात आले.

(4) 'Watchdog Committee' (पृ 86, परिच्छेद 1) : या समितीत पहिल्या आणि तिसऱ्या जगातील देशांतील राजकीय व धार्मिक क्षेत्रांतील अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, न्यायाधीश, श्रमसंघटक, इत्यादी निवडले जातात आणि नाणे निधीला आवश्यक असलेली कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात.

अशा प्रकारे या संस्थेने तिसऱ्या जगातील देशांची सर्वच अर्थरचना आपल्या हातात घेतली आणि तिचे चक्र ती पुढीलप्रमाणे चालवीत आहे : दीर्घकालीन वित्तीय मदत व तांत्रिक मदत देणे, आर्थिक सल्ला देणे (लेखकाने याला 'grand design' नाव दिले आहे), आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे, विदेशी गुंतवणुकीवर भर देणे आणि तिसऱ्या देशांचे निर्णय आपल्या हातात ठेवणे, इत्यादी.

या देशांच्या आर्थिक स्थितीचे मूल्यमापन करताना दोन पद्धती उपयोगात आणल्या जातात.

(1) देशाच्या नेत्यांबरोबर दीर्घकालीन बैठक करून देशासंबंधी सर्व माहिती काढणे.

(2) देशाच्या मध्यवर्ती बँकेमार्फत देशाच्या भांडवली क्षमतेचा अंदाज बांधणे आणि विदेशी विनिमय तूट भरून काढण्यावर भर देणे.

तिसऱ्या देशाच्या कार्यक्रमाकरिता नवीन दिशा देण्याचे कार्य खालीलप्रमाणे अनुसरण्यात आले :

(1) सामाजिक, आर्थिक विकासाकरिता जागतिक बँकेची मदत.

(2) तांत्रिक साहाय्य देणे.

(3) कर्जाचे स्वरूप विस्तृत करणे. त्यातून जागतिक बँकेने आपली ढवळाढवळ तिसऱ्या जगाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात वाढविली. विकासात्मक कामाकरिता व मर्यादित क्षेत्रांकरिता कर्जे दिली जातात आणि जागतिक बँकेच्या अनुशासनाखाली असे काम करावे लागते.

लेखकाने पाचव्या भागात जगाच्या कर्ज समस्येबद्दल माहिती दिली आहे. नाणे निधीद्वारे 1983 सालापासून तिसऱ्या देशांच्या कर्जाची पूर्वतपासणी चालू आहे आणि कर्ज देताना पैसावाद (monetarism) कसा वाढेल यावर भर दिला आहे (पृ. 97, परिच्छेद 1) आणि दक्षिण देशांच्या पाश्चिमात्यीकरणावरही भर दिला आहे. प्रत्यक्षात आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरेबियन देश, आशिया या प्रदेशांमध्ये मुक्त बाजाराचा पुरस्कार करण्यात आला आहे. खनिज तेल उत्पादक व निर्यातक देशांनी 1978–81 पासून नाणे निधीच्या म्हणण्यानुसार खनिज पदार्थांच्या किमती वाढविल्या आहेत. त्यामुळे स्थानिक लोकांवरही त्याचा परिणाम होऊन दारिद्र्याचे प्रमाण या देशांत वाढले आहे.

या भागात नाणे निधीच्या खाजगीकरणाविषयीही माहिती दिलेली आहे. तिसऱ्या जगाने कोणत्या पद्धतीने खाजगीकरण स्वीकारावे ही माहिती नाणे निधीने वॉशिंग्टन, लंडन व टोकियो येथून दिली. ही पद्धती स्वीकारल्यास कर्जमाफी करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या. "Grow out of debt" असे तिसऱ्या जगाला सांगण्यात आले (पृ. 102–3) आणि कर्जमाफीकरिता स्वतंत्र कार्यक्रम आखण्यात आले. असे कार्यक्रम 1990 सालापर्यंतच राबविण्यात यावे अशी सूचना देऊन मुक्त भांडवली अर्थव्यवस्थाही तेव्हाच चालू करण्यात आली आणि त्यावर अधिक गती देण्यावर भर दिला गेला.

लेखकाने विशेष नमूद केले आहे की, या संस्थेचे प्रमुख कमडसेस आणि चर्चिल यांचे स्वप्न 1990 मध्ये पूर्ण झाले. 1990 साली या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी घोषित केले की, तिसऱ्या जगाबरोबर त्यांच्या वाटाघाटी झालेल्या आहेत आणि या देशांना आता विकासाची नवीन दिशा मिळाली आहे. बुवांनी या घोषणेला व कार्याला परिसरांचे अधिक शोषण मानले आहे.

1983–90 सालापासून चालत आलेल्या कर्जसंरचनेत कर्जाऊ देशांनी नाणे निधीच्या सर्व अटी मान्य

करणे आवश्यक होते. जो देश या अटींचा विरोध करीत होता त्याला 'erring country' असे घोषित केले जात होते तसेच त्यांना शासनही केले जात असे. यात नाणे निधी यशस्वी झाली. तिसरे जग नाणे निधीसमोर गुडघे टेकून त्यांच्या सर्व अटी मान्य करावयाला लागले (पृ. 102). या देशांमध्ये मुख्य सहभाग पेरू, ब्राझील, अर्जेन्टिना, नायजेरिया यांचा होता. दक्षिणेतील देशही नाणे निधीची आज्ञा मानत होते. जे देश आज्ञांचे पालन करीत नव्हते ते सर्व नाणे निधीच्या काळ्या यादीत आले तर अनेक देशांना या कालात ठराविक अटी मान्य करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नव्हता.

कर्जाच्या स्थितीवर अधिक कडक नजर ठेवण्याकरिता सतत नवे कार्यक्रम आखले जात होतेच. जागतिक बँकेचे अधिकारी कर्जभार असलेल्या देशांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजनैतिक स्थितीची स्वतः पाहणी करतात. हुकुमशाही पद्धतीप्रमाणे हे कार्यक्रम राबविले जात होते. लेखकाने स्पष्टपणे मांडले आहे की, या देशांमध्ये निवडून आलेल्या सरकारला आमच्या पायावर पाय देऊन चालावे लागले. लेखकाच्या मते हा "off on, on off" चा खेळ होता. जोपर्यंत या देशांत राजकीय स्थैर्य येत नाही तोपर्यंत त्या देशांना आंतरराष्ट्रीय मदत मिळत नव्हती. हे एका विशिष्ट कालावधीपर्यंतच घडवून आणावयाचे होते. या देशांना अशी ताकीद दिली होती की, 1990 पर्यंतच नाणे निधीने सर्व कार्यक्रम राबविला पाहिजे. त्याला बुघोंनी 'watershed date' अशी उपमा दिली आहे.

मुक्त बाजारव्यवस्था आणण्याकरिता कायदेशीर व संस्थात्मक आराखडा तयार करण्यात आला. 1980 साली सर्व सदस्यांची एक विशेष सभा राष्ट्राध्यक्ष रीगन यांनी घेतली होती. त्याचा मुख्य उद्देश तिसऱ्या जगात मुक्त बाजार व भांडवलवाद लवकरात लवकर आणावा असा होता (पृ. 102, परिच्छेद 1). अति न्यूनविकसित 62 देश संरचनात्मक समायोजन करण्याकरिता निवडले गेले. त्यात दक्षिणेतील न्यूनविकसित देश होते. लेखकाने लिहिले आहे की, रीगनने स्पष्ट सांगितले होते की, या देशांमध्ये खाजगीकरण आणा नाहीतर त्यांना मरू द्या. या वागणुकीला बुघोंनी 'New Jerusalem of Reaganomics' अशी उपमा दिली आहे.

मुक्त व्यापार पद्धतीकरिता दोन विभागांमध्ये योजना मांडल्या गेल्या. पहिल्या विभागात 1983–85 साली दक्षिणेकडील विकसित देशांकरिता योजना आखली होती आणि दुसऱ्या विभागात बेकर योजना मांडण्यात आली.

पहिल्या विभागात योजलेल्या योजना 12 ते 18 महिन्यांत सुरू झाल्या पाहिजेत असा नाणे निधीचा आग्रह होता. या योजनांमध्ये चलनाचे अवमूल्यन भावफुगवटयाचा दर घटविणे, वास्तविक मजुरी दरात घट करणे, अंतर्देशीय व्याज दरात वाढ, इत्यादी राबविण्यावर भर देण्यात आला. एकूण 30 पर्यायी कार्यक्रम 1983 मध्ये सुरू करण्यात आले आणि एकवीसच राबविता आले. याचा परिणाम काही देशांच्या अर्थव्यवस्थेवर उलटा झाला. त्यांच्या भावफुगवटयात प्रचंड वाढ झाली, आंतरराष्ट्रीय समतोलातील देण्याघेण्याची प्रतिकूलता वाढली. बाह्य कर्जाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 70 टक्क्यांनी वाढले. अवघ्या तीन वर्षांमध्येच असे परिणाम दिसावयाला लागले. घाना, ग्वाटेमाला, मालावी, युगांडा, युरुग्वे, झिम्बाब्वे, झांबिया, सीरिया यांना सर्वाधिक फटका बसला. लॅटिन अमेरिका, कॅरिबिया, आफ्रिका व आशियाला मानवीय तत्त्वांच्या विरोधात समायोजन करावे लागले.

दुसऱ्या विभागात जी योजना मांडली त्याला 'debt plot' किंवा 'Baker initiative' म्हणतात. लेखकाने या योजनेला "Ali Baba - Sim-Sim-Open-Open" याची उपमा दिली. कर्जफेडीच्या त्रासातून मुक्त करण्याकरिता संरचनात्मक समायोजनेला नवीन रूप देऊन सामाजिक बदल हा नवीन शब्द व्याख्येत जोडला गेला. प्रथमतःच प्रत्येक देशाच्या सामाजिक स्थितीला प्राधान्यता दिली गेली पण आर्थिक बाबींना नाही.

शेवटी लेखक स्पष्ट करतात की, अशा सर्व कार्यक्रमांचा मुखवटा बुघोसारख्या अधिकाऱ्यांनी घातला होता आणि ते चेहरा लपविण्याचा प्रयत्न करीत होते. तिसऱ्या जगाच्या चार प्रमुख समस्या म्हणजे वित्तीय कमतरता, पैसाविषयक धोरण, विनिमय व व्यापार पद्धती आणि बाह्य कर्ज या होत. त्या या देशांची आर्थिक बाजू बळकट होऊ देत नाहीत हे नाणे निधीच्या

सर्व अधिकाऱ्यांना चांगले माहीत होते. तरीही या देशांना असेच सुचविले जात होते की, खाजगी क्षेत्र वाढविण्यात यावे आणि चैनीच्या वस्तूंची आयात वाढवावी. त्याबरोबरच आयातीचे शिथिलीकरण करण्यावर सतत जोर दिला जात होता. चलनाचे अवमूल्यन सुरूच होते. म्हणजे पूर्वीपासून लादलेल्या अटी तर बदलल्या नाहीतच मात्र नव्याने काही अटी लादण्यात आल्या. उदाहरणार्थ, नवीन अटींमध्ये शेती क्षेत्राच्या स्वरुपात बदल करण्याचे सुचविले. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यात ( subsidy ) कपात करावयाला सांगितले. असे लवकरात लवकर व्हावे यावर नाणे निधीचा जोर होता. असे केल्याने ते देश अधिक गरीब होतील हे लेखकासह सर्वांना माहीत होते. लेखकाने याला नाणे निधीची " beggar-my-neighbour policy " असे नाव दिले आहे.

लेखकाने त्यांच्या या पत्रात 1944 सालापासून चालत असणारी तिसऱ्या देशांची आर्थिक कुचंबणा स्पष्ट केली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांनी नमूद केलेले उद्देश कधीच पूर्ण केले नाहीत. प्रामुख्याने आफ्रिकी व लॅटिन अमेरिकी देशांची स्थिती अधिक बिकट होण्याचे कारण या पतसंस्थाच आहेत असे खुले करून मांडले आहे. हे पत्र भारतातील प्रत्येकाने वाचून त्यावर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे, कारण आफ्रिकी व लॅटिन अमेरिकी देशांप्रमाणे 1991 सालापासून असे सर्व प्रयोग आपल्या व इतर आशियाई देशांमध्ये सुरू झालेले आहेत. ही स्थिती निश्चितच चिंताजनक असून या बाबतीत लोकांनी जागरूक होण्याची गरज आहे.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## (अ) परिषदेची प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : आणखी चिकित्सक निबंध,** 1977, पृष्ठे 226, किंमत रु. 20.

(2) मो. वि. भाटवडेकर — **शिक्षणाचे अर्थशास्त्र,** 1978, पृष्ठे 157 (वितरण : व्हीनस प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे), किंमत रु. 20.

(3) भ. म. बापट — **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण,** 1982, पृष्ठे 333 (वितरण : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे) (आवृत्ती संपली), किंमत रु. 50.

(4) नी. वि. सोवनी — **अर्थमीमांसा,** 1995, पृष्ठे 345 (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे. क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029), किंमत रु. 250.

## (आ) परिषदेला देणगीरूपाने मिळालेली आणि परिषदेकडून विक्रीस उपलब्ध प्रकाशने

(1) नी. वि. सोवनी — **त्राका विचारसरणी : चार व्याख्याने,** पृष्ठे 64 (प्रकाशक : नी. वि. सोवनी), किंमत रु. 10.

(2) नी. वि. सोवनी — **अर्थसिद्धान्त : काही चिकित्सक निबंध,** 1972, (प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, पुणे).

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले कोश व भाषाप्रवेश

| अनु. | कोश | संपादक | किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| (1) | इंग्रजी–मराठी स्थापत्य शिल्पकोश | श्री. रा. वि. मराठे | 15 |
| (2) | उर्दू–मराठी शब्दकोश | श्री. श्रीपाद जोशी<br>श्री. एन. एस. गोरेकर | 50 |
| (3) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2 ( संस्कृत-संस्कृत ) | पं. वेणी माधवशास्त्री जोशी व पं. ना. ह. जोशी | 50 |
| (4) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2 ( संस्कृत–संस्कृत–मराठी ) | ,, ,, | 75 |
| (5) | वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा ( वनस्पतीशास्त्र व्याख्यासंग्रह ) | डॉ. गो. रा. परांजपे | 10 |
| (6) | मराठी वाङ्मयकोश खंड 1 | श्री. गं. दे. खानोलकर | 50 |
| (7) | तामिळ–मराठी शब्दकोश | सौ. रमाबाई जोशी<br>श्री. पु. दि. जोशी | 74 |
| (8) | मराठी–कन्नड शब्दकोश | श्री. गुरुनाथ दिवेकर | 74 |
| (9) | गुजराती–मराठी शब्दकोश | श्री. स. ज. धर्माधिकारी | 15 |
| (10) | कन्नड भाषा प्रवेश | श्री. गु. व्यं. दिवेकर | 13 |
| (11) | बंगाली भाषा प्रवेश खंड 1 | श्री. स. ग. सुखटणकर | 16 |
| (12) | बंगाली भाषा प्रवेश खंड 2 | ,, ,, | 16 |
| (13) | मल्याळम भाषा प्रवेश | श्री. रा. बं. जोशी | 28 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केन्द्रांवर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई 400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद 431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे 411 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर 440 001.

# सांख्यिकी पुरवणी - (27)

# भारतीय अर्थव्यवस्था : स्वातंत्र्योत्तर वाटचाल (1)

संकलन : रवीन्द्र दोशी *

## स्थूल देशांतर्गत उत्पादिताची (GDP) उद्योगनिहाय क्षेत्रीय रचना

(प्रतिवर्ष टक्केवारी)

| क्षेत्र | 1950-51 ते 1995-96 | 1950-51 ते 1964-65 | 1965-66 ते 1975-76 | 1976-77 ते 1991-92 | 1992-93 ते 1995-96 |
|---|---|---|---|---|---|
| **1 शेती व संबंधित उद्योग** | **42.0** | **51.9** | **42.9** | **35.3** | **28.8** |
| 1.1 शेती | 37.8 | 46.4 | 38.0 | 32.3 | 26.9 |
| 1.2 संबंधित उद्योग | 4.2 | 5.5 | 5.0 | 3.9 | 2.0 |
| **2 उद्योग** | **19.7** | **15.1** | **19.2** | **22.8** | **25.4** |
| 2.1 खनिकर्म व दगड उद्योग | 1.5 | 1.2 | 1.4 | 1.7 | 1.9 |
| 2.2 वस्तुनिर्माण | 16.8 | 13.3 | 16.6 | 19.2 | 20.9 |
| 2.3 वीज, वायू व पाणी पुरवठा | 1.3 | 0.5 | 1.2 | 1.9 | 2.6 |
| **3 सेवा** | **38.3** | **33.0** | **37.9** | **41.9** | **45.8** |
| 3.1 बांधकाम | 4.7 | 3.8 | 5.0 | 4.7 | 4.4 |
| 3.2 व्यापार | 10.4 | 8.8 | 10.3 | 11.5 | 12.5 |
| 3.3 हॉटेल व उपाहार गृहे | 0.7 | 0.6 | 0.6 | 0.7 | 0.9 |
| 3.4 रेल्वे | 0.9 | 0.8 | 0.9 | 0.9 | 0.7 |
| 3.5 इतर परिवहन | 2.5 | 1.6 | 2.2 | 3.2 | 3.9 |
| 3.6 साठवण | 0.1 | 0.1 | 0.1 | 0.1 | 0.1 |
| 3.7 दळणवळण | 0.5 | 0.3 | 0.5 | 0.7 | 0.8 |
| 3.8 बँक व्यवसाय व विमा | 2.8 | 1.5 | 2.0 | 3.7 | 6.6 |
| 3.9 स्थावर संपदा | 6.2 | 7.1 | 6.3 | 5.7 | 4.8 |
| 3.10 सरकारी प्रशासन व संरक्षण | 3.9 | 2.5 | 3.9 | 5.0 | 5.1 |
| 3.11 इतर सेवा | 5.9 | 5.9 | 6.0 | 5.7 | 5.9 |
| **घटक परिव्ययानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादित** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** |

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

## सर्वसाधारण कालखंड व कठीण वर्षे यांचा अभिवृद्धी दर

(प्रतिवर्ष टक्केवारी)

| क्षेत्र | 1950-51 ते 1956-57 | 1957-58 | 1958-59 ते 1964-65 | 1965-66 | 1966-67 ते 1971-72 | 1972-73 | 1973-74 ते 1978-79 | 1979-80 | 1980-81 ते 1990-91 | 1991-92 | 1992-93 ते 1995-96 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1 शेती व संबंधित उद्योग** | **3·4** | **–4·5** | **2·0** | **–11·0** | **5·0** | **–5·0** | **3·6** | **–12·8** | **3·1** | **–2·3** | **2·9** |
| 1·1 शेती | 3·8 | –5·1 | 2·0 | –13·5 | 5·4 | –5·6 | 4·1 | –13·4 | 3·3 | –2·6 | 2·8 |
| 1·2 संबंधित उद्योग | 0·5 | 0·6 | 2·5 | 11·1 | 2·1 | –0·3 | –0·5 | –7·2 | 0·7 | 1·2 | 3·2 |
| **2 उद्योग** | **6·1** | **4·4** | **8·2** | **2·1** | **5·0** | **4·1** | **6·5** | **–2·6** | **7·6** | **–1·9** | **10·1** |
| 2·1 खनिकर्म व दगड उद्योग | 3·7 | 6·5 | 7·6 | 11·8 | 1·1 | 5·9 | 5·4 | 1·1 | 7·7 | 3·7 | 5·9 |
| 2·2 वस्तुनिर्माण | 6·3 | 3·9 | 8·0 | 0·9 | 5·0 | 3·9 | 6·3 | –3·2 | 7·4 | –3·7 | 10·7 |
| 2·3 वीज, वायू व पाणी पुरवठा | 8·5 | 15·2 | 12·9 | 10·4 | 9·4 | 4·7 | 9·6 | 1·2 | 8·9 | 9·6 | 8·3 |
| **3 सेवा** | **4·2** | **1·7** | **5·8** | **3·2** | **4·3** | **2·8** | **5·7** | **1·0** | **6·5** | **4·6** | **7·5** |
| 3·1 बांधकाम | 7·0 | –12·2 | 8·0 | 6·7 | 2·6 | 2·3 | 7·1 | 5·3 | 4·6 | 2·2 | 4·7 |
| 3·2 व्यापार | 5·3 | 2·2 | 6·9 | 0·6 | 4·4 | 0·4 | 6·8 | –3·2 | 6·1 | 0·9 | 10·9 |
| 3·3 हॉटेल व उपाहार गृहे | 4·8 | 1·7 | 6·9 | 1·1 | 4·4 | 0·3 | 6·9 | –3·5 | 6·3 | 2·0 | 14·6 |
| 3·4 रेल्वे | 3·9 | 10·1 | 5·4 | 7·6 | 3·5 | 4·1 | 6·3 | 1·5 | 4·1 | 6·0 | 2·6 |
| 3·5 इतर परिवहन | 5·0 | 5·5 | 7·2 | 3·9 | 5·2 | 9·2 | 6·5 | 6·4 | 8·5 | 5·4 | 7·6 |
| 3·6 साठवण | 2·0 | 0·0 | 2·3 | 7·3 | 2·4 | 3·8 | 20·0 | 8·6 | 3·7 | –1·1 | 2·1 |
| 3·7 दळणवळण | 7·0 | 1·7 | 8·4 | 6·2 | 5·5 | 5·5 | 6·3 | 8·1 | 6·1 | 6·9 | 15·2 |
| 3·8 बँकव्यवसाय व विमा | 7·5 | 12·1 | 6·7 | 4·4 | 9·4 | 6·3 | 12·1 | –3·5 | 13·0 | 17·4 | 9·8 |
| 3·9 स्थावर संपदा | 2·2 | 2·2 | 2·4 | 2·6 | 2·7 | 3·0 | 3·1 | 3·2 | 3·6 | 3·2 | 3·7 |
| 3·10 सरकारी प्रशासन व संरक्षण | 4·0 | 7·8 | 9·1 | 3·6 | 7·2 | 3·7 | 4·8 | 7·1 | 7·7 | 2·1 | 3.4 |
| 3·11 इतर सेवा | 2·7 | 3·2 | 4·1 | 4·2 | 3·5 | 3·0 | 2·4 | 7·5 | 5·5 | 5·9 | 5·6 |
| **घटक परिव्ययानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादित** | **4·0** | **–1·2** | **4·3** | **–3·7** | **4·7** | **–0·3** | **5·0** | **–5·2** | **5·5** | **0·8** | **6·8** |

## उद्योगनिहाय प्रवृत्तीदर्शक (trend) अभिवृद्धी दर

(प्रतिवर्ष टक्केवारी)

| क्षेत्र | 1950–51 ते 1995–96 | 1950–51 ते 1964–65 | 1965–66 ते 1975–76 | 1976–77 ते 1991–92 | 1992–93 ते 1995–96 |
|---|---|---|---|---|---|
| **1 शेती व संबंधित उद्योग** | **2·4** | **2·5** | **3·1** | **2·9** | **2·9** |
| 1·1 शेती | 2·6 | 2·7 | 3·2 | 3·1 | 2·8 |
| 1·2 संबंधित उद्योग | 1·3 | 1·6 | 2·2 | 0·2 | 3·2 |
| **2 उद्योग** | **5·6** | **6·8** | **4·2** | **6·4** | **10·1** |
| 2·1 खनिकर्म व दगड उद्योग | 5·4 | 5·6 | 2·5 | 7·5 | 5·9 |
| 2.2 वस्तुनिर्माण | 5·4 | 6·7 | 4·1 | 6·2 | 10·7 |
| 2·3 वीज, वायू व पाणी पुरवठा | 9·0 | 11·4 | 7·6 | 8·2 | 8·3 |
| **3 सेवा** | **4·9** | **4·8** | **3·8** | **5·8** | **7·5** |
| 3·1 बांधकाम | 4·6 | 6·7 | 1·6 | 4·2 | 4·7 |
| 3·2 व्यापार | 5·1 | 5·8 | 3·8 | 5·5 | 10·9 |
| 3·3 हॉटेल व उपाहार गृहे | 5·2 | 5·6 | 3·9 | 5·7 | 14·6 |
| 3·4 रेल्वे | 4·0 | 5·5 | 2·8 | 3·8 | 2·6 |
| 3·5 इतर परिवहन | 6·8 | 6·7 | 6·4 | 7·8 | 7·6 |
| 3·6 साठवण | 5·0 | 2·3 | 3·5 | 3·7 | 2·1 |
| 3·7 दळणवळण | 6·7 | 7·2 | 5·8 | 6·4 | 15·2 |
| 3·8 बँक व्यवसाय व विमा | 8·1 | 7·4 | 6·2 | 10·8 | 9·8 |
| 3·9 स्थावर संपदा | 3·0 | 2·3 | 2.9 | 3·5 | 3·7 |
| 3·10 सरकारी प्रशासन व संरक्षण | 6·4 | 6·6 | 6·1 | 7·0 | 3·4 |
| 3·11 इतर सेवा | 3·9 | 3·3 | 3·2 | 5·1 | 5·6 |
| **घटक परिव्ययानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादित (GDP at factor cost)** | **4·0** | **3·9** | **3·6** | **4·9** | **6·8** |

## पैसारूप स्थूल देशांतर्गत बचत दर आणि त्याचे घटक

(चालू बाजार किमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादिताशी टक्केवारी)

| तपशील | 1950-51 ते 1967-68 | 1968-69 ते 1975-76 | 1976-77 ते 1978-79 | 1979-80 ते 1984-85 | 1985-86 ते 1992-93 | 1993-94 ते 1995-96 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 **घरगुती क्षेत्र** | **8·4** | **11·7** | **15·8** | **14·3** | **17·1** | **19·2** |
| | (70·9) | (72·2) | (72·2) | (72·2) | (79·4) | (78·5) |
| 1·1 घरगुती वित्तीय बचती | 2·5 | 3·6 | 6·1 | 6·5 | 8·4 | 10·7 |
| | (20·1) | (22·1) | (27·8) | (33·1) | (38·8) | (43·8) |
| 1·2 घरगुती वस्तुरूप बचती | 6·0 | 8·1 | 9·7 | 7·8 | 8·8 | 8·5 |
| | (50·7) | (50·1) | (44·4) | (39·1) | (40·6) | (34·6) |
| 2 **खाजगी निगम बचती** | **1·3** | **1·5** | **1·4** | **1·7** | **2·4** | **3·9** |
| | (10·7) | (9·4) | (6·6) | (8·6) | (10·9) | (15·8) |
| 3 **सरकारी क्षेत्राच्या बचती** | **2·2** | **3·0** | **4·6** | **3·8** | **2·0** | **1·4** |
| | (18·4) | (18·4) | (21·2) | (19·2) | (9·7) | (5·7) |
| 3·1 सरकारी प्राधिकरणे | 1·8 | 2·0 | 3·1 | 1·8 | –1·1 | –1·8 |
| 3·2 बिगर-विभागीय उपक्रम | 0·4 | 1·0 | 1·5 | 2·0 | 3·1 | 3·2 |
| 4 **स्थूल देशांतर्गत बचत** | **11·9** | **16·2** | **21·8** | **19·8** | **21·5** | **24·5** |

**टीप** : कंसातील आकडे स्थूल देशांतर्गत बचतीशी टक्केवारी दर्शवितात.

## घरगुती निव्वळ वित्तीय बचतींची विभागणी

(टक्केवारी)

| तपशील | 1954-55 ते 1967-68 | 1968-69 ते 1975-76 | 1976-77 ते 1978-79 | 1979-80 ते 1984-85 | 1985-86 ते 1992-93 | 1993-94 ते 1995-96 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 रोख पैसा (चलन) | 25·3 | 22·4 | 19·2 | 17·3 | 14·3 | 15·1 |
| 2 निव्वळ ठेवी | 18·2 | 27·2 | 42·6 | 31·5 | 24·9 | 31·8 |
| 3 भाग व कर्जरोखे | 12·9 | 4·9 | 3·3 | 5·6 | 14·4 | 11·1 |
| 4 सरकारकडील निव्वळ येणी | 8·7 | –3·1 | 1·8 | 11·8 | 12·9 | 9·6 |
| 5 आयुर्विमा निधी | 11·1 | 13·4 | 9·7 | 9·9 | 10·2 | 11·3 |
| 6 भविष्यनिर्वाह व निवृत्तीवेतन निधी | 23·9 | 35·1 | 23·3 | 24·0 | 23·3 | 21·1 |
| **घरगुती निव्वळ वित्तीय बचती** | **100·0** | **100·0** | **100·0** | **100·0** | **100·0** | **100·0** |

## गुंतवणुकीची क्षेत्रनिहाय व जिंदगीनिहाय विभागणी

(चालू बाजार किमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादिताशी टक्केवारी)

| तपशील | 1950-51 ते 1967-68 | 1968-69 ते 1975-76 | 1976-77 ते 1978-79 | 1979-80 ते 1984-85 | 1985-86 ते 1992-93 | 1993-94 ते 1995-96 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 क्षेत्रनिहाय स्थूल भांडवलनिर्मिती | | | | | | |
| 1·1 घरगुती | 5·9 (43·4) | 8·1 (45·7) | 9·7 (46·2) | 7·8 (35·4) | 8·8 (36·8) | 8·5 (35·3) |
| 1·2 खाजगी निगम | 2·4 (16·7) | 2·6 (14·3) | 2·0 (9·7) | 4·0 (18·2) | 4·9 (20·8) | 6·9 (28·9) |
| 1·3 सरकारी क्षेत्र | 5·8 (39·9) | 7·2 (40·0) | 9·3 (44·0) | 10·2 (46·3) | 10·1 (42·4) | 8·5 (35·7) |
| 2 जिंदगीनिहाय स्थूल भांडवलनिर्मिती | | | | | | |
| 2·1 बांधकाम | 7·8 (56·9) | 8·9 (50·5) | 10·1 (48·2) | 9·9 (45·0) | 10·6 (44·6) | 10·0 (42·1) |
| 2·2 यंत्रे व उपकरणे | 4·8 (33·5) | 6·3 (35·3) | 7·9 (37·8) | 9·5 (43·4) | 11·3 (47·7) | 12·8 (53·6) |
| 2·3 साठ्यांतील बदल | 1·5 (9·6) | 2·6 (14·1) | 3·0 (14·0) | 2·6 (11·6) | 1·9 (7·7) | 1·1 (4·3) |
| 3 स्थूल भांडवलनिर्मिती | **14·1 (100·0)** | **17·8 (100·0)** | **21·0 (100·0)** | **22·1 (100·0)** | **23·8 (100·0)** | **24·0 (100·0)** |
| 4 गुंतवणूक (स्थूल देशांतर्गत भांडवलनिर्मिती) | **13·7** | **16·9** | **20·8** | **21·1** | **23·8** | **25·7** |
| 5 देशांतर्गत बचत–गुंतवणूक अंतर (gap) | **–1·8** | **–0·7** | **1·0** | **–1·1** | **–2·3** | **–1·1** |

टीप : कंसातील आकडे स्थूल भांडवलनिर्मितीशी टक्केवारी दाखवितात.

## चालू बाजार किमतीनुसार वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पादिताचा अभिवृद्धी दर, बचत दर आणि वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर

| कालखंड | अभिवृद्धी दर (टक्के) | बचत दर (टक्के) | वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर (ICOR) |
|---|---|---|---|
| पहिला : 1951–52 ते 1964–65 | 4·22 | 16·56 | 3·92 |
| दुसरा : 1965–66 ते 1975–76 | 3·52 | 19·94 | 5·66 |
| तिसरा : 1976–77 ते 1991–92 | 5·05 | 22·62 | 4·48 |
| चौथा : 1992–93 ते 1995–96 | 6·67 | 26·71 | 4·00 |
| **संपूर्ण कालखंड : 1950–51 ते 1995–96** | **4·12** | **20·11** | **4·88** |

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्यांची यादी

(जानेवारी–मार्च 1997 अंकावरून पुढे चालू)

760 प्रा. दिलीप बाबूराव पवार (सातारा)
761 श्री. सुनील गोपाळ रत्नपारखी, मंगळवेढा (सोलापूर)
762 श्री. संजीव एस. कोठाडिया, पंढरपूर (सोलापूर)
763 प्रा. देविदास रूपचंद्र अग्रवाल, अमरावती
764 डॉ. राजीव मधुकर सदन, अमरावती
765 सौ. विद्या प्रल्हाद कट्टी, कोल्हापूर
766 प्रा. प्रवीण केंपण्णा जाधव, पुणे
767 कु. प्रमिला जयवंतराव पाटील, शिमाव (सांगली)
768 श्री. सुधाकर कृष्णाजी तासगांवकर, पुणे
769 श्री. व. प्र. शिंपी, पुणे
770 प्रा. विष्णु बळिरामजी गठीकर, अमरावती
771 प्रा. सुरेश नामदेवराव भटकर, यवतमाळ
772 डॉ. संजय कप्तान, अमरावती
773 डॉ. अशोक त्रिंबकराव पांडे, अमरावती
774 प्रा. प्रभाकर नरसिंह पित्रे, पुणे
775 श्री. प्रमोद बापूराव पुजारी, सांगली
776 डॉ. अजितकुमार आनंदराव डांगे, कोल्हापूर
777 श्री. दत्तात्रय नारायण कुलकर्णी, पुणे
778 श्री. दि. मा. मोरे, औरंगाबाद
779 श्री. स. म. पाटील, पुणे
780 श्री. म. सु. इंगळे, औरंगाबाद
781 प्रा. माधव रा. चिटणीस, पुणे
782 प्रा. एस डब्ल्यू. मिसाळ, भोर (पुणे)
783 श्री. अरुण राजाराम कुंभार, निपाणी (बेळगाव)
784 प्राचार्य खासेराव हणवंत शितोळे, अहमदनगर
785 श्री. प्रकाश बाळासाहेब जाधव, नागपूर
786 डॉ. सुमती कुलकर्णी, मुंबई

787 प्रा. किसन रुख्माजी जाधव, अमरावती
788 सौ. नलिनी मधुकरराव अंबारे, अमरावती
789 डॉ. दादासाहेब शिंदे, पुणे
790 कु. पद्‌मश्री बाळासाहेब मुजुमदार, सांगली
791 श्री. विजय गोविंदराव कांत, उचलपूर (अमरावती)
792 सौ. विभा जयंत सावरकर, अमरावती
793 प्रा. बद्रीनाथ हिरालाल दामजी, सोलापूर
794 श्री. श्रीनिवास व्यंकटनरम कोडम, सोलापूर
795 डॉ. व्ही. एम. चव्हाण, कोल्हापूर

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## घटना दुरुस्तीसाठी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेची सुधारित घटना दिनांक 1–4–1988 पासून अमलात आहे. अमळनेर येथे दिनांक 18 नोव्हेंबर, 1996 रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेने तसेच अहमदनगर येथे दिनांक 23 नोव्हेंबर, 1997 रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार घटना दुरुस्तीच्या संदर्भात सदस्यांकडून विहित नमुन्यात सूचना मागविण्यात येत आहेत. नमुना असा :

| घटनेतील मूळ कलम | सुचविलेले दुरुस्त कलम | दुरुस्तीचे समर्थन |
|---|---|---|

कृपया आपल्या सूचना कार्यवाह–खजिनदारांकडे दिनांक 15 एप्रिल, 1998 पर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवाव्यात. परिषदेची सुधारित घटना 'अर्थसंवाद' च्या खंड 13, अंक 1 मध्ये छापलेली आहे ती पाहावी.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह–खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## बाविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बाविसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर/नोव्हेंबर, 1998 मध्ये **शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे** आयोजित होणार आहे. औरंगाबाद येथील अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक **र. पु. कुरुलकर** अध्यक्षस्थानी राहतील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत.

(1) आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप.

(2) भारतातील बेकारीचा प्रश्न.

(3) महाराष्ट्राची ऊर्जा समस्या.

चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. वरील **विषयांची रूपरेषा** 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च 1998 अंकात देण्यात येईल.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून **निबंधासोबत** 300 **शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे** अनिवार्य **आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.**

निबंध मराठीतच असावेत. **ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत.** लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे/शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव आणि पत्ता हा सर्व तपशील **मराठीतच** देणे आवश्यक आहे.

**31 ऑगस्ट,** 1998 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत, निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

**डॉ. र. पु. कुरुलकर,** 987, **'इंदिरा', कोतवालपुरा,**
**औरंगाबाद** – 431 001.

**आ. गो. पुजारी**
कार्यवाह–खजिनदार

# जगा आणि जगू द्या

निसर्गाने प्रत्येक जीवमात्राला जगण्याचा अधिकार व जगण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. तेव्हा मानवाने स्वतःची भूक भागविण्यासाठी प्राणीमात्रांची हत्या करणे म्हणजे प्राणीमात्रांचा जगण्याचा नैसर्गिक अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घेणे होय. यापासून दूर राहणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. त्यासाठी प्राण्यांच्या कत्तली होणार नाहीत याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न करायला पाहिजेत. 'जगा आणि जगू द्या' हे अहिंसा तत्त्वाचे मूलभूत अधिष्ठान आहे.

– एक मानवतावादी



**'अर्थसंवाद' च्या ज्ञानयज्ञासाठी**
**आचार्य श्री पुण्यानंदसूरीश्वरजी महाराज**
**यांचा शुभसंदेश**